


# शोध माणूसपणाचा

विवेक उगलमुगले



# शोध माणूसपणाचा

विवेक उगलमुगले

कादवा शिवार प्रकाशन

**Shodh Manuspanacha**
**Vivek Ugalmugale**

शोध माणूसपणाचा
विवेक चिंतामण उगलमुगले
सुसंवाद : ९४२२९४६१०६.
**प्रथम आवृत्ती**
७ जून २०११
**हक्क :**
सुनीता विवेक उगलमुगले
४२, सुशेय, खुटवडनगर,
कामटवाडे, नाशिक : ४२२००८.
**प्रकाशन :**
कादवा शिवार प्रकाशन, नाशिक
विजयकुमार मिठे
पालखेड बंधारा,
तालुका दिंडारी, नाशिक.
मोबाईल : ९८८१६७०२०४
kadvashivar@gmail.com
**मुखपृष्ठ**
शिशिर शिंदे
shishir.shinde@rediffmail.com
**अंतर्गत सजावट**
दीपक दंडवते
**मुद्रक**
रिप्लिका प्रिंटर्स, वकिलवाडी, नाशिक.
**मूल्य**
२५०/- रुपये

**आदरणीय डॉ. रुक्मिणी आणि**

**डॉ. मनोहर प्रल्हादराव कराड,**

१९८३ साली ससून हॉस्पिटल, पुणे येथे आपण मला जीवनदान दिले. म्हणून या बोनस आयुष्यात मी अधिक जाणिवेने लिहिता-वाचता झालो. त्यातूनच 'माणूसकीचा शोध' घेण्याची मला आस लागली. त्यातीलच ही काही निवडक व्यक्तिचित्र! प्रिय अप्पासाहेब, आपल्या उभयतांचे माझ्या आयुष्यातील स्थान निर्मिकाइतकेच थोर नि महत्त्वाचे!

आपल्या 'सर्जन'शील माणूसपणाला

माझा हा मनोभावो कृतज्ञ नमस्कार.

**- विवेक**

# परिचय

**नाव** : **विवेक चिंतामण उगलमुगले**

पत्ता : 'सुशेय', प्लॉट नंबर ४२, खुटवडनगर, कामटवाडे, नाशिक : ४२२००८.

भ्रमणध्वनी : ९४२२९४६१०६

जन्मतारीख : १९ फेब्रुवारी १९६६

शिक्षण : वाणिज्य पदवीधर

: साहित्यभूषण पदवी परीक्षा

**प्रकाशित साहित्य (कवितासंग्रह) :**

- दिवाण्या आणि तोड्या
- सायकलवरच्या कविता
- प्रिय आई बाबांच्या शोधात
- आठवणींची फुलं

**बाल कवितासंग्रह**

- दाट सायीचे गाव
- हॅपी होम
- रोजनिशी एका चिमुरडीची

**व्यक्तिचित्रसंग्रह**

- शोध माणूसपणाचा

**पुरस्कार**

- तिफन पुरस्कार
- कै. लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार
- वाङ्मय सेवा पुरस्कार
- कवी गोविंद पुरस्कार
- शब्दश्री पुरस्कार
- गोदाभूषण पुरस्कार
- वैनतेय पुरस्कार
- कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार
- बालकुमार साहित्य सभा (कोल्हापूर) पुरस्कार
- स्व. केशवराव चुटके काव्य पुरस्कार

**इतर**

- कार्यकारी संपादक, व्यासपीठ दिवाळी अंक
- सहसचिव, शा.क.सा.वा., नाशिक.
- ग्रंथसचिव, डॉ. सुधीर फडके सार्वजनिक वाचनालय
- आकाशवाणी नाशिक व जळगाव वरून काव्यवाचन, ललित, प्रसारणाचे अनेक कार्यक्रम.
- प्रमुख कवी, कवितेची पाऊलवाट (काव्यवाचन)

# मनोगत

- कवी रवींद्र मालुंजकर यांच्यावर मी लिहिलेला लेख प्रसिद्ध झाला. प्रतिक्रिया म्हणून त्यांना पन्नासेक फोन आले. ही केवळ माझ्या लेखनाची किमया नव्हती. मालुंजकर स्वत:च मोठे होते, मी त्यांचं मोठेपण अधोरेखित केलं इतकंच!
- 'कुशावर्ता' या घरकाम करणाऱ्या मुलीवर लिहिलं तेव्हा तो लेख खूप जणांना आवडला. तसे काही फोन्स मला आले. शिवाय कुशावर्तानेही तो लेख कुठेकुठे नेऊन कौतुकाने दाखवला. तिचंही साऱ्यांनी कौतुक केलं. त्यापैकी एक जोडपे घरी येऊन मला भेटले, 'तुमचा हा लेख वाचून आजपासून आम्ही दररोजच्या भांड्यांमध्ये काही भांडे कमीच टाकू!', असं त्यांनी सांगितलं. म्हणजे प्रत्येकात असं 'माणूसपण' असतंच. मी तशी जाणीव करून दिली इतकंच!
- भारताचे गृहराज्यमंत्रीपद भूषविलेले मा.खा. श्री. माणिकराव गावित (दादासाहेब), प्रा. ग.प्र. प्रधान, पाणीवाले बाबा राजेंद्रसिंग, कवी अशोक नायगावकर यांच्यासारखे सन्माननीय, प्रसिद्ध असे अपवाद वगळता, मुख्यत्वे प्रसिद्धीपासून दूर राहिलेल्या माणसांवर लिहिण्याचा माझा प्रयत्न राहिलेला आहे.

- म्हणजे या संग्रहात कवी, साहित्यिक, चित्रकार, नेपथ्यकार, रक्तमित्र, शास्त्रज्ञ, रेडिओ जॉकी, उद्योजक, सूत्रसंचालक, स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेली जुणी-जाणती माणसं, सामाजिक कार्यकर्ते, ग्रंथमित्र व वाचक चळवळीतील कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार, मित्र, नात्यातील माणसं तसेच थेट रस्त्यावरच्या माणसांवर मी लिहिलेलं आहे. ते मुद्दाम किंवा अट्टहास म्हणून नाही तर 'शोध माणूसपणाचा' या माझ्या प्रयत्नांचा तो एक भाग आहे.
- या संग्रहात एक व्यक्तिचित्र विहिरीचे आहे. त्या विहिरीत मला 'गोदाई' दिसली.
- थोर साहित्यिक, कवींवरही मी वृत्तपत्रांतून लिहिलेलं आहे. ते त्या-त्या संपादकांच्या सूचनेवरून. मात्र खलील मोमीन, चंद्रकांत महामिने यांसारख्या थोर साहित्यिकांवर मी माझ्या आदरापोटी लिहिलेलं आहे. अर्थातच ही संख्या अधिक मोठी आहे.
- मूळात मी एक कवी आहे. त्यामुळे या सर्व माणसांवर लिहिताना मी ते किती अचूक लिहिलं आहे, यापेक्षा मी ते अधिक संवेदनशीलतेने लिहिलेलं आहे, असं मला वाटतं.
- मी लिहिलेली सगळीच (जवळपास सत्तरएक) व्यक्तिचित्रं, लेख यात समाविष्ट नाहीत. 'माझे तीर्थरूप : अण्णांविषयी' हा लेख मला मनाजोगता लिहिता आला नाही, असे वाटल्यामुळे तो लेख या संग्रहात समाविष्ट नाही. मात्र 'आठवणी : प्रिय निफाडच्या' या माझ्या आगामी पुस्तकात तो असेल.
- आदरणीय प्रा. ग.प्र. प्रधानमास्तरांची मी घेतलेली मुलाखत त्यांना स्वत:ला आवडली होती. तसं पत्रंही त्यांनी मला पाठवलेलं होतं. परंतु माझ्या त्या मुलाखतीत कुठलाच असा नवीन मुद्दा आलेला नाही. असं असं लक्षात आल्यावर तोही लेख वगळण्याचा मी निर्णय घेतला.

- कालौघात यातील काही माणसं आपल्यातून निघून गेली. त्यात आदरणीय प्रधान सर, गीतकार पंढरीनाथ सोनवणी, शेखसाहेब इनामदार, कवी अरुण काळे, पुंडलिक मोरजे, गोपाळराव देशपांडे, पंढरीनाथअण्णा सोनवणी, मोहनराव गायकवाड, माझे काका-मदन शंकर उगलमुगले (टलू तात्या) यांची आज तीव्रतेने आठवण येत आहे.
- मला व्यक्तिचित्र/चेहरे लेखनासाठी विपूल संधी देणारे आणि माझं मनापासून कौतुक करणारे माझे पत्रकारमित्र श्री. किरण पाध्ये यांचा मी मनापासून आभारी आहे.
- मध्यंतरी माझी काही पुस्तकं 'ऑप्टेटिव्ह प्रकाशन'चे माझे मित्र अनिल दंडगव्हाळ आणि सचिन मालेगावकर यांनी प्रकाशित केली. परंतु यावेळी 'कादवा शिवार'चे वितरक आणि आमचे युवामित्र सुनील जगताप (पालखेड बंधारा) यांनी हे पुस्तक 'कादवा शिवार'कडे द्यावं, असा आग्रह केला. 'कादवा शिवार'चे संपादक श्री. विजयकुमार मिठे यांनीही तशी संमती दर्शविली. त्यामुळे 'कादवा शिवार' प्रकाशनचा मी विशेष आभारी आहे.
- 'शोध माणूसपणाचा'मध्ये मुख्यत्वे 'कॉमनमॅन' किंवा चौकटीबाहेरची माणसं माझ्या लेखनाचा विषय झालेली आहेत. त्यांच्यातील माणूसपण अधोरेखित करताना मीच मला समजत गेलो, असं मला मनापासून वाटतं.
- संग्रहाचं मुखपृष्ठ युवा चित्रकार शिशिर शिंदे यांनी रेखाटलं आहे. एक वेगळी शैली आणि समर्पक आशय त्यांच्या चित्रांमध्ये निश्चितच आहे. दीड मिनिटांत पूर्ण होणारी त्यांची काही चित्रं अत्यंत लोकप्रिय झालेली आहेत. त्यातलंच एक चित्र त्यांनी 'शोध माणूसपणा'साठी आवर्जून रेखाटलं. आमचे मित्र इंजि. प्रशांत गोवर्धन यांनीही याकामी योग्य ते सहकार्य दिले. या दोन तरुण मित्रांचा मी मनापासून आभारी आहे.

- ‘शोध माणूसपणाचा’ची अंतर्गत सजावट करणारे माझे मित्र श्री. दीपक दंडवते, रिप्लिका प्रिंटर्सचे नरेंद्र शाळीग्राम, अभिजित कुलकर्णी तसेच याकामी ज्या-ज्या मित्रांचं सहकार्य मला मिळाले, त्या सर्वांविषयी मन:पूर्वक कृतज्ञता आणि ऋण व्यक्त करतो.
- या संग्रहात विविध क्षेत्रातील व्यक्तींवर लिहिल्यामुळे पुस्तकातील अधिक-उणेबद्दल कृपया आपण जरूर कळावे, ही नम्र विनंती.

**विवेक उगलमुगले**
चलभाष : ९४२२९४६१०६

# अंतरंग


| | |
|---|---|
| आमचे दादा चंद्रकांत महामिने | ११ |
| 'माझं काम हिच माझी ओळख!' मा.खा. माणिकराव गावित | १८ |
| एक सुंदर तरल भावकवी खलील मोमीन | ३२ |
| ग्रंथपंढरीचा वारकरी रामचंद्र काकड सर | ३८ |
| कष्टाळू हातांची कुशावर्ता | ४३ |
| एक भक्कम वाचक माणूस हेमंत पोतदार | ४९ |
| तिची गोष्टच वेगळी रोहिणीताई नायडू | ६७ |
| सर्वार्थानं सुंदर 'ननो' नीला यशवंत कुलकर्णी | ८० |
| चिंतनशील कवी विलास शेळके | ९० |
| कादवेचा राणा विजयकुमार मिठे | ९७ |
| प्रयोगशील चित्रकार धनंजय गोवर्धने | १०५ |
| अजातशत्रू कार्यकर्ता सुमंतकाका गुजराथी | ११० |
| प्रयोगशील नेपथ्यकार अरुण रहाणे | ११५ |
| पालक परिवाराचा शिलेदार शिरीष भालेराव | १२१ |
| कर्तव्यनिष्ठ उद्योजक पुंजाभाऊ सांगळे | १२९ |
| माझे गुरुवर्य भालचंद्र अनंत मोगल (सर) | १३७ |
| सूत्रसंचालक : कवी रवी! रवींद्र मालुंजकर | १४५ |
| अजुनि चालतोचि वाट द.शं. नाईक | १५३ |
| शैलीदार डॉ. शंकर बोऱ्हाडे | १५९ |
| लाखमोलाचा चित्रकार मित्र अवी जाधव | १६७ |
| कवितेचा लसलसता कोंब किरण भावसार | १७६ |

| | |
|---|---|
| अखंड चांगलं 'लिहिता' हात तुकाराम नवले | १८४ |
| दोन तरुण मित्रांविषयी राजेंद्र सोमवंशी, सुहास सुरळीकर | १९१ |
| जिद्दीमोहन पगारे | १९९ |
| गोष्ट समंजस आक्काची सौ.वंदना सांगळे | २०४ |
| एक वेगळा सेंच्युरियन प्रदीप गुजराथी | २११ |
| ताजं टवटवीत जगणं पुंडलिक फालक | २१६ |
| नाविन्यपूर्ण संगीतकार मधुकर झिराडकर | २२१ |
| निवेदक क्षेत्रातील परिपूर्ण आवाज स्मिता रणदिवे | २२६ |
| वैशिष्ट्यपूर्ण कर्मचारी सुभाष दिवटे | २३४ |
| सच्चा हिंदुस्थानी शेख साहेब इनामदार | २३७ |
| अर्थपूर्ण बांधिलकीचे चेहरे संजय श्रीवास्तव अरुण भुतडा | २४३ |
| तरुण वैज्ञानिक इला खुळगे-देशपांडे | २४७ |
| स्मृतिरूप शीघ्रकवी गोपाळराव देशपांडे | २५२ |
| जुनं ते सोनं पंढरीनाथ सोनवणी | २५७ |
| विदाऊट शॉप-टीपटॉप! चंद्रकांत दत्तात्रय चांढोले | २६२ |
| श्रद्धेनं गाणारा गळा स्नेहल मालपाठक | २६७ |
| आमचे टलूतात्या मदन शंकर उगलमुगले | २७२ |
| एक मनस्वी कवी कैलास पगारे | २८० |
| वेगळ्या वाटेचा प्रवासी राहुल रघुवीर फालक | २८६ |
| हनी आर्या कुलकर्णी | २९० |
| इगतपुरीचा मनस्वी कवी तुकाराम धांडे | २९४ |
| गोष्ट : एका जिवंत विहिरीची | ३०५ |
| सत्यकथा मोहनराव गायकवाड | ३११ |
| उद्याचा मोठा पत्रकार सागर पांढरे ! | ३१६ |



# आमचे दादा
# चंद्रकांत महामिने

ज्येष्ठ विनोदी लेखक चंद्रकांत महामिने यांना आम्ही सर्व मित्र 'दादा' म्हणतो. कारण एखाद्या मोठ्या भावासारखं किंवा वडिलकीच्या नात्याने ते आमच्यावर प्रेम करतात. मराठी विनोदी वाङ्मय प्रकारात आपल्या लेखनामुळे चंद्रकांत महामिने हे खऱ्यार्थाने 'दादा' ठरावेत इतकं विपुल, सातत्याने आणि चौफेर लेखन त्यांच्या हातून होत आहे. दरवर्षी त्यांच्या पुस्तकांना वाचकांकडून अगदी भरभरून मागणी असते. विनोदी साहित्यिकांमध्ये एक मानाचं पान ठरावेत, अशी लक्षणीय कामगिरी त्यांनी करून ठेवलेली आहे.

दादांच्या नावावर त्यांच्या वयाइतकीच (७५) पुस्तके आज आहेत. त्यांच्या विविध साहित्य कृतींबद्दल त्यांना महाराष्ट्रभरच्या मान्यवर संस्थांनी पुरस्कार देऊन दादांना गौरविलेलं आहे. ही सगळी बक्षीसं, स्मृतिचिन्ह ठेवायला दादांचं चांगलं मोठंधाटं घर अक्षरश: कमी पडतंय.

होय, दादांच्या मनाइतकंच त्यांचं घरही प्रशस्त आहे. कारण या घरात त्यांच्या स्वत:च्या पुस्तकांच्या प्रती, गेल्या तीस वर्षांपासून दरवर्षी चांगल्या तीस-चाळीस दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झालेलं त्यांचं साहित्य यामुळे आलेले अंक, वृत्तपत्रात वर्षानुवर्षे चालवलेली विविध सदर लेखनाची कात्रणं, प्रासंगिक लेखन, आकाशवाणीच्या श्रृतिका, नभोनाट्य,

वगनाट्य, अभिप्रायार्थ आलेली तसेच स्वत:च्या वाचनासाठी म्हणून आणलेली पुस्तकं, वाचकांची पत्रे आदी अक्षर मांदियाळीमुळे दादांचं भरलं घर 'श्रीमंत' असं वाटतं. शिवाय दादांच्या लेखन-टेबलावर, टीपॉयवर ताजी दैनिकं, साप्ताहिके, मासिकंही दादांची गरज बनून राहिलेली आहे. दादा भरपूर वाचतातही!

दादांच्या घरी पहिल्यांदा केव्हा गेलो, नेमकं आठवत नाही, पण मला वाटतं, ते १९९३ साल असावं. मनात मोठ्या लेखकाला भेटण्याची व त्यांच्याशी साहित्यावर गप्पा मारण्याची उर्मी होती. पहिल्याच भेटीत आवडलेल्या माणसात 'दादा' एक आहेत. आपल्या गावचाच माणूस शोभावा, अशी त्यांची घरातली साधीशी राहणी. अंगात कोपरी, पांढरा स्वच्छ पायजमा, सावळासा रंग, केस मागे वळवलेले, डोळ्यांवर चष्मा, कमरदुखीसाठीचा पट्टा पोटावर आवळलेला.

''या या कविराज'' म्हणून माझं आपुलकीनं स्वागत झालं. मला हा अनुभव नवीन होता. त्यानंतर चहा-पाणी, बिस्किट्स, विचारपूस आणि वरून ''लिहितं रहा रेऽ''चा तोंडभरून आशीर्वाद. त्यानंतर भेटीसाठी कुठलीही पूर्वपरवानगी, फोनबिन न करता दादांच्या घरी जावं. 'भगवती' या त्यांच्या पी ॲण्ड टी कॉलनीतल्या बंगल्यात दादांनी नेहमीच आमचं 'दिलसे' स्वागत केलं. बरोबरीच्या नात्याने मनमोकळ्या गप्पा मारल्या. दादांचे साहित्यिक मित्र मनोहर शहाणे असोत, अप्पा टिळक असोत किंवा आम्ही पोरगेलेसे कवी असोत दादा प्रत्येकाला सारखाच रिस्पेक्ट देतात. बोलण्यात कधी कडवटपणा नाही, कुणावर नाराजी नाही, भोगलेल्या परिस्थितीचं उदात्तीकरण नाही. मिळालेल्या पुरस्कारांची, मोठेपणाची शेखी नाही. एक विलक्षण निरलस प्रेमाचं माणूस म्हणजे आमचे दादा. एक अजातशत्रू माणूस म्हणूनही दादांची आम्हाला ओळख आहे.

दादांबरोबर काही कविसंमेलनात मी एक कवी होतो. दादा प्रत्येकाची काळजी घेतात. दिलखुलास दाद किंवा सूचनाही करतात. मुख्य म्हणजे

समोरच्याचं मन:पूर्वकतेने ऐकतात. पेहराव तोच शर्ट, पायजमा, कापडी बूट, जाकीट आणि खांद्याला शबनम आणि हो गळ्याभोवती उपरणं. दादांचं हे रूप पाहिलं की, खेड्यापाड्यातील लेखक-कवी आणि रसिकही दादांजवळ येऊन मनमोकळ्या गप्पा मारतात. दादांना माणसांशी बोलायला नेहमीच आवडतं.

स्वत: एक विनोदी लेखक असून या प्रकारातील साहित्यिकांची व साहित्याची 'वाणवा' पाहता आम्हा कवींना, ''अरे तुम्ही नवीन लोकांनी विनोदी साहित्यात लक्ष घाला रे, त्यात खूप मोठी संधी आहे तुम्हाला'', असे दादा आम्हाला सांगत असतात. आम्ही प्रयत्न केलाच नाही, असं नाही, पण विनोदी लेखन करणं, हे वाटतं तितकं सोपं काम नक्कीच नाही. त्यावर दादांचं सांगणं असतं, ''भरपूर वाचा, माणसं वाचा, सूक्ष्म निरीक्षण करा, चिंतन करा.'' दादा पोटतिडकीने सांगतात. आम्ही पोरं कविता, ललित, कथेतच दंग!

दादांचं मला सर्वाधिक आवडलेलं पुस्तक म्हणजे त्यांचं 'प्रवराकाठची माणसं.' त्यानंतरही दादांची अनेक पुस्तकं मी आवर्जून वाचली. ती सगळीच आवडली असंही नाही, पण त्यांच्या जिद्दीचं, माणसं वाचण्याचं, कॉमन मॅन केंद्रस्थानी मानून सातत्याने लिहीत राहण्याचं मला कौतुक वाटत राहतं. महाराष्ट्र शासनाची उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मिती पुरस्कार मिळालेली त्यांची पुस्तकं मी आवर्जून वाचली. या पुस्तकातलं मला काय भावलं तर ते दादांचं सच्चेपण! एक सर्वसामान्य माणूस कसा जगतो, त्याच्या भावभावना, गावचा परिसर, गावगुंडी, माणसांची स्वप्ने, मातीचा सुगंध, अशा मगदुराचं दादांचं लेखन वाचकाला 'आपलं' वाटतं.

दादा मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातील कोल्हार बुद्रुक गावचे. त्यामुळे गावचा तो अस्सल गावराणपणा त्यांच्या लेखनातून पुरेपूर उतरतो. कधीकाळी लहानपणी डोक्यावर पाटी घेऊन शेव-मुरमुरे विकणारा आणि आपल्या घरच्या खाणावळीत गरीब परिस्थितीमुळे पडेल ते काम करणाऱ्या दादांनी विलक्षण असे जीवनानुभव घेतले आहेत.

रेवड्याच्या बक्षिसांवर कुस्त्या मारल्याहेत. चोरून तमाशा पाहिलाय. मित्रांच्यात धमाल चर्चा ऐकल्याहेत. त्यामुळे की काय दादांच्या कथेतील नायक कधीच पराभूत होत नाही, हार मानत नाही. तो लढत राहतो. विजयी वगैरे होतो.

आपला स्वत:चा नर्मविनोदी स्वभाव, खुसखुशीतपणा ते आपल्या लेखनात आणतात. खेड्यातील बदलती जीवनशैली, तेथील भाषा, संवाद, म्हणी, रांगडेपणा, ग्राम्य मानसिकतेला एक विनोदी डूब देण्यात दादांचा हातखंडा आहे. सूक्ष्म निरीक्षण, वास्तवाला भिडायचं धैर्य यामुळे आपल्या माणसांना न्याय देण्यात दादा कुठेच कमी पडत नाही. समाजातील व्यंग, अनैतिकता, भ्रष्टाचार, फसवेगिरी, गुंडगिरी यांच्यावर हल्ला करताना दादांची लेखणी दमत नाही. मग ती कधी कथा असते, कधी कादंबरी, कधी श्रृतिका तर कधी कविताही असते. दादा सातत्याने अभिव्यक्त होत राहतात.

दूरसंचारसारख्या स्थिर सरकारी खात्यातून सेवानिवृत्त झालेले महामिने दादा वयाच्या पंच्याहत्तरीनंतरही छान ताजे, टवटवीत लिहितात. वाटतात. संवेदनशीलतेबरोबरच 'विनोदी' पण आपल्या हाडीमासी मुरवून घेतल्यामुळेच जीवनाबरोबरच त्यांचा साहित्यप्रवास सुखकर झालाय, असं दादांना वाटतं. त्यामुळे गेल्या अर्धशतकापासून दादा दमदारपणे विनोदी लेखन करताहेत.

दादांचा पिंड सेवादलाचा! त्यामुळे दादांशी माझं नातं अधिक जवळचं. माझे वडील सेवादलाचे. मी छात्रभारतीवाला. त्यामुळे दादांमधला एक साधा, सच्चा, निगर्वी, अगत्यशील असा थोर माणूस मला त्यांच्यातील साहित्यिकाइतकाच अधिक महत्त्वाचा आणि मोठा असा वाटत आलेला आहे.

माझी प्रकाशित सर्व पुस्तकं त्यांनी आवर्जून वाचली. त्यांचं कौतुक केलं. परंतु त्यापैकी 'प्रिय आई-बाबांच्या शोधात' हे पुस्तक त्यांनी रात्री वाचून पहाटे लगेच मला फोन केला, ''कविराज, तुमचं पुस्तक रात्री

वाचलं. आवडलं. म्हणून आमच्या सौंनाही ते वाचायला दिलं. त्यांनीही ते वाचलं. त्यांनाही ते खूप आवडलं. न राहवून तुमच्याच पुस्तकामागे अभिप्राय म्हणून मी काही लिहून ठेवलंय, तुम्हाला शुभेच्छा व अभिनंदन!''

ज्येष्ठ म्हणावीत अशी दादांसारखी माणसं इतकी संवेदनशील कशी राहू शकतात, हे मला पडलेलं एक कोडं. परंतु विजयकुमार मिठे असतील, रवींद्र मालुंजकर, गौरवकुमार आठवले, किरण भावसार, अवी जाधव, हेमंत पोतदार, किशोर पाठक, राजेंद्र सोमवंशी, विलास पगार, सुनील जगताप किंवा मनीषा कुलकर्णी असतील दादा प्रत्येकाशी आपुलकीनेच बोलणार. आमच्या बहुतेकांच्या पुस्तक प्रकाशनाला, लेखनाला, साहित्यिक कार्यक्रमांना दादांचे आशीर्वाद हमखास मिळालेहेत. कार्यक्रम छोटा-मोठा असो दादांची उपस्थिती असतेच. प्रत्येकाशी प्रेमाने बोलणार, आपण कुणीतरी मोठे लेखकराव आहोत, असा भाव दादांकडे कधीच नसतो.

पुंजाजी मालुंजकर यांच्या इगतपुरी तालुका ग्रामीण साहित्य संमेलनाला दरवर्षी दादा न चुकता जातात. तसंच सटाण्याला साहित्यायनच्या संमेलनाला, विजयकुमार मिठेंच्या पालखेड बंधाऱ्याला, दिंडोरी, येवला, सिन्नर, नाशिकच्या संवाद : एक वाङ्मयीन चळवळीत, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वसंत व्याख्यानमाला, कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि नाशिक जिल्हा साहित्यिक मेळाव्यात दादांची उपस्थिती म्हणजे जणू दादांची साहित्यिक बांधिलकीच असते.

दादांच्या घरातून दादांना भरपूर प्रेम व सहकार्य मिळते. सोज्वळ आणि अगत्यशील पत्नी, समंजस आणि गुणी मुले-मुली. प्रेमळ सुना आणि गोड नातवंड असं भरलं गोकुळ म्हणजे पी ॲण्ड टी कॉलनीतला दादांचा 'भगवती' बंगला. प्रशस्त आवार, विसावायला झोका आणि र.का. नाईक, नरेश महाजन यांच्यासारख्या रसिक मित्रांचा शेजार यामुळे दादा खुश असतात. छान लिहिते-वाचते राहतात. फिरते असतात. त्याचं

कौतुक वाटतं.

दादांच्या काही पुस्तकांवर मी परिचयपर लिहिलंय. तेव्हाही दादा प्रेमानं फोन करणार. कौतुक करणार, पण खरं तर 'अशामुळे आमचीच प्रतिष्ठा वाढते!' असं दादांना म्हणालो तर दादा म्हणतात, ''तुम्ही माणसं साहित्याचं काम करताहेत. पुस्तकं वाचली जाणं महत्त्वाचं आहे. म्हणून पुस्तक परिचय, त्यात व्यक्तिगत भाग फार छोटा असतो.' दादा असंच काही नेमकं बोलतात. त्यामुळे दादांप्रती आमचा आदर आणखीच वाढतो.

आमचे दादा नाशिक सावानाच्या जिल्हा साहित्यिक मेळाव्याचे, इगतपुरी तालुका साहित्य संमेलनाचे, येवला आणि दिंडोरी तालुका साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. या चारही अध्यक्षीय संमेलनांना मी उपस्थित होतो. तेव्हा दादांनी व्यक्त केलेले अध्यक्षीय मनोगत, मुलाखत यामुळेच मी दादांचा मनोमन शिष्य झालेलो आहे. इतकं साधं, सरळ, सोपं, पारदर्शी, अस्सल आणि मन:पूर्वकतेने दादा बोलतात त्यांचं मला विशेष वाटतं. त्यामुळेच दादांचा एक अघोषित असा फॅन्स क्लब नाशिक जिल्ह्यात आहे. त्यात झोडग्याचे कवी कमलाकर देसले, इगतपुरीचा तुकाराम धांडे, येवल्याचे बाळासाहेब हिरे, निफाडचे राजेंद्र सोमवंशी, पालखेड बंधाऱ्याचे विजयकुमार मिठे, खंडेराव सोळसे, दिंडोरीचे राजेंद्र गांगुर्डे, पळशाचे विष्णूपंत गायखे, सिन्नरचे किरण भावसार, मनमाडचे खलील मोमीन अशी कितीतरी नावे सांगता येतील.

मध्यंतरी आम्ही काही मित्रांनी दादांच्या पंच्याहत्तरीनिमित्त अमृत महोत्सवाचा कार्यक्रम केला. विजयकुमार मिठे संपादक असलेल्या 'कादवा शिवार'ने साहित्यिक चंद्रकांत महामिने विशेषांक काढला. दादांना अस्मादिकांनी 'विनोदी साहित्य सम्राट' अशी पदवी त्यात दिली. कार्यक्रमाला भरपूर गर्दी झाली. त्यात आम्ही काही संकल्प सोडले. विजयकुमार मिठे हे 'कादवा शिवार'च्या वतीने दादांच्या नावे 'उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार' देणार होते. दादा राहतात त्या पी ॲण्ड टी

कॉलनीच्या रस्त्याला 'साहित्यिक चंद्रकांत महामिने मार्ग' असे नाव द्यावे! अशी मागणी आम्ही नाशिक मनपाकडे करणार आहोत! (टाळ्या) अशी मागणी अस्मादिकांनी केली. दादांच्या मानपत्राचं लेखनही मी त्यावेळी हौशेने केलं.

पुरस्कार आणि मार्ग नामकरणाचे ड्राफ्ट लिहून झाले, पण कसं नि काय या दोन्हीही गोष्टी कृतीत येणं राहून गेलं. दादा त्यावर काहीच बोलत नाहीत, पण मनातून आम्हाला अपराध्यासारखं वाटत राहतं. आमचे दादा मनाने थोर. आपण त्यांच्याकडे जावं हसतमुख स्वागत करतील. ''तुम्ही लोक गुणी आहात. सातत्याने लिहिते रहा. कशानेच नाऊमेद होऊ नका. नवीन काय लिहिताहेत? नवनवीन विषय हाताळा, चांगल्या प्रकाशकांच्या पसंतीस पडेल, असं लिहा. साहित्याचा आनंद घ्या. आपलं मन हे पंढरपूरच्या वारकऱ्यासारखं नितळ असू द्या म्हणजे झालं!''

दादा असं आतून बोलत असतात. आम्हीही अगदी मन:पूर्वक धडपडत असतो, पण मनातलं सांगायचं तर दादा आमच्यासाठी साहित्यातले 'पांडुरंग' आहेत.

नाशिकच्या 'संवाद : एक वाङ्मयीन चळवळी'चे दादा आज सन्माननीय अध्यक्ष आहेत. नाशिकच्या साहित्याचे पितामह आहेत. त्यांच्यावर मनापासून लिहिताना 'संवाद'चा संदर्भ मला अतिशय महत्त्वाचा वाटतो. तो येथे नोंदवावासा वाटला हे खरंच. साहित्य, माणूस आणि संवाद याचं दि बेस्ट कॉम्बिनेशन म्हणजे आमचे दादा- चंद्रकांत महामिने!

# ‘माझं काम हिच माझी ओळख!’

# मा.खा. माणिकराव गावित

आदरणीय दादासाहेबांच्या संसदेतील कारकिर्दीला तब्बल तीस वर्ष पूर्ण झाली. म्हणून या देदीप्यमान अशा वाटचालीकडे स्वत: दादासाहेब कसे पाहतात? त्यांना याविषयी नेमकं काय वाटतं? या ध्येयवेड्या प्रवासातील त्यांचे काही वेगळे अनुभव आपण जाणून घ्यावेत, म्हणून आम्ही म्हणजे दादासाहेबांचे जावई उपअभियंता श्री. रमेश वेलजी गावित, आमचे मित्र इंजि. प्रमोद जावळे, प्रवीण पाटील आणि मी असे दादासाहेबांना भेटलो.

अगदी नाही म्हटले तरी मनावर एका प्रकारचा ताणही होता की, एवढ्या मोठ्या खंडप्राय देशाचं महत्त्वपूर्ण असं गृहखात्याचं राज्यमंत्रीपदही दादांनी यशस्वीपणे सांभाळलं! लागोपाठ नवव्यांदा त्यांनी आपल्या नंदुरबार मतदारसंघाचं यशस्वी असं प्रतिनिधित्त्व केलं आहे. काँग्रेस पक्ष आणि गांधी घराण्यावर संपूर्ण निष्ठा आणि या सर्व अनुषंगाने दादांचा वेळोवेळी झालेला सन्मान! शिवाय मध्यंतरी (ऑगस्ट २००६) भाटी प्रकरणामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला काळीमा लावण्याचा झालेला गैरप्रकार, त्यातून उजळलेली त्यांची स्वच्छशी प्रतिमा! यामुळे दादांच्या एकूणच थोर अशा व्यक्तिमत्त्वाविषयी एक कुतूहल मनात होतं.

दादांची नि आमची ही भेट कशी झाली? ते थोडक्यात सांगतो.

आपल्या अर्धांगिणीच्या आजारपणात त्यांची आस्थेनं भेट घ्यावी; वास्तपुस्तं करावी म्हणून दादाचं नाशिकला येणं झालं होतं. दादांची प्रिय कन्या सौ. निर्मलाजी रमेश गावित नगरसेविका, नाशिक मनपा या नाशिकला असतात. (आता त्या त्र्यंबकेश्वर-इगतपुरीच्या सन्माननीय आमदार आहेत) त्यांच्याकडेच आईंना उपचारार्थ ठेवण्यात आलं होतं.

आजार फारसा गंभीर स्वरूपाचा नव्हता. म्हणून आल्यावर सर्वप्रथम त्यांनी कुटुंबियांची भेट घेतली. संबंधित डॉक्टरांशी आजार उपचारासंबंधी अत्यंत आस्थेवाईकपणे चौकशी-चर्चा केली.

मी हे सर्व संभाषण जवळून ऐकत-पहात होतो. झब्बा, पायजमा. त्यावर जाकीट, (जाकिटावर भारताचा तिरंगा असलेला बॅच), डोक्यावर गांधी टोपी घातलेले दादासाहेब खूप साधे नि निगर्वी वाटले. त्यामुळे त्यांच्या मोठेपणाची भीती मनातून गेली. मनात विचार आला की, अरेच्च्या एवढा मोठा माणूस पण किती नम्रतेने बोलतो, वागतो. आपल्याला त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारता येतील.

डॉक्टरांशी चर्चा झाल्यावर दादा व आम्ही सर्वजण आईंना ज्या खोलीत ठेवलं होतं. तिथं आलो व दादा नि आईचं आजारपणाविषयी काही बोलणं झालं. दादा वडिलकीच्या नात्यानं त्यांना धीर देत होते. 'काळजी करण्यासारखं काही नाही', असं खूप प्रेमानं समजावत होते.

आईंना काहीशी झोप आली, असं वाटलं. पण दादांना हे सारं काही त्यांच्याच साक्षीनं सांगण्याची इच्छा दिसली. दादासाहेब म्हणाले, 'इथंच बसून बोलता येईल.'

आमच्या कामाची त्यांना पूर्वकल्पना होतीच. म्हणून विषयाला सुरूवात म्हणून किंवा दादांचं मत म्हणून पहिल्यानं विचारलं की ''दादासाहेब आम्हाला आपलं पहाडासारखं थोर व्यक्तिमत्व जाणून घ्यायचंय! त्यासाठी काही चर्चासंवाद आम्ही करणार आहोत.''

यावर दादा अत्यंत हळूवारपणे म्हणाले, '... की तुम्ही लोक करताहेत तर जरूर करा. तुमचं प्रेम मी जाणतो. पण मला स्वत:बद्दल

फार काही नाही बोलता येणार. लोक फार उदोउदो करून घेतात. पुस्तकं छापून आणतात. मला तसलं काहीएक आवडत नाही हो. पण यानिमित्ताने मला माझा राजकीय प्रवास किंवा माझ्या मतदारसंघातील माणसांविषयी, त्यांच्या कामाबद्दल काही सांगता येईल तर ते मी जरूर सांगेल.''

तोच धागा पकडून मी दादांना म्हणालो की, ''आम्ही फार प्रश्न वगैरे विचारणार नाही. आपणच मनमोकळेपणानं बोला, की आपली जडणघडण कशी झाली? बालपण कसं गेलं? शिक्षण कुठे नि कसं झालं...?

या प्रश्नांवर दादांचा चेहरा काहीसा उजळलेला दिसला. जणू त्यांच्या भूतकाळातल्या आठवणींनी त्यांना गलबलून आलेलं असणार, दादा सांगू लागले.

''नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात धुडीपाडा या लहानशा पाड्यातील सर्वसामान्य आदिवासी शेतकरी कुटुंबात २०.१०.१९३४ रोजी माझा जन्म झाला. त्यावेळची आदिवासी गावांसारखंच आमचं गाव नि घर. घरात शिक्षणाची म्हणून परंपरा नव्हती. वडिलांचा शेती व्यवसाय; परंतु वडिलांनी शाळेत नाव घातलं, हे महत्त्वाचं. गावात शाळा नव्हती, म्हणून धनराट या गावी शिक्षणासाठी म्हणून दररोज २ कि.मी. पायी चालत जावं लागे.

पहिली ते चौथी धनराट इथंच शिकलो. १९४४ साली चौथी पास झालो. १९४५ साली नवापूरला शाळेत दाखल झालो. मी बोर्डिंगमध्ये राहणार. पण तेथे जागा नव्हती. म्हणून आता, रोज ६ कि.मी. आमची पायपीट सुरू झाली. १९४६ साली मात्र बोर्डिंगमध्ये मला जागा मिळाली नि माझी पायपीट एकदाची थांबली.

माझी शाळा जेमतेमच होती. एकशिक्षिकी शाळा असली तरी शिक्षक ध्येयवादी होते. शाळेत असताना देशाला मिळालेलं स्वातंत्र्य ठळक आठवतं. आम्ही आनंदाने पेढे खाल्ल्याची आठवण मनात ताजी

आहे.

त्याचवर्षी दुर्दैवाने आमची शाळा सुटली. घरात मोठा असल्याने घराची जबाबदारी घेणे आवश्यक वाटत होते. घरात दूध-दुभतं होतं. पायी फिरायचं, विहिरीवर अंघोळ करायची. पडेल ती छोटी-मोठी कामं करायची असं काही चाललं होतं. काहीतरी चांगलं काम करावं असं माझं मलाच वाटायचं. मित्रांत तशा गप्पा वगैरे व्हायच्या.

माझा हा प्रवासही मोठा मजेशीर आहे. हिऱ्या-दसऱ्यासारखे जिवलग मित्र होते. त्यांच्याबरोबर झाडांच्या बुडांवर नाव टाकण्याचं काम त्यावेळी आम्ही केलं.

१९५४-५५ साली जंगल कामगार सोसायटी स्थापन झालेली होती. मी असा काही तसा या सोसायटीच्या कामात भाग घेत होतो. १९५८ साली जंगल कामगार सोसायटीत मी काहीकाळ नोकरीही केलीय. हा काळ माझ्या राजकीय जडणघडणीसाठी फार उपयुक्त ठरला. सागवानी लाकूड मोजमाप करणं वगैरे कामं करताना महाराष्ट्र राज्याची स्थापना, किंवा त्यावेळी आमच्या गावचे सरपंच चुडामण आनंदा माळी (गुरूजी) यांना आम्ही दिल्लीला पाठवलं होतं. ते सारं मनात नकळत कुठेतरी गोंदलं जात होतं.

त्यावेळी ग.द. माळी यांनी आपले सहा तालुके महाराष्ट्रात रहावेत म्हणून केलेले प्रयत्न मी जवळून पाहिले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब, डांग सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब बीडकर, छोटूभाई नाईक, 'मराठा'चे प्र.के. अत्रे, गोविंद वल्लभ पंत आदी थोर व्यक्तिमत्वांशी मी जवळून परिचित होत होतो. नकळत माझ्याही मनात आपण या क्षेत्रात काही काम करावं! असं रूजत होतं.

म्हणून चाललेल्या छोट्यामोठ्या कामांत मी लक्ष घालत होतो. त्यात आम्ही उकाई धरण निर्मितीला केलेला विरोध मला आठवतो. महाराष्ट्र-गुजरात सीमाप्रश्नांसंबंधी चाललेल्या चळवळीत मी सक्रिय होतो. जंगल

कामगार सोसायटीतले सचिवपद मला खूप काही शिकवून गेले. माझा लोकसंग्रह वाढला.

ग्रामपंचायतीपासून माझे समाजकारण खऱ्या अर्थाने सुरू झाले. ग्रामपंचायतीचा सदस्य म्हणून १९६४ साली विजयी झालो. नि प्रचंड कामाला लागलो. त्यामुळे १९७१ साली पुन: सदस्य म्हणून निवडून आलो. मला पहिल्यानेच त्यावर्षी 'उपसरपंच' म्हणून काम करण्याची दुर्मिळ अशी संधी मिळाली.

कामाचं क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारतच गेलं. १९७२-७३ साली नवापूर शहरातील पश्चिम भागातून मी जिल्हा परिषदेसाठी निवडून आलो. येथे 'समाजकल्याण सभापती' म्हणून माझी निवड झाली. त्यावेळी मला एखाद्या समितीत फक्त सदस्य तरी का केले नाही? असं विचारावं वाटलं; मात्र मोठ्या सन्मानाने मिळालेलं हे सभापतीपद अगदी आपोआप मिळालं. या समितीचं त्यावेळी केलेलं माझं काम वैशिष्ट्यपूर्ण ठरलं आहे.

'सभापती' झालो. परंतु मी माझ्या माणसांना घट्ट धरून होतो. प्रसंगी वाईटपणा आला. परंतु गरीब माणसाला न्याय मिळाला पाहिजे! म्हणून मी सतत प्रयत्नशील राहिलो. याचा खूप मोठा उपयोग मला झाला, हेही सांगितले पाहिजे.

१९८०-८१ साली मी प्रथमच विधानसभा सदस्य म्हणून विजयी झालो. माझे राजकीय गुरू, सल्लागार श्री. स्वरूपसिंगजी नाईकसाहेब त्यावेळी खासदार म्हणून विजयी झालेले होते. त्यात नाईकसाहेबांची वर्णी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात लागल्याने त्यांच्यासाठी मी आमदारकीचा राजीनामा दिला व नाईकसोबांच्या जागेवर प्रथमच खासदार म्हणून मी विजयी झालो. दिल्लीला इतक्या दूर जाण्याची इच्छा नव्हती; पण नियतीच्या मनात - तसे असावे. म्हणून १९८०-८१ ते आजपर्यंत सलग नऊ वेळा भरपूर मताधिक्क्याने काँग्रेस पक्षाच्या वतीने मी विजयी होत आलो आहे..

त्यानुषंगाने मी दादांना विचारलं की, असं कोणतं महत्त्वाचं काम आपण केलंत की, ज्यामुळे सलग नवव्यांदा आपण एकाच मतदारसंघातून एकाच पक्षाच्या तिकिटावर विजयी होत आलात?

तर अत्यंत सौम्य शब्दात आणि आपण काही विक्रम वगैरे केला आहे किंवा करतोय असं न मानणारे दादा म्हणाले, ''हे बघा, मी स्वत: खूप गरिबी अनुभवलीय. त्यामुळे मला आमच्या लोकांचे प्रश्न माहितीए. लोकांशी संवाद साधताना मी त्यांच्यातलाच एक असतो. माझ्या माणसांना मला भेटायला कुठली अपॉईंटमेंट घ्यावी लागत नाही. माझं स्वत:चं म्हणून एक चालतं-फिरतं ऑफिस आहे. मी माझ्या माणसांना केव्हाही, कुठेही भेटू शकतो. आश्वासन वगैरे नाही. थेट कामाला हात, प्रकरण मार्गी लागून ते निकाली निघाल्याशिवाय उसंत म्हणून घ्यायची नाही. बस्स माझं काम लोकांना माहीत आहे. त्यामुळेच हे सर्व मला मिळालंय.

१९८० साली आदिवासी विकास महामंडळाचा अध्यक्ष असताना संपूर्ण महाराष्ट्रभर मी दौरे काढलेहेत. मनाजोगतं काम केलं. याचा आनंद त्यावेळी मिळाला. हे काम महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.अ.र. अंतुले साहेबांनी पाहिलं होतं. त्यामुळे मला खासदारपदासाठी उभं करण्यात आलं. तेव्हा आवश्यक ती डिपॉझिटची रक्कमही मजजवळ नव्हती. परंतु स्वरूपसिंग नाईकसाहेब, स्वत: बॅ. अंतुले यांनी माझी जबाबदारी स्वीकारली. धडगाव तालुक्यात आमचा त्यावेळेचा प्रचार माझ्या चांगल्या स्मरणात आहे. आमच्या आदिवासींनी केलेलं त्यांचं पारंपरिक स्वागत. ढोलताशांच्या ठेक्यावर अंतुलेसाहेब नाचले होते. त्यांचं हे प्रेम पाहून अंतुलेसाहेब खूप भारावूनही गेले. जनसंघाचे शंकर फूकरा जाधव या विरोधी उमेदवारासाठी अटलजी आलेले होते.

आमचं या उलटं होतं. 'इंदिराजींनी येऊ नये आम्ही आमचा उमेदवार विजयी करू!' म्हणून आमचे लोक प्रयत्नशील. १,२७,००० मतांनी मी विजयी झालो आणि मतदारांचे जाहीर आभार मानण्यासाठी मग

इंदिराजी स्वत: आल्या. त्यांच्या सभेसाठी ४ ते ५ लाख माझे मतदारबांधव उपस्थित होते. हा सर्व प्रसंग किंवा ही आठवण माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना आहे. असं मला वाटतं.

कारण त्यावेळी इंदिराजींची झालेली ओळख, मी दिल्लीला गेल्यावर स्वत: त्या त्यांच्या सेक्रेटरी (आर.के. धवन) यांना म्हणाले, 'ये गावितजी है। अभी नंदुरबारसे चुनके आये है।' इंदिराजींची माझ्याबद्दलची आत्मियता पाहून मी थक्क झालो. नि कामाला जुंपलो.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांहून अधिक काळ दिल्लीत काम करताना मी संसदेतून कधी सुट्टी घेतलेली नाही. सुट्टीच्या दिवसांत मतदारसंघात फिरून जनतेची काम करणं यात आजवर खंड पडलेला नाही.

केलेल्या महत्त्वपूर्ण कामांत शिक्षण, आरोग्य आणि रस्तेविकास यात मी भरपूर काम उभं केलंय, आजही करतो आहे. माझ्या आदिवासी बांधवांच्या सुख-सोयींसाठी मी रात्रीचा दिवस केलाय. बुलडोझर लावून पर्वत फोडून रस्ते तयार करण्यासाठी मी जबरदस्त पाठपुरावा केलाय. त्या केलेल्या माझ्या प्रयत्नांचं समाधानही मोठं आहे. १९९० पर्यंत हे काम बऱ्यापैकी पूर्ण झालेलं होतं.

कुपोषित बालकांसाठी ११७ कोटी रुपयांची विशेष पॅकेज मी मंजूर करून घेतलं होतं. रंगावली धरण, नागन प्रकल्प, नवापूर येथील सहकारी साखर कारखाना माझ्या प्रयत्नामुळे सुरू झाला. शैक्षणिक क्षेत्रातही बऱ्यापैकी काम मला उभं करण्यात यश मिळालं.

शिक्षणावरून आठवलं; म्हणून दादासाहेबांना मध्येच कुटुंबातील सदस्यांच्या शिक्षणाबद्दल विचारलं, तर दादा उत्साहाने सांगू लागले. चार मुली व एक मुलगा असं माझं कुटुंब आहे. माझ्या मुलींना मी जाणीवपूर्वक शिकवलं. १९७७ मध्ये धुळे येथे घर बांधल्यानं माझी मुलं जयहिंद शाळेत शिकली. तेथील दयाराम शिंदे या शिक्षकमित्राची मला आजही आठवण येते.

या मित्रांच्या सहकार्यामुळेच प्रथम विसरवाडी, नवापूर, आणि

विशेषत: धुळे-नंदुरबार येथे शिक्षणसंस्थांचं जाळं विणण्यात मी यशस्वी झालो आहे. आपल्या शिक्षणाची जी परवड झाली; ती आापल्या मुलांची होऊ नये; म्हणून आजही या क्षेत्रासाठी मी विशेष प्रयत्नशील असतो. चांगलं काम असेल तर पक्षाचे मतभेद दूर ठेऊन मी त्या कामांना मदत केलेली आहे. आमची सर्व आदिवासी बांधवांची मुलं आज उच्च शिक्षण घेताहेत, नोकरी-व्यवसायात नशीब आजमावताहेत हे पाहून मनाला फार समाधान वाटतं.

आमच्या मतदारसंघातील दलित आणि विशेषत: आदिवासी बांधवांना मुलभूत शिक्षण मिळावे म्हणून मी नेहमीच आग्रही राहिलो आहे. उच्च शिक्षणाइतकंच प्राथमिक शिक्षण हे महत्त्वाचं असल्याने मतदारसंघातील मी सुरू केलेल्या आणि आजही जाणीवपूर्वक काम करणाऱ्या आमच्या आश्रमशाळा हे माझं काम मला खूप महत्त्वाचं वाटतं.

आमची मुलं अंमळनेरसारख्या प्रताप महाविद्यालयात जाऊन उच्च शिक्षण घेत असत. ती गरज ओळखून १९८१-८२ साली नवापूर येथे सुरू केलेलं सिनिअर कॉलेज किंवा १९९०-९१ साली बी.एड्. महाविद्यालय स्थापन करण्यात माझा सहभाग मला महत्त्वपूर्ण वाटतो.

दादासाहेब असं सारखं कामाविषयी बोलत राहतात. मी मध्येच दादांना आपल्या कुटुंबाविषयी कृपया सांगा! म्हणून विनंती केली असता दादांच्यातला कार्यकर्ता घरगुती विषयावर हळवा होताना मी पाहिला. हेही पाहणं एक अनुभव होता. (ज्येष्ठ कन्या स्व. हेमाताईंची त्यांना आठवण त्यांना झाली असावी त्या आठवणींचे कढ मनात दाबून दादा सांगू लागतात).

आई-वडील अशिक्षित होते. मला तीन भाऊ, त्यांना मीच शिकवलं. पद्माकर हे भाऊ प्रांताधिकारी होते. आता सेवानिवृत्त झालेहेत. बाबलादादा शेती करतात. तिसरे सखाराम वकील आहेत सर्वांचं छान चाललंय.

हं. आमच्या या बाईसाहेब आमचं गृहखातं सांभाळतात. शेतीही

त्याच बघतात. सर्व आदिवासी बांधवांप्रमाणे त्यांनाही इंदिराजी दैवत! म्हणून माझ्या राजकीय कार्याला त्यांचा सतत पाठिंबा!

मुली शिकल्या; त्यांची लग्न झाली. माझे जावई उच्चशिक्षित आणि सुस्वभावी आहेत. मुलगा श्री. भरत (भाऊ), सूनबाई सौ. संगीता यांचं व्यवस्थित चाललंय. मुलगा माझा समाजकारणाचा वसा पुढे चालवील, असे काम करत आहे. त्याचा आनंद वाटतो.

दादांचे आदर्श तर सर्वज्ञात आहे. परंतु त्यांच्याविषयी दादांना विचारलं. तेव्हा मोठ्या अभिमानाने दादा म्हणाले. माझा आदर्श इंदिराजी! संपूर्ण गांधी घराण्यावरील माझी निष्ठा मी कधीच ढळू दिलेली नाही.

इंदिराजी तर आमच्या देवच! त्यांचा शब्द आम्हाला प्रमाण! त्या जेव्हा-केव्हा आमच्या मतदारसंघात येत, तो दिवस आमच्यासाठी साक्षात दिवाळी असे! सावकारी बंद करण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केलेत. आदिवासींच्या जमिनी परत मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न आठवतात. इंदिराजींचं आमच्यावर सतत विशेष लक्ष असे. त्या आमची दखल घेत. त्याचा आनंद होई, आमचा उत्साह वाढे. इंदिराजींप्रमाणेच शरदराव पवारसाहेब, आमचे स्वरूपसिंग नाईकसाहेब हे माझे आदर्श.

जिल्हा परिषदेत किंवा लोकसभा सदस्य म्हणून खात्यांतर्गत येणारी कामे तर मी केलीच; परंतु आदिवासींची शेती बारमाही व्हावी, म्हणून विहिरींवर मोटार बसविणे, इलेक्ट्रीक पंप बसविणे, किंवा ऑईल इंजिन बसविण्यासाठी आवश्यक त्या तरतुदी मी करून घेतल्या.

मुळात आर्थिकदृष्ट्या माझा माणूस सर्वार्थानं संपन्न झाल्याशिवाय तो या प्रवाहात येणे कठीण आहे. हे जाणून आम्ही महाराष्ट्र शासनाकडून स्वतंत्र आदिवासी विकास खात्याची निर्मिती केली आणि मला सांगण्यास आनंद वाटतो की, शासनाच्या बजेटमध्ये ९% आर्थिक तरतूद या खात्यासाठी जेव्हा शासन उपयोगात आणतं; तेव्हा आपण केलेल्या प्रयत्नांना यश आल्याचे पाहून मनाला आनंद हा होतोच होतो.

या सर्व प्रयत्नांमुळेच आमच्या लोकांनी मुळची परिस्थिती निश्चितपणे

बदलली आहे. बदलते आहे. सर्व गावे बारमाही होताहेत. माझ्या बांधवांची पायपीट कुठेतरी संपते आहे. बहुतेक गावात आज मोटारसायकली, फोरव्हीलर्स आल्या आहेत. त्यांचे शिक्षण, राहणीमान आणि आरोग्य कमालीचे सुधारले आहे. हे सूचक आणि आनंददायी बदल मला अपेक्षित होते; म्हणून मी मला स्वत:ला भाग्यवान समजतो. आपल्या धडपडीला विकासाची सुगंधी फुल येताहेत. याचा आनंद खरोखरही मोठा आहे.

या सर्व आदर्शांना समोर ठेऊन काम करत राहिलो, समाजात समरसून वावरत राहिलो. त्यांच्या प्रश्नांची उकल करत राहिलो, पश्नांच्या मुळाशी जाऊन काम सनदशीर मार्गाने पूर्ण करण्याकडे माझा नेहमी कल असतो.

आणखी एक महत्त्वपूर्ण आदर्श म्हणून मी काम करत असलेला काँग्रेस पक्ष याचा उल्लेख मला अभिमानाने करता येईल! या पक्षाने मला कामाची भरपूर संधी दिली, मान-सन्मान दिला, एखाद्या मातेने आपल्या लेकराला सांभाळावं, तशी या पक्षाने मला प्रेमाची उब दिली आहे. मी काँग्रेसचा सुरूवातीपासून निष्ठावंत पाईक आहे. याचा मला नेहमीच अभिमान वाटतो.

याचं एक छान उदाहरण देतो की, १९५० साली भारताची घटना तयार झाली. पंडितजी नेहरू आपले पंतप्रधान होते. त्यांनी अभ्यासू, विचारवंत असलेले बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकरांना घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्षपद दिले. हा इतिहास सर्वांना ज्ञात आहेच.

परंतु १९५० साली घटनेत आदिवासी आणि दलितांना आरक्षण (रिझर्वेशन) असावं. शिक्षणात सवलत मिळावी किंवा सर्व क्षेत्रातून त्यांना सवलतीची तरतूद असावी; म्हणून ही आरक्षणाची महत्त्वाची तरतूद काँग्रेस पक्षाने केलेली होती. अगोदर दहा वर्षे, पुन्हा दहा वर्षे आणि पुन्हा दहा वर्षे अशी मुदतवाढ आमच्या काँग्रेस पक्षाने याबाबत दिली. म्हणूनच माझा आदिवासी व दलित माणूस ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्वत्र प्राधान्याने आज दिसतो आहे.

प्राणप्रिय अशा इंदिराजी गेल्या. तेव्हा प्रचंड दु:खी व निराशही झालो होतो. त्यानंतर स्व. राजीवजी आले, आज सोनियाजी आहेत. माझं या घराण्यावरचं नि काँग्रेस पक्षावरचं प्रेम किंचितही कमी झालेलं नाहीय. २००४ साली सोनियाजी नवापूर सहकारी साखर कारखान्याच्या उद्‌घाटनासाठी आल्या होत्या. तब्बल चार-साडेचार लाखांची प्रचंड उपस्थिती त्यांच्या सभेला लाभली होती. शिवाय माझे काम त्यांच्यापर्यंत त्यापूर्वीच पोहचले होते. त्यामुळे संसदेतील माझा अनुभव आणि माझ्या मतदारसंघात मी उभी केलेली कामे पाहून मला, भारताच्या गृहखात्याचा राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी त्यांनी उपलब्ध करून दिली.

आजवर झालेल्या कामांकडे आपण कसे पाहता? आपण स्वत: याविषयी समाधानी आहात काय? किंवा गत तीस वर्षात आनंददायी अनुभवांबरोबरच टोचतील, बोचतील, असे काही अनुभव आपणाकडे आहेत का? असं मी दादासाहेबांना विचारलं.

हे बघा, मी एक सर्वसामान्य कुटुंबातला असल्याने तळागाळातली दु:ख मला माहितीए. शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा नेण्याचं काम करत राहण्याचा माझा निश्चय आहे. जे काम आजवर केलयं ते समाधान देणारं आहे. अजून खूप काम शिल्लक राहिलंय.

त्यात माझ्या आदिवासी बांधवाचे, त्याचे म्हणून स्वत:चे असे मुक्तविश्व अबाधित रहावे, म्हणून मी प्रयत्नशील आहे. बोगस आदिवासींचा शोध घेणे सुरू आहे. त्याचबरोबर मुळ आदिवासींना सन्मानजनक जीवन मिळवून देण्याचं काम मी सातत्याने करत आलेलो आहे. सरदार सरोवरामुळे जे आमचे बांधव त्यात बाधीत होताहेत त्यावर मी माझी भूमिका स्पष्ट शब्दात नोंदवलीय. मेघा पाटकर यांच्या आंदोलनास मी माझ्यापरीने संपूर्ण सहकार्य केले आहे.

हे काम करून घेताना शासकीय यंत्रणेकडून मला नेहमीच सहकार्य लाभले. कारण एरवी शांत स्वभाव असून, माझ्या कार्यप्रणालीचा नैतिक धाकही अधिकारीवर्गाला वाटतो. माझी कामं कुठे रेंगाळत वगैरे नाहीत.

प्रश्न तर रोज उभेच असतात. आपण न थकता त्याविरुद्ध लढत राहिलं पाहिजे. असं मला वाटतं.

गत पंचवीस-तीस वर्षात केलेल्या सर्व कामांची यादीही सविस्तरपणे देता येईल; परंतु त्यात  लक्षणीय ठरलेली, भारतनिर्माण अंतर्गत केलेली राजीव गांधी निवारा योजना, राजीव गांधी विद्युतीकरण, किंवा हे मंत्रीपद मिळाल्यानंतर नंदुरबार व धुळे जिल्ह्यासाठी आवश्यक तो विकास निधी मला उपलब्ध करून देता आलेला आहे. उधना ते जळगाव ही रेल्वेलाईन डबल करण्यासाठी माझा पाठपुरावा सुरू आहे.

तापी नदीवरील बॅरेज होण्यासाठी केंद्राकडून आवश्यक ती मदत मिळावी म्हणून आम्ही प्रयत्नात आहोत. महाराष्ट्र शासनाकडून तापी नदीच्या पाण्याचा हिशोब अद्याप प्रलंबित असल्यामुळे हा प्रकल्प लांबणीवर पडला आहे. परंतु हे काम पूर्ण होण्यासाठी मी व्यक्तीशः प्रयत्नशील आहे.

आणखी एक, मी कधी जात-पात मानली नाही. गरीब-श्रीमंत, लहान-मोठा सारे मला सारखेच! त्यामुळे या सर्वांच्या उपयोगी पडल्याचे समाधान आहे आणि तेच माझ्या आजवरच्या कामाचे खरे संचित आहे.

बोचतील असे अनुभवही आहेत. पण ती केवळ आत्मस्तुतीतून वगळावीत असंही मला वाटत नाही. शिक्षण, आरोग्य, अंधश्रद्धा, आर्थिकस्थिती यावर खूप काम होणं गरजेचं आहे. परंतु लोकसहभागाशिवाय यात आपण संपूर्ण यशस्वी होऊ शकणार नाही. हेही खरंच!

यामुळेच १९९८ साली निवडणूक लढविण्यास मी नकार दिला होता. पण आमचे मतदारलोक ऐकत नाही. तुम्हीच पाहिजे! म्हणतात. याला काय म्हणावं? आपल्या माणसांचा आग्रह मोडता येत नाही.

गुलाबाच्या फुलाचा सुगंध हा जसा नैसर्गिक व सहज असतो. इतक्याच सहजतेने आपले काम लोकांत जावे, असे मला वाटते. राजकारणातले अस्तित्व हे आपल्या चांगल्या कामावर ठरत असते.

लोकांना काम प्यारं असतं. मी संपूर्ण आयुष्य समाजकारणासाठी वेचलं आहे. त्याचा आनंद वाटतो. केंद्रीय मंत्रीपद हा आपल्या आयुष्याचा स्वल्पविराम आहे. लोकांची कामं करणं हाच माझ्या आयुष्याचा पूर्णविराम आहे! असंच मला नेहमी वाटतं.

आयुष्यात मानसन्मान भरपूर मिळाले. पराभव आणि अपमानही मिळालेत. कालपरवाचं भाटी प्रकरण तर माझ्या जीवनात मोठंच वादळ घेऊन आलं. पण मी स्वत: स्थितप्रज्ञ होतो. निर्दोष ठरलो! पण अशा प्रकरणांनी प्रामाणिक कार्यकर्त्याचे मन हे दुखतेच!

तीस वर्षाच्या संसदीय कारकिर्दीकडे पाहताना जाणवतंय. सोयी सुविधा आल्या. मुलं शिकली, नोकरीधंद्याला लागली, बोलता बोलता तीस वर्षे निघून गेली. मी मात्र आहे तसाच आहे. वय वाढलं. मंत्रीपदाचा सन्मान मिळाला. संसदेत आपल्या माणसांना थोडाबहुत न्याय देता आला. माझे काम शेवटपर्यंत सुरूच राहणार आहे. नव्हे; लोकांची काम करत राहणं हाच माझ्या जीवनाचा श्वास झालाय.

माझं जीवन; माझं काम; हीच माझी ओळख आहे. आपण काम करत रहावं, प्रामाणिकपणे करावं. लोक आणि काळ तुमचं मूल्यमापन करत असतो.

'चला येतो, सांगण्यासारखं अजून खूप आहे. पंचाहत्तर वर्षांचा इतिहास तास-दीडतासात कसा पकडू? अच्छा येतो. भेटू या.' असं म्हणून दादा हसतमुखाने निघाले.

सुमारे तास-दीडतास, जसं आठवेल तसं अत्यंत नम्र भाषेतलं दादासाहेबांचं मनोगत ऐकताना भारावून गेल्यासारखं झालं. आईचा निरोप घेत दादासाहेब सर्वांना 'येतो' म्हणाले. मंत्रीपदाचा आणि संसदेतील विश्वविक्रमी कर्तृत्वाचा कसला कसला म्हणून अहंकार नाही. बडेजाव नाही. दादासाहेबांच्या पाठमोऱ्या प्रतिमेला नमस्कार करताना कविवर्य बा.भ. बोरकरांच्या काव्यपंक्ती आठवल्या,

'जीवन त्यांना कळले हो, मीपण ज्यांचे पक्व फळापरी गळले हो!'

सुप्रसिद्ध समाजसेवक प्रकाश आमटे, मंदाताई आमटे, डॉ. राणी व डॉ. अभय बंग, डॉ. अनिल अवचट, निसर्गमित्र श्री.द. महाजन, पक्षीमित्र शेखर गायकवाड अशी माणसं आपला आदर्श. त्यामुळे कुठल्या पक्षाशी म्हणून आपली जवळीक वा बांधिलकी अजिबातच नाही. परंतु सुमारे तीस वर्षे भारताच्या संसदेचा एक अविभाज्य घटक राहिलेले जुने-जाणते आदरणीय खा. दादासाहेब गावित यांचं अवघं व्यक्तिमत्त्व आणि माणूसपण जवळून अनुभवण्याची एक दुर्मिळ संधी मला मिळाली, याचं समाधान खरोखर फार मोठं आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधींनी स्वतंत्र भारताचे स्वप्न पाहताना असाच एका खेड्यातील माणूस उच्चपदावर विराजमान होण्याचं स्वप्न पाहिलं होतं. दादासाहेब या स्वप्नाचे मूर्तिमंत उदाहरण आहेत! असं मला वाटतं.

# एक सुंदर तरल भावकवी
# **खलील मोमीन**



कवी खलील मोमीन यांचा 'अक्षराई' हा काव्यसंग्रह १९९६ साली माझ्या वाचनात आला. मला त्यातील कविता इतक्या आवडल्या की, त्या कविता मी पुन:पुन्हा वाचल्या. काही कविता मी माझ्या वहीत उतरवून घेतल्या. शब्दांमधल्या कोऱ्या जागेतील अंतर, कवितेची कच्ची वही चाळताना, एखादे तरी फूल, माझा नमस्कार स्वीकारण्यासाठी, शब्दांना भरवताना या कवितांनी माझं मन आनंदून गेलेलं होतं. तशातच त्यांची 'परवड' कविता त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाली नि मग मी खलील मोमीनजींचा होऊन गेलो.

सार्वजनिक वाचनालयाच्या 'जिल्हा साहित्यिक मेळाव्यात 'एक कवी आणि कविता' हा कार्यक्रम सन २००० साली संपन्न झाला. पहिला मान मिळाला तो मोमीनसरांना. स्वर्गीय आनंद जोर्वेकर आणि संजय चौधरी यांनी त्यांची दिलखुलास मुलाखत घेतली. ह्या दोघांनी कवितेचं हे देखणं झाड इतकं गदगदा हलवलं की, कवितेची कितीतरी प्राजक्त फुले तेव्हा प्रसन्नपणे टपटपली. हा कार्यक्रम ज्यांनी प्रत्यक्ष ऐकलाय किंवा पाहिलाय त्यांना या कवीची सर्जकता, अलवारता आणि उत्कटता पक्की स्मरणात असेल.

उत्कट भाववृत्ती जपणारा मराठीतील एक निर्मळ मनाचा कवी म्हणून

त्यांची ओळख माझ्या मनात तेव्हाच रुजली. पुढे भेटी होत गेल्या. प्रत्यक्ष भेटीत वयातलं अंतर गळून पडलं. कवितेचं हे झाड छान टवकारलेलच असतं. वयपरत्त्वे वडाच्या झाडासारखा एक घनदाटपणा आणि समंजसपणा त्यांच्यात आलाय खरा. मोमीनसर आताशा मात्र काहीसे आत्ममग्न वाटतात.

दि. २, ३ व ४ फेब्रुवारी २००१ रोजी नाशिक येथे संपन्न झालेल्या पहिल्या मुस्लीम-मराठी संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. तेव्हाचं त्यांचं भाषण ऐकताना जाणवलं की, या कवीला अभिव्यक्त होण्यासाठी कवितेचं एक सशक्त माध्यम जास्त महत्त्वाचं वाटतं. या कवीचं नातं केवळ शब्दांशी, अर्थांशी नाही तर माणूस आणि निसर्गाशीही आहे आणि ते आदिम नातं अधोरेखीत करण्याची त्यांची मन:पूर्वकताही मनाला भावली. निसर्गाशी असलेलं त्यांचं नातं हे केवळ प्रतिमांपुरतं नाही, तर ते त्यांचं प्राणतत्त्वही आहे, हे जाणवत राहतं.

मनमाड येथे भारतीय अन्न महामंडळात सेवेत राहिलेल्या मोमीन यांच्या नावावर १९८२ साली प्रसिद्ध झालेला 'निरालय' आणि १९९४ साली आलेला 'अक्षराई' हे दोनच काव्यसंग्रह असले तरी त्यांचा हा काव्यप्रवास वरवरचा-उथळ नाही. एक चिंतनशील कवी म्हणून त्यांची ओळख करून देता येईल. आदरणीय तात्यासाहेबांनंतर नाशिकच्या कवितेचं क्षितिज समर्थपणे पेलणाऱ्या प्रमुख कवींमध्ये मोमीन हे नाव अग्रस्थानी आहे.

'कविता' हा आपला आत्मा आहे, असं ते नुसतं म्हणत नाहीत, तर जिथे-जिथे म्हणून कवितेचा दिवा जागवला जातो तेथे तेथे खलीलजी जिवाची वात जाळण्यासाठी आवर्जून जातात. अशा या अजातशत्रू व्यक्तिमत्त्वाला धर्म-पंथाचे बेगडी रंग लागलेले कधी कुणीही पाहिले नाहीत. स्व. आनंद जोर्वेकर असोत, झोडग्याचे कमलाकर आबा देसले असोत रेखाताई भांडारे असो किंवा अगदी कुणीही कवितेचा रसिक असो. सर्वांची ओळख एकच 'खलील मोमीन : मराठीतील एक

प्रतिभावंत कवी! आणि एक चांगला माणूस!'

खलीलजींची कविता सादर करण्याची एक अकृत्रिम अशी पद्धती आहे. त्यांचे आतले हळवेपण, माणूसपण त्यांच्या वागण्या-बोलण्यातून सतत जाणवत राहते. शिवाय त्यांचं हस्ताक्षरही इतकं सुंदर (सुंदर हस्ताक्षर असलेली माणसं स्वभावानेही सुंदर असतात.) की, मनाच्या कुपीत ते फ्रेम करून ठेवावं. अरुण म्हात्रेंचा 'ऋतू शहरातले' हा काव्यसंग्रह त्यांच्याच हस्ताक्षरात प्रिंट झालेला आहे. मला वाटतं की, अरुण म्हात्रेंनी आपल्या संग्रहातून खलीलजींचं सुंदर हस्ताक्षर चिरंजीव करून ठेवलेलं आहे.

खलीलजींच्या कवितेचा आत्माच मुळी कवितेविषयी आणि निर्मितीविषयी चिंतन करत राहतो.

'कवितेची कच्ची चाळताना' ह्या कवितेत ते लिहितात,

**'नजरेच्या कक्षेत मावते**
**तेवढेच आभाळ आपले असते!'**

या नजरेच्या कक्षेत पानं, फुलं, झाडं, क्षितिज, पक्षी, घरटी, आकाश, ऊन, वारा, फुलपाखरू तर येतातच सोबत देठाचं सोसणं, आभाळाच्या खांद्यावर मान टेकवून बसलेलं झाड, छोट्या मुलांचा प्रश्न, पक्ष्यांचे पदठसे, साळुंक्यांच्या घरट्यातील पिले, उष्टी बोरे अशा कितीतरी प्रतिमा नावीन्याच्या अनुभवासह येत राहतात.

त्यांच्या कवितेतील निसर्गचित्रे मोठी आनंददायी आहेत.

**'पाऊस पडे घनघोर**
**चिंब मनमोर चहूकडे पाणी**
**एकरूप सारे रंग तसा**
**श्रीरंग सहज ये चरणी '**

या ओळीतील 'मनमोर' या शब्दाने कवीला नादावले होते. तो शब्द त्यांनी कवितेत पेरला आणि कवी स्वत:च मोर झाला असे वाटते. परंतु आपली कविता अर्थपूर्णतेकडे नेण्यात ते जराही कमी पडत नाही.

त्यासाठी या काही ओळी पहा.

**'ती कळी कळी निरखून**
**लाजरे ऊन चोरीते नजरा**
**मी कवितेसाठी छान**
**टाचुनी प्राण, गुंफितो गजरा'**

हा केवळ अक्षरांचा उत्सव मनाला प्रसन्नच करीत नाही तर जगण्यालाही उभारी देत राहतो, असं मला वाटतं.

कविवर्य द.भा. धामनस्कर यांच्यासारखीच त्यांची कविता निसर्ग आणि माणूस याबद्दल मुक्तछंदात संवाद साधते. द.भा. धामनस्करांच्या कितीतरी कविता त्यांच्या मुखोद्गत आहे. दभांचे 'बरेच काही उगवून आलेले' आणि 'प्राक्तनाचे संदर्भ' त्यांनी मला आवर्जून वाचायला दिले. या दोघांच्या रूपाने मला कवितेतील ज्ञानोबा-तुकारामच मिळाले. मी समृद्ध, आनंदी झालो.

काव्यनिर्मितीविषयी लिहिताना ते किती मृदू-अलवार होतात पहा-

**कवितेची कच्ची वही चाळताना**
**मी नेहमीच फार अस्वस्थ होतो**

हा अनुभव शेवटी किती स्वाभाविक नि हळवा होतो पहा,

**पारव्यांच्या उडणाऱ्या थव्यातील**
**एक पक्षी टेलिफोनच्या तारेला**
**थडकून गतप्राण झाला तेव्हा**
**'पाखरे उडताहेत' ही ओळ**
**अस्वस्थ करीत असली कितीही**
**तरी तिच्यावर**
**पेनने काट मारण्याची**
**मला काही केल्या**
**हिंमत होत नाही.**

या कवितेतून त्यांच्या संवेदनशीलतेचा प्रत्यय यावा. आता मला

खलीलजी विशेष भावले ते अशा भावगर्भ कवितांच्या लेखनामुळे. 'शब्दांमधील कोऱ्या जागेतील अंतरात' या कवितेतून ते लिहितात,

**'जन्म आणि मृत्यू**
**यांच्या दरम्यानचे अंतर**
**विशद करणारे जगणे**
**शब्दांमधल्या कोऱ्या जागेतील**
**अंतराइतके पोकळ**
**आणि अटळ वाटते,**
**म्हणून 'गाय' हा शब्द लिहिला**
**की तिच्या मानेला**
**थोडाही ताण न पडता**
**तिला सहजपणे खाता यावा**
**अशा बेताने**
**मी 'चारा'हा शब्द लिहितो**
**कविता लिहिताना शब्दांमधल्या**
**कोऱ्या जागेतील अंतरात**
**प्राणांचा अदृश्य पूल उभारतो'**

या अशा हृद्य-संस्कारी भावनांपुढे आपण कुण्या एका मुस्लीमधर्मीय कवीची कविता वाचतोय, असा मूर्ख प्रश्न मनाला कधीच स्पर्शत नाही. खलीलजींची कविता माणुसकीचे आदिम नाते सांगणारी, तरल भावभावनांशी नाते सांगत संथपणे मेंदूत उतरत जाऊन थेट काळजाच्या तळाचा ठाव घेणारी कविता आहे.

कवितेत कोंडलेल्या शब्दांचा कलकलाट असह्य होऊन कवीचा, कागदाचे तुकडे उधळून देऊन शब्दांना मुक्त करण्याचा प्रमाणिकपणा मनाला भावतो. हा लयबद्ध अनुभव कवितेला श्रीमंती देऊन कवीचे मोठेपण अधोरेखीत करतो. खलीलजींची निरिक्षणशक्तीही मोठी दांडगी आहे. या ताकदीतून कवी सोलीव सत्य उकलून कधी एखादं वास्तव

समोर ठेवतो, तर कधी वाचकाला अंतर्मुख करून सोडतो.

वयपरत्ते खलीलजींचं लेखन काहीसं कमी झालेलं आहे. किंवा मूळात ते बहूप्रसवा असे नाहीतच. 'अनुष्टूभ'च्या संपादन सहाय्याचं काम तर ते आजही उत्साहानं करतातच. शिवाय कवितारती, दीपावली, लोकसत्ता, सकाळ, व्यासपीठ यासारख्या नामवंत दिवाळी अंकांतून त्यांची कविता आणि गजल वाचावयास मिळते तेव्हा आनंद होतो.

मनमाडच्या आययूडीपीनगरात ते दोघं पती-पत्नी राहतात. चारही मुली सासरी सुखी आहेत. त्यांची आणखी एक लाडकी लेक म्हणजे त्यांची कविता! ती तर 'अक्षराई' या त्यांच्या घरात आणि खुद्द कवीच्या तनामनात कायमच वास्तव्याला किंवा माहेराला आलेली. तिच्यासोबत त्यांचं अवघं जगणं आनंददायी झालेलं.

मध्यंतरी त्यांना मी माझा 'प्रिय आई बाबांच्या शोधात' हा काव्यसंग्रह पाठवला. त्यांना तो आवडला. त्यावर ते मला भेटायला आले. अगदी सुरुवातीला मी त्यांचा चाहता होतो (तो आजही आहेच.) नंतर मी, किरण भावसार, रवींद्र मालुंजकर मोमीनदांच्या घरी गेलो तेव्हा आम्ही त्यांचे छोटे मित्र झालो होतो. अनाथ मुलींवरचा माझा हा संग्रह वाचून त्यांनी मला 'छोटा भाऊ' करून घेतलं. बरं ते नुसतं सांगण्यापुरतं नाही तर फोनवरच्या आणि प्रत्यक्ष भेटीत मला ते पुन:पुन: सांगत राहतात, 'तू माझा भाऊ आहेस. तन, मन, धन कसलीही मदत हवी असेल तर मी आहे रे बाबा...' हे सांगतानाचे त्यांचे वत्सल डोळे नि त्यांचा आश्वासक आवाज मला माझ्या जगण्याचं संचित वाटत राहतं!

# ग्रंथपंढरीचा वारकरी
# **रामचंद्र काकड सर**



ग्रंथ हे माणसाला मार्ग दाखविणारे माणसांचे गुरू होत. ग्रंथ हे आपल्या जवळच्या मित्रासारखे उपयुक्त व आनंददायी असतात.ते आयुष्यभर आपली साथ-सोबत करतात. जीवनात योग्य मार्ग दाखवतात. प्रगतीपथावर नेतात. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

**होईल जीवनाची उन्नती, ज्ञानविकासाची प्रगती ।**
**ऐसीच असावी ग्रंथसंपत्ती गावोगावी ।।**

या थोर विचारांचा वारसा जपत मखमलाबादचे व्रतस्थ ग्रंथमित्र श्री. रामचंद्र काकड सर, ग्रंथालय चळवळीचं काम सातत्याने जिल्हाभर मोठ्या आत्मियतेनं आणि नेटानं उभं करण्याच्या प्रयत्नात असतात.

'आधी केले, मग सांगितले' याप्रमाणे त्यांनी आपल्या मखमलाबादसारख्या छोट्या खेड्यात १९६९ सालापासून अखंडपणे ग्रंथालयाची चळवळ रुजवली, जोपासली आणि वाढविण्याचं काम सुरू ठेवलेलं आहे.

मखमलाबाद सार्वजनिक वाचनालय हे आज नाशिक जिल्ह्यातील एक उपक्रमशील वाचनालय म्हणून सर्वदूर परिचित आहे. अर्थातच त्यामागे काकडसरांची प्रेरणा, मार्गदर्शन आणि उत्स्फूर्त असा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे.

स्वत: एक सेवाभावी शिक्षक राहिलेल्या काकडसरांनी आपल्या गावात आणि पंचक्रोशीत शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आजवर लक्षणीय काम उभं केलेलं आहे. वयाची पंच्याहत्तरी उलटून गेली तरी त्यांच्या तळमळीत, प्रामाणिकतेमध्ये कुठेही खंड पडलेला नाही.

वारकरी संप्रदायाची परंपरा लाभलेल्या घरात काकडसरांचा जन्म झाला. घरची परिस्थिती अगोदर जेमतेमच होती. त्यात त्यांनी विज्ञान शाखेचं शिक्षण घेऊन शिक्षकाची नोकरी स्वीकारली. अनेक प्रकारच्या कौटुंबीक जबाबदाऱ्या पेलल्या. मात्र ग्रंथांशी आपली मैत्री कधीही सोडली नाही. त्यातून हाडाचा शेतकरी, एक प्रामाणिक कार्यकर्ता आणि एक मनस्वी जिंदादिल माणूस म्हणून परिसरात त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

उत्कृष्ट संघटक म्हणून काकडसरांनी आपल्या व्यापक दृष्टिकोनातून संपूर्ण परिसर आणि त्यातील माणसांना आपलेसे करून ठेवले आहे. ग्रंथालय आणि सांस्कृतिक चळवळीतून या परिसरातील शेकडो माणसं आणि मने त्यांनी घडविली आहेत.

आपले काम निरलसपणे पुढे नेण्यासाठी त्यांनी कधी कुठे भेदाभेद केला नाही. अजातशत्रू म्हणून त्यांची ओळख करून देता येईल. ग्रंथालय चळवळीत त्यांच्या अनेक ओळखी-परिचय झालेत. त्या ज्ञानाचा, त्या थोर संचिताचा उपयोग त्यांनी केवळ स्वत:साठीच न करता आपल्या परिसरासाठी आवर्जून केला.

ग्रंथालय चळवळीचं काम करताना त्यांना आपल्या कार्याची दिशा व ध्येय मिळालं. यामध्ये महाराष्ट्राचे लाडके नेते स्व. यशवंतराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, कविवर्य कुसुमाग्रज, स्व. वसंतदादा पाटील, अण्णा हजारे, स्व. मधुकरराव चौधरी, स्व. दादासाहेब पोतनीस, प्रसिद्ध समीक्षक वा.ल. कुलकर्णी, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा निकटचा सहवास व मार्गदर्शनाचा लाभ काकडसरांना मिळाला.

वेळोवेळी निमित्ता-कारणाने त्यांनी यासारख्या दिग्गजांना आपल्या

गावात, वाचनालयात आणलं. त्यांचे विचार आपल्या माणसांना ऐकवले. ऐकलेल्या विचारांतून नवनवीन प्रेरणा घेऊन काम उभारण्याचा ध्यास घेतला. यामुळेच गावाचं, परिसराचं अपार प्रेम त्यांना मिळत गेलं. कुटुंबाची भक्कम साथ व पाठिंबा मिळाला. या सर्व पुण्याईतून सरांच्यातील 'माणूस' घडत गेला. काकडसर जनसामान्यांचे विश्वासू आणि जवळचे मित्र झाले. मुख्य म्हणजे ग्रंथमित्रही झाले.

नाशिक ग्रंथालय चळवळीचा इतिहास लिहिताना रामचंद्र काकड सरांचा उल्लेख प्रामुख्याने आणि प्राधान्याने करता येईल. इतके विलक्षण काम त्यांच्या हातून झालेले आहे. नवनवी ग्रंथालयं उभी करणं, त्याचे काम योग्य दिशेने होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य त्यांनी केलेलं आहे. ग्रंथालयांची अधिवेशनं आयोजित करणं, ती यशस्वी करणं, ग्रंथालय चळवळीतील सेवकांचे प्रश्न धसास लावणं, ग्रंथांचा प्रचार-प्रसारासाठी विविध कार्यक्रमांच्या आयोजनात काकडसरांनी आपल्या जीवाचं रान केलेलं आहे. गेली काही वर्षे या संघाचं अध्यक्षस्थान काकडसर यशस्वीपणे सांभाळताहेत.

स्वत:ला 'ग्रंथपंढरीचा वारकरी' म्हणणाऱ्या काकडसरांच्या मखमलाबाद येथील मळ्यात गेल्यावर त्यांचं हे म्हणणं किती मन:पूर्वक आणि प्रांजळ आहे हे समजतं. त्यांच्या शेतीचा तो अभिजात पसारा, घरातला चांगला मोठा देव्हारा, ऐसपैस गप्पांची मैफल जुळून यावी, असं पम्रन्न नि मोकळं वातावरण. सरांच्या वाचणाऱ्या आणि सुस्वभावी पत्नी सौ. सुलोचनाबाई यामुळे आपण सरांचे होऊन जातो. जोडीला निवडक अशी पुस्तकं असतात. काकडसर आणि ग्रंथ यांना वेगळं करता येणार नाही. अशा विचारातून सरांकडे पाहताना एक प्रकारची विनम्रता मनात येते.

नाशिकपासून हाकेच्या अंतरावर इतका नम्र, सत्शील आणि ऋजू व्यक्तिमत्त्वाचा माणूस आपल्या नात्यातला आहे! याची साक्ष अनेकांना पटलेली आहे. यात साहित्यिक एन.एम. आव्हाडसाहेब, प्रा.शं.क. देवरे,

दामोदर मानकर, दत्ता पगारसर, शशिकांत काकड, विष्णूपंत गायखे, मोतीराम पिंगळे, कवी रवींद्र मालुंजकर, विजयकुमार मिठे, ॲड. तानाजी जायभावे, इंजि. के.पी. धात्रक, रमेश राख, नाना सानप, राजेश शिरसाठ, शिवाजी जाधव, माजी मंत्री टी.एस. दिघोळे, मुरलीधर पाटील, प्रा. बाळकृष्ण अंजनगावकर, क्रीडा क्षेत्रातील कु. पल्लवी धात्रक, कर्मचारी संघटनेचे पुंडलिकराव थेटे, माधवराव भणगे, पत्रकार योगेश पाटील, विलास पगार, राजेंद्र सोमवंशी, नानासाहेब देवरे अशी कितीतरी महत्त्वाची नावं सांगता येतील.

काकडसर दरवर्षी आपल्या वाचनालयाच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेला जिल्ह्यातील कवींचं एक कविसंमेलन आयोजित करतात. या कवी संमेलनांना मी उपस्थित राहिलेलो आहे. नवोदित कवींच्या सहभागाने जागणारं हे कविसंमेलन जिल्हा साहित्यिक मेळाव्यातील कवी संमेलनाइतकतंच संस्मरणीय आणि लक्षणीय असतं.

आपल्या ग्रंथालयात नवनवी ग्रंथसंपदा आपल्या सभासदांना उपलब्ध करून देणं, विविध साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचं देखणं आयोजन करणं, जिल्हा ग्रंथालय संघाचं काम अशा विधायक नि निस्पृह कार्याचा कृतज्ञ गौरव म्हणून त्यांच्या सुहृदांनी त्यांच्यावर एक गौरवग्रंथ प्रकाशित करून या कार्यक्रमासाठी माजी उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील यांना बोलावले होते. एकूण सरांच्या कार्याची दखल शासन दरबारीही पोहचलेली आहे. असं असूनही सरांचे पाय नेहमीच जमिनीवर असतात.

सरांविषयी त्यांचे सुहृद काय म्हणतात; हे एका वाक्यात पाहिलं तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व उभं करण्यासाठी ते पुरेसं ठरू शकेल. साहित्यिक, कवी एन.एम. आव्हाडसाहेब त्यांना 'मखमलीचा सुगंध' म्हणतात तर कवी रवींद्र मालुंजकर त्यांना 'कवीमनाचा ग्रंथप्रेमी' असं संबोधतात तर पत्रकार मोतीराम पिंगळे त्यांना 'मखमलाबादचे लालबहादूर शास्त्री' अशी उपमा देतात. प्रा. शं.क. कापडणीस त्यांना 'गोदातीरीचा राम' म्हणतात. एकूण काय तर काकडसरांच्या ऋजू आणि ध्येयवेड्या व्यक्तिमत्त्वाची

सर्वांनाच प्रचिती आलेली आहे.

वास्तविक एक साधे शेतकरी असावेत असं साधं राहनीमान. शारीर उंची तशी कमीच. पांढरा स्वच्छ नेहरू शर्ट, पायजमा, डोक्यावर टोपी, डोळ्यांवर वाचनाचा चष्मा, पायात चामडी वाहणा, गव्हाळ अंगकांती आणि मुख्य म्हणजे चेहऱ्यावरचं प्रसन्न हास्य यामुळे काकडसर प्रत्येकाला आपले 'जवळचं' माणूस वाटतात.

नाशिकच्या ग्रंथालय चळवळीतील हे ऋषितूल्य व्यक्तिमत्त्व मला माझ्या वडिलांकडून सर्वप्रथम परिचित झालं. पुढे कवितेच्या आणि ग्रंथालय चळवळीतील समान धाग्यामुळे मी काकडसरांच्या अधिक जवळचा झालो. काकडसर भेटले की, वडिलांचे एक मित्र याबरोबरच आपलेही एक ज्येष्ठ स्नेही भेटल्याचा मला आनंद होतो. मग सरांचा हातात हात घेऊन त्यांना भेटण्यापेक्षा सरांच्या चरणकमलाकडे आपसूक विनम्रतेने हात जातात. तो माझा नमस्कार त्यांच्यातील थोर माणूसपणाला आणि त्यांच्या ग्रंथालय चळवळीतील नि:स्पृह अशा कामाला असतो.



# कष्टाळू हातांची
# **कुशावर्ता**

खुटवडनगरला स्वत:च्या घरात राहायला गेलो, तेव्हा तेथील वस्ती बऱ्यापैकी तुरळकच होती. मोकळ्या जागेवर रोज नवी बांधकामं तिथं उगवत होती. भरारा वाढत होती. घर बांधून पूर्ण झालं की, मुला-माणसांच्या चिवचिवाटानं ती छान भरून जात होती.

पण यात काही कुटुंब अशीही असतात की, ती फक्त इतरांचीच घरं बांधून देतात. त्यांच्या समाधानात (!) आपलं समाधान शोधतात आणि हातातलं हे काम संपलं, की 'नवा गडी, नवा राज' या न्यायानं दुसरीकडे कामाचा डाव मांडला जातो. खरं तर ही माणसं, आयुष्यभर नुसती-नुसती कष्टतच राहतात. विसावा म्हणून जिवाला त्यांच्या असा नसतोच.

या कुटुंबांमध्ये जशी कामाठी मोठी माणसं असतात. तशी निरागस-कोवळी लेकरं बकरंही असतात. बांधकामालगतच इवलूशा झापात, खोपीत कुठंतरी ही बिचारी माणसं कसं तरी जगत असतात. चाललेल्या बांधकामाच्या बाजूलाच खेळता-खेळता ही मुलं त्यांच्या 'खेळण्याच्या वयातच' कामालाही जुटतात. अकाली प्रौढ, समंजस, कामकरी होतात. या मुलांची कोवळी स्वप्नं येथील व्यवस्था किती नकळतपणे खुडून घेत असते.

या मजूर माणसांचं जगणं म्हणजे साक्षात ढोरमेहनत असते. यात मुलं शिकणं तर दूरच, उलट विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर असल्याप्रमाणे फिरफिर सुरू असते. नव्या आणि दूरवरच्या कामांच्या शोधात या मुलांना नीटपणे कुठेच रुजता येत नाही. सारखी भटकंती नि पोट मागे लागलेली ही माणसं आपल्या पोरांच्या हातात पाटी पुस्तकांऐवजी त्यांच्या डोक्यावर दगड, वीटा, मातीची पाटी केव्हा देतात, हे सगळं नेमकं केव्हा सुरू होतं! हे लक्षातही येत नाही.

या मुलांना कुठलं आलंय सोनेरी बालपण! ना लाडकोड, ना वेडी हौस-मौज! ती आपली कुठेतरी रडत-भेकत, मातीत लोळत-घोळत कशीतरी मोठी होत राहतात.

असंच एकदा, आमच्या घराच्याच बाजूला एका घराच्या कामावर मला कुशावर्ताचं कुटुंब दिसलं. आई-वडील, तिच्या पाठचा भाऊ अर्जुन आणि स्वत: कुशावर्ता. सर्वजण तिला 'कुशा' म्हणून हाक मारत होते. कुशाला मी प्रथम पाहिलं ते अर्जुनशी अल्लडपणे मस्ती करताना. तेव्हाचा तिचा निरागस चेहरा मला स्वच्छपणे आठवतो. तेव्हा कुशा ही मुल-बाळ नसलेल्या कुठल्याशा वयस्क जोडप्याकडे राहायलाच होती.

कुशाच्या निमित्ताने एक चुणचुणीत मुलगी घरात राहील, शिवाय घरातली छोटी-मोठी कामंही कुशा करू शकते; या हिशेबाने ती या घरात वाढत होती. मधून-मधून आपल्या आई-वडिलांना भेटायलाही येत होती. अशी आनंदात तिची तीन-चार वर्षे गेली. ते वयस्क जोडपं अन्यत्र बदलून गेलं. त्यानंतर कुशा आपल्या मूळ कुटुंबात पुन: येऊन राहिली.

कुशाला त्या घरी, घरकामाची थोडी- बहूत सवय झालेली होतीच. मग इथं तिला कोण बसून खाऊ घालणार होतं! एक मुलगा म्हणून तिचा लहान भाऊ- अर्जुन कसाबसा शाळेत जायला लागला होता. कधी तिची आई आजारी असायची. बांधकाम मजुरीची कुशाला सवयच नव्हती. मजुरीचं ते भारी काम तिला झेपावण्यासारखंही नव्हतंच.

म्हणून कुशाने जवळपासच्या बंगल्यातील धुणी-भांड्यांची कामं

धरली. काम स्वच्छ, निटनेटकी करते म्हणून तिची कामंही वाढत गेली. धुणं-भांड्यांबरोबर, फरशी (लादी) पुसणं, कुठे घर सांभाळणं, एखाद्या घरी स्वयंपाक करणं, अशा स्वरूपाची तिची कामं वाढत गेली. पैसे मिळत होते. पण अंगपेरानं काहीशी थोराड दिसणारी कोवळ्या वयाची कुशा दिवसभर कामच तेवढं ओढताना दिसायची.

दहा-बारा वर्षांची पाहिलेली काळी-सावळी, चुणचुणीत, अल्लड, हसरी कुशा अवघ्या दोन-तीन वर्षातच 'कामवाली बाई' नेमकी केव्हा झाली हे अक्षरशः काही कळलंच नाही. पण मला तिचं कोवळं वय नि तिचं प्रत्यक्ष काम करणं आठवलं की, अस्वस्थ व्हायला व्हायचं.

किती शिणत असेल एवढूसा जीव? शिवाय संपूर्ण दिवसभर थकून-भागून घरी आल्यावरही शांतता अशी नाहीच. स्वतःच्या घराचं पाणी भरणं, झाडलोट, धुणं-भांडी, आवरासावर तेही तिला चुकायचच नाही.

सुटी अशी तिला नाहीच मुळी. बरं कुठं गावी जाणं नाही, कामाला उगीच दांडी मारणं नाही. कुशाचं गाव परभणी जिल्ह्यातील रोहिणा. तिचे आई-वडील देवधर्म, लग्नकार्य किंवा सुख-दुःखासाठी गावी जाऊन येत. पण कुशा मात्र क्वचितच त्यांच्याबरोबर गावी जायची. येण्या-जाण्यासाठी भाडंही खूप लागतं. शिवाय आपल्या जाण्याकडे त्या सात-आठ घरांची कामं बुडतात, त्यांचा खोळंचा होतो असं तिला वाटतं. म्हणून कुणा जवळच्या नातेवाईकाच्या सोबतीनं ती घरीच थांबते. मन मोठं करते किंवा मन मारते.

बरं ही सर्वच कामांची घरं. एका जाती-धर्माची नाहीत. या सर्व घरातला कुशाचा वावर इतका स्वाभाविक नि आपुलकीचा की, ही सर्व कुटुंब तिला आपल्याच घरातली मानतात. कामात कसूर नाही. कामाचा कंटाळा नाही. कुणामध्ये डावं-उजवं नाही. चोरी-लबाडी नाही किंवा टिपिकल धुणं-भांड्यांवाल्यांसारखं अडवणूक, वरचेवर दांड्या मारणं, इकडंच तिकडं करणं असं अक्षरशः काहीच नाही. प्रत्येक घरी तिचा शिस्तशीरपणा, व्यवस्थित वागणं, त्यामुळे तिला नावं ठेवायला कुठे जागा

राहत नाही.

म्हणजे ठरल्या वेळेत कामावर पोहचणं, हसतमुखाने शांतपणे, स्वच्छपणे काम पूर्ण करणे आणि मगच पुढच्या कामावर जाणे. बरं इकडून- तिकडून कामाला जातानाची तिची लगबग मोठी समंजस. खोटा आव नाही. चिडचिड, आदळआपट नाही. मुख्य म्हणजे थिल्लरपणा नाही. शिवाय प्रत्येकाशी बोलताना मावशी, आजी, काकू, ताई-दादा अशा आदराचं बोलणं. लहान मुल दिसलं तर दोन मिनिटं चालतीवरच त्याचं कौतुक करून, कुशा पुन्हा आहे की नाहीच जशी गल्लीत!

आणखी गल्लीत कुणा ओळखीच्या बाईची तब्येत बरी नसली, तर तिच्या घरचं काम करणं, कुणाकडे काही कार्यक्रम असला किंवा दिवाळसणासारखं कुणाचं घर आवरणं असेल, कुशाला कुणीही हक्काने हाक मारावी. वेळात-वेळ काढून अशा कामांनाही कुशा नाही म्हणत नाही.

बरं एवढी सारी ढोर मेहनत केल्यावर आपल्या स्वत:च्या घरी ती एक गरीब स्वभावाची मुलगी असते. कमवण्याचा रुबाब नाही. खोटा अहंम नाही. रात्री उशिरा जेवणं-खावणं आटोपली की, तिच्या झोपडीच्या दारातल्या कॉर्पोरेशनच्या मोठ्या मर्क्युरी लाईटच्या उजेडात ती अर्जुनची पुस्तकं एक-एक अक्षर जळुवून वाचताना दिसते. त्या वृद्ध जोडप्याने तिला गरजेपुरतं वाचायला शिकवलं होतं. वेळ मिळाला की, असं कुठलंही पुस्तक, किराण्याच्या रद्दीचा जुना पेपर धरून पडल्या-पडल्याच ती मजेत वाचताना दिसते.

तिचं हे सर्व काम, निर्मळ स्वभाव, वाचनवेड वगैरे पाहिलं की, वाटतं, 'कुशा एखाद्या चांगल्या खात्या-पित्या घरात असती तर किती छान शिकून मोठी झाली असती. पण बीड, परभणीसारख्या दुष्काळी जिल्ह्यातील अशा कितीतरी कोवळ्या मुलांचं शिकणं, बालपण हे केवळ परिस्थितीमुळे करपून जात असावं, हा विचार अस्वस्थ करतो.

आजकाल आपण सर्वत्र पाहतो, की श्रीमंतांबरोबरच मध्यमवर्गीय

घरातल्या कितीतरी मुलांना शिक्षणाच्या नावाखाली घरातल्या कुठल्याच कामांना जराही हात लावत नाही. त्यांची बरीचशी कामं आई-वडिलच करून घेतात. त्यांची स्वत:ची म्हणावीत अशीही कामे ही मुलं बिनदिक्कत इतरांना सांगून मोकळी होतात. स्वत:पुरतं पाहतात. 'माझ्याकडे पाहा अन पानफुल वाहा!' अशी त्यांची अवस्था असते.

या विपरित अनुभवात या मुलांपेक्षा वयानं, ज्ञानानं खूप लहान असलेली कुशा मात्र स्वत:च्या घरातलं काम तर करतेच, शिवाय सात-आठ घरातली कामं अधिक इतर वरकरणी कामं! असं दिवसभर तिचं कष्टणं सुरू असतं. तेव्हा या बालहातांना आदरपूर्वक नमस्कारच करावा वाटतो. काय म्हणत असतील हे कोवळे - कष्टाळू हात?

कुशासारख्या राबणाऱ्या कितीतरी मुली छोट्या-मोठ्या शहरातून काम करताहेत. हे अखंड राबणारे हात आपल्यासारख्या अनेकांची घरं लख्ख करत असतात. आपलं जगणं सुसह्य (?) करीत असतात. अशा कष्टणाऱ्या हातांना आपण मजुरी तर देतोच, कधी बक्षीस म्हणून सणावाराला नवा ड्रेसही घेतो. पण या सर्व विकतच्या वस्तूंपेक्षा अशा निरागस लेकरांना आपण, आपलंच मूल समजून प्रेम दिलं पाहिजे. वर्षातून चार-दोन वेळेस तरी एखादा सिनेमा, नाटक, सर्कस, सहलीला आपल्या मुलांसोबत न्यायला हवं. आपल्या घरात कितीतरी चांगली पुस्तकं, खाऊ- खेळणी असते ती त्यांना दिली तर? मुळात त्यांना प्रेम आपलं दिलं तर?

प्रत्येक घरात असं होईल न होईल. परंतु तुर्त या कामांच्या हातांवर लिहिलं तर पाहिजे, असं मला मनापासून वाटलं.

हा सर्व विचार बिचाऱ्या कुशासारख्या मुलीच्या गावी कुठे असतो. कुशा दररोज किती काम करते, दमते. घर चालवते. वरून प्रसन्न हसते. कुठून येतं हे शहाणपण? ही प्रचंड उर्जा? वाटलं इतकं नितळ - निर्मळ आपल्याला जगता आलं पाहिले.

कुशा आता मोठी होतेय. तिच्या लग्नाची बोलणी घरात सुरू आहे.

पाहुणे पाहायला येताहेत. गल्लीतल्या तिच्या बरोबरची मुलं-मुली तिला यावरून चिडवतात. यावर कुशा फक्त हसते. चिडणं- वैतागणं नाहीच मुळी! ‘आई-वडील काय वाईट करतील का?’ असं ती हसून सांगते. तिच्या या हसण्यात खूप काही लपलेलं असतं. तिचं हरवलेलं - तिच्याही नकळत निसटून गेलेलं बालपण तर नक्कीच!

या लेखासाठी म्हणून कुशाच्या आई-वडिलांकडे तिचा फोटो मागितला तर तिचा स्वतंत्र फोटो त्यांच्याकडे नव्हता. मग तिच्या वडिलांनी तिचा फोटो काढून आणला. मला दिला. फोटो कलर होता. परंतु फोटोग्राफरने त्यावर कुठलंही काम न करता तो त्यांना दिलेला होता. प्रत्यक्षात दिसते तशीच कुशावर्ता त्यात दिसत होती.

कुशाचा फोटो पाहून मुलगी म्हणाली, ‘पप्पा, काय छान दिसते ना कुशावर्ता! पण ती या फोटोत जरा जास्तच काळी दिसतेय हो...!’ यावर मुलीला मी म्हणालो, ‘आहेच कुशा काळी खरी, पण देवांचाही देव पांडुरंग म्हणजे आपला विठ्ठल नाही का चांगला काळाभोर? युगे अठ्ठावीस कर कटेवरी ठेवलेल्या विठ्ठलाच्या हातांइतकेच कुशासारख्या कामसू नि निरागस मनांचे हात मला त्या परमेश्वराइतकेच पवित्र वाटतात!’

हे ऐकल्यावर भिजल्या डोळ्यांनी मुलगी म्हणाली, ‘बिचारी कुशा!’ होय, हे सहजोद्गार आपल्या अगदी प्रत्येकाचेच असतात. आपण सर्वजण कुशासारखी राबराब राबणारी मुलं पाहतो. वाचतो नि त्यानंतर पुन्हा आपल्या स्वत:तच गर्क होऊन जातो. प्रसंगी धुणं-भांड्यात एखाद-दुसरं भांडं - जास्तीचा आणखी एक कपडा दुष्टपणाने किंवा सवयीने टाकून देतो. हे कुठेतरी कमी होईल का?

कधी काळी शिक्षणासाठी आसुसलेल्या या कष्टकरी हातात नंतर उरते ती फक्त जिवंत राहण्याचीच काय ती फडफड. परिस्थितीमुळे प्रसन्नपणे उडायचं, विहरायचं विसरून गेलेल्या या दबलेल्या मनांना आपण आता समजून घेतलं पाहिजे!



# एक भक्कम वाचक माणूस
# **हेमंत पोतदार**

नाशिक-येवला-धुळे असा प्रवास करीत मी पुन्हा बदलीवर नाशिकला आलो. त्यावेळी 'डिझाईन डिव्हिजन'ला माझी बदली होणं हा माझ्या दृष्टीने एक मोठाच भाग्ययोग होता, असं मला वाटतं. या ऑफिसचा लिमिटेड स्टाफ, जिंदादिल माणसं शिवाय आमच्या या ऑफिसचं कामही नेमकं आणि सोफिस्टिकेटेड!

सुरुवातीचे नाशिकचे माझे बदलीचे दिवस हे अगदीच अल्पकाळाचे (८-१० दिवसांचे) होते. त्यामुळे नोकरीसाठी म्हणून नाशिक आता मला नवीनच होतं. त्यात हे डिझाईन डिव्हिजन म्हणजे तऱ्हेतऱ्हेच्या माणसांचा एक अप्रतिम असा गुच्छच होता जणू. त्यातील कलावंत असलेले डी.एस. रुपवतेदादा, नाटकवेडा सुभाष कपोते, शेअर मार्केटवाले विलास रामटेके, गप्पीष्ट (स्व.) किरण इनामदार, कीर्तनकार अभियंता शंकरबुवा वैद्य, खिलाडूवृत्तीचे अभियंता प्रवीण गायकवाड, चोखंदळ वृत्तीच्या नामजोशीबाई यांबरोबरच राजेंद्र बधान, विजयकुमार कापुरे, राजेंद्र पाथरकर, विजय जोशी, सगळेदादा, देवीदास घेळ, के.डी. शिंदे, एकनाथ शेवाळे, भोई, फालक, चोप्रा, खरे, आमचे अधिकारी गं.म. नातू, डी.बी. कुरीलसाहेब अशा कितीतरी लोकांवर स्वतंत्रपणे लिहिता येईल, अशी खरोखरी परिस्थिती आहे. खरं सांगायचं तर या कार्यालयातील दिवसच

खूप सुंदर होते, असं आम्हा सर्वांनाच आजही वाटतं.

अशा ताज्या-टवटवीत कार्यालयात मी बदलून आलो आणि येथेच मी खऱ्या अर्थाने कात टाकली. मी पहिल्यापेक्षा कितीतरी अधिक मोकळा नि बोलका झालो. याच कार्यालयात मला मिळालेलं एक वेगळं नि वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व म्हणजे हेमंत पांडुरंग पोतदार!

मी या सर्वांच्यात वयानं वगैरे लहान! म्हणून स्टाफशी माझी ओळख करून देण्याचं काम, माझा सहकारी सुभाष कपोतेनं स्वीकारलेलं. त्याचं या बाबतीतलं टायमिंग आणि परफेक्शन इतकं अफलातून असायचं की, व्यक्तिचित्रांच्या माझ्या लिखाणात मी या माणसावर अजून का नाही लिहिलं? साधारण सत्तरच्या वर माणसांवर लिहिताना कपोते मात्र अंगाला तेल लावून माझ्यापासून जणू सटकतच राहिले. असो.

तर या कपोतेंनी एक दिवस माझी ओळख एका भव्यदिव्य दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी करून दिली. 'हा हेमंत (ते समवयस्क असल्यामुळे एकमेकांना एकेरी नावानं संबोधतात.) एक हुषार माणूस. इंग्रजी, मराठी दि बेस्ट! व्याकरण-बिकरण भन्नाट. ड्राफ्टिंग मस्त. भाषासौष्ठव अप्रतिम. नशिब तो टीव्हीवर बातम्या वगैरे द्यायला नाही आणि हो, वाचतो, बिचतो चिकार. मैत्रीला चांगलाय, ओळख असू दे, अडीअडचणीला मदतबिदत करतो, काही लागलं तर सांगत जा.'

कपोतेंची टकळी आणखी सुरू होती. हेमंतरावांचीही कळी नेहमीप्रमाणे खुललेली. 'बास का सुभ्या, काही ठेव ना बाकी.' आणि मला म्हणाले, 'बाळ, (अस्मादिक तेव्हा वय वर्षे सव्वीस आणि हेमंतराव होते चाळीशीपार केलेले.) चल भेटू या.'

संपूर्ण मदतीचा त्यांनी शब्द दिला आणि खांद्याला शबनम अडकवून स्वारी गेलीही निघून.

मला त्यांच्या ओळखीतला 'वाचन' हा शब्द जवळचा वाटला होता. म्हटलं, बघूयात एखाद्यावेळी निवांत गप्पा मारू या विषयावर.

परंतु हा योग काही जुळेना. आमच्या कामाच्या शाखा वेगळ्या.

कार्यालयात एक तर काम सुरू असायचं. किंवा सर्वांचा मिळून गप्पांचा छान फड रंगलेला असायचा. मी दबून जायचो त्यांच्यात. त्यामुळे व्यक्तिगत असं बोलणं जमेना.

हेमंतरावांचा सेवादलाचा संदर्भही समजला. खादीचा झब्बा, शबनम, पुस्तकं आणि गप्पा रंगवण्याचं अचूक कसब, याविषयी मला त्यांचा मित्र असलेल्या राजू जोशीने माहिती सांगितली. माझी उत्सुकता वाढलेली.

हेमंतराव म्हणजे त्यावेळी एक छान उमदे असे प्रसन्न व्यक्तिमत्त्व वाटायचे. नीटनेटके आणि व्यवस्थित कपडे. गुळगुळीत घोटलेली दाढी, साडेपाच फूट उंची, तब्बेत गुटगुटीत. डोक्यावर विद्वत्तेचं काहीसं टक्कल. केस मागे वळवलेले. रुबाबदार व्यक्तिमत्त्वाला शोभेल अशी माफक ढेरी, चालण्या-बोलण्यात एक मस्त ऐट. आम्ही त्यांना 'एक्झ्युक्युटिव्ह स्टाईल' म्हणयचो. मला वाटतं द्विपदवीधरपर्यंत त्यांचं शिक्षण, कायद्याच्या शिक्षणातलं त्यांचं ज्ञान आणि दांडगं वाचन, यामुळे आलेला आत्मविश्वास त्यांच्यात जाणवायचा.

मुळात डिझाईन डिव्हिजनला तुलनेनं काम कमीच होतं. त्यात कार्यालयातल्या प्रत्येक कामात हेमंतराव कामाला वाघ. त्यामुळे त्यांच्या टेबलावरचं काम 'यू' आटोपून हेमंतराव असलेल्या पंचवीसएक इंजिनीअर्समधले एक होऊन जायचे. त्यात ऑफिसच्या कामाच्या गप्पा, मुलांची शिक्षणं, कौटुंबीक जबाबदाऱ्यांपासून राजकारण, आंतरराष्ट्रीय घडामोडी, याबराबेरच साहित्य, नाट्य, चित्रपट, संगीत, चित्रकला आदी विषयांवरच्या त्या गप्पा ऐकणं म्हणजे एक नितांत सुंदर 'अनुभव' असायचा. दररोजची ती मैफल छोटीशीच असायची. पण त्यात जशी हसी-मजाक, चहा-पाणी, सहजता वगैरे असे. तशीच वैचारिकताही त्यात असे. खरं तर या गप्पांतून नकळत मी 'समृद्ध' होत गेलो.

परंतु या गप्पा खूपदा कृतीतही उतरविण्यास त्यांना आवडे. यातून एकाचवेळी अनेकांच्या घरी गॅस, कुकर, फ्रीज, गाड्यांपासून खाण्याच्या

वस्तूंपर्यंत खरेदी त्यांच्या पुढाकाराने करवून घेतल्याची मी पाहिलीय.

अशा दिलखुलास स्वभावामुळे हेमंतराव या गप्पांचे म्होरके किंवा केंद्रस्थानी असायचे. विषय कुठलाही असो अगदी भरभरून आणि स्पष्टपणे बोलायचे आणि हो, एखाद्या विषयाचं ज्ञान नसेल तर संबंधितांकडून ते समजून घेताना त्यानां संकोच वाटायचा नाही आणि कुणाचाही एखादा अनुभव आवडला, माहिती आवडली तर त्यावर हेमंतरावांची कॉम्प्लिमेंटही अफलातून असे. विशेष म्हणजे त्या भरभरूनपणाला तोड नसे. त्यामुळे समोरच्याची जबाबदारी वाढलेली दिसे. स्वत:ला नेहमीच अपडेट ठेवावं, अशी ती चौकसता असे.

या गप्पांत 'वाचन' हा मुद्दा ऐरणीवर असे. मी येण्यापूर्वीच या कार्यालयात पुस्तकांची मासिक भिशी सुरू होती. त्यात लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ, जी, माहेर, मिळून साऱ्याजणी, गृहशोभिका, श्री व सौ अशी निवडक साप्ताहिकं आणि मासिकं आपापसात बदलली, वाचली जायची. त्यात वयानं लहान म्हणून त्यात मीही एक चकटफू वाचक होतो. माझ्याकडून हे लोक कॉन्ट्री घेत नव्हते. उलट माझ्या वाचनवेडाचं कौतुकच होई.

एकदा हेमंतराव निवांतसे होते. मी त्यांना काही कौटुंबीक प्रश्न विचारले, त्यावर ते उत्साहाने म्हणाले, 'दोन मुलं आहेत. थोरला ऋषिकेश, धाकटा सौरभ. रचना शाळेत शिकतात. पत्नी सौ. सुमित्रा आदर्श शाळेत शिक्षिका आहे. घरी आई-वडीलही आहेत. बहीण-भावांची लग्न झालीहेत. बस्स आता तुझं सुनाव.'

पडत्या फळाची अपेक्षा धरून मी म्हणालो, 'रावसाहेब, मी निफाडचा. वडील शिक्षक आहेत (अरे वाऽऽऽ), एक भाऊ नि दोन बहिणी आहेत (छान), मी पदवीधर झालोय (गुड गुड...), आईला नि मला वाचायला आवडतं (व्हेरी गुड)' (हेमंतरावांच्या अशा दिलखुलास कॉम्प्लिमेंटस्नी मनाला छान उभारी मिळाली.)

मग 'मी काय वाचलंय?' या त्यांच्या प्रश्नावर मी आपली फुशारकीने

यादी सांगणार होतो, 'कोसला, उपरा, बलुतं' पुढे काही पुस्तकांची नावे घेण्याआधी 'कोसला' या एकाच नावाने हेमंतरावांची कळी अशी काही खुलकी की, विचारता सोय नाही. लागलीच खुर्चीतून उठून त्यांनी माझी पाठ काय थोपटली, कौतुकाने शेकहँड काय केला, आनंदाने अंगठा उंचावून मला दाद काय दिली. या विलक्षण अभिप्रायाने मी अंतर्बाह्य सुखावलो.

'कोसला' मी कुठे, केव्हा कशी वाचली या त्यांच्या प्रश्नांत माझ्यावर लेखन-वाचनाचे संस्कार करणाऱ्या प्रा.के.एम. खैरनारसरांना त्यांचं मनापासून धन्यवाद देणं आणि कोसलासारखी अभिजात साहित्यकृती वाचणारा माणूस भेटणं! ही एक सुंदर गोष्ट आहे, असं त्यांनी मला सांगितलं. त्यानंतर कोसलातला 'पांडुरंग सांगवीकर' आमच्यातल्या मैत्रीचा एक धागाच ठरला. याशिवाय मी वाचलेली चक्र, धर्मानंद, सत्याचे प्रयोग, श्यामची आई, अक्करमाशी, आठवणींचे पक्षी, उचल्या, शिरवळकरांचं दुनियादारी, डॉ. आनंद यादवांची झोंबी, स्पर्शकमळे, गोतावळा, सुनीता देशपांडेंचं आहे मनोहर तरी, दुर्गा भागवतंतांचं व्यासपर्व, श्री.म. माटेंचं उपेक्षितांचं अंतरंग, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, ह. मो. मराठे, शन्ना नवरे, व.पु. काळे, मधु मंगेश कर्णिक, डॉ.अनिल अवचट यांच्या वाचलेल्या साहित्यावर आम्ही बोललो. त्यांनी माझं मनापासून  कौतुक केलं. मलाही त्यामुळे खूप छान वाटलं. त्यानंतर आठवणीने ते मला विचारत असत, 'तू काय वाचतोहेस?' मी गाजलेल्या निवडक साहित्यकृती मिळवून वाचायचो. पण हेमंतराव मात्र चौफेर वाचायचे. त्यांच्यामागे अशा चांगल्या पुस्तकांची नावं टिपून मी ती पुस्तकं वाचू लागलो. ती बहुतेक सर्व पुस्तकं मला आवडली. कारण ती खरोखरच ऑफबीट होती. हेमंतराव अक्षरश: चिक्कार वाचायचे. दैनिकं, साप्ताहिकं, मासिकं, नियतकालिके आणि ललितही! त्यामानाने मी कविता लेखन, कविता वाचनामुळे त्यांच्यामानाने वाचनात चांगलाच मागे पडायचो.

हेमंतरावांचं व्यक्तिमत्त्व, संवाद कौशल्य, भरपूर वाचन या गोष्टींचा मला हेवा वाटायचा. माझ्या मनात तेव्हा मात्र खेडूत मानसिकतेचे न्यूनगंड वगैरे होते. नकळत मी त्यांचा फॅन झालो. भरपूर वाचायला लागलो. त्यामुळे आहे त्यापेक्षा अधिक कृश झालो, पण त्यावेळी केलेल्या वाचनातून मिळालेला आनंद अलौकिक असा होता.

पुढे गप्पांच्यात मला समजलं की, हेमंतराव मूळचे खान्देशातील जळगाव जिल्ह्यातील फरकांडे गावचे. हेमंतरावांना आपल्या या छोट्याशा गावाचा आणि खान्देशच्या भूमीचा मोठा अभिमान. आमची खान्देशची भूमी म्हणजे कष्टाळू आणि गुणी लोकांची खाण! पू. साने गुरुजी, कवयित्री बहिणाबाई, बालकवी, मधुकरराव चौधरी, डॉ. भालचंद्र नेमाडे, प्रमोद जावळे अशा कितीतरी नावांवर ते अत्यंत अभिमानानं आणि भरभरून बोलतात.

हेमंतरावांचे वडील पाटबंधारे खात्यातच सेवेत होते. त्यावेळी पगार कमी. जबाबदारी मात्र अधिक. हेमंतरावांना दोन भाऊ आणि दोन बहिणी, आई-वडील असं कुटुंब. उत्पन्न मर्यादित. त्यामुळे सर्वांचंच शिक्षण गरिबीतच झालं. त्यावेळी घरात समृद्धी अशी नव्हतीच कधी, पण त्याचं वैषम्यही वाटलं नाही फार. म्हणून शिक्षणाची जिद्द मनात निर्माण झाली. म्हणून त्यावेळी पडेल ती कामं केली. कुठला म्हणून हट्ट केला नाही. वडील शिस्तप्रिय आणि कडक स्वभावाचे होते. आई माहेरची श्रीमंत परंतु आमच्याकडे ती शांतपणे, प्रेमळपणे राहिली. मुळात ती खूपच साधीभोळी होती. ती बिचारी सर्वांचं प्रेमानं करत असे. तिच्या कष्टाला आणि सहनशीलतेला मर्यादा नव्हती. स्वत:ची हौसमौस, आवडीनिवडी बाजूला ठेवत तिने आम्हाला लहानाचं मोठं केलं. अशी संपूर्ण कृतज्ञता त्यांच्या मनात आई-वडिलांविषयी आजही आहे.

वडिलांची बदली ज्या गावी होई, तेथे तेथे कुटुंबही हले. त्यामुळे शिक्षण वेगवेगळ्या गावांना झालं. म्हणजे पहिली ते चौथी गिरणा डॅम, पाचवी ते दहावी महात्मा गांधी हायस्कूल, इगतपुरी आणि बी.ए. पदवीचं

शिक्षण १९७० साली फैजपूर येथील धनाजी नाना महाविद्यालयात झालं. १ जुलै १९७७ रोजी शासकीय सेवेत म्हणजे पाटबंधारे विभागात त्यांचा प्रवेश झाला.



त्यांच्या शाळा-कॉलेजचे दिवस हे कधीच सर्वसामान्य नव्हते. त्यात अमर्याद कष्ट होते. भौतिक सुख-सुविधांचा अभाव होता. तरीही एक मनस्वी आणि आनंदी जीवन हेमंतराव भरभरून जगले. हे त्यांच्या बोलण्यातून जाणवतं. शाळा-कॉलेजातले साहित्यिक -सांस्कृतिक उपक्रम, विविध स्पर्धांमधला त्यांचा सहभाग, मित्र-मैत्रिणी, उत्तम शिक्षक याबरोबरच चित्रपट, संगीत, वाचन यांची त्यात रेलचेल असे.

सरकारी नोकरी मिळाली की, बहुतेक सर्व मुलं लग्न करून आपलं स्वत:चं वेगळं बिऱ्हाड थाटतात, पण हेमंतरावांनी शेवटपर्यंत आई-वडिलांना एकटं सोडलं नाही. ते आईवडिलांच्यातच राहिले. बहीण-भावंडांचं, मुला-भाचरांचं म्हणून जे जे करणं शक्य आहे ते ते त्यांनी सर्व काही मन:पूर्वकतेने केलं. आताही त्यात खंड पडला आहे, असं मला वाटत नाही.

गिरणा, वैतरणा, हतनूर, तापी प्रकल्प, नाशिक येथे वडिलांच्या नोकरीनिमित्त वास्तव्य झाल्याने खूप वेगवेगळ्या प्रकारची, स्वभावाची माणसं आणि परिसर त्यांना पहायला मिळाला. त्यात वाचन हा प्राणप्रिय छंद. आणखी सर्व कलेशी मैत्र त्यामुळे हेमंतरावांचं व्यक्तिमत्त्वं समृद्ध होत गेलं.

या सर्व पार्श्वभूमीवर १९९६ साली सिंचन भवन परिसरात 'शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालय' सुरू झाले. त्यात त्यांनी मला सहभागी करून घेतलं. ते सचिव आणि मी ग्रंथसचिव अशी पदं आम्हाला देण्यात आली. परंतु कुठलंही पद हे केवळ मिरवण्यापुरतं किंवा उबवण्यासाठी नसतंच मुळी. उलट त्या पदांना पुरेपूर न्याय देत वाचनालयाने साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचा अक्षरश: धडाकाच लावला. आमच्या बरोबरीने ल.गो. जोशी, प्रमोद जावळे, द.भि.

मालपाठक, जयप्रकाश मुथा, देवीदास जाधव, प्रकाश कापसे, मधुरा फाटक, शुभदा देशपांडे अशी खूप माणसे काम करत होती. अल्पावधीतच वाचनालय हे नाशिक शहरातलं एक महत्त्वाचं सांस्कृतिक पीठ म्हणून नावारूपास आलं. या सर्वांमध्ये हेमंतराव अग्रभागी असायचे.

नाशिक शहरात कुणीही साहित्यिक-कवी आलेत की, त्यांना आपल्या वाचनालयात आणण्यासाठी हेमंतराव प्रयत्न करायचेच. 'शासकीय कर्मचारी असं काही छान करतात!' या कौतुक वगैरे करणाऱ्यांमध्ये कवयित्री शांता शेळके, द.मा. मिरासदार, मारुती चित्तमपल्ली अशी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेनलाध्यक्षांसारखी माणसं वाचनालयात येऊन गेली. तसेच कविवर्य ना.धो. महानोर, रंगनाथ पठाणे, डॉ. अनिल अवचट, यशवंत पाठक, डॉ. भालचंद्र नेमाडे, व.पु. काळे, फमुं, रा.रं. बोराडे, बाबुराव बागूल, प्रशांत असनारे, खलील मोमीन, उत्तम कांबळे, अनंत सामंत, राजन खान, प्रवीण दवणे, माधवराव चितळे, विजय कुवळेकर, भारत सासणे, प्रा. इंद्रजित भालेराव, राजदत्त, गिरीष प्रभुणे, सौन्मित्र, महावीर जोंधळे, डॉ. जब्बार पटेल, राजू परुळेकर अशी कितीतरी मोठी माणसं वाचनालयात आणण्यात हेमंतरावाचं श्रेय मोठं आहे.

शिवाय ही माणसं आली की, त्यांच्याशी दिलखुलास गप्पा मारणं, उपस्थितांना पाहुण्यांची व पाहुण्यांना आपल्या माणसांची नेमकी व नेटकी ओळख करून देणं, त्यावेळी प्रत्येकाला अंगावर मोरपीस फिरल्यासारखंच वाटे. हेमंतराव हे काम आवडीने करीत असत. आपल्यालाही असं सुंदर, अर्थपूर्ण बोलता यायला हवं, असंच वाटे तेव्हा. हो, आजही वाटतं.

१९९९ साली आमच्या वाचनालयाने 'व्यासपीठ' दिवाळी अंक निर्मितीला सुरुवात केली. अरविंद गुंजाळ साहेब अध्यक्ष होते. त्यांनी हेमंतरावांना अकांचा 'संपादक' आणि मला 'कार्यकारी संपादक' केलं. मला स्वत:ला तरी त्यातला काहीच अनुभव नव्हता. म्हणून एक अभ्यास आम्ही दोघांनीही जाणीवपूर्वक केला. संपादकीय, अनुक्रमणिका,

मुखपृष्ठ, रेखाटनं, व्यंगचित्रं, कविता, कथा, लेखांचा क्रम, पानपुरके असं सारी काही अभ्यासून वहीत नोंदवून घेतलं. आम्ही त्यात बालविभागही सुरू केला.

मला वाटे, आपला सर्वच्या सर्व अंक केवळ नवोदितांचा आणि साहित्यिक जगताला अपरिचित अशा लोकांचा असावा. परंतु हेमंतरावांना मौज, अक्षर, ऋतुरंग, पद्मगंधा, महाराष्ट्र टाइम्स, सकाळसारखा अंक काढावा वाटे. त्यात थोडेबहुत ते यशस्वीही झाले. दिवाळी अंकात कुठेच काही न लिहिणारे डॉ. भालचंद्र नेमाडेंसारखी दिग्गज माणसं सोडली तर मराठी साहित्यातली सर्व मोठी माणसं त्यांना लेखनासाठी मिळाली. पाडगावकर, फ.मुं., दत्ता टोळ, अमृता सुभाष, यु.म. पठाण, ग.प्र. प्रधान, राजन गवस, राजन खान, राम प्रधान, गिरीजा कीर यांसारखी कितीतरी मोठ्या माणसांनी व्यासपीठमधून लिहिलं. त्याचबरोबर माझ्या नवोदितांनाही ते आवर्जून स्थान देत. त्यामुळे अंक चांगलाच होई. अंकाला हमखास पुरस्कार मिळत. 'व्यासपीठ' हा वाचनालयाची एक वेगळी ओळख ठरला.

नंतर नंतर त्यांनी अधिकारी वर्गाला लिहिण्याची गळ घालण्यास सुरुवात केली. मी त्यांना म्हणायचो, 'लेखनात उत्कटता वगैरे तर हवी ना.' पण हेमंतराव म्हणायचे, 'अरे, ही सर्व माणसं श्रीमंत घरातूनच आलीयत का? त्यांचे अनुभव आपण का नाही समाजासमोर ठेवायचे.' यादरम्यान वाचनालयासंबंधी काम करायचंही आवाहन ते करीत. प्रत्येक वेळी आश्वासक, उमेद वाढविणाराच अनुभव मिळे. असं व्हायचं नाही, पण हेमंतराव कंटाळले नाहीत. 'लगे रहो...' असा त्यांचा खाक्या असे. मी मात्र कधीकधी कंटाळा करायचो.

'वाचनाने माणसं बदलतात, वाचनासाठी दिसलेला वेळ कधीच वाया जात नाही. वाचनातून आपणास नित्य नवे काहीतरी छान मिळत राहते. विचारांना दिशा मिळते आणि मुख्य म्हणजे आपल्या जीवनाचे खऱ्या अर्थाने आपल्याला आकलन होते. साहित्याची ही देणगी मोठी आहे!'

असं आवर्जुन काही पेरताना मी हेमंतरावांना पाहत आलो आहे.

खात्यातील सर्वोच्च अधिकारी म्हणजे आजचे राजेच! म्हणून 'राजा बोले नि दल हाले' यावर त्यांचा विश्वास असल्यामुळे, अधिकाऱ्यांचा अनुभव व्यक्तिगत स्वार्थासाठी नाही तर एक सार्वजनिक काम उत्तमपणे उभं राहण्यासाठी हेमंतरावांचा अट्टहास असतो.

रचना शाळेत त्यांची मुलं शिकत असताना हेमंतराव पालक शिक्षक संघाचे सचिव होते. त्यावेळी संघाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णींसोबत त्यावेळी त्यांनी मिळून राबवलेले कार्यक्रम, उपक्रम हे इतके वेगळे लक्षवेधी ठरले की, असा एखादा विचारशील आणि उपक्रमशील 'शिक्षक पालक संघ' असू शकतो! हे मला अगदी प्रत्येकाला सांगावसं वाटे. माझी मुलंही याच शाळेत शिकायला असल्यामुळे संपूर्ण शाळाच या कार्यक्रमांमुळे भारावून गेलेली मी पाहिलीय. 'ऑफबीट' म्हणता येईल, असेच ते प्रयत्न होते.

मला वाटतं की, उत्तम वाचन आणि कॉलेज जीवनात खूप चांगल्या लोकांमध्ये वावरायला मिळणं, यामुळे एक ' दि बेस्ट व्हीजन' त्यांच्याकडे आहे, संवेदनशीलताही आहे. पूज्य साने गुरुजींच्या पवित्र भूमीतले काही चांगले गुण अंगी यावेत, तसे हेमंतराव घडलेहेत. म्हणूनच हेमंतराव माझ्यासाठी नेहमीच एक अभ्यासाचा विषय राहिलेले आहेत.

वाचनालयाचं आणि व्यासपीठाचं काम करताना त्यांच्यासोबत असलो की, त्यांच्याकडून वेगवेगळे किस्से, प्रसंग साभिनय ऐकण्याची आम्हाला मेजवानीच मिळते. एक उत्तम अशी कथनशैली, पाठांतर, तीव्र स्मरणशक्तीचा प्रत्यय येतो. ते बहुतेक सगळे संदर्भ, विषय अचूक नि सभ्यसे असतात. हा माझा अनुभव आहे.

बरं हे हिरवेकंचपण कुठे खरेदीला वगैरे जातानाही असते. मूळचे समाजवादीपण कपड्यात बऱ्यापैकी सैल होऊन जातं. जीन्सपासून टी-शर्ट, कोट, रंगबेरंगी झाकीचे कुठल्याही नवीन फॅशनचे भरपूर कपडे त्यांच्या संग्रही आहेत. शिवाय कुठे ताजी भाजी, रसरशित फळं दिसो,

मुलांसाठी उत्तम खाऊ असो, मोठ्या आकाराच्या थैल्या त्यांच्यासोबत असतातच. बरं खरेदी करताना घासाघीस, कंजुषपणा अजिबात नाही. चांगली रग्गड खरेदी करायची. मी याकडे प्रथम कौतुकाने आणि नंतर मात्र सवयीने पाहायला शिकलो.

हो, पण त्यावरून मी त्यांना कधी काही विचारलंच नाही, असं मात्र नाही. एकदा ते त्यावर गंभीरपणे म्हणाले होते, 'अरे विवेक, सुदैवाने आपल्याला शासकीय नोकरी आहे. एक वाचन आणि खाणं सोडून दुसरं व्यसन नाही. तुझी वहिनी म्हणजे सुमित्रा आदर्श शाळेत शिक्षिका आहे. तिला तर माझ्याहीपेक्षा जास्त पगार मिळतो. अण्णांची पेन्शन आहे. मग या खाण्याला असे कितीक पैसे लागतात.

... पण हो, या अगोदर हाच घरखर्च चालवताना मीदेखील पुष्कळ काटकसर केली. मन आवरलं, पण हरलो नाही. खूप कष्ट केले. घरोघरी पेपर टाकले, आकाशकंदील विकले, प्रिंटिंग-बाईंडिंगचं भरपूर काम केलं, दिवाळीत फटाके विकले, घरोघरी दूध टाकलं (ते काम तर अजूनही सुरूचये) अशी कितीतरी कामं केली. कामाची कधी लाज बाळगली नाही. चिकार कष्ट केले. (हेमंतरावांचा असा बिनतोड जबाब आला की, माझी तंद्री लागून संपूर्ण अंतर्मुख होणं माझं सुरू होतं.)

हेमंतराव सांगतात की, या सर्व केलेल्या कामांचा फायदा असा झाला की, आमच्या सर्व कुटुंबाला भल्या पहाटे उठण्याची सवयच लागून गेली. मला वाचनाला निवांतपणा मिळाला. जनसंपर्क वाढला. या कामांच्यातून खूप चांगलीही माणसं मला भेटली. त्यांच्याशी स्नेह जुळला. त्यामुळे घरातल्या सर्वांनाच कष्टाची सवय लागली. विशेष म्हणजे मुलं, पुतणे, भाचरं छान शिकले.

आज हेमंतरावांचा मोठा मुलगा ऋषिकेश बी.ई., एम.बी.ए. करून महिंद्र कंपनीत मॅनेजर पदावर नोकरीला आहे. तर धाकटा सौरभ अमेरिकेत मिशिगन विद्यापीठात बी.ई. (मॅकेनिकल) होऊन एम.एस. झालाय. घर कसं छान उभं राहिलंय. पण यामागे हेमंतरावांचे व वहिनींचे मोठे कष्ट

आहेत.

दरम्यान, त्यांची आई आणि वडील-अण्णा हे वृद्धापकाळाने देवाघरी गेले. अण्णा तर ८४ वर्षांचं समृद्ध आयुष्य जगले. हेमंतराव आणि वहिनी अगदी सुरुवातीपासून ताई-अण्णांचं आपुलकीने करत आले. वास्तविक दोघं नोकरीला. मुलं आज बाहेरगावी गेलेले. त्यात आपले सर्व दैनंदिन व्याप सांभाळून त्यांना खुबा मोडलेल्या अण्णांचं करावं लागे. हेमंतरावांच्या या व्यवस्थिपणाचं मला कौतुक वाटतं.

कुठलाही एखादा कार्यक्रम संपला रे संपला की, हेमंतराव गर्दीतून अचानक नाहीसे झाल्यासारखे निघून जायचे. मी एकदा त्यांना त्रासिकपणे विचारलं. तर ते म्हणाले, 'अरे, आपल्या घरी दहा-पंधरा वर्षांपासून तू गोल्डी कुत्रीला पाहतोय ना, बिचारं मूकं जनावर... त्याला तहानभूक लागली, शी-शू लागली तर ते कुणाला बरं सांगणार?' यावर माझा राग तर लगेच वितळलाच. उलट त्यांच्यातलं माणूसपण मला खूप काही शिकवून गेलं.

अनेक उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव राहिलेले श्री. देवदत्त मराठे साहेब, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री. देवेंद्र शिर्के साहेब, सार्वनिक बांधकामचे सचिव धनंजय धवड साहेब, कोयनेचे मुख्य अभियंता राहिलेले कवी विलास शेळके, मुख्य अभियंता ना.लो. गवळेसाहेब, म.वि. पाटील साहेब, राजेंद्र शुक्ला साहेबांसारख्या कितीतरी अधिकाऱ्यांसाठी ते 'हेमंतराव' असतात. त्यांच्यासोबत काही कामानिमित्त जाताना हेमंतरावांना त्यांनी दिलेला रिस्पेक्ट पाहून मी अनेकदा प्रभावित झालो आहे.

मला वाटतं, उत्तम राहणीमान, उत्तम आणि अपडेट वाचन, वागण्या-बोलण्यातील ऋजुता, संवादातील नेमकेपण, सच्चेपण, अचुकता यामुळे त्यांचे जुळलेले 'सूर' त्यांनी मुख्यत्वे वाचनालयाच्या कामासाठीच उपयोगात आणलेले मी पाहिलेहेत.

माणसं जोडणं आणि ते मैत्रं टिकवणं हेमंतरावांना साधतं. त्यामुळेच अनेक साहित्यिक, कलावंत, अधिकारी, कर्मचाऱ्यांचे, मित्र-मैत्रिणींचे, नातेवाईकांचे वाढदिवस त्यांना ज्ञात असतात. वाढदिवसाचं सुंदर निमित्त म्हणून ताजी ग्रंथभेट, सुंदरसा बुके, वेचक ग्रिटिंग संबंधितांना ते आवर्जून देतात. महत्त्वाचं म्हणजे ही ग्रंथभेटीची पुस्तकं त्यांनी स्वतःच्या खर्चाने विकत घेऊन देतात. महिन्याकाठी चांगल्या माणसांसाठी म्हणून शे-दीडशे रुपये खर्च करणं त्यांना मनापासून आवडतं. कारण पत्नी आणि मुलंही आज कमावती असल्यामुळे असा योग्य खर्च करणं त्यांना परवडतंही.

त्यांच्या सोबतच्या या सर्व जाण्यांमध्ये मीही खूपदा असतो. तेव्हा मी मलाच प्रश्न विचारतो, 'बाबा, तू इतका पर्टिक्युलर आहेस का?' त्याचं उत्तर बहुतेकांचं, 'भारत कधी कधी माझा देश आहे!' असंच असतं. प्रश्न इच्छाशक्तीचाच असतो. आपण मात्र निमित्त शोधत राहतो. म्हणून मला हेमंतरावांचा हेवा वाटतो. आपल्याला त्यांच्यासारखं व्हावं वाटतं! यातच सारं काही आलं.

पाचव्या वेतन आयोगात माझाही पगार बऱ्यापैकी झाला. वाचनाचं वेड म्हणून माझ्याही घरी दररोज एक स्थानिक वृत्तपत्र, महिन्याकाठी तीन-चार मासिकं शिवाय शहरातल्या एकूण चार वाचनालयांचा मी सभासद झालो आहे आणि या सर्वांचा मिळून महिन्याला खर्च किती तर दोन-अडीचशे रुपये! हेमंतरावांची ही शिकवण मी अगदी तंतोतंत उचलली. आज मला त्याचे समाधान वाटते. या चौफेरशा वाचनातून आतल्याआत मी उमलून आलो. आत्मानंदाची छान अनुभूती मी या अक्षरधनातून घेतली... घेतो आहे.

'व्यासपीठ'साठी काम करताना साहित्यिक बाबींकडे त्यांना हवे तसे लक्ष देता येत नाही. म्हणून मनातून ते विलक्षण नाराज असतात. परंतु 'दुसरं कुणी करील... मीच कशाला जबाबदारी घेऊ... कुणाचा कशाला नाहक वाईटपणा, असा संकुचित विचार करतील तर ते हेमंतराव कसले?' कुणी चांगलं-वाईट काहीही म्हणो वाचनालय आणि व्यासपीठ उभं

राहण्यात हेमंतरावांचे कष्ट शब्दातीत आहे. वाचक चळवळीचा प्रचार आणि प्रसाराच्या विचारांशी घट्ट नाळ जुळलेला त्यांच्यातला कार्यकर्ता मला स्तिमीत करत आलेला आहे.

साहित्य, कला, संस्कृती, चित्रपट, संगीत, वाचन यातील एक 'दर्दी आणि मर्मज्ञ आस्वादक रसिक' म्हणून अनेकांना त्यांची ओळख आहे. उत्तम पुस्तकांचं स्वत:चं असं कलेक्शन त्यांच्याकडे आहे. अनेक चांगल्या चित्रपट गीतांच्या कॅसेट, सीडीज त्यांच्या संग्रही आहेत. त्यांची खवय्येगिरीही अनेकांना ज्ञात आहे. त्यामुळे जीवनाचा खराखुरा आनंद घेणे, उत्तम कलांचा, गोष्टींचा रसास्वाद घ्यावा, तो हेमंतरावांसारख्या जिंदादिल माणसानेच.

म्हणून चांगलं कुठलंही काम करायला त्यांची ना नसते. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या 'राष्ट्रासाठी तुम्ही काय कराल?' या आशयाचा लेख त्यावर्षीच्या १५ ऑगस्टला झेंडावंदनानंतर सर्वांसमोर त्यांनी वाचला होता आणि मुख्य अभियंता गवळेसाहेबांच्या निरोप समारंभात हेमंतरावांनी वाचलेली डॉक्युमेंटरी इतकी परफेक्ट होती की, त्यांचे हे दोन वाचन अनेकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहावेत, इतके सुंदर झालेले होते.

हेमंतराव सूत्रसंचालन अतिशय उत्तम करतात. कार्यक्रमही सुंदर, नेटका घडवून तो संपन्नही करतात. त्यावेळी वेळ, पैसा, शक्ती अर्थातच खर्च होते, पण त्याचं म्हणून वेगळं कुठलंही बिल लायब्ररीकडे आलेलं नाही. हेमंतरावांकडे असलेली ऊर्जा विलक्षण आहे.

बरं, नवीन अधिकारी आले की, पुन्हा बे एके बे! पुन्हा शून्यापासून सुरुवात. बरं हनुमानासारखी छाती फाडून नाही दाखवता येत आपल्याला की, आपण किती सच्चे, प्रामाणिक आणि रसिकोत्तम आहोत म्हणून! वेळ जातो. नवीन उभालेलं काम हीच ओळख! वेळ जातो, हे सर्व समोरच्याला जाणवायला, पण हेमंतराव कंटाळत नाही. नाउमेद होत नाही. पुन्हा पुन्हा पायाभरणी करत राहतात. हेमंतरावांची ही स्थितप्रज्ञता

वाखाणण्याजोगी आहे.

हेमंतरावांना आता सेवानिवृत्तीचे वेध लागलेहेत. कारण अत्यंत परिश्रमातून आणि मन:पूर्वकतेने उभं राहिलेलं वाचनालयाचं हे सरस्वती मंदिर आणि व्यासपीठचा उपक्रम यापुढेही सुरू रहावा म्हणून ते नव्या शिलेदारांच्या शोधात आहेत. काही माणसं केवळ टीका करतात. प्रत्यक्ष काम किती लोकांना करायचं असतं? सार्वजनिक काम करताना जसा मान-सन्मान, प्रसिद्धी वगैरे मिळते तसेच टक्के-टोणपे खाणारी चिवट माणसं आपल्याला हवीहेत! असं हेमंतरावांना वाटतं.

मला त्यांचे सर्वच विचार पटतात, असेही नाही. कधीकधी आपल्यालाही थकायला होतं. धावपळ नको वाटते. स्वत:च्या लिहिण्या-वाचण्यात खंड पडतो, कुटुंबाकडे दुर्लक्ष होतं. त्यामुळे मनाला अस्वस्थतता येते. परंतु हेमंतरावांची चिकाटी आणि जिद्द पाहिली की, मी पुन्हा उभा राहतो.

इतकंच काय वाचनालयाच्या मुद्यावरून आजवर त्यांनी कितीतरी लोकांना मदत आणि काम करण्याची विनंती केली आहे. जाहिरातदार, वाचनालयाचे थकबाकीदार, अनियमित सभासद यांच्याशी त्याबाबतचा पाठपुरावा करताना समोरचा आपल्याला समजून घेईलच, असं होत नाही. कधीकधी काही माणसं वैतागतात, चिडतात, पण हेमंतराव त्यांना आपल्या विनाअनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या वाचनालयाबद्दल सांगत राहतात. त्यातूनच नवनवीन ग्रंथ खरेदी, कर्मचाऱ्यांचं मानधन, वर्षभरातले साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रमांना लागणारा निधी उभा करण्याची त्यांची तळमळ जाणवत राहते. त्याकामी नेटाने लढणारा खंदा शिलेदार होताना मी त्यांना पाहिलंय.

अनेकांना त्यांची नि माझी जोडी म्हणजे शासकीय कर्मचाऱ्यांच्या वाचनालयाचे लॉरेल-हार्डी (तब्बेतीवरून) वाटते. लोक काहीही चांगलं-वाईट म्हणूदेत. व्यक्तिगत माझा अनुभव फक्त एवढाच आहे की, गेली वीस वर्षे हा भला माणूस मला हेच सांगत राहिला की, ‘विवेक हा

लेख, हे पुस्तक तू वाच. छानेय... गावात अमूक एक कार्यक्रम चांगलाय... आपण जाऊयात...' गोदागौरव, जनस्थान, लेखक तुमच्या भेटीला, नाशिक जिल्हा साहित्यिक मेळावा, ग्रंथप्रदर्शन, चित्रप्रदर्शन, वसंत व्याख्यानमाला अशा कार्यक्रमांना आम्ही आवर्जून बरोबरच जातो. असे सुंदर कार्यक्रम चुकले की, आम्ही हळहळतो. दररोज भेटलो की, काल काय छान पाहिलं, ऐकलं म्हणजे टीव्हीवरचा सारेगमपा काय छान होता, काय गातात पोरं. शिवाय, तुझं लेखन काय म्हणतंय, हे तू छान लिहिलंस, तुझा कार्यक्रम कसा झाला, तब्बेतीला जप, मुलांचा अभ्यास काय म्हणतोय, पैसे वगैरे हवे असतील तर सांग, संकोच करत जाऊ नकोस, कार्यक्रमाला वगैरे वेळ झाला तर 'तू घरी कसा जाणार? सायकल राहू दे, मीच सोडून देतो, कुणी टीका करतंय, करू दे! लोकांनी गांधी, साने गुरुजी, नेहरू, सावरकर, यशवंतराव, अण्णा हजारे कुणाला सोडलंय' अशी माझ्यासह अनेकांची काळजी घेणं, आपुलकीनं विचारणं, चांगलं ते सूचवणं हा त्यांचा एक पिंडच!

हेमंतरावांनी आजवर कितीतरी गरजू नि हुषार मुला-मुलींना त्यांच्या शिक्षणासाठी छोटी-मोठी मदत केलेली मी पाहिलीय. दान सत्पात्री असावं आणि या मदतीची उगाच चर्चाही नको. आपण समजाचं काही देणं लागतो! हा त्यांचा एक महत्त्वाचा विचार.

वाचनालय, व्यासपीठच्या निमित्ताने आमचे सर्वांचेच यथोचित सत्कार त्यांनी वेळोवेळी घडवून आणले. परंतु इतरांना गौरवता-गौरवता हेमंतराव मात्र स्वत: कौतुकापासून खरोखरी वंचित राहिले. ऑक्टोबर २००८ मध्ये संपन्न झालेल्या पहिल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे साहित्य संमेलनाची मुख्य धुरा हेमंतरावांकडे असूनही त्यांचा सत्कार करणे संयोजकांना शक्य झाले नाही. ही बाब कवीहृदयाच्या विलास शेळकेसाहेबांच्या लक्षात आली तेव्हा संमेलनाचे सूप वाजले होते.

हेमंतरावांना त्याचं फारसं काही वाईट वाटलं नाही. ते म्हणाले, 'साहेब, इतकं म्हणाले हाच आपला सत्कार!' त्यापेक्षा आपण हे सारं

ज्या सर्वांसाठी करतो, त्यात सर्वांनी आवर्जून यावं, जीवनाचा निखळ आनंद घ्यावा, अशा कार्यक्रमांतून प्रेरणा घेऊन वाचन, लेखन करावं, सुंदर समाज घडण्याची प्रक्रिया सुरू व्हावी, परस्पर संवाद व्हावा, माणूस म्हणून सुंदर आयुष्य जगावे यासाठी साहित्य, वाचन आणि त्यानुषंगाने असे कार्यक्रम व्हावेत, असा विचार घेऊन त्यांनी नाशिक आणि अकोला साहित्य संमेलनासाठी अक्षरश: जीवाचे रान केलेलं मी अनुभवलं आहे.

असं खूप काही त्यांच्याबद्दल सांगता येईल. ते वाचनालयाचे सचिव, व्यासपीठचे संपादक वगैरे आहेत. परंतु असं असूनही वाचनालयात दररोज मन:पूर्वकतेने पेपर लावणं, आलेला नि पाठवायचा पत्रव्यवहार, कार्यक्रमांची सर्व अनुषंगिक कामं करणं त्यांच्या जणू अंगवळणीच पडली आहेत.

व्यासपीठचं काम सुरू असताना त्यांना चैन म्हणून पडत नाही. साहित्य मागणीची पत्रं, जाहिरातीचं काम, अंक लावणं, अंक साहित्यिक व वितरकांना वेळेत पोहोचवणं यात घरची दिवाळी ‘साजरी’ करायची राहूनच जाते. त्यानंतर अंकाच्या बऱ्या-वाईट प्रतिक्रिया स्वीकारणं, पुढच्या अंकाची तयारी, असं पडेल ते काम करताना खरं तर त्यांची दमछाक होते. परंतु आई-वडिलांचे संस्कार, खान्देशच्या मातीचा चिवटपणा, उत्तम कानसेन, भक्कम आणि चौफेर वाचक, मर्मज्ञ आस्वादक आणि चळवळीतील कार्यकर्तेपणाचा अनुभव यामुळे हेमंतराव पुन्हा पुन्हा उमेदीने, उत्कटतेने उभे राहतात. कामाला लागतात.

हेमंतराव असं विलक्षण रसायन आहे. भरपूर काम नि उत्साह त्यांच्यात खच्चून भरलाय. हे सर्व काम उभं राहताना मी त्यांच्यासोबत असतो. त्यामुळेच व्यक्तिगत माझ्या जडणघडणीत हेमंतरावांचा सहभाग खूपच महत्त्वाचा राहिला आहे.

छोटेमियाँच्या भूमिकेत मी आपला मनमोकळा वागत राहतो. चटकन रिॲक्ट होतो. तरीही एक कवी म्हणून अनेकदा त्यांनी मला समजावून घेतलं आहे, याची जाणीव झाली की, मनोमन मी ओशाळतो. हेमंतरावांच्यातलं कार्यकर्तेपण वादातीत आहे. हे सर्व आठवलं की, माझा

तथाकथित आक्रमकपणा गळून पडतो. आताश: मी त्यांच्यावर उठसूठ वार करत नाही. त्यांच्या वयाचा, ज्ञानाचा, अनुभवाचा आदर करतो. त्यांची भूमिका, तळमळ समजून घेतो आणि त्यातूनच मी अधिकाधिक नम्र होत गेलोय, असं मला वाटतं.

सन २००९ सालच्या व्यासपीठने साहित्य मागणीसाठी व व्यासपीठसाठी आलेल्या साहित्यावर चर्चा करणेकामी परिवाराचे सल्लागार विलास शेळकेसाहेबांकडे गेलो. त्यांनी मला विचारलं, 'विवेक, तुम्ही काय लिहिताय यावर्षी व्यासपीठमध्ये?'

मी म्हटलं, 'हेमंतरावांवर, लिहावं का?'

शेळकेसाहेब तत्काळ म्हणाले, 'लगेच लिहून टाका. त्यांच्या निवृत्तीची वाट पाहत बसू नका, लगेच लिहा...'

शेळकेसाहेब साहित्य संमेलनात म्हणाले होते तसा हेमंतरावांचा यथोचित सन्मान झालाच, असता तर इतकं सविस्तरपणे त्यांच्यावर कुठे बोलता आलं असंत? मात्र या लेखातून त्यांचा सन्मान होईल किंवा कसे? यापेक्षा वाचक चळवळीतल्या एका सच्च्या कार्यकर्त्याचं 'कार्यकर्तेपण' थोडंबहूत अधोरेखित करण्याचा मी प्रयत्न केला इतकंच!



# तिची गोष्टच वेगळी
# **रोहिणीताई नायडू**

रोहिणीताई आणि मी निफाडला काही वर्षे एकाच शाळेत शिकलो. शिक्षणतज्ज्ञ व्ही.व्ही. चिपळूणकर यांनी त्यावेळी गौरवलेली. 'वैनतेय विद्यालय, निफाड' ही आमची शाळा. शाळेची शिस्त भारी कडक. आदरणीय व्यवहारेसर आमचे मुख्याध्यापक. सर्व शाळेला त्यांचा एक आदरयुक्त धाक वाटायचा. साधारण १९७९ ते १९८१ अशी ती वर्षे होती. रोहिणीताई माझ्या वर्गात होत्या. मोठ्या शिस्तीच्या वातावरणात आमची शाळा पूर्ण झाली.

मला चांगलं आठवतंय, सलग तीन वर्ष एकाच शाळेत, एकाच वर्गात, एकाच तुकडीत आणि राहायलाही काही दिवस एकाच गल्लीत असूनही मी आणि रोहिणीताई एकमेकांशी अजिबातच बोललो नाही. त्यावेळी वर्गातली मुलं-मुली आपसात फार क्वचित बोलत. जी मुलं मुलींशी बोलत त्यांना चिडवलं जाई. त्यातून काही मुलं धीटाईने बोलत. क्वचित वह्या-पुस्तकांची देवघेव व्हायची. वर्गाला त्यांचं अप्रूप वाटायचं.

मी अभ्यासात साधारण. बुटका, हडकुळा. वडील त्याच शाळेत शिक्षक असल्यामुळे दबलेला. माझं मन शाळेत रमायचं नाही. वर्गातली हुषार-देखणी मुलं मला शत्रू वाटायची. स्वत:चा राग यायचा. या पार्श्वभूमीवर कुठल्याच मुलीशी मी बोलू शकत नव्हतो. भाषण करणं

वगैरे तर अगदी दूर. रोहिणीताई वर्गातल्या उंचशा मुलींमधली एक मुलगी. रोहिणीताईंचे वडील (नाना) शिक्षणाधिकारी. रोहिणीचं राहनीमान निटनेटकं, रंग गोरापान, चेहऱ्यावर मंदस्मित, अभ्यासातही व्यवस्थिपणा, वागणं शांत, समंजस.

माझं त्याउलट. अभ्यासातला कच्चेपणा, गल्लीतल्या गावठी खेळांची आवड. त्यामुळे गृहपाठही अपूर्ण असायचा. गणिताचे सर मला नेहमी बदडून काढायचे. शाळेत मी दबून असायचो. मुली आपल्याला हसतील, ही भीती सारखी मनात असायची.

आमची शाळा म्हणजे जणू अखंड पेटता असा ज्ञानयज्ञच होता. दहावीला वर्षभर आम्ही अभ्यासातच होतो. आम्हीही झटून अभ्यास केला. शाळेच्या नवीन इमारतीत आमची पहिली बॅच. म्हणून शाळेने आमचा कसून अभ्यास करून घेतला. आम्ही काठावरचे विद्यार्थीही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो.

जीवनात उभं राहताना त्या शाळेने दिलेले संस्कार फार उपयोगी पडले. आम्ही या शाळेचे भाग्यवंत विद्यार्थी.

१९८१ साली आमची शाळा सुटली. आमचा वर्ग पांगला. सुरुवातीला काही वर्षे या फाटाफुटीचं फार काही वाटलं नाही.परंतु जसजसे दिवस, वर्षे जात राहिले तशी ही तीव्रता वाढत राहिली. मित्रांच्या आठवणी सतावू लागल्या. काही मुलं-मुलीं तर एकदाचे दहावी सुटले,तेव्हा दिसलेले ते पुन्हा कधीच दिसले नाहीत. त्यांचे चेहरे, वर्गातल्या बेंचवर बसण्याच्या त्यांच्या जागा, वर्गातली एखादी छोटी-मोठी आठवण, मात्र मनाच्या एका कोपऱ्यात मुक्कामी राहिली. आपण इतके कोडगे कसे? याचंही वाईट वाटत राहिलं.

मी आपला निफाडच्याच कला आणि वाणिज्य महाविद्यालयात कॉमर्स शाखेत प्रवेश घेतला. तेथे मला अर्थशास्त्राचे प्रा. के.एम. खैरनार सरांसारखे कलाप्रेमी नि चांगले वाचणारे, उमद्या मनाचे प्राध्यापक मिळाले. माझं दहावीपर्यंत गोंधळलेलं नि अस्वस्थ मनाचं गलबत त्यामुळे

काठाशी लागलं. मनाला छान उभारी वगैरे मिळाली. मी झपाटून वाचू लागलो. थोडंबहूत लिहून पाहू लागलो. मी काहीसा विचारशील झालो. याचं श्रेयही अर्थात खैरनारसरांच्या प्रयत्नांना!



हे सर्व इतकं सविस्तर यासाठी सांगतोय की, या सर्व जडणघडणीत वर्गातली ती मुलं डोक्यात फिट्ट होती. त्यांना विसरणं अशक्य होतं. त्यांच्या आठवणी मनात गच्च होत्या.

उपरा, बलुतं, आठवणींचे पक्षी, कृष्णाकाठ, सफर, अक्करमाशीसारखी आत्मचरित्रं वाचून बारावीच्या सुटीत मीही माझं जमेल तसं आत्मचरित्र लिहिलं. त्यात 'माझे शाळेचे दिवस' यात वर्गातली सर्व मुलं-मुली, त्यांची नावं, माझे शिक्षक अशा आठवणींचं ते प्रकरण विशेष होतं. त्यात एक नाव होतं 'रोहिणी किसन वानखेडे'. वडिलांच्या बदलीमुळे त्यांनी निफाड सोडलं होतं. पुढे काहीच माहीत झालं नाही. रोहिणीताई कुठे गेल्या?

महाविद्यालयातलं शिक्षण पूर्ण होता होता शेवटी मला नोकरी लागली. नाशिक, येवला, अंगणगाव, धुळे असा सातेक वर्षे प्रवास करत मी पुन्हा नाशिकला आलो. त्र्यंबकरोडवरील आमचं कार्यालय सिंचन भवनमध्ये होतं. सिंचन भवनाची भिंत म्हणजे शेजारचं बांधकाम भवन. सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यालयं. एकदा दुपारचा चहा प्यायला म्हणून तेथे गेलो, तेव्हा मला तेथे रोहिणीताई अचानक दिसल्या. ओळख करून विचारपूस करण्याचं धाडस तेव्हाही आलेलं नव्हतं. त्या बायकांच्यात, मी सहकारी मित्रांमध्ये! नंतर चौकशी केली असता समजले की, रोहिणीताई बांधकाम विभागात 'सिनिअर क्लर्क' म्हणून नोकरीस आहेत.

दरम्यान, रोहिणीताई एकदा रस्त्यात भेटल्या. मी सायकलवर. लाईट बिल भरायला चाललो होतो. त्यांना पायी चालताना पाहून थांबलो. नमस्काराचा सोपस्कार होता होता त्यांच्या दु:खी चेहऱ्याचा मला अंदाज आला. म्हणून 'काय झालं?' असं नुसतं विचारलं तर ताई एकदम

रडायलाच लागल्या. मी गोंधळून गेलो. त्यांनी सांगितलेल्या घटनेने मलाही खूप वाईट वाटलं. रोहिणीताईंची एकुलती एक मुलगी गौरी (आसावरी) हिचं नुकतंच निधन झालेलं होतं. मध्ये दोनेक महिले गेले असतील, पण आपल्या वर्गातील मुलगा भेटला म्हटल्यावर त्यांची जखम भळभळली होती.

आम्ही भेटलो, तेथून जवळच ताई राहायला होत्या. मला ते माहीत नव्हते. लग्नानंतर मुलीचं आडनाव बदलतं. त्यामुळे पेपरात एखादी चांगली-वाईट बातमी वाचली तरी सहसा कुणाच्या लक्षात येत नाही. गौरीची बातमी मीदेखील वाचली होती. हळहळलो. पण हीच गौरी रोहिणीताईंची लेक! हे त्यात कुठं होतं? नि मला ते कोण कशाला सांगेल?

ताईंना घरी येण्याचा शब्द दिला. ताईंची ती भेट, ते रडणं आजही माझ्या स्मरणातून जाता जात नाही.

त्यानंतर एकदा ठरवून ताईंच्या घरी गेलो. ताई आणि पंत घरीच होते. त्यांनी माझी ओळख आपले पती श्री. नागराजन नायडू यांच्याशी करून दिली. मनमोकळ्या गप्पा झाल्या. ताईही सावरलेल्या दिसल्या. गौरीच्या कितीतरी सुंदर आठवणी त्यांच्याकडे होत्या. दु:खाचे कढ येतच होते.

दु:ख मोठं होतं. परंतु त्याच विचारात-दु:खात राहिलं तर आणखी मनाला त्रास होणार होता. म्हणून हे दु:ख स्वीकारून पुढची वाटचाल करण्याचं ठरत होतं. मला जे - जे सूचत होतं तसंतसं बोलत गेलो. ताई त्यास तयार होतील, अशी आशा वाटली. पंत विश्वासानं म्हणाले, 'विवेक, येत जा त्यांना तेवढंच बरं वाटेल.'

मी म्हणालो, 'होय, निश्चित!'

निघताना मनोमन ठरवलं की, ताईंना मनापासून साथ द्यायची. काहीतरी छान उभारून त्यात आपलं होता होईल तेवढं योगदान द्यायचं. दरम्यान, आमच्या विभागात आमचं वाचनालय सुरू झालं होतं. मी

त्यात एक होतो. त्या कामांचा अनुभव उपयोगी पडणार होता, असं वाटलं.

ताईंचे बंधू राजू वानखेडे, आई-वडील, काही मैत्रिणी, स्वत: पंत आणि मी अशा सर्वांच्या चर्चेतून एखादी सामाजिक संस्था सुरू करावी! असे ठरले. ताईंना स्वत:ला तशी इच्छा होती. त्यातूनच 'गौरी सामाजिक व कल्याणकारी संस्था' स्थापन झाली.

संस्थेच्या इतर उद्देशांमध्ये मुलांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन होतं. तेथे मी मदत करावी, असे ठरवले. त्यानुसार गौरीच्या स्मृतीप्रीत्यर्थ वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आदी स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं. नाशिक शहरातल्या काही शाळांमधून चांगला प्रतिसाद मिळत गेला. ताईंसोबत त्यांच्या घरातली सर्व माणसं, शिवाय पुष्पा चोपडे, मनीषा शुक्ला, विजय कोकणे, सौ. शीला गायकवाड, सौ. मनीषा मांदाडे, स्वत: पंत आणि मी असायचो. सर्व जमून आलं की आमचा सर्वांचा उत्साह वाढे.

मला चांगलं आठवतंय, स्पर्धेची सर्व अनुषंगिक तयारी आणि स्पर्धा संपन्न करणं यात मी जमेल तसं काम करायचो. रोहिणीताई आणि पंत सर्व व्यवस्था जातीनं पाहायचे. स्पर्धा यशस्वीतेबरोबरच मुलांना त्यातून आनंद मिळतो आहे का? मुलांना हे सर्व आवडतंय ना? किती मुलं आली; यापेक्षा किती उत्सुकतेने आली? त्यांना आपण दिलेला नास्ता (खाऊ) आवडला का? ही सर्व काळजी ताईंच्या डोळ्यात मला दिसायची.

ताईंची एक 'आई' म्हणून असलेली भावावस्था मी डोळ्यात साठवून घ्यायचो. माझ्यातला कार्यकर्ता आनंदून जायचा. मुलांसाठी काहीतरी चांगलं करतोय, याचा आनंद वाटे. या सर्व कार्यक्रमातलं काम मला कधीही ओझं वाटलं नाही. इतकी मन:पूर्वकता, पारदर्शकता त्यात असे.

सुरुवातीचे चारेक वर्षे अशा टिपिकल वाटाव्यात अशा स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न झाल्या. पण स्पर्धेची ती निवेदनं, त्यासाठीच्या त्या

अटी-शर्ती, मुलांचं ते जीवघेणं पाठांतर, स्पर्धेचं ते पारंपरिक टेन्शन, ती मोजकी बक्षीसं, पालकांचा नको इतका सहभाग, बक्षीस न मिळालेल्या इतर मुलांचं हिरमुसणं हे सारं ताईंना नकोसं वाटलं. मुलांना निर्भेळ आनंद मिळाला पाहिजे, यावर आमचं एकदम झालं. त्यातून मुलांसाठी 'आनंदमेळ्या'च्या आयोजनाचं ठरलं. रिमांड होम, नाशिकमध्ये कार्यक्रम करायचा ठरवलं. एका सुटीत सर्वजण आम्ही तेथे गेलो. मुलांसाठी ठरवून एक एक स्टॉल लावलेला होता. एक स्टेज होतं. त्यावर पपेट शो, गाणी, गोष्टी, विनोद, नाच, वाजवणं असं सारं काही होतं. मुलं फुगे फुगवत होते. फोडत होते. आनंदाने बागडत होते. दिवसभर नुसती धम्माल. मग जेवण. मी पाहिलं रोहिणीताई त्या दिवशी मुलांमध्ये मूल होऊन खेळल्या. सर्वांनाच खूप आनंद झाला.

परंतु ताईंचा खरा पिंड कार्यकर्तीचा. त्याला एक निश्चित स्वरूप आणि आकार देण्यासाठी ताईंनी सामाजिक कार्यकर्तीचं (एमएसडब्ल्यू) आपलं रितसर शिक्षण पूर्ण केलं. त्यांच्या बॅचमध्ये पहिल्या आलेल्या मनीषा शुक्ल या त्यांच्या सोबत होत्या. दोघी छान मैत्रिणी झाल्या. विचार जुळले. त्यामुळेच गौरी सामाजिक कल्याणकारी संस्थेला एक छान स्वरूप प्राप्त झालं. पुढे याच मनीषा शुक्ल संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणून काम पाहू लागल्या. कामांची व्याप्ती वाढतच गेली.

संस्थेचं काम जसं वाढत गेलं, तसं रोहिणीताईंचं व्यक्तिमत्त्वही दिवसेंदिवस प्रगल्भ होत गेलं. दिवसागणिक त्यांच्या मैत्रिणीही वाढत गेल्या. त्यात पुष्पा चोपडे, डॉ. पूर्वा पाटील, मनीषा कुलकर्णीसारख्या कार्यकर्त्या, मैत्रिणी त्यांना मिळाल्या. मूल्य शिक्षणावर भर देणाऱ्या काही संस्थांतून प्रयोगशीलतेने त्यांना काम करायला मिळालं. तेथे डॉ. अनिल अवचट, राजू तांबे, रोहिणी बलंग यांचं काम त्यांना जवळून पाहायला मिळालं. शिवाय नाशिकमध्ये चित्रकार शिवाजी तुपे सर, साहित्यिक बी.जी. वाघ, उत्तम कांबळे अशा व्यक्तिमत्त्वांचाही त्यांना परिचय करून घेता आला. पंत सोबत असायचेच. म्हणून त्यांचा हुरूप वाढला. बंधू

राजू वानखेडे यांच्या सहकार्याने त्यांनी स्वत:ची 'ग्रेस ॲकॅडमी' नावाची शाळा सुरू केली.

विशेष म्हणजे या शाळेत त्या मुख्य होत्या. त्यामुळे आपल्या शाळेत मुलांना आनंददायी आणि भयमुक्त शिक्षणाची त्यांनी व्यवस्था केली. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, म्हणून त्यांच्यासाठी खेळ, विविध गोष्टींची छान छान पुस्तकं, विज्ञानाची आणि उपयुक्त अशा पुस्तकांची छोटीशी परंतु मुक्तद्वार लायब्ररी. शिवाय आपल्या मुलांना उमलत्या वयातच लेखक, कलावंत, खेळाडूंची ओळख व्हावी म्हणून शाळेत तशा कार्यक्रमांचं आयोजन. मुख्यत्वे मुलांना भरभरून प्रेम देणं, घराइतकंच त्यांना आपल्या शाळेतही मोकळं, आनंदी वाटावं अशा पद्धतीचं वातावरण दिसून येते. मुलांबरोबर ताईंचंही स्वत:चं शिकणं सतत सुरू असतं.

खरंतर मला हे समाधान वाटत राहिलं की, ताई आता खऱ्यार्थानं मुलांच्यात मोकळेपणाने रमताहेत. त्यांच्यासाठी काहीतरी मूलभूत काम करताहेत. कधीतरी दु:खाने गदगदलेलं हे झाड आता मुलांमध्ये छान हसतंय, हे पाहून विलक्षण समाधान वाटतं.

त्यापुढे जाऊन त्यांनी, आपल्या शासकीय नोकरीतील पाच वर्षांची असाधारण रजा मंजूर करून घेतली. या सुटीत त्यांनी वेगवेगळ्या गावात जाऊन तेथे शौचालयाच्या निर्मितीसाठी विशेष प्रयत्न केले. महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे, मोफत नेत्रचिकित्सा शिबिरांचं आयोजन, कुठल्याशा आदिवासी आश्रमशाळेत जेवणाची स्टीलची ताटं पुरवणं, गरजू मुलींना चपला घेऊन देणं, कुणाला शाळेत प्रवेश मिळवून देणं, कुणाचं शिक्षण अशा विविध कामांना त्यांच्याकडे अजिबात कमी नसते.

ताईंनी काही कामं तर अतिशय उत्स्फूर्तपणे केली, मला त्याचा विशेष आनंद व कौतुक वाटतं. रवळगाव (ता. दिंडोरी) येथील पहिली ते सातवीची शाळा त्यांनी छान रंगवून दिली. तसेच महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्याच सहकार्याने त्यांनी दिंडोरी तालुक्यात अडीच हजार झाडं

ग्रामस्थांच्या मदतीने लावली. त्यावर ‘हिरवीकंच बांधिलकी’ हा लेख मी सकाळ वृत्तपत्रातून लिहिला. ताईंबरोबरच मलाही काही फोन यासाठी आले. त्यात एक फोन आमचे त्यावेळचे मुख्याध्यापक श्री. वि.दा. व्यवहारेसरांचा होता.

कामाचं क्षितिज विस्तारलंय. ‘पाखरांचे पंख आम्हा आभाळ पुरेना’ असा त्यांचा विश्वास वाढलाय. म्हणून सुधा मूर्ती, प्रकाश आमटे, राजू परुळेकर, राजेंद्र सिंग अशा कार्यकर्त्या माणसांना त्यांना मन:पूर्वकतेने ऐकायचं असतं. उत्तमोत्तम नि निवडक अशी पुस्तकं विकत घेऊन वाचायची असतात. त्यातनूच मार्केट यार्डात बालमजुरी करणाऱ्या मुलांचा प्रश्न त्यांना लक्षात आला. काम सुरू झालं. शिवाय याच विषयावर चित्रकला स्पर्धाही आयोजित करण्यात आली. त्याचं प्रदर्शनही भरवण्यात आलं. ज्येष्ठ चित्रकार शिवाजी तुपेसर बक्षीस वितरणासाठीचे पाहुणे होते.

त्यातच संस्थेला ‘सिकलसेल’ हा प्रामुख्याने आदिवासी भागामध्ये आढळणारा अनुवंशिक आजाराचे प्रबोधन व नियंत्रणाचे महत्त्वपूर्ण काम मिळाले. त्यापूर्वी त्यांनी विविध खेडे-पाडे, वस्त्या यांना दिलेल्या भेटी, त्यांच्याशी साधलेला संवाद, तेथील अंधश्रद्धा, प्रश्न यांचा केलेला अभ्यास कामी आला. प्रत्यक्षात सिकलसेल आजाराचं काम करायचं सर्व क्षेत्र, परिसरातील सर्व बाबींचा सर्वे, कागदपत्रांची पूर्तता, आवश्यक कार्यकर्त्यांचा संच, शासकीय दवाखाने आणि जिल्हा परिषद कार्यालयांना भेटी, वाडे-वस्त्यांवरील ग्रामस्थांशी प्रत्यक्ष चर्चा अशा कामांमुळे रोहिणीताईंच्या कामाला एक निश्चित स्वरूप प्राप्त झालं.

या कामासाठी त्यांना घरातल्या माणसांबरोबरच, संस्थेच्या अध्यक्षा राजश्री वानखेडे, सीमा टाकळकर, मनीषा शुक्ल, विजय कोकणे, राजेंद्र राजगुरू, अनिल दंडगव्हाळ (दीपा आर्ट्स), हौशी खगोल मंडळाचे सचिन मालेगावकर आदींचे विशेष सहकार्य लाभले. प्रत्यक्षात डॉ. पूर्वा किशोर पाटील आदींची यात भक्कम साथ होतीच. त्यामुळेच सिकलसेलचे

हे वेगळे काम अधिक नेटकेपणाने सुरू झाले.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील उपक्रम, कार्यक्रम राज्य आरोग्य संस्था महाराष्ट्र यांचेमार्फत बालकांवर आघात करणाऱ्या अनुवंशिक आजाराच्या निदान व प्रतिबंधासाठी प्रयत्न होत आहे. यात गौरी सामाजिक व कल्याणकारी संस्थेने नाशिक जिल्ह्यासह चार-पाच जिल्ह्यातील वाडे-वस्त्यांबरोबरच शाळा-कॉलेजमधून जनजागृती रॅली, जनजागृती सप्ताह, रक्त तपासणी, प्रबोधनात्मक व्याख्याने, सूचना व माहिती पुस्तकांचं वाटप, प्रत्यक्ष संवाद-चर्चात्मक शिबिराचं आयोजन, पथनाट्य, भित्तीपत्रकांची प्रदर्शने, प्रत्यक्ष सिकलसेलग्रस्त व वाहक रुग्णांना मार्गदर्शन व औषधोपचार सुविधा अशा सर्व स्तरावर काम सुरू ठेवलेलं आहे.

नाशिक जिल्ह्यातील एकूण ९ तालुक्यात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १३ ग्रामीण रुग्णांलयांच्या कक्षेत हा कार्यक्रम यशस्वीपणे सुरू आहे. सिकलसेल आजाराविषयीची माहिती, प्रबोधन आणि त्यावर नियंत्रण यासाठी प्रचार-प्रसार, जनजागृती कार्यक्रम, रक्त तपासणी शिबिरे यांच्या दोन-तीन कार्यक्रमांना मी उपस्थित राहिलो, तेव्हा या प्रश्नांची व्याप्ती व ताईंचं हे वेगळं काम मला जवळून अनुभवता आलं.

त्यांच्या या कामाचा आवाका आणि व्याप्ती पाहून कुणीही स्तिमीत व्हावं, एवढा सर्व व्याप त्या कशा पेलवत असतील. आपली नोकरी, घर, संसार, सामाजिक कामं आणि स्नेही परिवार सांभाळणं, त्यांना कसं जमतं? हे पाहून थक्क व्हायला होतं. बरं हे कमी असतं की काय म्हणून कुठल्याही चांगल्या कार्यक्रमात त्यांना यायचंच असतं. चांगली पुस्तकं वाचायची असतात, त्र्यंबकेश्वर जवळच्या खरोली गावच्या मुकुंद दीक्षितांच्या कामाचं नुस्त त्यांना एकदा बोललो तर ताई-पंत एके रविवारी त्यांची गाडी घेऊन माझ्या घरी हजर! आम्ही लगेच खरोलीला जाऊनही आलो. दीक्षितांचं काम पाहून आलो.

झाडं व पक्षांवर प्रेम करणारे नाशिकरोडचे आमचे मित्र शेखर

गायकवाडांबद्दल त्यांना अशीच एकदा माहिती दिली. त्याच आठवड्यात आम्ही दोघं शेखर गायकवाडांच्या घरी! कुणाच्या डोळ्याचं ऑपरेशन करायचंय, कुणाला शैक्षणिक कोर्स करायचाय, ताईंना एखादं काम सांगितलं की, ताई तेथे वेळेत पोहोचलेल्या असतात. तेव्हा त्यांची उत्सुकता आणि मन:पूर्वकता मी अनेकदा अनुभवली आहे.

कालपरवा त्यांचा असाच उत्साहात फोन आला, 'विवेक, आनंदाची बातमी आहे. आपण एक वाचनालय सुरू करतो आहोत. तुझी मदत लागेल.'

मी 'हो' म्हणालो. तर त्याच म्हणाल्या, 'चित्रकार शिवाजी तुपे सरांचं नाव आपल्या वाचनालयासाठी ठरवूया.' वाचनालयाबरोबर त्यांना तुपेसरांची अनमोल चित्रसंपत्ती प्रिझर्व्ह करण्याचा मानस आहे. हे ऐकल्यावर तर माझ्या आनंदाला भरतेच आले.

सन २०१० मध्ये ताईंच्या वडिलांचं म्हणजे नानांचं वृद्धापकाळाने निधन झालं. दु:ख तर होतेच परंतु वडील वाचणारे म्हणून ताईंनी त्यांच्या तेराव्यात ग्रंथदान केले. घटना छोटी असो वा मोठी. प्रसिद्धीचा सोस नाही, पण जे करायचं ते नेमकं नि मन:पूर्वकतेने!

त्यांच्या काही मैत्रिणी लिहिणाऱ्या-वाचणाऱ्याही आहेत. त्यात पुष्पा चोपडे, निर्मला अष्टपुत्रे आणि ताई या तिघी मिळून 'कविता बहिणाईच्या' हा कार्यक्रम सादर करतात. ताई स्वत: लिहीत वगैरे नाहीत, पण त्यांचा अशा सुंदरशा कार्यक्रमातून असणं मला महत्त्वाचं वाटतं.

आता इतकं सर्व महत्त्वाचं नि वेगवेगळं काम सुरू आहे तर त्याचं कौतुक हे होणारच. नाशिकच्या एका संस्थेचा 'मुलीकडून आईचा सत्कार' या पुरस्कारार्थींमध्ये ताई आणि डॉ.पूर्वा पाटील या दोघी मैत्रिणींचा समावेश होता. केंद्रीय आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते रोहिणीताईंना सिकलसेलच्या कार्यक्रमासाठी नागपूर येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आलेलं होतं. नाशिकचाच प्रतिष्ठेचा मायको फोरम या सेवाभावी संस्थेचा आरोग्य-समाजसेवेबद्दल त्यांना नुकतंच गौरविण्यात

आलेलं आहे.

सन्मान एक निमित्त. त्यातून आपल्या संस्थेचं काम जनसामान्यांपर्यंत जातं. हा उद्देश सफल होतो, असं मला वाटतं. परंतु ताई अशा कुठल्याच पुरस्कारांबद्दल अवाक्षर काढत नाही. इकडून तिकडून आम्हीच ते जाणून घेतो. ताईंचा स्वभाव आहे तो सतत चांगलं असं काम करण्याचा. नवनवीन गोष्टी शिकण्याचा. म्हणजे ताई स्वत: उत्तम गृहिणीही आहेत. घर छान स्वच्छ, नीटनेटकं ठेवतात. स्वयंपाक अप्रतिम करतात. त्यांचं आदरातिथ्य नेहमी अगत्यशील असतं. त्यांना कुठल्याही वयोगटातल्या माणसाशी मनमोकळा संवाद साधायचा असतो. म्हणून बच्चेकंपनीमध्ये रमणं त्यांना सर्वाधिक आवडतं. कपडे आणि खाण्याबाबत त्या विलक्षण चोखंदळ आहेत. त्यांना सतत काहीना काही तरी शिकायचं असतं. सध्या त्या कायद्याचं शिक्षण पूर्ण करताहेत. पोलिस अधिकारी राहिलेल्या किरण बेदी त्यांच्या आदर्श आहेत. त्यांना आपल्या संस्थेच्या कार्यक्रमात आणून त्यांना त्यांच्याशी संवाद साधायचाय, असं सारखं काहीतरी त्या मला ऐकवत राहतात, मला त्याचा आनंद वाटतो.

एक सांगायचं राहिलं, एक वर्गबंधू म्हणनू त्यांचं माझ्याशी असलेलं नातं ताई आणि पंतांनाही महत्त्वाचं वाटतं. त्या सर्व कामात त्यांचं संवेदनशील मन शाळेतल्या विविध आठवणीत मित्र-मैत्रिणीतही असतं. या सर्वांसाठी वर्गातल्या सर्वांची एकत्र मोट बांधण्याचा आटापिटाही करण्याचा त्या प्रयत्न करतात. आमची भेट तर होतेच शिवाय मी कुणाकडे जाऊन आले, कोण कोण मान्यवर घरी येऊन गेले, कुणाशी फोनाफोनी झाली. या आठवणी तर त्या अगदी आवर्जून सांगणार. त्यामुळे मीही अपडेट होतो.

काम छोटं असो, मोठं असो. त्या माझी आठवण काढतात. याचा मला अभिमान वाटतो. त्यांची कामं सुरूच असतात. मी त्यांचा हा प्रवास जवळून पाहतो. या सर्वांच्यात त्यांची लाडकी लेक म्हणजे त्यांच्या गौरीचं जाणं त्या विसरलेल्या नाहीत. एक आई म्हणून त्यांची ती स्वाभाविकता

मला जाणवत राहते. परंतु गौरीच्या आठवणीत केवळ रडत राहून किंवा त्यामुळे कुणाच्या निव्वळ सहानुभूतीला कारण व्हावे, असं त्यांना अजिबात वाटत नाही. चांगल्या कामांतून, उपक्रमांतून त्यांनी स्वत:ला गुंतवून घेतलं आहे. परतुं ही केवळ दु:खावरची फुंकर नाही. मूळात त्यांचा पिंड एका कार्यकर्तीचा, संपूर्ण माणुसकीचा आणि संवदेनशीलतेचा असल्याने त्या या कामात झोकून देऊन काम करताहेत.

वैनतेय विद्यालयापासूनचा ताईंसोबतचा हा प्रवास अधोरेखित करताना त्यातले मी काही कवडसे फक्त पकडू शकलो आहे. वास्तविक यापेक्षाही त्यांचं काम प्रत्यक्षात कितीतरी मोठं नि महत्त्वाचं आहे. शिवाय त्यांचं संवेदनशील मन, त्यांचा लाघवी स्वभाव, त्यांचा प्रचंड उत्साह मी नाही पकडू शकलोय शब्दांच्या चिमटीत. त्यांची जगण्याची स्वाभाविकता मला नाहीए शब्दबद्ध करता येत. नात्यातलीच प्रिय बहीण वादळातून उभी राहावी तशा त्या पुन्हा उभ्या राहिल्या. मी त्याचा एक आत्मिय साक्षिदार आहे. मला त्यांच्या सोबत राहणं आवश्यक वाटतं, अभिमानाचं वाटतं.

संस्थेच्या वेगवेगळ्या कामानिमित्त, नवनवीन काही शिकण्यासाठी त्या आनंदवनात जातात, नागपूरला जातात. मोठमोठ्या निवासी शिबिरात, कार्यक्रमांना त्या नियमित जातात. आपल्या सासरी दूर केरळला जातात. सर्व क्षेत्रात त्यांचा स्नेहपरिवार आहे. दक्षिण आफ्रिकेतही आपल्या बांधकाम व्यवसायाची हद्द असलेला राजू वानखेडेंसारखा मोठा प्रिय भाऊ आणि संपूर्ण परिवारच त्यांच्या पाठीशी आहे. जिवाभावाच्या म्हणाव्यात अशा कितीतरी मैत्रिणी आहेत. कार्यकर्त्यांचा एक छान ग्रुप आहे. एकूणच त्यांचा गोतावळा चांगलाच मोठा आहे.

असं असतानाही, ३१ डिसेंबर २०१० ला नववर्षाचं स्वागत करण्यासाठी ताई आणि पंत माझ्याकडे आले. येताना खाऊ घेऊन आले. रात्री बारापर्यंत मनसोक्त गप्पा मारल्या. सर्वांनी मिळून खाऊ खाल्ला. एकमेकांना शुभेच्छा दिल्या. आम्ही सर्वांनी ताई आीण पंतांना आदरपूर्वक

नमस्कार केला.

ताईंच्या अशा कितीतरी श्रीमंत नि मनोज्ञ आठवणी माझ्याकडे आहेत. माझं दूरवरचं छोटसं घर, माझी सायकल, माझी वर्ग तीनची नोकरी, मुळचा माझा संकोची स्वभाव, काही काही म्हणून आड न आणता ताई माझ्याशी मनमोकळेपणाने शेअर करत राहतात. तेव्हा मी एक भाग्यवंत असतो. ताईंच्या या नात्याकडे कौतुकाने पाहताना माझ्या मनात आनंदाने एकच वाक्य येतं, 'तिची गोष्टच वेगळी!'



# सर्वार्थानं सुंदर 'ननो'
# नीला यशवंत कुलकर्णी

आजकाल आयुष्यमान वाढलंय, हे खरंच पण त्यापैकी निरोगी, निरामय आणि सुखभरलं आयुष्य किती जणांच्या वाट्याला येतं? ह्या प्रश्नाचं उत्तर प्रत्यक्षच अनुभवायचं असेल तर, नाशिकच्या पाटील लेन-२, बी मधील 'नवयशोदा' या इमारतीत वास्तव्यास असलेल्या नीला यशवंत कुलकर्णी म्हणजे 'ननो' यांना आपण वेळ काढून भेटायला हवं, असं मी सूचवीन.

नुकताच दि. २६ मे २०१० रोजी ननोंना, मी भेटून आलो. त्यांच्याशी भरपूर गप्पा मारून आलोय आणि मगच मी तुम्हाला याविषयी सांगतोय... त्याचं असं झालं, गेल्या एक तपाहूनही अधिक सौ. शुभदा राजेंद्र देशपांडे आणि आम्ही, शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालयात एक पदाधिकारी म्हणून खरं तर 'कार्यकर्ता' म्हणून काम करतो आहोत. सौ. शुभदा देशपांडे मुळात वाचनप्रिय, उत्तम रसिक. अतिशय सुस्वभावी. महत्त्वाचे म्हणजे आमच्या या वाचनालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना जो एक सात्त्विक देखणेपणा ज्यांच्या सजावटीमुळे विशेषत: त्यांच्या सुंदरशा रांगोळीने दिला तो शुभदाताईंनीच. कुठलंही काम छोटं-मोठं असेल कधी कंटाळा नाही. चिडणं-संतापणं नाही. एक शांत, समंजस ताई अशी त्यांची ओळख करून देता येईल. दिसायला

तर त्या सुंदर आहेतच शिवाय त्यांचं मनही नेहमीच उत्साही, प्रेमळ असं मला जाणवत राहिलं आहे. त्या वाचनातही भरपूर निवडक. 'उत्कृष्ट वाचक' म्हणूनही त्या सन्मानित झालेल्या आहेत. टेबल टेनिस या खेळात त्या वन विभागाच्या राष्ट्रीय स्तरावरच्या खेळाडू आहेत. अनेक सुवर्ण व रौप्यपदके त्यांनी प्राप्त केलेली आहेत. आमच्या सरकारी व परिषद कर्मचारी बँकेवर त्या सन्माननीय संचालिका आहेत. एक अष्टपैलू नि नितळ असं त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्यावर स्वतंत्रपणे लिहावं, इतकं छान काही त्यांच्याकडे निश्चितच आहे. तत्पूर्वी एक आठवण सांगतो, अभिप्राय म्हणून माझ्या संग्रही असलेली एडवर्ड विंडहॅम टेबंट यांची 'चेहरा' ही कविता मी त्यांना सप्रेम भेट दिलेली होती. त्यांना ती कविता आवडली होती. म्हटलं, या सुंदर वागण्याचा मूळ स्त्रोत आपण समजून घेऊयात. म्हणून शुभदाताईंच्या आई नीला यशवंत कुलकर्णी म्हणजे 'ननो' (घरगुती नाव) यांना भेटण्याचं ठरवलं.

ऑफिस, लायब्रीचं काम आटोपून, सायंकाळी सायकल पिटाळत कॉलेजरोडला पोहचलो. चोप्रा हार्ट हॉस्टिपलसमोर नवयशोदा इमारतीत तळमजल्यावर 'ननो' राहतात. वय वर्ष केवळ ८४!

प्रथम एकत्र आम्ही नाश्ता, चहा-पाणी घेतला. तोपर्यंत ८४ वर्षांच्या चिरतरुण ननोंना कौतुकाने मी न्याहाळत होतो. सावळा रंग, हसरा चेहरा, मध्यम उंची, अंगावर छान सूती गुलाबी साडी, त्यावर मॅचिंग ब्लाऊज, हातात, कानात, नाकात मोजके, नाजूक दागिने. केस छान विंचरून त्याचा छोटासा अंबाडा बांधलेला, कपाळावर ठसठशीत टिकली. कमरेला पांढरा स्वच्छ रुमाल अडकवलेला. ननो खरोखरच छान, नीटनेटक्या दिसत होत्या.

ऐकण्याचा फार नाही पण थोडाबहूत त्रास त्यांना जाणवत असावा. म्हणून त्यांच्या शेजारीच खुर्ची मांडली. मग सुरू झाला दिलखुलास गप्पांचा सिलसिला. ननोंना मी अगोदरच सांगितलं की, 'मी तुमची टिपिकल मुलाखत घेत नाहीए. तुम्ही स्वत:चं तुमचं आयुष्य आठवेल

तसं सांगा. मी लक्षपूर्वक ऐकतोय.'

'मी, नीला यशवंत कुलकर्णी. माहेरची वच्छी! म्हणजे वत्सला जोशी, इकडे सर्वजण प्रेमाने मला का कुणास ठाऊक पण 'ननोच' म्हणतात. त्यापूर्वी माझ्या माहेरबद्दल थोडसं सांगते, 'आम्ही एकंदर अकरा भावंडं. घरची परिस्थिती जेमतेम. म्हणून माझी रवानगी मालेगावची आमची मावशी रमाबाई काशीकर हिच्याकडे झाली. तिचे दीर रा.मो. काशीकर हे निष्णात वकील होते. तेव्हा त्यांच्या एकट्याच्या कमाईवर मावशीचं ३०-३२ लोकांचं कुटुंब चाले. घरात सुबत्ता होती. संस्कार होते. मुख्य म्हणजे मावशीच्या घरात भरपूर पुस्तकं असायची. मुळात मावशीसह सर्व माणसं शांत, प्रेमळ, त्यामुळे मी इथे छान रमली. एकत्र कुटुंबपद्धतीचे सुयोग्य संस्कार माझ्यावर येथेच झाले. माझ्या अचूक वागण्यावर माझा याच मावशीचा प्रभाव आहे. होय, माझं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण मालेगावातच झालं.'

याच मावशीच्या प्रेरणेनं मी नोकरी करावी, असं मनोमन ठरवलेलं. नाशिकच्या न्यू हायस्कूलला शिक्षिका म्हणून नोकरीला लागले. दरम्यान कांदिवली येथे मासपिटी म्हणजे व्यायाम सहाय्यकाचा रिफ्रेशर कोर्स केला. त्यामुळे माझी नोकरी पक्की झाली.

यशावकाश मी बी.ए., बी.एड्.ही पूर्ण केले. दरम्यान याच शाळेत यशवंत कुलकर्णी क्लर्क म्हणून सेवेत होते. गोरेपान, मध्यम उंचीचे, देखणे, हुशार, नववीपर्यंतचे त्यांचं शिक्षण अगदी पहिल्या नंबराने पास होण्यात झालं. परंतु कौटुंबीक अडचणी, मानसिक क्लेष यामुळे दहावीला ते दोनदा चक्क नापास झाले. त्या प्रतिकूल परिस्थितीमुळे सिगारेट ओढण्याचं व्यसन त्यांना लागलं असावं. परंतु कुलकर्णी पुढे त्यातून बाहेर आले. शिकले, शिक्षक झाले. मूळात कुलकर्णीसर रसिकोत्तमच होते. त्यांना वाचनाची व नाटकाची मनस्वी आवड होती. अनेक नाटकं त्यांनी स्वत: बसवली. त्यातून स्त्रीपात्रासह उत्तमोत्तम भूमिकाही त्यांनी केल्या. नाटकांचं दिग्दर्शनही ते उत्तम करीत असत. या सर्व गुणांमुळे त्यांचं

व्यक्तिमत्त्व मला आवडलं. आमचा प्रेमविवाह झाला.

अडी-अडचणीत संसाराला सुरुवात झाली. अशिक्षित असलेल्या माझ्या सासूबाई पारंपरिक विचारांच्या होत्या. मूळात त्या संतापी, भांडखोरच होत्या. त्या माझ्यावर संतापत, परंतु मी कधीच त्यांना दुरुत्तरे केली नाहीत. तीन मुली आणि एक मुलगा असा आमचा संसार छान फुलला. त्यावेळी पगार कमी. तेही वेळेवर व्हायचे नाहीत. वर्षभर दोन साड्या नि सणसमारंभासाठी एक साडी पेटीत ठेवलेली असे. चारआणे डझनांची केळी घेणेही अवघड होऊन जाई. कित्येक दिवस घरात घड्याळ नव्हतं. शाळेत जाण्यासाठी वेळ बघायला म्हणून कोपऱ्यापर्यंत माझ्या मुलांना जावं लागे. पैसे साठवून पुढे घड्याळ घेतलं तेव्हाही सासूबाई रागावल्याचे स्मरते.

संस्थेच्या राजकारणामुळे सात-आठ वर्षे पती यशवंत कुलकर्णींची बदली निफाड येथे इंग्लिश स्कूलला होती. ते तेथे मुख्याध्यापक होते. त्यांची बदली नाशिकला होईना. शेवटी दबावाला कंटाळून त्यांनी उर्वरित दोन वर्षांची सेवा पूर्ण करण्याआधीच स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यामुळे ते जरा जास्तच निराश झाले. ते निफाडला असताना आमचा संसार, मुलांची व माझी शाळा, पै-पाहुणे, हवं- नको ते सारं मला एकटीलाच पाहावं लागे.

माझी मुलं त्यांच्या वडिलांना भाऊ म्हणत. भाऊंच्या नैराश्येच्या काळात त्यांना उभारी देण्याचा माझा प्रयत्न असे. त्यासाठी जमेल तसं त्यांना काही चांगले वाचून-म्हणून दाखवणं, कॅरम खेळून त्यांचं मन रमविणं, त्यांना झोप न लागल्यास डोक्याला तेल लावणे, त्यांच्याशी उत्तम संवाद साधत त्यांचे नैराश्य घालवण्याचं काम मी अगदी मनापासून करत असे.

मला स्वत:ला फिरण्याची-प्रवासाची भारी हौस! पण पैशांच्या चणचणीमुळे आणि संसाराच्या रगाड्यात तेव्हा ते राहूनच गेले. मुलांचे वडील (भाऊ) तसे काटकसरीच होते आणि तशात त्यांचं मन:स्वास्थ्यही

त्या नोकरीमुळे ठीक नसल्याने फिरण्याची वगैरे हौस मी मनातच ठेवली.

प्रवासाचे शक्य होणार नाही, याचं वाईट वाटून न घेता मी घरात मन गुंतवून घेई. मला स्वयंपाक उत्तम करता येतो. खाद्यपदार्थांचे नवनवीन प्रयोग करायला मला आवडतात. त्याबद्दल कुठे काही चांगलं वाचलं, ऐकलं किंवा पाहिलं, की मी तो पदार्थ मन:पूर्वकतेने करून पाहते. विशेष म्हणजे मला तो करणं जमतो. मग मी तो नवीन शिकलेला पदार्थ माझ्या जवळच्या माणसांना आवर्जुन शिकवते. वृत्तपत्रं, मासिकांतील यावरची कितीतरी कात्रणं, टिप्स माझ्या वहीत मी छान कापून-चिकटवून ठेवल्या आहेत.

त्याचबरोबर मला चित्रकला अगदी मनापासून आवडते. त्यामुळेच प्रथमा आणि छाया या माझ्या मुलींनी चित्रकलेचं एटीडीचं शिक्षण घेतलेलं आहे. माझा मुलगा यशोधन आणि शेंडेफळ शुभदा ही माझी चारही मुलं फार गुणी. सर्व कलांमध्ये त्यांना रस आहे. माझ्या मुलीच्या म्हणजे छायाच्या चित्रकला क्लासच्या विद्यार्थ्यांबरोबर बसून मी मध्यंतरी चित्रकला शिकले. माझी नात इला खुळगे मला पेन्सिल स्केच शिकवते. सुनेकडूनही काही खाद्यपदार्थ मी शिकून घेतले. वास्तविक शाळेत मी स्वत: होते एक शिक्षिका, परंतु जीवनात 'आजन्म विद्यार्थी' राहण्याचा मी संकल्प सोडलेला आहे.

स्वत:चा मोठेपणा म्हणून नाही सांगत, पण वेगवेगळ्या कलांमध्ये रूची असली की, माणूस नेहमी ताजा-टवटवीत राहतो. हा माझा स्वानुभव आहे. म्हणून या वयातही मला खूप काही शिकावंस वाटतं. करून पाहावसं वाटतं. त्यात चित्रकला आहे, गाणं शिकणं आहे, बागकाम आहे. तळमजल्यावर राहत असल्याने सुंदर-सुंदर झाडं मी तेथे वाढवलीय. भजनी मंडळात आजही मी आवर्जुन जाते. त्यामुळे वेळ छान जातो. वाचनालयातून आपल्या आवडीचं पुस्तक स्वत: जाऊन आणणं मला आवडतं.

बरं, हे झालं माझ्यापुरतं! पण तुम्हाला सांगते की मला इतरांसाठीही

खूप काही करावसं वाटतं. त्यात जवळचे नातेवाईक, मैत्रिणींना पाठवायचे दिवाळी, नववर्षाचे ग्रिटिंग्स मी घरी स्वत:च बनवते. जवळच्यांना वाढदिवस शुभेच्छा मी अगदी आठवणीने पाठवणारच! या सर्व पाकिटांवर रंगीत पाना-फुलांच्या डिझाईन्सही मीच काढणार!

पत्रलेखन हा माझा एक आवडता छंद. मात्र परिचित असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या चांगल्याशा यशाबद्दल पत्र टाकून लगेच त्या व्यक्तीचं अभिनंदन करायला मला आवडतं. तशी नोंदही मी आपल्या वहीत करून ठेवते.

वाया गेलेल्या रंगीत प्लास्टिकच्या पिशव्यांपासून हार बनवणं असो, पेपरमध्ये वाचून घरच्याघरी सुंदर तोरणं बनवणं असो, दारापुढे छोटीशी का होईना नित्यनेमाने रांगोळी काढणं असो किंवा वृत्तपत्रातील अप्रतिम छायाचित्रं, उपयुक्त माहिती कापून त्यांची चिकटवही करणं असो मला दिवसभर बिझी राहायला आवडतं. मला त्यात आनंद वाटतो.

पेन्शन मिळते म्हणून माझा स्वत:चा खर्च मी स्वत:च करते. पैशांच्या व्यवहारात नेहमीच चोख असते. नातू, मुली वगैरे माझ्या सोबत येतात तेच मला महत्त्वाचे वाटते. उगाच कुणावर चिडचिड, आदळआपट, द्वेष, म्हातारपणाचा बाऊ करून सारखं हे दुखतं, ते दुखतं हे सांगण्याचा किंवा स्वत:वर लक्ष केंद्रीत करून घेण्याचा माझा स्वभाव नाही. मनमोकळं, प्रेमळ वागलं की प्रेमही आपोआपच मिळतं! हा माझा अनुभव आहे.

आजवर सर्वांशीच उत्तम संबंध ठेवलेहेत. पण उठसूठ इकडे-तिकडे जाऊन बसायला जाणं, नको तेथे लुडबूड करणं मला नाही आवडत. आपले घर, आपले छंद त्यातच रमायला मला आवडतं.

एक गुडघेदुखी सोडली तर दुसरा आजार नाही. मध्यंतरी केलेलं गुडघ्याचे ऑपरेशन यशस्वी झाल्यामुळे नव्या उमेदीने कामाला लागली आहे. पेपर वाचणं, टीव्ही पाहणं, चांगली नाटकं पाहणं, व्याख्यानं ऐकणं, चवदार स्वयंपाक करणं, बागकाम, देवपूजा असं सारं काही आनंदाने करायला मला आवडतं.

शिक्षिका असल्यामुळे आजही मोठ्याने बोलण्याची सवय आहे. आवाज खणखणीत आहे. तब्येत अगदी खुटखुटीत आहे. मध्यंतरी (ऑक्टोबर २००९) मुलगी- शुभदाबरोबर मी केरळ ट्रीप करून आले. चक्क हत्तीवरही बसले. माहुताने विचारलं, 'आजी तुमचं वय किती हो?'

'मी सांगितलं ८३ वर्षे!'

तेव्हा तो माहुत एका हत्तीकडे बोट दाखवून म्हणाला, 'आजी, तो हत्ती ८४ वर्षांचा आहे. अजून सवारी करतो!' हे पाहून तर मला अधिकच उत्साह आला. म्हातारपण शरीराने येते पण मन प्रसन्न, उद्योगी ठेवलं तर आपण छान, तरुणच राहतो नेहमी! असं मला वाटतं.

आता तुम्ही (अस्मादिक) कवी आहात म्हणून सांगते की, 'मला वाचायला खूप आवडतं. आजही महिन्याकाठी दोन-तीन पुस्तकं मी आवर्जुन वाचतेच! त्यात पेपर वाचन असतंच. माझी ही आवड, मी माझ्या मुलांमध्येही निर्माण करू शकले, याचा आनंद वाटतो. माझे सारे छंद कमी-अधिक सर्व मुलांनाही आहेत. त्यामुळे माझी मुलं सुदृढ, समाधानी आहेत. कुठे कुणाच्या तोंडून कधी, 'वच्छीची सर्व मुलं चांगली आहेत. सुसंस्कारित आहेत!' असा अभिप्राय मिळाला, की जन्माचं सार्थकच झाल्यासारखं वाटतं.

मला तीन जावई आहेत. ते सुविद्य असून त्यांच्या व्यवसायात निष्णात आहेत. काही समारंभ निमित्ताने आमचे कौटुंबीक संमेलन छान जमून येते. माझा मुलगा चि. यशोधन कर्तव्यदक्ष आहे. नोकरीनिमित्ताने ठाण्यास राहतो. चि.सौ. माधवी ही सून, सुगृहिणी, सुस्वभावी आहे. पाली (मुंबई) कॉलेजला (ज्युनिअर) मराठी विभाग प्रमुख आहे. अर्थातच ती गोल्ड मेडालिस्ट आहे. तीन नाती उच्च शिक्षण प्राप्त आहेत. नातू उच्च पदवीधर असल्याने व्यवसायात अधिकारी आहेत. कौटुंबीक सुख म्हणाल तर मी याबाबत पूर्ण समाधानी आहे.

नोकरीतून सेवानिवृत्त होऊनही तब्बल २५ वर्षे झालीहेत. यजमान कुलकर्णीसर स्वर्गवासी झाले. त्यांच्या जाण्यानं आम्ही सर्वजण अतिशय

दु:खी झालो. पण आमचं हे कुटुंब त्यांच्याच साक्षीने मी उभं करू शकले आहे. याची कृतार्थ जाणीव मला आहेच. आमची पंच्याहत्तरी मुलांनी उत्साहात संपन्न केली होती. तसेच लोकमत, नाशिक आयोजित पासष्ट वर्षांवरील विजेत्या आजी-आजोबात सन २००० साली आमची जोडी दुसरी आली. यातच खूप काही आलं. भाऊंच्या कितीतरी सुंदर आठवणी मनात आहेत. कुलकर्णीसर कधीच माझ्याशी भांडले नाहीत. माझा अपमान त्यांनी कधीच केलेला मला आठवत नाही. गरिबीतही आमचा संसार पुढे छान मार्गी लागला. संसार सर्वार्थानं सुखाचा झाला.

भाऊंच्या पश्चात मीच मुलांची आई-बाबा झालेय. त्यांना प्रेम देते. त्यांच्यात आवश्यक तेवढी रमते. त्यांचं कौतुक करते. भाऊंच्या विचाराप्रमाणे वागते. म्हणजे भाऊंचा कर्मकांडावर विश्वास नव्हता. म्हणून त्यांच्या मृत्यूनंतरची धार्मिक कृत्ये न करता त्यांच्या आवडीचा 'नाट्य व अभिनय' याला महत्त्व देऊन नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाच्या बालविभागाला दहा हजार रुपये त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणगी दिली.

हाच धागा पकडून मध्यंतरी नात्यातील यशस्वी व धडाडीच्या मुलांचा त्यांच्या यशाबद्दल रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन सुधाताई फडकेंच्या हस्ते त्यांचा सन्मान केला. तोही भाऊंच्या प्रथम स्मृतिदिनी!

वयाच्या चौऱ्यांशीतही सावानात आणि कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वाचनालयात मी स्वत: पुस्तक बदलायला जाते. पुस्तकं वाचते, पुस्तकांवर चर्चा करते, आनंद घेते. हो, मध्यंतरी छान विमानप्रवासही मी करून आले. ८ मार्च २०१० ला महिलादिनी. पडद्यामागील काही गुणी आयांचा घरातच एका कार्यक्रमात हृद्य सत्कार केला. त्यासाठी मंगला मोहाडकर- राजपाठक प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. नाशिकच्या रचना शाळेच्या जागेचा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा आपली नातवंड ज्या शाळेतून घडली त्या शाळेच्या ऋणातून काहीसे उत्तराई व्हावे म्हणून ५०००/- रुपयांची मदत मला करावी वाटली. केवळ

प्रसिद्धी म्हणून नाही पण अशा गोष्टी मनाला समाधान देतात, असं मला वाटतं'

दोनेक तास ननो उत्साहाने बोलत होत्या. मीही लक्षपूर्वक ऐकत होतो. बोलण्याच्या ओघात, 'मी अत्रे बोलतोय'कार कै. सदानंद जोशी हा माझा सख्खा भाऊ, क्रिकेट समालोचक वि.वि. करमरकर हे न्यू हायस्कूलचेच विद्यार्थी, समाजसेविका सुधाताई फडके माझ्या शाळेतील सहशिक्षिका! अशी कितीतरी नावं ननोंच्या बोलण्यात येत होती. परंतु माझ्या ठळकपणे लक्षात राहिली, ही तीन नावे!

वाटलं, ननो हा सर्व जीवनप्रवास अत्यंत नम्रपणे, आनंदाने, अभिमानाने, उत्स्फूर्तपणे, समरसून आपल्याला ऐकवताहेत. ननोंच्या बैठकीच्या खोलीत स्व. कुलकर्णीसरांचा (भाऊंचा) एक हसरा फोटो आहे. जणू त्या फोटोकडे बघूनच ननो बोलत होत्या.

स्व. भाऊंच्या नैराश्येच्या काळात त्यांना उभारी यावी म्हणून ननो त्यांना काही सुंदर ऐकवायच्या. तोच संदर्भ घेऊन काहीशा संकोचाने, ननोंना एखादं गाणं ऐकवण्याची मी विनंती केली.

ननो लागलीच तयार झाल्या. 'माझा आवाज मोठा लागतो!' म्हणून समंजसपणे स्वत:ची खूर्ची जरा बाजूला घेऊन दोन गाणी त्या अप्रतिम गायल्या. त्यात पहिलं गाणं होतं, दशरथ पुजारी यांचं 'देवा तुझा मी सोनार...' आणि एक होतं भजन, 'राम नामी रमूदे रसना...'

ननो तन्मयतेनं गात होत्या. मी मन:पूर्वक ऐकत होते. वाटलं, अशी सर्वार्थानं सुंदर आई मिळायलाही भाग्य लागतं. आमच्या शुभदाताईंना आणि त्यांच्या भावंडांना ते मिळालय!

ननोंचा प्रसन्न मनाने गाणारा सुंदर चेहरा न्याहाळताना शुभदाताईंना दहाएक वर्षांपूर्वी मी सप्रेम भेट म्हणून दिलेली ती एडवर्ड विंडहॅम टेंबटांची 'चेहरा' कविता ननोंसाठी किती चपखलपणे लागू होते, ते बघा (त्यावेळी मी ननोंना पाहिलेलं नव्हतं)

**चेहरा**

मी एक चेहरा पाहिला आहे
सुंदर चेहरा पाहिला आहे.
तो जितका सुंदर आहे
तितकाच चित्ताकर्षक आहे
तो इतका आनंदी आणि तेजस्वी आहे, की
संपूर्ण काळोखातसुद्धा त्याची प्रभा फाकते
तो चेहरा स्वत:च आनंदरूप आहे
तो माझ्या दृष्टीस पडला
ते माझे भाग्य होय
पण, हा माझा आनंद
इतरांना मिळणार नाही
तो चेहरा ज्या स्त्रीचा आहे
ती माझी ‘आई’ आहे.



# चिंतनशील कवी
# **विलास शेळके**

दि. १८ सप्टेंबर १९९६ रोजी नाशिक येथे ‘शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालय’ सुरू झालं. त्यावेळी कवी विलास शेळके साहेबांना या वाचनालयाचं प्रथम अध्यक्षपद देण्यात आलेलं होतं. ‘कॉलम’ हा श्री विद्या प्रकाशनाने प्रकाशित केलेला एक सुंदर काव्यसंग्रह त्यांच्या नावावर होता. त्यावेळी ठरवून मी ‘कॉलम’ मन:पूर्वकतेने वाचला होता. त्यातील काही कविता मला खूपच आवडल्या होत्या. त्या मी माझ्या वहीत उतरवून घेतल्या होत्या.

**उद्ध्वस्त होण्याच्या प्रहरी**
**बाहेर छानपैकी मेलोडियस पाऊस**
**सारखा झिम्मड झिम्म, झिम्मड झिम्म**
**दोस्त, मग ही विसंगती मजेदार वाटते...**

त्याचबरोबर

**आता जेव्हा कधी मी चालतो**
**चष्म्याची नाजूक फ्रेम सांभाळीत**
**तेव्हा खरं म्हणजे मी, शोधत असतो**
**या लहानपणच्या वाटेवर हरवलेले**
**माझे काही संदर्भ...**

या कविता मला विशेष भावल्या. एकूणच 'कॉलम' या संग्रहाच्या मी प्रेमात पडलो होतो.

यानंतर मी स्वत: वाचनालयाचा एक कार्यकर्ता झालो होतो. शेळके साहेबांशी वरचेवर बोलणं वगैरे होई. त्यात एक छान निमित्त जुळून आलं. कॉलमच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनासाठी कवयित्री शांता शेकळे आलेल्या होत्या. आमच्या वाचनालयात त्यांच्याशी ऐसपैस गप्पा झाल्या. परशुराम साईखेडकर नाट्यगृहात संपन्न झालेला तो एक आठवणीतला सुंदर असा प्रकाशन सोहळा होता.

शेळकेसाहेब वाचनालयाचे अध्यक्ष असताना आम्ही अनेक साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रम केले. प्रत्येक कार्यक्रम संस्मरणीय कसा होईल! यावर त्यांचा कटाक्ष असे. एक उच्च अभिरूची असलेले ते क्रियाशील असे रसिक माणूस होते. याची प्रचिती वारंवार आम्हाला आलेली आहे.

१९९९ साली वाचनालयाने व्यासपीठ दिवाळी अंकाची निर्मिती करण्यास सुरुवात केली. वाचनालयाचे तत्कालीन अध्यक्ष अरविंद गुंजाळसाहेबांनी मला या अंकाचा कार्यकारी संपादक तर हेमंत पोतदारांना संपादकाचे काम करण्यास सांगितलं. दोघांकडेही अनुभव नव्हता. पण आमचा उत्साह जबरदस्त होता. विलास शेळकेसाहेबांच्या तालमीत आम्ही तयार होत गेलो. प्रत्येकवेळी अंक तयार होताना साहित्यिक-कवीपैकी कुणाला पत्रं दिलीहेत? विषय कोणते दिलेहेत? त्यांना पुरेसा वेळ दिलाय का? संपादकीय संस्कार, अंकाचा दर्जा, साहित्याचे वाङ्मयीन मूल्य अशी सकस चर्चा व्हायची. त्या सर्व चर्चा अतिशय उपयुक्त असत. संपादनाचं माझं काम करताना मला त्यांच्या सूचना नेहमीच उपयुक्त ठरल्या.

आमच्या या अंकात स्वत: शेळकेसाहेबही लिहीत. कधी मी शब्दांकन करायचो. त्यात सुधारणा या व्हायच्याच. त्या इतक्या अचूक असत की, साहेबांच्या साहित्यिक जाणीवेबद्दल माझा आदर आणखी

वाढत असे. त्यावेळी ते एक लेखक असत आणि मी कार्यकारी संपादक. जलसंपदा विभागातील त्यांचं असलेलं मुख्य अभियंता आणि माझं अनुरेखकांचं पद त्यावेळी आड येत नसे. साहेब व सौ. भारतीवाहिनी माझ्याशी अतिशय आपुलकीने बोलत. माझ्या लिहिण्या, वाचण्याचीही चौकशी करत. खूप समाधान वाटे तेव्हा.

व्यासपीठ असो कुठलाही एखादा महत्त्वाचा साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रम असो, तेथे बोलताना साहेब शांत, स्थितप्रज्ञ, एकेक मुद्दा व्यवस्थित मांडत. मराठी साहित्याचा त्यांचा व्यासंग, अभ्यास त्यांच्या बोलण्यातून जाणवे. साहित्यातले संदर्भ तर इतके अचूकपणे येत की, मुख्य अभियंतासारखं महत्त्वाचं पद सांभाळून हा माणूस कुठे, केव्हा नि कसा वाचत असणार? याचं मला अप्रूप वाटे. त्यांचं वागणं नम्रतेचं, बोलणं लाघवी, धीरगंभीर खर्जातलं आणि मनापासून असे. त्यांची कविता वाचण्याची पद्धतही अतिशय डौलदार आहे.

घाटघर प्रकल्पावर त्यांनी अनेक आव्हानात्मक कामे पूर्ण केलेली आहेत. प्रकल्प अधिक व्यवस्थिपणे पूर्ण व्हावा म्हणून त्यांनी केलेले परिश्रम सर्वश्रुत आहेत.

किल्लारीच्या भूकंपात ते आपल्या पत्नीला घेऊन घटनास्थळी राहिले होते. यामुळे त्यांच्यातील माणूसपण मला महत्त्वाचं वाटतं, आपलं बालपण गरिबीत, अभावात गेलं. परंतु वडिलांची जिद्द आणि आईचे संस्कार यामुळे आपण कसे घडलो. आपली शाळा, सवंगडी, पुस्तकं, वसंत व्याख्यानमाला, कॉलेजचे दिवस, कविता, कुटुंब आणि नोकरीतले विविधांगी असे परिस्थितीचे आणि कामांचे अनुभव मला त्यांच्याकडून प्रत्यक्ष ऐकायला मिळाले. एक बहुआयामी असं व्यक्तिमत्त्व त्यांना लाभलेलं आहे असं मला वाटतं.

देशदूतमध्ये 'चेहरे' नावाचं सदर मी लिहीत होतो. एकदा याच कामासाठी मी शेळकेसाहेबांकडे गेलो. मुलाखत द्यायला त्यांनी होकार दिला. परंतु त्यावेळी समकालीन कवितेवर त्यांनी दिलेली मतं, अभिप्राय

इतके टोकदार नि विलक्षण होते की ही सर्व मतं मी लेखात जशीच्या तशी छापली असती तर काहीतरी वादळ निश्चित उठलं असतं. ही त्यांची मतं, विधान 'माईल्ड' करत तो लेख 'एक जीवनवादी कवी' या शीर्षकाखाली छापून आला. यानंतर अनेकांनी इतरही कवींवर असं सविस्तर लिहावं असं सूचवलं. परंतु हा लेख लिहिताना माझ्यावर उगीचच खूप दडपण आलं होतं. कारण हाच एक लेख असा होता, की जो साहेबांना न दाखवता तो थेट देशदूतमधून छापून आलेला होता.

वाचनालय, व्यासपीठ, नाशिक सावानाचा जिल्हा साहित्यिक मेळावा, विविध पुस्तक प्रकाशने, सांस्कृतिक कार्यक्रम या सर्व वाटचालीत मी साहेबांच्या अधिक जवळचा होत गेलो, असं मला वाटे. साहेब भेटले की, आवर्जून बोलत, आस्थेने विचारपूस करत. हेमंत पोतदार सोबत असले की, हिंमत करून मी माझी मतंही मांडायचो. साहेबांशी चर्चा करायचो. दर दिवाळीला साहेबांच्या घरी आवर्जुन जाणं होतं. आम्हाला पाहताच साहेबांनी घरात आवाज द्यावा, 'अगं भारती, हेमंतराव, विवेक आलेत बघ. काही चहापाणी वगैरे पाठवा!' मला समाधान वाटतं. साहेबांचा मुलगा गौरव नि पोतदारांच्या मुलगा ऋषिकेश हे बी.ई.ला पुण्यात शिकायला होते. त्यामुळे गप्पांना साहजिक एक कौटुंबीक जिव्हाळ्याचा स्पर्श असतो.

प्रेरणा आर्ट फाऊंडेशन, पुणे या संस्थेचा साहेबांना साहित्य पुरस्कार प्राप्त झाला. तो पुरस्कार त्यांना त्यांचे अत्यंत आवडते कवी नारायण सुर्वेंच्या हस्ते प्राप्त होणार होता. त्यामुळे साहेब खूष होते. वाचनालयाचे प्रमोद जावळे, हेमंत पोतदार या कार्यक्रमासाठी गेले. मी गेलो नाही. साहेबांनी माझी चौकशी केली. हे समजल्यावर मला चुटपूट लागून राहिली.

महाबळेश्वर येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात विलास शेळके हे एक निमंत्रित कवी होते. साहेबांनी आठवणीने आम्हा सर्वांना बोलावल्याचे मला आठवणीत आहे.

कोयना जलविद्युत प्रकल्पाचे मुख्य अभियंता म्हणून पुण्यास साहेब पदोन्नतीवर गेले. त्यावेळी घाटघर मंडळ कार्यालयाने त्यांना प्रेमाचा निरोप समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी साहेबांनी एक सुंदरसे गीत गायल्याचं माझ्या स्मरणात आहे. त्यावेळी त्यांनी सांगितलेल्या सर्वच आठवणी हृद्य होत्या, पण, 'मी स्वत: एक कवी असल्यामुळे मला, माझ्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांतील कवी, लेखक, साहित्यिक, चित्रकार, कलावंतांना प्रोत्साहन द्यायला, त्यांची काळजी घेणं मला मनापासून आवडतं!' हे त्यांचं वाक्य आजही माझ्या काळजात घर करून आहे.

मला स्वत:ला त्यांनी भरपूर प्रेम व प्रोत्साहन दिले. हे त्यात ओघाने आलेच!

शेळकेसाहेब पुण्यात असताना चीनच्या अभ्यास दौऱ्यावर जाऊन आले. सौ. भारतीवहिनीही त्यांच्या समवेत होत्या. या प्रवासाच्या साहेबांनी सांगितलेल्या आठवणी प्रत्यक्ष ऐकताना मला असं वाटलं की, शासन सेवेतील कितीतरी उच्चपदस्थ अधिकारी कामकाजाव्यतिरिक्त किंवा प्रशिक्षणासाठी वगैरे परदेशी जात असतात. परंतु शेळके साहेबांसारख्या कवीहृदयाचा, दर्दी, रसिक, जिंदादिल माणूस त्यात असेल का? इतकी अत्युच्च कोटीची रसिकता मी त्यांच्यात पाहिली आहे.

कवी अमोल बागूल यांच्या 'ऋतूंचे मृत्युपत्र' हा संग्रह त्यांनी आपल्या गौरव प्रकाशनामार्फत प्रकाशित केला. या कार्यक्रमासासाठी आदरणीय आबा म्हणजे बाबुराव  बागूल आलेले होते. एखाद्या कवीने दुसऱ्या एखाद्या कवीचा संग्रह स्वत:च्या खर्चातून प्रकाशित करण्याची मी पाहिलेली ही एकमेवाद्वितीय घटना.

ऑक्टोबर २००८ मध्ये आमच्या वाचनालयाने 'शासकीय कर्मचाऱ्यांचे पहिले साहित्य संमेलन' नाशिक येथे संपन्न केले. त्यातील कविसंमेलनाचे साहेब माननीय अध्यक्ष होते. मी सूत्रसंचालनाला होतो. साहेबांचा उत्साह, सहभाग अद्वितीय होता. त्यांच्याप्रमाणे आपणही नेहमीच प्रसन्न, ताजेतवाने,

आनंदी रहावे असे वाटले. परंतु मी दमून गेलो होतो, अपेक्षित उत्स्फूर्तता, उंची त्यावेळी मी देऊ शकलो नाही.

संमेलनाचं सूप वाजलं, संमेलन यशस्वीपणे संपन्न झालं. त्यानंतर अभिप्राय म्हणून शेळकेसारखे म्हणाले, 'साहित्य संमेलन छानच झालं, पण त्यात हेमंत नि विवेकचा सत्कार करायचा मात्र राहून गेला!' साहेबांच्या या एका वाक्याने आमचा श्रमपरिहार तर झालाच शिवाय साहेबांविषयीचा आमचा आदर आणखीनच वाढला.


एक कार्यकारी अभियंता ते मुख्य अभियंतापदापर्यंतच्या साहेबांचा प्रवास मी जवळून अनुभवला. या प्रवासात माझ्यासारखा एक कर्मचारी यापेक्षाही एक कवी, कार्यकारी संपादक म्हणूनही मी त्यांच्या पुष्कळच जवळ गेलो. साहेबांमुळे मला ओ.पी. नय्यरांच्या गाण्यातील नजाकत समजली. कवितेचे एक वेगळं मत ऐकायला मिळाले. आशा भोसलेंच्या गाण्यातील वेगळा स्वर समजला, असं खूप काही! साहेबांच्या सहकार्यामुळेच माझा शासकीय सेवेतील प्रवासही सुखकर झालेला आहे. याची कृतज्ञ जाणीव मला आहे.

नाशिक ते भंडारदरा असा प्रवास मी साहेबांसमवेत बसून केलेला आहे. त्यावेळी साहेबांबरोबर झालेल्या साहित्यिक गप्पा, विश्रामगृहावर आम्ही दोघांनी मिळून घेतलेलं जेवण, यामुळे मी सुखावलो जरूर. त्याहीपेक्षा एक 'माणूस' म्हणूनही साहेब मला अधिक ग्रेट वाटतात. माझ्या लिखाणाची त्यांनी केलेली विचारपूस असेल, कौतुक असेल. शिवाय साहेबांच्या घरी गेल्यावर आदरणीय बाईसाहेबांचा हातचा चहा, नाश्ता, फराळ असेल. मला त्यासाठी अनेकदा आग्रह झालेला आहे. माझं घर त्यांच्या घरापासून बऱ्यापैकी दूर! त्यात तुझ्याकडे वाहन नाही, थांब, रिक्षाने जाण्यापेक्षा मी तुला निमाणीपर्यंत सोडवतो म्हणून साहेबांच्या स्कूटरवर पाठीमागे बसण्याचं भाग्यही मला मिळालं.

अशा कितीतरी सुंदर आठवणी मनात गर्दी करताहेत. साहेब सेवेत असताना त्यांचा एक भक्कम, प्रेमाचा हात माझ्या पाठीशी होताच. परंतु

त्यानंतरही एक कवी, कार्यकारी संपादक, साहेबांचा शब्दांकनकार म्हणून माझ्यासारख्या सर्वार्थाने लहान माणसाला त्यांनी दिलेलं प्रेम, सहकार्य, विश्वास ही मला मिळालेली एक मोठीच शिदोरी वाटते. या सर्वच गोष्टीचं ऋण शब्दातीत आहे. म्हणून त्यांच्या ऋणात राहणं मला महत्त्वाचं वाटतं.

विलास शेळकेसाहेब हे 'मराठी साहित्याचं सांस्कृतिक संचित' म्हणून त्यांचे योगदान किती? हे मात्र मला नेमकेपणाने सांगता येणार नाही. परंतु एक मात्र मला निश्चित माहीत आहे की, मराठी कवितेत 'अभियांत्रिकी प्रतिमा' त्यांनीच पहिल्यांदा आणल्या आणि हो, मला स्वत:ला तसेच आमच्या वाचनालयाला मोठं करण्यात त्यांचा वाटा अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. शासकीय कर्मचारी साहित्यातील ते एक महत्त्वाचे 'सांस्कृतिक संचित' आहेत हे तर अगदी नक्की!



# कादवेचा राणा
# विजयकुमार मिठे

**‘जव्हा आठवते आई**
**तुझ्या जगण्याची कथा**
**तव्हा दूर व्हती साऱ्या**
**माझ्या मरणाच्या व्यथा.’**
किंवा
**‘मातीचाच देह माझा**
**मातीचेच हातपाय**
**नाळ, पिंड पोसताना**
**माती झाली माझी माय.’**

अशा कितीतरी भावगर्भ काव्यपंक्ती लिहिणारे विजयकुमार मिठे हे कवी आता प्रसिद्धीच्या झोतात आलेले असे कवी आहेत. नुकताच त्यांचा ‘हिर्वी बोली’ हा काव्यसंग्रह दिमाखात प्रकाशित झालेला आहे. कसदार कविता, प्रा. डॉ.दिलीप धोंडगे यांची आश्वासक प्रस्तावना आणि शेतकरी संघटनेचे नेते मा.श्री. शरद जोशीसाहेबांचे आशीर्वाद या संग्रहाला लाभले. नाशिक जिल्ह्याचा विचार करता ग्रामीण कवितेतील हा एक महत्त्वाचा असा काव्यसंग्रह ठरू पाहतोय, असे म्हणता येईल.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील पालखेड बंधारा हे

विजयकुमार मिठेंचे छोटसं गाव. खरं तर खेडेगावच! ऐंशीच्या दशकाआधीचं गावपण टिकवून ठेवलेल्या गावासारखं रम्य असं गाव. मिठेंनी आपल्या कथांतून-ललित लेखनातून हे गाव चित्रमयशैलीत वाचकांशी परिचित केलेलंच आहे. आता पालखेड बंधारा या गावची ओळख 'विजयकुमार मिठे यांचं गाव' अशीही झालेली आहे.

विजयकुमार प्रारंभी जिल्हा परिषदेत नोकरीला होते. परंतु तेथे त्यांचा जीव रमला नाही. प्रत्यक्ष शेती-मातीत राबणं, गावात, गावातलं होऊन राहणं आणि सातत्याने लिहिणं! हाच मिठेंचा आता दिनक्रम झालेला आहे.

माझ्या कार्यालयातील खंडू जाधव या कर्मचाऱ्याने माझी ओळख एकदा मिठेंच्या साहित्याशी करून दिली. मी वाचतो म्हणून त्यांनी आपल्या गावच्या साहित्यिकाचं पुस्तक मला वाचायला दिलं. मिठेंचं ते पुस्तक होतं 'कादवेचा राणा'. बाह्यदर्शनी हे पुस्तक तसं अनाकर्षच होतं. त्यातला अक्षरांचा टाईप, मांडणी, कागद किंवा शुद्धलेखनाच्या चुका यामुळे वाचताना रसभंग होत होता. परंतु आपल्या भागातला, खेड्यातला माणूस कसदार कथा लिहितो, त्याचं पुस्तक आहे. या गोष्टीचं अप्रूप वाटलं. पुस्तक परत करताना जाधवांना म्हणालो, 'एकदा भेटवा तुमच्या कुमारांना. मला त्यांना भेटायला आवडेल.'

वास्तविक जाधव फारसे चोखंदळ वगैरे वाचक नव्हते. म्हणून आपल्या गावातील विजयकुमारांनाच ते शंकर पाटील, डॉ. आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर यांसारखं ग्रेट मानत होते. मी दिलेला अभिप्राय त्यांना मुळीच पटला नाही. कारण कुमार त्यांच्यासाठी खरोखरच मोठे साहित्यिक म्हणण्यापेक्षा एक अस्सल असे साहित्यिक होते. कादवा शिवारमध्ये मिठेंना मानणारा एक मोठाच चाहता वर्ग आहे, याचा अनुभव मी स्वत: अनेकदा घेतला आहे.

कवी म्हणून माझाही तेव्हा (१९९२) नवीनतेचाच काळ होता. विविध काव्यस्पर्धात सहभाग घेणं, कवीसंमेलनं ऐकणं, काव्यसंग्रहाच्या

प्रकाशनाला, कार्यक्रमांना उपस्थित राहणं, असं त्यावेळी माझं अगदी जोरदार सुरू होतं.

असंच एकदा आपल्या पालखेड बंधारा या गावातील 'सरस्वती कला मंच'च्या वतीने त्यांनी काव्यस्पर्धा आयोजित केलेली होती. मी माझा सहभाग नोंदवला. बक्षीस मिळविण्याबरोबरच कुमारांशी परिचय होण्याचीही उत्सुकता मनात होती. मैत्रीचा हात मी पुढे केलेला होता.

अपेक्षेप्रमाणे कुमार माझ्याकडे आले. आपल्या सरस्वती कला मंचविषयी, गावाबद्दल, जगण्याबद्दल आणि आपल्या लेखनाबद्दलही भरभरून बोलले. त्यावेळेस कुमारांच्या नावावर 'घोंगट्याकोर', 'कादवेचा राणा' आणि दोन-तीन एकांकिका असं लेखन होतं.

पांढरा शर्ट, पायजमा, पायात रबरी बूट, डोक्यावरचे केस काहीसे विरळ झालेले, घारे डोळे, गव्हाळ रंग, उंचपुरे व्यक्तिमत्त्व लाभलेले मिठे तसे तयारीचे वाटले. परंतु प्रत्यक्ष शेतीत राबून, शहरापासून दूर राहून हा माणूस निष्ठेने लिहितो आहे, उत्तम अशा साहित्यिकांचं लेखन अभ्यासपूर्वक वाचतो आहे, याचं अप्रूप वाटलं. या पहिल्याच भेटीत आमचं मैत्र जुळलं.

कुमारांची ही दोन्ही पुस्तकं कादवेच्या परिसरात पोहोचली होती. परंतु सर्वदूर म्हणता येईल अशासाठी आपण काहीतरी आवर्जून करावं, असं वाटलं. मी त्यावेळी माझं वृत्तपत्रीय लेखन सुरू केलेलं होतं.

आमची मैत्री झाल्यानंतर त्यांचा 'बुजगावणं' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. बुजगावणंमधील कथा मी वाचल्या. पहिल्या दोन्ही पुस्तकांपेक्षा अधिक नवीन, ताज्या आणि त्यातील 'द्राक्षबळी'सारख्या कथेनं तर मला विशेष प्रभावित केलं. ठरविल्याप्रमाणे मी दैनिकाच्या रविवार पुरवणीतून या पुस्तकाचा परिचय करून दिला. जमेल तिथे मिठे आणि त्यांच्या पुस्तकांबद्दल आवर्जून बोलत राहिलो.

'बुजगावणं'मधील कथा खरोखर उत्तम उतरल्या होत्या. अपेक्षाप्रमाणे आमचे मार्गदर्शक गुरुतुल्य चंद्रकांतजी महामिने, चित्रकार धनंजय

गोवर्धने, कवी विलास शेळके आदींची कौतुकाची थापही त्यांच्या पाठीवर पडली. 'घोंगट्याकोर'ला येवल्याचा 'कर्मभूमी पुरस्कार' मिळाला होता. आता 'बुजगावणं'ला जळगाव येथील मानाचा 'देसर्डा पुरस्कार'ही मिळाला.

पुस्तकाला पुरस्कार मिळतोय म्हणजे आपलं लेखन योग्य दिशेने सुरू आहे, असा पुरावा मानून आणखी उमेदीने त्यांनी लेखन सुरू केलं. 'गावाकडची माणसं' हे एक चांगलं पुस्तक त्यांच्या हातून लिहून झालं. आपल्या गावातील, परिसरातील अत्यंत साधी-सुधी माणसं की ज्यांना स्वत:चा असा चेहरा किंवा ओळख नाही अशा माणसांवर मिठेंनी लिहिलेलं हे पुस्तक त्यांच्या आजवरच्या पुस्तकातलं एक सर्वाधिक चांगलं पुस्तक म्हणून सांगता येईल.

कुमारांच्या लेखनाला एक पकड म्हणता येईल ती या पुस्तकातून आलेली दिसते. द.मा. मिरासदार, डॉ. आनंद यादव, अण्णा भाऊ साठे, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर यांच्या परंपरेतील लेखन मिठे यांनी या पुस्तकातून यशस्वीपणे केलेलं आहे. आमचा सर्वांचा चित्रकार मित्र अवी जाधव यांनी रेखाटलेली अर्कचित्रे अत्यंत देखणी झालेली आहेत.

सुप्रसिद्ध साहित्यिक 'सीबीएस'कार वसंत नरहर फेणे यांच्या शुभहस्ते या पुस्तकाचं प्रकाशन पालखेड बंधाऱ्याला झालं. त्यावेळी नाशिकचा संवादचा सर्व साहित्यिक चमू, कुमारांचे साहित्यिक कवीमित्र, नातेवाईक, मित्रमंडळी, गावकरी आणि 'गावाकडची माणसं'मधील प्रत्यक्ष व्यक्तिरेखा प्रकाशनात हजर होत्या. हा प्रकाशन सोहळा इतक्या अमाप उत्साहात संपन्न झाला की, आज इतक्या वर्षांनंतरही हा कार्यक्रम सर्वांच्या मनात ताजा आहे.

या पुस्तकामुळे मिठेंचा लेखनातील आत्मविश्वास वाढला. जिल्ह्यातील साहित्यिकांमध्ये कुमार सुपरिचित झाले. विदर्भातील 'अंकुर वाङ्मय पुरस्कार' या संग्रहाला लाभला. 'साहित्य क्षेत्रात पाय रोवून उभे रहावे, आता मागे हटणे नाही!' ही जिद्द या पुस्तकाने कुमारांच्यात निर्माण केली.

दरम्यान, कुमारांचं अधून-मधून काव्यलेखनही सुरूच होतं. त्यात कवी रवींद्र मालुंजकर यांनी 'कवितेची पाऊलवाट' नावाचा कार्यक्रम सुरू केला. त्यात स्वत: मालुंजकर, गौरवकुमार आठवले, तुकाराम धांडे, राजेंद्र सोमवंशी, किरण भावसार, मी आणि कुमारही त्यात असायचेच असायचे. संपूर्ण कवितेला वाहिलेला हा कार्यक्रम खेड्या-पाड्यावर बऱ्यापैकी लोकप्रिय आहे. त्यात विजयकुमार मिठे हे एक महत्त्वाचं नाव. या कार्यक्रमाच्या समारोपाला त्यांची 'आई' ही कविता हे एक प्रमुख आकर्षण. रसिकांच्या डोळ्यांच्या कडा पानावणारी ही एक हृदयस्पर्शी कविता कुमार मोठ्या भावगर्भतेने सादर करतात. 'आई' ही त्यांची कविता मिठेंची आज एक ओळख झालेली आहे. ('हिर्वी बोली' या त्यांच्या काव्यसंग्रहात ही कविता आहे.)

त्यांच्या कथालेखनाला बळ मिळालं; अशा काही गोष्टी त्यांच्याबाबत झाल्या, त्यात आदरणीय चंद्रकांत महामिनेंचं मार्गदर्शन, गावातल्या लोकांचं प्रेम, कै. रा.म. घुगे (सायखेडा) यांनी त्यांना दिलेलं प्रेम, उदंड प्रेम देणारा सर्व थरातला मित्रपरिवार, चिंतन, मनन आणि वाचनातून मिठे आज एक आघाडीचे कथालेखक म्हणून ओळखले जात आहेत. कवी विलास शेळके यांनी त्यांच्याविषयी एक सुंदर अभिप्राय दिलेला आहे. 'मी मिठेंच्या कथेचा चाहता आहे. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण बोली त्यांच्या लेखनातून फार प्रभावीपणे आलेली आहे. साहित्य विश्वाला त्यांची दखल घ्यावीच लागेल!' व्यासपीठ दिवाळी अंकातून प्रकाशित झालेल्या त्यांच्या कथा विशेष लक्षणीय ठरलेल्या आहेत.

'लाऊक' या त्यांच्या संग्रहाला वैजापूरचा 'शंकर पाटील उत्कृष्ट कथानिर्मिती पुरस्कार' आणि लातूरचा 'अण्णा भाऊ साठे पुरस्कार' लाभला. आपल्या आवडत्या साहित्यिकांचा आपल्या पुस्तकांना पुरस्कार मिळणं, कुमारांना अतिशय महत्त्वाचं वाटतं.

त्यामुळेच 'हेळसांड' हा त्यांचा कथासंग्रह अत्यंत बांधीव कथांनी सजलेला आहे. मुख्य म्हणजे मिठेंच्या कथांनी या संग्रहांतून आपली

कुस बदलली आहे. बदलतं गाव, बदलती परिस्थिती आणि मानसिकता या संग्रहात प्रथमच आलेली दिसते. त्यामुळेच याही पुस्तकाला कविवर्य नारायण सुर्वे आणि अकोल्याचा स्व. जगन्नाथजी भोंडे पुरस्कार लाभला. एकूण काय तर त्यांची सर्वच पुस्तकं क्रमाक्रमाने लोकप्रिय होत गेली आहे, रसिकमान्य होत गेलेली दिसतात.

‘आम्ही साक्षर श्रीमंत’सारखं प्रबोधनपर पुस्तकही त्यांच्या नावावर आहे. जळगाव आकाशवाणीवर ‘चौफेर’ आणि नाशिक आकाशवाणीवर दीर्घकाळ सुरू असलेली त्यांची ‘घरकुल’ मालिका त्यांना अखंड ‘लिहिता’ ठेवण्यासाठी पूरक ठरली आहे. आकाशवाणीच्या या लेखनाचंही ‘लेखणी उडाली आकाशी’ हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केलं आहे.

खरं तर मिठेंच्या प्रत्येक कथेवर, व्यक्तीचित्रांवर, ललित लेखनावर स्वतंत्रपणे लिहिता-बोलता येईल इतकं अस्सल असं मिठे लिहिताहेत. ‘घरकुल’चं लेखन तर ते सातत्याने करतातच, शिवाय प्रासंगिक लेखनही करताना ते थकत नाहीत. एक शेतकरी, पत्रकार, साहित्यिक-कवी, एक माणूस म्हणून त्यांचा जनसंपर्क दांडगा म्हणावा असा आहे. त्यांच्या गावतली शाळा, परिसरातल्या शिक्षण संस्था, वाचनालय, साहित्यिक, सामाजिक संस्थांच्या कार्यक्रमात मिठेंचं असणं अगदी अपरिहार्य असतं.

हे सगळं काम कमी होतं की काय म्हणून त्यांनी ‘कादवा शिवार’ हे साहित्याला वाहिलेलं स्वत:चं मासिक सुरू केलं. इतरांना संधी देण्याबरोबरच आपली लेखन ऊर्जा पुरेपूर वापरावी, या हेतूने त्यांनी हे मासिक जाणिवपूर्वक सुरू केलेलं. आज इतक्या वर्षांनंतर प्रत्येक महिन्याच्या अंकात, विशेषांकात आणि दिवाळी अंकात मिठेंची एक तरी कथा, कविता, स्फूट, ललित असं लेखन त्यात असतंच असतं. शिवाय अंकासाठी साहित्य मागविणं, ते वाचणं, अंकाची सर्व जुळवाजुळव, वितरण आणि अंकाचे बरे-वाईट सर्व अभिप्राय पचवून महिन्याला हजारभर सभासद सांभाळणं! ही तारेवरची कसरत मिठे अक्षरश: एकहातीच सांभाळतात.

पालखेड बंधारा ते नाशिक हा ३५-४० किलोमीटरचा मोटरसायकलचा प्रवास ते जवळपास दररोज करतात. वयाच्या पन्नाशीनंतरही साहित्याने त्यांच्यातील 'कुमार' कमालीचा उत्साही ठेवलेला आहे, हे विशेष. जोडीला बहुतेकदा त्यांच्या गावातील माणिकराव जाधव, माधव जाधव, सुनील जगताप, अशोकराव मोंढे असं कुणीतरी त्यांच्यासोबत असतंच. पुस्तकाचं आणि माणसाचं खरं तर त्यांना व्यसनच आहे, असं म्हणता येईल.

नाशिकला आल्यावर मुलाच्या फोटोग्राफीचं काम, अंकाच्या अक्षरजुळणीचं काम म्हणून दीपक दंडवते यांच्या घरी जाणं-येणं, रवींद्र मालुंजकर, गौरवकुमार आठवले, राजेंद्र सोमवंशी, अंकाच्या कामासाठी रिप्लिका प्रेस, दै. देशदूत, गांवकरीमध्ये जाणं, तसेच माझ्याकडे आणि गुरुवर्य-आदरणीय दादासाहेब महामिनेंच्या घरी त्यांचं जाणं हे होतच. हे सर्व फिरणं, काम न कंटाळता, न थकता मिठे करतात. कुठलीही घाई नाही. चिडचिड, त्रागा नाही याचं अप्रूप वाटतं.

मिठेंच्या लेखनास सर्वसामान्य वाचकांबरोबर कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, डॉ. आनंद यादव, वसंत नरहर फेणे, द.ता. भोसले, शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशीसाहेब यांसारख्या दिग्गज साहित्यिकांचे, प्रा.डॉ. दिलीप धोंडगेंसारख्या साक्षेपी समीक्षकांचे सुंदर अभिप्राय प्राप्त झाले आहेत. डॉ. आनंद यादव आणि महामिने दादांच्या सूचनेवरून मिठे आता एका (घुसमट) कादंबरी लेखनात गुंतलेले आहे. या कादंबरीचा पहिला-दुसरा श्रोता मी आहे. ग्रामीण मातीचा अभिजात सुगंध, त्यातला भाबडेपणा, इरसालपणा, अगतिकता, संपूर्ण गावगाडा चित्रमय शैलीत उभं करणारी ही कादंबरीही कुमारांना लेखक म्हणून मोठं नाव मिळवून देईल! असे वाटते.

'कादवा शिवार'ची सर्व उस्तवारी, नाशिक आकाशवाणीचं मालिका लेखन, कथा-कविता, कादंबरी, ललित (आभाळओळ पुस्तकातील त्यांचे ललित लेख अत्यंत वाचनीय झालेले आहेत.) असं चौफेर लेखन

ते करताहेत. वाचकांना, रसिकांना खिळवून ठेवताहेत. परंतु आपलं लेखन हे आपल्यासाठीही जीवनाचा एक कणा झालेलं आहे, असं कुमारांना वाटतं. या लेखन बळावरच आपल्या मायमातीला, माणसांना प्रतिष्ठा मिळवून देण्याची जिद्द मिठे बाळगून आहे. त्यासाठीची त्यांची धडपड अगदी सतत सुरू असते.

मध्यंतरी कुमारांना तालुका व दिंडोरी वैभव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. परंतु डॉ. आनंद यादव यांना मिठेंकडून 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार अपेक्षित आहे. तसेच डॉ. आनंद यादव यांनी कुमारांची अंतर्नाद या मासिकाची वर्गणी भरली व त्याप्रमाणे काही वर्षे त्यांना अंक नियमीतपणे मिळत राहिले. मला वाटतं, यातच सर्व काही आलं.

उमद्या मनाचे आमचे लेखकमित्र विजयकुमार मिठे त्यादृष्टीने एक एक पाऊल पुढे टाकत आहे. एकूण काय तर कादवेचा हा राणा एक दिवस दिल्ली सर करणार म्हणजे करणारच!



# प्रयोगशील चित्रकार
# **धनंजय गोवर्धने**

चित्रकलेचा म्हणून कोणताही वारसा वगैरे नसलेल्या आपल्या घरातून किंवा रुढार्थाने चित्रकलेचं वगैरे कोणतंही शिक्षण न घेतलेल्या धनंजय गोवर्धनेंनी तरुण वयातच कुठल्याशा अनाम अंत:प्रेरणेतून चित्रकारीतेशी आपलं नातं गच्च केलं. त्यामुळेच आपल्या सर्जनशीलतेतून त्यांनी आजवर विपूल आणि देखणी अशी चित्रनिर्मिती केली आहे. नव्हे, त्यात त्यांचं नवनवीन प्रयोग करत राहणं सतत सुरूच आहे. परंतु त्यांच्या या चित्रकला किंवा फोटोग्राफी कलेकडे केवळ छंद किंवा पोटार्थी म्हणून पाहणं सर्वथा चूक ठरेल. राष्ट्रसेवा दलाचे संस्कार असलेल्या, पुरोगामी विचारांच्या मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. सतत माणसाला माणूस जोडण्याचा संस्कार आणि संवेदनशील मन, त्यांचे घरातच तयार झाले. त्यामुळेच उमलत्या वयात त्यांनी खूप चांगलं ऐकलं, पाहिलं आणि वाचलंही! स्वाभाविकपणे भोवतालचं जग, देखणासा निसर्ग आणि भली-बुरी माणसं त्यांनी पाहिली. त्यांना जाणून घेतलं. त्यांच्या वागण्या-बोलण्याचा आपल्या परीने अन्वयार्थ लावला. या सर्वांची मिळून त्यांच्या मनात जी काही घुसळण झाली ती कसदार अभिव्यक्ती म्हणजे त्यांची 'चित्रनिर्मिती!' असं म्हणता येईल. चित्रकलेचं सशक्त माध्यम मिळालं आणि हा कलावंत माणूस एका वेगळ्या अर्थी अबोल झाला.

राज्य शासन सेवेतील जबाबदार पदाची (अधीक्षक) त्यांची नोकरी किंवा सरकारी कामातील रुक्षता, साचेबद्धता त्यांच्या कलेच्या आड कधीच आली नाही. आपल्या सरकारी नोकरीला संपूर्ण न्याय देत चित्रकलेबरोबरच, जाणीवपूर्वक त्यांचं फोटोग्राफी, लँडस्केप, रेखाटन, पेंटिंग्स, कॅलिग्राफी, काव्यलेखन, ललित लेखन वगैरे खूप काही सुरू असतं. कार्यालयातल्या कामांची आणि आपल्या छंदांची गल्लत झालेली आम्ही कुणी कधीच पाहिलेली नाही.

शासन सेवेतील बऱ्याचशा सुट्या या माणसाने उत्तमोत्तम लँडस्केप, अत्यंत 'ऑफबिट' फोटोग्राफी वगैरे करण्यात व्यतीत केल्या आहेत. म्हणूनच की काय गोवर्धनेंच्या अंगी निसर्गाचा एक चिवटपणा आणि ऋजुता कायम राहिली. आजवर सुमारे हजारेक पुस्तकांची मुखपृष्टे आणि अक्षरश: हजारो रेखाटनं करूनही त्यांना सतत नावीन्याचा ध्यास लागून राहिलेला असतो. त्यांच्या बऱ्याचश्या चित्रांत आणि फोटोग्राफीत 'झाड आणि माणूस' यांचं आदिम नातं प्रामुख्याने अधोरेखित झालेलं दिसून येतं.

व्हॅन गॉग, पिकासो, दलाल, सातवळेकर, सुभाष अवचट, मनजीत बावा आदींच्या चित्रांवर आणि त्यांच्या जिंदादिलीवर प्रेम करत हा माणूस रंगरेषांशी मन:पूर्वक 'खेळत' राहिला आहे. या अखंड खेळण्यामुळेच एक कलावंत म्हणून, ते स्वत: घडलेच शिवाय एक कलावंत म्हणून, त्यांचं मन चिरतरुण राहिलं आहे, हे जाणवतं. म्हणून एकाच वेळेस त्यांचं शिवाजी तुपे (सर), प्रभाकर कोलते, श्रीधर अंभोरे, भ.म. परसवाळे, गणेश विसपुते किंवा स्वत:चा चित्रकार मुलगा 'जयंता' या सर्वांबरोबर छान जमून जातं.

'चित्र' हा त्यांच्या आयुष्याचा एक अविभाज्य किंवा अपरिहार्य भाग बनून राहिला आहे. यावर त्यांना स्वत:ला असं वाटतं की, कलावंताला कोणतीही जात वा पंथ नसतो. कोणत्याही जाती, धर्म, पंथांचा कलावंत आपल्याला, देश व भाषेची अडचण न ठेवता आनंद देऊ शकतो हे

महत्त्वाचे! म्हणून कलावंतांना समाजाने आदराने आणि सन्मानानेच वागवले पाहिजे! याबाबत ते नेहमी आग्रही राहिले आहेत.

समाजाला विचार देण्याचे काम चित्र करू शकतात किंवा एखादी निश्चित भूमिका घेऊन केलेली चित्रकारिता ही समाजाचं वैचारिक भरणपोषण करण्यासाठी उपयुक्त ठरते. या विचारातून आजवर त्यांनी चित्रांच्या माध्यमाचा नेमका उपयोग करून घेतलेला आहे.

त्यातूनच त्यांनी एड्स, महिला हक्क, भटक्या-विमुक्तांची उपेक्षित मुलं, दंगल, भूकंप, अंधश्रद्धा निर्मूलन अशा कितीतरी सामाजिक विषयांवर आपली उद्‌बोधक पोस्टर्स चितारली आहेत. त्यांच्या या कामाला सर्वदूर उत्स्फूर्त असा प्रतिसादही मिळाला आहे.

त्यामुळेच चित्रकलेसाठी आपलं अवघं आयुष्य झोकून दिलेल्या गोवर्धनेंनी चित्रकलेत केलेले प्रयोग वैशिष्ट्यपूर्ण ठरले. जलरंग, तैलरंग, ऑईलपेंट, पेन्सिल वर्क, चारकोल ते शेणमाती, गेरू-चुन्याच्या मिश्रणातून तयार केलेल्या रंगांनी त्यांनी आपली चित्रं रेखाटली आहेत.

पारंपरिक चित्रकारिता ते ॲबस्ट्रॅक्ट चित्रांमध्ये सारख्याच तन्मयतेने रमणाऱ्या गोवर्धनेंनी हे प्रयोग केवळ पैसा-प्रसिद्धी किंवा सहज म्हणून केलेले नाहीत, तर एक कलावंत म्हणून आपण येथील समाजाचे एक अविभाज्य घटक आहोत, कलावंत आणि माणूस म्हणून आपण समाजाचं काही देणं लागतो, समाजाशी आपली असलेली बांधिलकी यातूनच 'दंगलपुराण', 'भूकंप' आदी विषयावर जीव ओतून काम करण्याचं समाधान मोठं आहे, असं त्यांना वाटतं. त्यांनी लिहिलेल्या 'नि:शब्द कोलाहल'मधील सर्वच ललित लेख त्यांच्यातील माणूसपणाची साक्ष देणारी आहेत.

त्यांची चित्रं, फोटोग्राफी आणि संवेदनशीलतेतून उतरलेलं त्यांचं साहित्य यामुळे त्यांनी कितीतरी सुंदर माणसं जोडली. हा सर्व स्नेहगोतावळा आणि मुख्य म्हणजे त्यांचे कलादी क्षेत्रातील योगदानामुळेच त्यांना कार्यालयात मान मिळालाच, परंतु त्याची म्हणून कुठलीही सवलत

वगैरे न घेता हा माणूस तेथेही केवळ सचोटीने आणि प्रामाणिकतेने काम करीत राहिला. आपल्या मोठेपणाचा कुठलाही डामडौल, गर्व वा अभिनिवेश त्यांच्या वागण्या-बोलण्यात नसतो हे विशेष!

कर्नाटक शासनाने पदवीपूर्व शिक्षणासाठी त्यांच्या 'नि:शब्द कोलाहल' या पुस्तकामधील 'चित्रसंवाद' हा लेख पाठ्यपुस्तकात एक धडा म्हणून घेतलाय किंवा 'दंगलपुराण' या त्यांच्या कामास सुप्रसिद्ध सिनेदिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांचा अभिप्राय लाभलाय. कलावंताने स्वत:बद्दल अधिक बोलू नये! असं मानणाऱ्या गोवर्धनेंच्या चित्रांची एकंदर पार्श्वभूमी पाहता त्यामागे एक दु:खद छटा किंवा अस्वस्थता निश्चितपणे जाणवते.

आपली ही चित्रकारिता 'समाजाभिमूख' असावी म्हणून ते सतत आग्रही राहिले आहेत. यात कुठलंही काम त्यांनी सहज किंवा उगीच म्हणूनही केलेलं नाही. फोटोग्राफीत केवळ उच्च प्रतीचा कॅमेरा वापरून, बटन क्लीक करून भागत नाही, तर वेगळं नि अस्सल ते शोधणारी एक 'नजर' आणि सर्जनशील मन क्लीक करणाऱ्या बोटात एकवटून अचूक तेच पकडण्याची त्यांची क्षमता पाहून कविश्रेष्ठ कुसुमाग्रज त्यांना म्हणायचे, 'जगातला एक नंबरचा छायाचित्रकार मी आणि दोन नंबरचा तू!'


चित्रकारितेबरोबरच फोटोग्राफीमुळे तात्यासाहेबांचं नि गोवर्धनाचं स्नेहत्त्व कायमसाठी जुळलं. त्यातूनच त्यांनी अगोदर 'विशाखा' आणि नंतर 'थांब सहेली' या तात्यासाहेबांच्या पुस्तकांची मुखपृष्ठ अत्यंत भावोत्कटतेने केली आहेत.

अक्षरांकन (कॅलिग्राफी) कलेतही त्यांचं नाव आदरानं घेतलं जातं. त्यांनी केलेली शब्दालय, स्त्रग्धरा, साहित्य सावाना, व्यासपीठ आदी दिवाळी अंकांची तसेच 'दर्शन', 'अनाघ्रात'सारख्या नियतकालिकांच्या कॅलिग्राफीमुळे गोवर्धनेंचं नाव सर्वत्र पोहोचलं आहे. याबरोबरच विविध नामांकित संस्थांचे त्यांनी तयार केलेले लोगो उदाहरणार्थ- विशाखा, रुक्मिनी, बाबुराव बागूल, पंजाबराव देशमुख आदी पुरस्कारांच्या

स्मृतीचिन्हांचे डिझाईन्स, शिवाय विविध विषयांवरचे पोस्टर्स, नाटक व एकांकिकांचे नेपथ्य, दिग्दर्शन, विजय तेंडुलकरांसोबत कुसुमाग्रजांवरील दूरदर्शनपटाची निर्मिती आणि महत्त्वाचे म्हणजे नाशिक येथे भरलेल्या ७८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे त्यांनी तयार केलेले 'बोधचिन्ह' ही त्यांच्या कलानिर्मितीची काही मानाची पानं म्हणता येतील.

या सर्व कलाप्रवासात 'कै. वासंती वळवडे मुजुमदार पुरस्कारा'सारखे अनेक सन्मान त्यांना मिळाले. त्यांच्या कलानिर्मितीची नोंद आवर्जून घेतली गेली, परंतु केवळ पुरस्कारामुळे गोवर्धनेंसारख्या स्थितप्रज्ञ कलावंताचं मनोबल वगैरे उंचावतं, असं म्हणणं चूक ठरेल. 'अनुष्टुभ'सारख्या दर्जेदार नियतकालिकांतून त्यांनी आपल्या चित्रनिर्मितीबद्दल स्वत: लिहिलंय की, 'मुक्त रेखाटन मी माझ्या मनावरील ताण कमी करण्यासाठी काढतो. अनेक रेखाटनांचा सलग अभ्यास केला, तर माझ्या मनाच्या भावस्थितीचा आलेखही काढणे शक्य होईल!' म्हणजेच त्यांची चित्रं हीच त्यांचं खरं आत्मचरित्र! असं म्हणता येईल.

'व्यासपीठ' दिवाळी अंकाच्या माध्यमातून, त्यांच्या कार्यालयातील एक कनिष्ठ सहकारी म्हणून, चित्रकलेचा एक रसिक म्हणून, गेली २० वर्षे गोवर्धनेंची ही प्रयोगशीलता, सातत्य, भावस्थिती जवळून पाहण्याचं भाग्य मला लाभलं. एक कलावंत म्हणून अक्षरश: चिक्कार कामं त्यांनी केलेली आहे, करताहेत. त्यातला एक छोटासा कवडसा मी पकडू शकलो आहे, याची नम्र जाणीव मला आहे.



# अजातशत्रू कार्यकर्ता
# **सुमंतकाका गुजराथी**

समाजाचे संरक्षण करण्याचे काम राजसत्तेचे असले तरी समाज जागृतीचे काम समाजसेवक किंवा कार्यकर्त्यांचे असते. प्रत्येक गावात अशी एक तरी पणती अंधाराचा भेद करण्याची उमेद बाळगून आयुष्यभर तेवत असते.

कुणाचं लक्ष असो- नसो. या पणत्यांचं अंधाराला छेद देणं सुरू असतं. या प्रयत्नात कुठे काही लख्ख उजाडलं, की लोक गर्दी करतात. प्रकाशाचा, त्या कामाचा उदो उदो होतो. ते क्षण म्हणजे कोणाचा मिरवण्याचा अट्टहासही असतो. पणती निमित्तमात्र राहते.

गावोगावच्या अशा असंख्य पणत्या त्या उपेक्षेतही सूर्याचं काम करीत जग उजळायचं काम निरसलपणे करीत असतात. या पणतीचं नाव कधी येवल्याचे प्रभाकर झळके सर असतं, निफाडचे छबू काका बिवाल असतं, पळसेचे विष्णूपंत गायखे असतं, मखमलाबादच्या सार्वजनिक वाचनालयाचे रामचंद्र काकड सर असतं तर कधी सिन्नरचे सुमंतकाका गुजराथी असतं.

या सच्च्या माणसांवर स्वतंत्रपणे लिहिलं गेलंच नाही, असं नाही. त्यांचे सत्कार झाले नाहीत असंही नाही. पण अशी निरलस, प्रामाणिक, सेवाभावी वृत्ती समाजातून संपतेय की काय, अशी आज परिस्थिती आहे.

अशा कार्यकर्त्या मनाच्या माणसांना आपण 'तुम्ही पुढे व्हा... पुढे

व्हा!' म्हणून किती काळ मागे-मागेच राहणार आहोत? कारण त्यांची उमेद किंवा मनं खचली नसतील, पण त्यांच्या वयाच्या, शरीराच्या म्हणून काही मर्यादा असतातच ना!

सुमंतकाकांसारखी माणसं इथून तिथून सर्वांची मित्र असतात. त्यांचं काम, त्यांची कामाप्रती असलेली निष्ठा, होणारी दगदग, खर्च, धावपळ, त्रास, झोकलेपण हे सर्वच आपल्याला दिसत असतं, जाणवत असतं. परंतु आपलं केवळ श्रदस्थ होणं संपत नाही. आपण या माणसांना 'छान-छान' म्हणत आपली घरं व्यवस्थितपणे उबवत राहतो. आपलं थीटेपण हा केवळ आपला भंपकपणा असतो. असो.

मित्रहो, ज्यांच्या साधेपणावर, प्रामाणिकतेवर जीव ओवाळून टाकावा, ज्यांच्या पायाशी बसून जगण्याचे संदर्भ शोधावेत, असे सिन्नरचे सुमंतकाका गुजराथी यांचा आपल्याला परिचय करून देताना मला खूप आनंद होतोय.

वडांगळीचा आमचा काळजातील कवीमित्र किरण भावसारने काकांचा परिचय करून देताना सांगितलं होतं. 'काका सिन्नर वाचनालयाचे संचालक आहेत. लेखन, इतिहास संशोधक, दलित मित्र असं खूप काही आहेत. आणि त्याहून मोठे-सच्चे माणूस आहेत!'

पहिल्याच भेटीत काकांशी असं काही मैत्रं जुळलं की, आमच्यातलं जवळपास चाळीस वर्षांचं अंतर क्षणार्धात गळून पडलं. पहिल्याच भेटीत आमचे स्नेहबंध जुळले. या भेटीत लक्षात राहिला तो काकांचा मनमोकळा स्वभाव! काका भरभरून बोलत राहिले. आम्ही उत्सुकतेने ऐकत राहिलो. कुठेही तक्रारीचा सूर नाही, संतापणं, चिडणं नाही. तेव्हा वाटलं, इतकं प्रेमळपणे आपल्याला वागता आलं पाहिजे!

दरम्यान, काका स्वत: नर्मदा परिक्रमेच्या फिरस्त्याचा विलक्षण अनुभव घेऊन आले. निळ्या पानांच्या एका शिवलेल्या वहीत 'मनोभावे' या शीर्षकाखाली त्यांनी हे अनुभव लिहून ठेवले होते. ती वही वाचताना आपण काही धार्मिक संदर्भाचं लिखाण वाचतो आहोत किंवा एखादी

शुष्क डायरी वाचतोय, असं वाटलं नाही. उलट डॉ. राजेंद्र मलोसे यांची 'स्वप्नपंख' किंवा शन्ना नवरेंची 'दिनमान' सारखी एखादी छान रोजनिशीच वाचतो आहोत अशा काकांच्या मन:पूर्वक लेखनाने मी प्रभावीत झालो.

कुठल्याही चांगल्या लेखनात लेखकाचा मूळ स्वभाव उतरत असतो. काका त्याअर्थी खूपच सच्चे, प्रामाणिक आणि सात्विक वाटले. एरव्ही बऱ्यापैकी नास्तिक असलेला मी, काकांचे हे नर्मदेचे अनुभव वाचून हेलावून गेलो. काकांच्या स्वभावातील नितळता त्या लेखनातून जाणवत राहिली. काकांचं ते मोत्यासारखं दाणेदार अक्षर मनावर कायमचं जणू कोरलं गेलंय.

सुमंतकाका सिन्नरच्या वाचनालयाचे संचालक आहेत. सिन्नर तालुक्यातील कितीतरी पुरातन आणि ऐतिहासिक ठेवे गवसून काकांनी त्यांना नावारूपाला आणलेले आहेत. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, सेतू माधवराव पगडी, बाबासाहेब पुरंदरे, मा. श्री. दीक्षितांपासून अनेक थोरामोठ्यांशी त्यांचा स्नेहभाव जुळलेला असतो. परंतु नर्मदेसारख्या अनुभवात ते स्वत:ला संपूर्ण वेगळे ठेवतात आणि मनपूर्वकतेने परिक्रमा पूर्ण करून घेतात.

खरं तर काका म्हणजे, एक उत्साहमूर्ती! शांत म्हणून त्यांना बसवतच नाही, पण हे फिरणं निरोद्योगी नाही. स्वत:साठी नाही. काकांचं हे फिरणं एखादा ध्यास घेतल्यासारखं असतं. विस्मृतींचा शोध घेणार असतं. त्यात शिवाजीराजे सुरतेवरून परतताना ज्या गडावर काही काळ मुक्कामी राहिले तो पट्टागड (विश्रामगड) असेल. तिथल्या वनवासी बांधवांची शिवजयंती असेल, थोरल्या बाजीराव पेशव्यांचं जन्मस्थान असलेलं डुबेरे गावाला ऐतिहासिक अधिकृतता देण्याचं काम असेल, वावी येथील इतिहासप्रसिद्ध संत शाहीर वरदी परशुराम स्मारकाचं काम असेल, त्यांचं शाही कवनांचं दुर्मिळ पुस्तकं प्रकाशित करणं असेल. काकांनी अशा कितीतरी कामांसाठी प्रचंड पायपीट, पत्रव्यवहार नि पाठपुरावा केलेला आहे. ती कामं तडीस नेली आहेत.

शिवाय कनकोरी येथील क्रांतिकारक कृष्णा कुँवर किंवा भिल्ल समाजाच्याच भागोजी नाईकांचं जन्मगाव, मृत्यू ठिकाण म्हणजे सांगवीचा शोध असेल किंवा जॅक्सन खून खटल्यात फासावर गेलेल्या सिन्नरच्या हुतात्मा विनायक देशपांडेंची पुण्यतिथी असेल किंवा त्यांच्या स्मारकाचं काम असेल, काकांनी अशा कितीतरी कामांसाठी आपलं आयुष्य वेचलं आहे. राष्ट्रपुरुषांच्या जयंतीसाठी, पुण्यतिथीसाठी काका नेहमी अग्रभागी असतात. उमलत्या पिढीला संस्काराचे विविध कार्यक्रम असो, वाचक चळवळीचे कार्यक्रम, साने गुरुजी कथामाला, अशी एक ना अनेक कामं काकांना वयाच्या पंच्याऐंशीतही खुणावत राहतात.

मध्यंतरी काकांच्या एकुलत्या मुलाचं दु:खद निधन झालं. पुत्रवियोगाचं मोठं दु:खं पचवून काका आजही वाड्या वस्त्यांतून, खेड्यापाड्यातून उत्साहाने फिरत असतात. या कामात काकांचा किती प्रवास झाला, किती दगदग झाली, किती पैसे खर्च झाले, किती पत्रव्यवहार झाला, शासनदरबारी पाठपुरावा झाला याची तपशीलवार नोंद काकांकडे असणं शक्यच नाही. पण या पूर्ण झालेल्या कामांचं समाधान! काकांच्या चेहऱ्यावर उमललेलं मात्र सहज दिसतं.

शरीर साथ देत आहे तोपर्यंत काकांची ही भटकंती, शोध सुरूच राहणार आहे. काकांनी उभ्या केलेल्या कामाचं कौतुक म्हणून त्यांना मिळालेला दलितमित्र पुरस्कार असेल, सिन्नरभूषण पुरस्कार, ज्येष्ठ नागरिक सन्मानासारखे आनंदाचे क्षण- त्यांच्या सुहृदांनी जमवून आणले. काका तत्कालीन मंत्री बबनराव घोलप यांना म्हणाले होते. '... या सर्व पुरस्कारांपेक्षा माणसांचं मोल मला अधिक आहे!' तालुक्यातील प्रत्येक गावात त्यांच्या हक्काची, जीवाभावाची कितीतरी घरं आहेत. हीच काकांची खरी श्रीमंती!

संपूर्ण सिन्नर तालुका आपलं घर असल्यासारखे काका माणसं जोडत फिरत असतात. पत्नीची समर्थ साथ आहे. वेगवेगळ्या जाती-धर्माचा आणि वयोगटातील मोठा मित्र परिवार आहे. सिन्नरचं सार्वजनिक

वाचनालय आहे. पुस्तकं आहेत. काकांचं काम म्हणून थांबलेले नाही. आयुष्याची संध्याकाळ मात्र सुरू झाली आहे, इतकंच!

कालपरवा काकांकडे जाणं झालं. तेव्हा सूर्यही मावळतीकडे झुकला होता. चैत्राचं उन्हं मात्र होतं. काका कुणाला तरी पत्र लिहित बसले होते. आम्ही आलो म्हणून हातातलं काम बाजूला ठेऊन सरसावून बसले. आपल्या कामांबद्दल माहिती देत राहिले. आम्ही मन:पूर्वकतेने ऐकत राहिलो. वटवृक्षाच्या गार सावलीत बसवल्यसारखं छान थंडगार वाटलं. दरम्यान मावशींनी गोड सरबत करून आणलं. थोड्या वेळाने आम्ही निघालो, तसे काकाही उत्साहाने बाहेर निघाले. म्हणाले, 'वाचनालयाचा उद्या कार्यक्रम आहे. त्याची तयारी करायचीय, मला गेलं पाहिजे...'

तेव्हा मनात आलं. काकांवर केवळ लिहून चालणार नाही. काकांची पंच्याऐंशीची उमेद आपण घेतली पाहिजे.

काकांच्या चिमुकल्या परंतु स्नेहार्द घरातून निघताना काकांचे 'संघ' विचार आणि त्याच घरात पूज्य साने गुरूजींची दर्शनी असलेली प्रतिमा मात्र मनातून जाता जाईना. खरं तर काका कुठल्या विचारांचे? या प्रश्नाला काही अर्थच उरत नाही. काका खरे अजातशत्रू!... पूज्य साने गुरूजींसारखे काकांचे हृदय माऊलीमय झालेले आहे! हे मात्र नक्की!

# प्रयोगशील नेपथ्यकार
# **अरुण रहाणे**



अरुण रहाणे; वय वर्ष ३९, राहणार एन-४४/सीबी२/१५/१, भाजी मार्केट समोर, त्रिमुर्ती चौक, नवीन सिडको, नाशिक-९ या पत्यावर राहायला असतांना अरुण रहाणेंचा नि माझा परिचय झाला. कवी राजू देसले यांनी बंधूता साहित्य संमेलनात (२००४) माझी अरुणशी ओळख करुन दिली होती.

फारशी शरीर उंची नाही. छान हसतमुख चेहरा. पटकन नजरेत भरावं असं राजबिंड व्यक्तिमत्व नसलं तरी डोळ्यात एक तेजतर्रार चमक. उत्तमतेची एक शोधक नजर, बोलणं जमिनीवरचं. राजूने त्यावेळी अरुणविषयी सांगितलेलं एक वाक्य आठवतय, ''अरुणची ही सुरुवात आहे, उद्या अरुणच्या हातात फिल्मफेअरची बाहुली (ॲवार्ड) असेल!''

कालिदास कलामंदिराच्या आवारात गप्पां मारायला आम्ही छान खालीच बसलो. कोपरगांव तालुक्यातील पुणतांबा हे अरुणचं गाव. नगरला त्याने जी.डी.आर्टस केले आहे. नाशिकला येऊन एकांकिका आणि नाटकांमध्ये नेपथ्यकाम करण्याआधी अरुणने नाशिकमध्ये साईनबोर्ड पेंटिंग्ज आणि गणेशोत्सवातील छोटी-मोठी सजावटीचीही कामं केली आहेत.

त्यातूनच नाशिकमधील विविध नामांकित संस्थांच्या नाटकांची

नेपथ्यकामं त्याला मिळत गेली. गोदागौरव, जनस्थान सारख्या बड्या समारंभाचा मंच सजविण्याचे काम त्याला मिळाले. आणि हा सिलसिला मग पुढे सुरूच राहिला. नाशिकला चांगला मोठा नि महत्वाचा कार्यक्रम म्हटला, की अरुणचं त्यात असणं, हे समीकरणच झालेलं आहे.

सुरुवातीला प्रकाश देशपांडेसरांचं मार्गदर्शन मिळालं. प्रदीप पाटील यांनी उमेद दिली. त्यांच्याच सहकार्यातून अरुण या क्षेत्रात आला. स्थिरावला. ‘खजिन्याची विहीर’ हरीष जाधव लिखित ‘ध...शी’, तत्वमसि, स्वेतकेतू, स्वामी एका वैराण सुक्ताचे अधांतर सारखी महेश आफळेंची वेगळी नाटकं, अंधारुन आलय, अभंड, कोण म्हणतं टक्का दिला या नाटकांची मी कामं केली. नेपथ्यासाठी मला प्रथम, व्दितीय अशा बक्षिसांनी गौरवण्यात आलेलं होतं. आपलं काम लोकांना आवडतय, याअर्थी ही बक्षीसं उमेद वाढवणारी होती, असं अरुणला वाटतं.

जेडी आर्टसचा विद्यार्थी असल्यामुळे नेपथ्यकामाची आवड व दृष्टी होतीच. नासिकला आल्यावर तसं सुंदर, पोषक वातावरण मिळालं. मार्गदर्शन आणि प्रोत्साहनही मिळालं; साधारण १९८१ साली अरुण नासिकला आल्याचं सांगतो. मामांकडे राहून हे सर्व पाहत पाहत तो शिकत होता. कंपनीत काम करता करता एकांकिका, नाटक, लोकहितवादी मंडळ, चिरंजीवी नाट्यसंस्था, राज्य नाट्य स्पर्धा, कामगार कल्याण मंडळाच्या नाट्यस्पर्धा, वीज मंडळाच्या नाट्यस्पर्धा अशा विविध कामांतून त्याचं अनुभवक्षेत्र विस्तारत गेलं.

हे अगदी कालपरवा घडलं, नि मी त्यात कसा समरसून भाग घ्यायचो, हे अरुणकडून अगदी ऐकण्यासारखं आहे. आपल्यातला कलावंत कसा घडत गेला; हे अरुणला कृतज्ञतेने सांगायचं असतं. आनंद ढाकीफळे, नेताजी भोईर, शाम लोंढे अशा मोठ्या माणसांबरोबर काम करण्याची संधी त्यावेळी मिळाली. माझ्यासारखी शिकणारी नवी मुलं, मित्रही सोबत असायचे. हे सर्व शिकताना मजा यायची. अरुणला या

आठवणी सांगायला मनापासून आवडतं.

विशेष म्हणजे, कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांकडेही नेहमी जाणं व्हायचं. त्यांनी काही उपयुक्त मार्गदर्शन केल्याचं अरुण अभिमानाने सांगतो. १९९० साली 'व्हाईटकेन' या एकांकिकेसाठी पहिलं बक्षीस मिळालं, तेव्हाच अरुणने ठरवून टाकलं, की आपण उत्तम नि वेगळं काम करुन दाखवायचं! अरुणला बक्षीस मिळण्याचा एक फायदा असा झाला, की नाव मिळालं तशी नवनवीन कामंही मिळत गेली.

खजिन्याची विहीर, गांधार, डोंगराएवढा काळोख, आपलं बुवा असं आहे, नैनं दहती पावकं, तत्वमसी श्वेतकेतू, सावली सूर्यप्रकाशाची अशी काही चांगली नाटकं अरुणला मिळाली. कमीत कमी खर्चात चांगला मोठा स्टेज उभारणं, पीलरच्या साहाय्याने नेपथ्य! ही अरुणची त्यावेळी ओळख ठरली. यासाठी पूरक वाचन करणं, स्केचेस काढणं, संबंधितांशी चर्चा-संवाद, कामासाठी भरपूर फिरणं, संबंधित माणसांशी बोलणं यातून आयडिया मिळत गेल्या. असं अरुण नम्रपणे सांगतो.

परंतु आपल्या कामाबद्दल अरुणची म्हणून काही निश्चित मतं आहेत. दिग्दर्शकाइतकीच आमची भूमिका महत्त्वाची! असं अरुणला वाटतं. मोठमोठे कलावंतही आमच्याच नेपथ्याच्या पार्श्वभूमीवर आपला अभिनय साकारतात. रसिक प्रेक्षकांनाही नेपथ्यात इंटरेस्ट असतोच! ही खात्री आणि दाद अरुणला मिळाली आहे.

नाटकातून सिनेमापर्यंतचा अरुणचा प्रवास हा अगदी सहज सोपा असा झालेला नाही. त्यामागे आहे, ती अरुणची जिद्द, चिकाटी आणि परिश्रम. १९९१च्या सुमारास एन.चंद्रा दिग्दर्शीत 'तेजस्विनी' चित्रपटासाठी काम करण्याची संधी मिळाली. चित्रिकरणासाठीची स्थळं शोधून देणं, सेट उभारणं असं काम होतं. परंतु या कामानं अरुणला एक वेगळाच आत्मविश्वास मिळाला.

त्यानंतर १९९२ साली एच.ए.एल. संस्थेने राज्य नाट्य स्पर्धेत 'खजिन्याची विहीर' नाटक केलेलं होतं. अर्थातच या नाटकासाठी

अरुणला नेपथ्याचं पहिलं बक्षीस मिळालं. हे नाटक निर्माते सुरेश कराडे यांनी पाहिलं होतं. चौकशी करुन त्यांनी अरुणची भेट घेतली. त्यामुळे अरुणला 'तोचि एक समर्थ' हा सिनेमा मिळाला. अरुण पक्का स्वामिभक्त आहे. अरुण स्वत: तसं मानतो.

कलादिग्दर्शनातील वेगळेपणा बद्दल अरुण बोलतो तेव्हा, त्याचं ते सांगणं स्वप्नवत वाटत. तो वेगळं काहीतरी करण्याची आस बाळगून आहे. 'ज्युरासिक पार्क' चित्रपटासारखं काहीतरी भव्यदिव्य त्याला करायचं असतं. परंतु हे सर्व अगदी कमी पैशात नि प्रसंगी वेस्टेजमधूनही. माझा हा फॉर्म्युला मराठी चित्रपटात यशस्वी ठरला आहे. असं अरुण सांगतो.

अरुणच्या नावावर असलेल्या चित्रपटांची यादी दिवसांगणीक वाढतेच आहे. त्यात जय सप्तश्रृंगी माता, तोचि एक समर्थ, सौभाग्यवती सरपंच, आई शक्तिदेवता, तूच माझी भाग्यलक्ष्मी, अब क्या होगा, फाईव्ह रायफल (हिंदी सिनेमे), असे चित्रपट सुरुवातीला केले. शिवाय 'स्त्री देवता तुझी कहाणी, अश्वमेध, दिवस बालपणीचे, या दूरदर्शन मालिकाही केल्या. सातआठ चित्रपटांतून स्वत:ही छोटी-मोठी कामं अरुणने केलीहेत.

यानंतर मात्र अरुणने स्वत:ची अशी इमेज तयार केली, की अरुणचं काम म्हणजे बंधा रुपया! एन.चंद्रासारखा दिग्दर्शक आपल्या कामावर लक्ष ठेऊन असतो तर मग झोकून देऊन काम करणं. वेगळी काही छान निर्मिती करत राहणं, अरुणला महत्वाचं वाटतं

सावरखेडं एक गाव, कवडसे, जत्रा (कोंबडी पळाली फेम), राजमाता जिजाऊ, मुक्ती, दगडांच्या देशा, महागुरु, साहेब, वणवा-२०१४, सासूच्या घरात जावयाची वरात, उमंग, जावई बापू जिंदाबाद, निशानी डावा अंगठा, आनंदी आनंद, सासर माझं दैवत सारख्या चित्रपटांनी अरुणला चांगलं नाव मिळालेलं आहे. राजीव पाटील, केदार शिंदे, पुरुषोत्तम बेर्डे, सचिन शिंदे, विजय पाटकर, पीतांबर काळे

यांसारख्या आघाडीच्या दिग्दर्शकांसोबत तो सध्या काम करतो आहे.

या सर्व वैशिष्ठपूर्ण कामांसाठी विविध मानाचे पुरस्कार त्याने मिळवले आहेत, शिवाय अनेक महत्वाच्या पुरस्कारासाठी त्याला नामांकनही मिळालेलं आहे त्यात अल्फा गौरव पुरस्कार-२००४(सावरखेड एक गाव) ह्या पहिल्या वहिल्या मोठ्या पुरस्काराचं अरुणला अप्रूप वाटतं, शिवाय पितांबर काळे दिग्दर्शित 'तोचि एक समर्थ' या चित्रपटासाठी अरुणला महाराष्ट्र शासनाचे नामांकन मिळाले होते.

अरुण असा एकदम बिझी कलावंत आहे. या कामांसाठी महाराष्ट्रभर त्याला फिरावं लागतं. त्याचा मुलगा प्रसाद नुकताच आर्किटेक्चर कॉलेजमधून 'प्रॉडक्ट डिझाईन'ची पदवी घेऊन डिझाइनर झाला आहे. तो आता वडिलांना त्यांच्या कामात 'सहाय्यक' म्हणून मदत करतो आहे. मूलाबरोबरच पंधरावीस जणांची ॲक्टिव्ह टीम यासाठी अरुणकडे आहे. त्यामुळे एकाच वेळी अनेक ठिकाणी वेगवेगळी कामं पाहणं अरुणला शक्य होतं.

एवढी सर्व सृजनशीलता, दगदग, व्याप असूनही अरुणला कुठलंही व्यसन वगैरे नाही. समर्थ भक्त असल्यामुळे 'काम' हेच व्यसन किंवा आवड झालेली आहे. अरुण पूर्व परिस्थितीशी इमान राखून सतत संपुर्ण नम्रतेने वागत राहतो.

याबद्दल अरुणला विचारलं तेव्हा अरुण फार हळवा झालेला मी पाहिलाय. अरुणचे वडील कलाशिक्षक होते. थोडीफार जमीनही होती. परंतु वडील गेले. जमीनही गेली. पुढे आईने धूणीभांडी करुन अरुणला शिकवलं. रिमांड होममध्ये राहून अरुणने आपलं शिक्षण पूर्ण केलं. आईची इच्छा होती, अरुणने आपल्या वडलांचा वारसा पुढे चालवावा! अरुणलाही याच क्षेत्राची आवड म्हणून सर्व कसं छान जुळून आलं. अरुणने प्रसंगी झाडूही मारला, नाशिकच्या मेनरोडवर साईनबोर्ड रंगवलेहेत. महात्मानगरच्या एका बंगल्याच्या आऊटहाऊसमध्ये तो राहायला होता.

नंतर हे सर्व नाटकांचं काम, सेट उभारणं, चित्रपट, दूरदर्शन मालिका,

पुरस्कार मान-सन्मान सर्व काही मिळत गेलं. त्यात मूलं छान शिकली. अरुणचा एक मुलगा हॉटेल मॅनेजमेंट करून मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलात सहाय्यक व्यवस्थापक म्हणून तर दुसरा मुलगा डिझाइनींगचा पदवीधर होऊन अरुणचा सहाय्यक म्हणून काम करतो आहे.

या सर्व जीवन लढाईत पत्नीने अरुणला चांगली साथ दिली. अनेक चांगले मित्र मिळाले. उत्तमोत्तम काम करत वाटचाल सुरू आहे. आपलं काम वेगळं असावं म्हणून त्याचं प्रयोग करणं सतत सुरू असतं. आपले आदर्श रघुवीर तळशीकरांसारखा स्वत:चा 'नेपथ्यकार' असा ठसा अरुणला चित्रपटसृष्टीवर उमटवयाचाय! दादासाहेब फाळके यांच्यासारखं चित्रपटसृष्टीसाठी काहीतरी भरीव असं काम अरुणला करून दाखवायचय. नाशिकला चित्रपट निर्मितीसंस्था काढायचीय! चित्रपट निर्माता व्हायचय!

अरुण असा ध्येयवेडा कलावंत आहे. त्याच्या अंगात तेवढं पोटेन्शियल निश्चितच आहे. एक कलावंत दृष्टी आहे. प्रयोगशीलता आहे. त्यामुळे ही सारी स्वप्न तो आपल्या जिद्दीतून, प्रयत्नातून, कामातून पूर्ण करणार हे निश्चित! कुणी सांगावं अरुणच्याच जीवनावर एखादा चित्रपट निर्माण होईल! त्यातही त्याचच सुंदर, वेगळं असं नेपथ्य असेल. मला वाटतं, ही भेट या मनस्वी कलाकाराला मिळो, या हार्दिक शुभेच्छा.



# पालक परिवाराचा शिलेदार
# शिरीष भालेराव

**कळण्या मोल सुखाचे**
**विधीने तुला दु:ख दिले**
**या दु:खामधुनी निज सौख्याची**
**उधळीत जा तू गोड फुले**

या चार ओळींमध्ये सर्वसामान्यांच्या जगण्याचे संदर्भ किती नेमकेपणाने अधोरेखित झाले आहेत बघा. जीवन हा सुखदुख:चा एक फेरा आहे, असं म्हणतात. वास्तविक दु:ख आणि भोग कुणाला चुकले आहेत?

परंतु वाट्याला आलेलं दु:ख कवटाळीत न बसता आपल्या दु:खातूनही आशेची फुलं फुलवण्याची उमेद काही माणसं बाळगतात. आपल्या परीनं लढत राहतात. कळत- नकळत भोवतालचं जग अधिक सुंदर नि आनंदी करीत असतात.

आपण अशा उमेदभरल्या मनांची दखल घेतली पाहिजे. त्यांचं मन:पूर्वक कौतुक केलं पाहिजे. असंच काही ह्या लोकांना वाटतं, असंही नाही, पण अशी ध्येयवेडी माणसं कुळल्याही कारणांनी एकटी पडून मोडून जाऊ नयेत, नाउमेद होऊ नयेत म्हणून अशा उभारणाऱ्या हातांना साथ देण्याचा माझा प्रयत्न असतो.

भारतीय समाज व्यवस्थेत विवाह आणि त्यानंतर वंशविस्तार या दोन

गोष्टींना अनन्य साधारण असे महत्व आहे. म्हणूनच २००३ सालातही अमोल पालेकरांसारख्या संवेदनशील दिग्दर्शकाला 'अनाहत' सारखा विषय हाताळावासा वाटतो.

जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा विवाह झाला पाहिजे. विवाहानंतर उभयतांनी वंशविस्तार केला पाहिजे. असे काही संकेत समाजात रुढ झाले आहेत.

याप्रमाणे ज्या जोडप्यांना संतती होते. त्यांना समाजात योग्य स्थान आपोआपच मिळतं. त्यांचं कुळल्याही शुभकार्यात सहभागी होणं आनंददायी मानलं जात. परंतु ज्या जोडप्यांना अशा प्रकारे संतती होत नाही, म्हणजे जे मुला-बाळांचे धनी होत नाही, त्यांच्याकडे समाज कुश्चित नजरेनं पाहतो. विशेषत: स्त्रियांना या अघोषित समाज बहिष्काराला किंवा कुचाळक्यांना पदोपदी सामोरे जावे लागते. त्याचं अपमानीत होणं आणि पदरी दु:ख येणं सहसा चुकत नाही.

वास्तविक या निंदा नालस्तीला काहीच आधार वा अर्थ नसला तरी या जाचातून आपली सुटका(?) व्हावी म्हणून पोळलेल्या लोकांकडून नको नको ते प्रयोग स्वत:वर केले जातात. अत्यंत कडक व्रत-वैकल्ये, उपवास-तापास, नवस, अघोरी उपायांत मोडणारे सर्व प्रकार ते आज सर्वत्र सहज उपलब्ध असलेल्या अत्यंत महागड्या आणि गुंतागुंतीच्या आधुनिक (!) वैद्यकीय उपचारांना शरण जाणं हे रुढ होतय.

मुख्यत: पैसेवाली आणि राक्षसी महत्वाकांक्षेची माणसं हरप्रकारे महागडे नि गुंतागुंतीचे इलाज करुन या फेऱ्यातून कधी सुटतातही. त्यांना स्वत:चं मूल होतं. परतुं ती दमवणूक आणि पिदवणूक अक्षरश: जीवघेणीच असते. हे कितीजणांना ठाउक असते.

आणि हो, या सर्वांतून अशी काही किंवा पुष्कळच जोडपी उरतातच की, त्या बिचाऱ्यांना हे, ते आणि तेही उपाय करुनही त्यांची 'आई-बाप' होण्यांची पाटी कोरी राहते. आणि मग पुन: सुरू होतो तो या सर्व दुष्टचक्राचा अपरिहार्य फेरा!

मित्रहो, ही सर्व वास्तवदर्शी पार्श्वभूमी यासाठी, की त्या तथाकथित दृष्टचक्राच्या फेऱ्याला यशस्वी छेद देणारी ध्येयवेडी माणसं मला जवळून परिचित आहेत. हो, कधीकधी ही माणसंही अशा फेऱ्यातून गेली आहेत. त्या सर्व खर्च, त्रासामुळे अपमानीत आणि नाईलाजीत होऊन दु:खी-कष्टी झाली होती.

पण...पण असंच काही चांगलं वाचून ऐकून ही माणसं फिनिक्स पक्षासारखी पुन: जिद्दीनं उभी राहिली. त्यांनी स्वत:शीच एक धाडसी निर्णय घेतला. 'दत्तक पालक होण्याचा!' कायदेशीर मार्गाने सर्व बाबींची पूर्तता करुन अनाथाश्रमातून मुल दत्तक घेण्याचा! स्वत: आई-वडील होण्याचा! अनाथ मुलांना, हक्काचं, मायेचं घर मिळवून देण्याचा.. त्यांचा हा महत्वपूर्ण निर्णय मुलांसाठी आणि स्वत: त्यांच्यासाठी आनंददायी ठरला.

असं मानलं जातं, की अशा अनाथ मुलांना हक्काचे नि प्रेमाचेही आई-बाबा मिळावेत म्हणूनच समाजातील सर्वांनाच स्वत:ची अपत्यप्राप्ती होत नसावी. असो.

खरं तर सुख हे मानण्यात आहे. यात महत्वाचं एकच, की 'कोणतच सुख हे ओरबडून मिळत नाही. सुख हे छोटासा का होईना पण 'त्याग' वगैरे करुनच मिळत. विचारांती नि हळूवारपणे ते आपल्याला मिळवावं लागतं!' दत्तक पालकत्व हा असाच एक विचारशील त्याग आहे.

वास्तविक 'दत्तक पालक' ही संकल्पना आता समाजात चांगलीच रुजली आहे. असं आपण सहज म्हणतो परंतु नाशिकसारख्या प्रचंड लोकसंख्येच्या महानगरात दत्तक पालकांची संख्या पाचशेच्या जवळपास आहे. त्यातूनही या संख्येत मोठा वर्ग आहे, तो उच्चभ्रू आणि उच्चशिक्षितांचाच. की ज्यांना मुल होण्याचा आधुनिक उपचारांचा खर्च पेलवत नाही आणि अघोरी उपायही त्यांना करायला नकोच असतात. परंतु दत्तक पालक होणं म्हणजे न्यूनत्व वगैरे! असं काही त्यांच्या मनात असतं.किंवा दत्तक पालकत्वाची एकूण प्रोसेसविषयी ते फारसे परिचित

नसतात. आणखी ही सर्व प्रोसेस समजून घ्यायला ते पुढाकार घेत नाही. त्यांना संकोच, भीती वगैरे वाटते. ही माणसं म्हणजे मध्यमवर्गीय! ती सहसा कुठेच पुढाकार घेताना दिसत नाहीत.

हीच अनभिज्ञता, संकोचाची भावना नेमकी ओळखून अगोदर स्वत:च एक दत्तक पालक म्हणून अनुभवी झाल्यानंतर आपला हा आनंद इतर घरांतूनही वाटता येईल! अशी काही माणसं बांधिलकीच्या भावनेने एकत्र आली. त्यात ॲड. अमरजितसिंह, गरेवाल, श्री. योगेश जोशी (सर), अनघा कुलकर्णी, विनय चंद्रात्रे, सीमा क्षत्रिय अशी काही दत्तक पालक माणसं मला परिचयाची झाली. परंतु त्यात अग्रभागी असलेलं एक उत्साही असं व्यक्तिमत्व तर माझ्या छान परिचयाचं होतं, ते म्हणजे शिरीष वसंत भालेराव!

शिरीष मुळचा खांदेशचा. वडील पाटबंधारे विभागात सेवेत होते. वडलांच्या निधनानंतर शिरीष अनुकंपा तत्वावर पाटबंधारे विभागात आला. दरम्यान अतिशय जिद्दीने त्याने आपले शिक्षण पूर्ण केलं. एम.ए आणि एम.कॉम अशा दोन दोन शाखेचं व्दिपदवीधर होणं त्याने साध्य केलं. यथावकाश तो त्याचा कुटुंबकबिला घेऊन नाशिकला आला नि नंतर नाशिक हीच त्याची कर्मभूमीही ठरली.

सरकारी नोकरी आणि कमावती पत्नी (सौ. प्रतिभा वहिनी ग्लॅक्सो कंपनीत सेवेत आहेत) यामुळे त्याचं कुटुंब तर स्थिरावलं. परंतु घरात पाळणा हालत नव्हता. त्यामुळे पती-पत्नी दोघंही बैचेन असायचे. कुठून नि कसा शिरीषच्या मनात दत्तक पालक होण्याचा विचार पक्का झाला. वहिनीही आनंदाने तयार झाल्या. मुलगी घेण्याचं निश्चित झालं. पुणे येथे नावनोदंणी केली. आम्हा काही मित्रांना त्याने ही सर्व हकीकत सांगितली तेव्हा अर्थातच आम्हीही खूप आनंदित झालो. आमच्या मित्रांमध्ये किंवा इतक्या जवळच्या परिचितांमध्ये दत्तक पालक होणारा शिरीष हा आमचा पहिलाच मित्र होता. आम्ही त्याचं मनापासून कौतुक केलं. त्याला भरपूर प्रोत्साहन देऊन मित्र परिवार आनंदी होत असल्याचं

सांगितलं.

शिरीषने चैताली नावाची गोड मुलगी दत्तक घेतली. तो राहत असलेल्या मधुरिमा सोसायटीने त्याचं बाळासह जल्लोशात आणि अभूतपूर्व स्वागत केलं. चैतालीच्या स्वागतासाठी आयोजित समारंभात आम्ही काही मित्र खूपच उत्साहाने सहभागी झालो होतो. शिरीषचा आम्हाला अभिमान वाटत होता.

परंतु गोष्ट इथंच संपली नाही. शिरीष आणि त्याच्या काही सहकारी मित्रांनी पालक परिवार नावाची संस्था स्थापन केली. आपण दत्तक पालक झालो. आपल्याला बाळ मिळालं. आपलं घर आनंदलं! याबरोबरच आणखी काही लोकांना हा आनंद आपल्याला वाटता येतो का? हा विचार केंद्रस्थानी मानून काम सुरू झालं.

नाशिकच्या आधाराश्रमात जाऊन दत्तक पालकांची यादी व पत्ते मिळवून. त्यांच्याशी फोनवर, प्रत्यक्ष वा पत्राव्दारे संपर्क साधणं सुरू झालं. दत्तक पालकांचा मेळावा घेण्यात आला. परस्पर परिचयाबरोबरच दत्तक पालकत्वांत येणाऱ्या अडी-अडचणींवर विचार विनिमय झाला.

या मेळाव्याला मी स्वत: उपस्थित होतो. काही जणांना आपला दत्तक पालकत्वाचा आनंद इतरांत वाटायचा होता. आपलं बाळ आपल्याला आई-बाबा म्हणतं आणि ते कुणीतरी कौतुकाने पहावं, असे भाव तर त्यांच्याठायी होतेच शिवाय काहींच्या अडचणी व प्रश्नही होते. त्यावर मुक्त संवाद झाला. पालक परिवार संस्था घट्टपणे उभी राहावी! असे काही यात ठरले. जेष्ठ समाजसेविका सुधाताई फडके, शैलाताई कुलकर्णी, राहुल जाधव मार्गदर्शनासाठी आवर्जून उपस्थित होते. एक वेगळ्या विश्वाशी माझी नाळ जुळली होती. मला ही सर्व माणसं देवमाणसं वाटली. कारण त्यात असेही पालक होते, ज्यांना स्वत:चं एक मूल होतं आणि अजून स्वत:ची मुलं होणं शक्य असताना योगेश जोशी-सुनीता जोशी यांनी मुलगी दत्तक घेतली होती. चंद्रकांत आंबेकरांनी त्यांना ज्ञात असूनही काहीसं आजारी बाळ मुद्दाम दत्तक

घेतलेलं होतं. आणखी असेच कितीतरी थोर अनुभव. या सर्व विलक्षण अनुभवांमुळे मी अक्षरश: थरारुन गेलो होतो.

याच कार्यक्रमात मनोमन मी अभिवचन घेतलं, की पालक परिवार, नासिक सारख्या संस्थेसाठी पुरेसा वेळ आपण देत राहू. शिरीष या संस्थेचा संस्थापक सचिव आहे, त्यामुळे सुरुवातीपासून आम्ही पालक परिवाराचं काम सोबत करतो आहोत.

'चौकटीबाहेरचं घर' नावाची पुस्तिका, दत्तक सप्ताह, दत्तक पालक होऊ इच्छिणाऱ्या पालकांना मार्गदर्शन करणं, प्रेरणा व प्रोत्साहन देणं. दत्तक पालकत्वाची प्रक्रिया समजाऊन सांगणं. वेळोवेळी बैठका, मेळावे आयोजित करणं. दत्तक पालकांना परिवारात सामावून घेणं. त्यांच्याशी आवश्यक तो प्रत्रव्यवहार करणं. अशा स्वरुपाच्या कामांची शिरीषकडे गर्दी असते. अमाप उत्साहात ही सर्व कामे तो आनंदाने करतो.

कुणी दत्तक पालक होऊ इच्छित असेल तर शिरीषचा उत्साह पाहण्यासारखा असतो. तो फोनवर बोलेल, संबंधितांना पत्र लिहिल. वेळ मिळाल्यावर लगेच त्यांच्या घरी कुटुंबासह जाऊन येईल. विषयाला थेट हात घालण्याअगोदर आपली मुलगी-चैताली कशी आईबाबांच्या अंगाखांद्यावर खेळते आहे. याचा वस्तुपाठ देण्याचं काम शिरीष अचुक करतो. खूपदा त्याच्या समवेत ॲड. अमरजितसिंग गरेवाल हेही कुटुंबासह उपस्थित असतात. मग फारसे प्रश्न शिल्लक राहत नाही. 'आई वडील आणि मूल' हे नातं प्रसन्नपणे उमलून आलेलं अनुभवतांना समोरचा माणूस अंतर्मुख होतो. विचारशील आणि कृतीशीलही होतो. हा पालक परिवाराचा यशस्वी फॉम्युला शिरीषसाठी एक आनंददायी अनुभव झालेला आहे.

पालक परिवाराचं काम दररोज असं नसतं. तेव्हा घर, ऑफिस यात फक्त गुंतून न राहता तो ज्या सोसायटीत राहतो, ती इंदिरानगर येथील मधुरिमा सोसायटी, अजिंक्य मित्र मंडळ, इंदिरानगर आदी संस्थांचे वेगवेगळे कार्यक्रम यात आपला वेळ तो खर्च करीत असतो. अशा

विविधांगी कामामुळे त्याला कै. किशोर सूर्यवंशी पतसंस्थेचे सन्माननीय चेअरमनपद मिळालं. रोटरी कल्ब ऑफ नाशिक मिडटाऊनचं चेअरमनपदही त्याच्याकडे देण्यात आलेलं होतं.


परंतु मी स्वत: शिरीषला याबाबत अनेकदा टोकत राहिलो आहे, की आपली बांधिलकी आहे, ती पालक परिवाराशी! आणि हेच एक काम असे आहे, की जे काम तुला आत्मिक समाधान मिळवून देईल! शिरीषला माझं हे आग्रहाचं सांगणं पटतं, परंतु लोकही शिरीष सारख्या उत्साही माणसाला आपल्या कंपूत सारखं खेचत राहतात. खरं तर इतर संस्थांसाठी हजारो माणसं मिळू शकतील पण पालक परिवारासारखं बांधिलकीचं काम निष्टेनं करत राहणं हे एक आव्हानच आहे. त्यामुळे शिरीषसारख्या माणसाने पालक परिवाराची नाळ तुटू न देण्याची काळजी घेतली पाहिजे, असंच वाटत राहतं.

दत्तक पालकत्वाबाबत केवळ माहिती पुरवणं आवश्यक प्रक्रिया पूर्ण करुन मूल पदरात पाडून घेणं एवढाच मर्यादित विचार घेऊन पालक परिवार ही संस्था उभी राहिलेली नसून अशा सर्व पालक-पाल्यांचा मिळून एक परिवार व विचारशील समाज बांधण्याचा संस्थेचा उद्देश आहे. जसंजसं दत्तक मूल संबंधित घरात वाढत जातं, वास्तवाशी परिचित होतं. त्यावेळी त्याची भावावस्था जपणं. त्याला योग्य पद्धतीने मानसिक, भावनिक आधार देणं, मार्गदर्शन करणं अशा स्वरुपाची कामे पालक परिवाराला करायची असतात. शिरीष आणि त्याची टीम यासाठी सदैव तयार असते.

समाजातील अनाथ मुला-मुलींना हक्काचं व मायेचं घर मिळवून देणं. त्यांना चांगलं माणूस म्हणून घडवणं, सुसंस्कृत करणं, उत्तोमोत्तम शिक्षण देऊन त्यांना खऱ्यार्थाने उभं करणं व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून ताठ मानेनं जगण्यास लायक करणं! ही शिरीषच्या पालक परिवारापुढे एक मोठं काम आहे. शिरीषला ह्या कामात अतोनात रस आहे. पण त्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागणार आहेत. ह्याचीही जाणीव शिरीषला

आहे.

त्याचमुळे बाकी सर्व बंध सोडून ह्याच एका मानवतेच्या कामात झोकून देऊन मोठं काम उभं करण्याची उमेद शिरीष बाळगून आहे. 'पालक परिवाराचा शिरीष!' हीच ओळख त्याला खूप काही देऊन जाईल! हा माझा शब्द खरा करण्याची मन:पूर्वक धडपड शिरीष आज करतो आहे. एखाद्या निष्ठावान शिलेदारासारखा!



# कर्तव्यनिष्ठ उद्योजक
# **पुंजाभाऊ सांगळे**

भारताचे तत्कालीन उपपंतप्रधान आणि महाराष्ट्राचे भाग्यविधाते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या सिन्नर येथील एका राजकीय सभेत सन्माननीय 'अध्यक्षपद' भूषविलेले पुंजाभाऊ सांगळे हे सिन्नर, नाशिक येथील एक यशस्वी उद्योजक म्हणून आपणा सर्वांना सुपरिचित आहेत.

परंतु कधीकाळी भाऊंना मिळालेला हा दुर्मिळ मान तसेच उद्योजक म्हणून आज असलेली त्यांची ख्याती यामागे एक बस कंडक्टर ते यशस्वी उद्योजक पुंजा'भाऊ' किंवा अक्षरश: पुज्य ते बांधकाम व्यावसायिक क्षेत्रातलं यशोशिखर! असा लौकिकार्थाने मोठा नि विलक्षण प्रवास भाऊंनी केलेला आहे. किंवा वेगळ्या अर्थाने भाऊंची ती खरीखुरी यशोगाथाच आहे, असेही म्हणता येईल. ती प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी कालपरवा मी, भाऊंच्या राहत्या घरी स्वत: भाऊंना भेटून आलो.

साहित्यिक आणि पुंजाभाऊंचे स्नेही असलेले प्रा.डॉ. शंकर बोऱ्हाडेसर सिन्नरच्या नात्याने सोबत होते. एसटीने आम्ही दोघे सिन्नरला पोहचलो. एस.टी. स्टँडजवळच्याच शिवाजीनगर परिसरात भाऊंचा अतिप्रशस्त म्हणता येईल असा देखणासा बंगला आहे. सिन्नर येथील गाजलेला दरोडा याच बंगल्यावर पडला असेल, हे त्या बंगल्याकडे पाहिल्यावरच जाणवलं.

बंगल्याच्या गेटमधून आत जाईतो बोऱ्हाडेसर सांगत होते, की 'कधीकाळी' हा भला माणूस दहा बाय दहाच्या खोलीत भाड्याने राहत होता. म्हणजे चहा प्यायला म्हणून एकदा आम्ही त्यांच्या घरी गेलो तर वहिनी घर सारवत होत्या. मग भाऊंचं शेण सारवलं घर सुकल्यावरच आम्ही आत गेलो. चहापाणी घेतला. त्याला आता केवळ २०-२५ वर्ष झाली.

एरवी, अन्यत्र बंद असलेलं बंगल्याचं दार, इथं मात्र छान उघडच होतं. दारासमोर नीटनेटका बगिचा. घरासमोर तुळशीवृंदावन. आम्ही आल्याचं समजताच, काष्टी पातळ, कपाळावर ठसठशीत कुंकू आणि साध्याशा राहणीतल्या पुंजाभाऊंच्या पत्नी सौ. कलावतीबाई यांनी आमचं अगत्यपूर्वक स्वागत केलं. डोक्यावरचा पदर सावरत त्या चहापाणी करण्यासाठी आत गेल्या. सूनबाईंनी चहा आणेपर्यंत भिरभिरत्या नजरेनं, भाऊंनी उभारलेलं साम्राज्य कौतुकानं मी न्याहाळत होतो.

भाऊ थोड्या वेळाने येतीलच. असं कळालं.भाऊ येईपर्यंत त्यांच्या पत्नीशी मी काही बोलावं असं बोऱ्हाडे सरांनी सूचवलं. परंतु त्या माऊलीने अत्यंत नम्रतेने सांगितलं, की, ''भाऊंचा एकसष्टीचा भव्य सोहळा, त्यांचा बांधकाम उद्योग, त्यांची मेहनत, त्यांना मिळालेलं यश हे सर्व त्यांनी मिळवलय. त्याविषयी तुम्ही भाऊंशीच बोला. आम्ही आपले निमित्तमात्र! घरसंसार सांभाळला. मी आपली साधी बाई. 'मी घर सांभाळलं, त्यांनी उद्योग!'' असं हसत-हसत त्यांनी सांगितलं, पण आम्ही आपलं भाऊंविषयी आणखी काही विचारलं तर त्या म्हणाल्या ''त्यांच्याविषयी सांगण्यासारखं खूपच आहे. पण आपल्याला काही जास्त बोलता येत नाही पहा.'' एवढंच त्या बोलत लगबगीने घरात निघूनही गेल्या. विचार केला. किती साध्या आहेत ह्या. नाहीतर चार पैसे हाती आले की, लोक किती रेटून वगैरे बोलतात! त्यांचा तो नम्रपणा, लाघवीपणा मला मनापासून आवडला.

तेवढ्यातच चांगले उंचपुरे, गोऱ्या रंगाचे, सडपातळ असे भाऊ

येतांना दिसले. पांढरा स्वच्छ इस्तरीचा सदरा, पायघोळ असं दूटांगी धोतर, डोक्यावर कडक इस्तरी केलेली टोपी आणि चेहऱ्यावर सात्विक हसू असलेले भाऊ आले. नमस्कार वगैरे झाला. बोऱ्हाडेसरांनी भाऊंना अदबीने सांगितलं ''भाऊ हा विवेक! वेगळीशी वाट चोखाळणाऱ्या व्यक्तिमत्त्वांवर हा लिहितो. तुमच्या एकसष्ठीचंही सुंदर निमित्त आहे. तुम्ही तुमच्याविषयी सांगावं. आम्हाला ते जाणून घ्यायचं आहे. लोकांपर्यंत पोहचवायचं आहे.''

आपली कर्तव्यनिष्ठता, जिद्द, चिकाटी, परिश्रम लोकांपर्यंत योग्य पद्धतीने जाईल. शिवाय नव्यानं उद्योग व्यवसायात येऊ पाहणाऱ्यांनाही आपले अनुभव, धडपड, सचोटी समजेल आणि हे वाचून-ऐकून एखाद-दुसरा जरी उद्योजक-व्यावसायिक जीवनात उभा राहत असेल तर मला ते हवंच आहे!'' या भूमिकेतून भाऊंनी आढेवढे न घेता माझ्याशी बोलण्याची तयारी दर्शवली. भाऊ सांगू लागले...

''मी शेतकरी कुटुंबात जन्मलो. पाच एकर बागायती शेती होती. महानुभाव पंथीय आमचं कुटुंब खावून-पिऊन सुखी होतं. शाळेत तसा मी सामान्यच होतो. शिक्षण पूर्ण करून नोकरीला लागावं नि कुटुंबाला हातभार लावावा! असं मनात होतं. त्यादृष्टीने प्रयत्नात होतो.

त्यासाठी, आमचे मेहुणे शिवाजीराव डोंगरेंच्या सोबत जाऊन क्रांतीवीर वसंतराव नारायणराव नाईकसाहेब यांना भेटलो. तर ते चिडून म्हणाले. काय आहे हे प्रत्येकाला काय फक्त ड्रायव्हर कंडक्टरच व्हायचंय का? नववीत आहात ना, मग पुढे शिकून ऑफिसर किंवा क्लार्क तरी व्हा! उच्च पदावर काम करायला काही अडचण आहे का?''

नाईकसाहेबांचे ते शब्द मला आजही आठवतात. नकळत प्रेरणा नि प्रोत्साहन देतात. त्यामागची त्यांची तगमग नि प्रेम जाणवतं. परंतु त्यावेळी तरी मला त्यांच्याच सांगण्यावरुन एसटीत नोकरी लागली. १९६५ साली बसकंडक्टर म्हणून मी सेवेत रुजू झालो!

इंटक युनियनचं काम तेथे मला खुणावत होतं. खुद्द नाईकसाहेबांबरोबरही

माझा परिचय झाला. त्यांचं उत्तुंग व्यक्तिमत्व मला जवळून अनुभवता आलं. माझा उत्साह नि उमेद वाढली. बाहेरचा म्हणावा असा मित्रपरिवारही वाढत होता. बाहेरचं खूलं आकाश मला जणू साद घालत होतं. म्हणूनच की काय सात रुपये चाळीस पैसे रोजाची एसटीची नोकरी मी स्वच्छेने सोडून दिली.

मला चांगलं आठवतय, त्यावेळी सिन्नर डेपोत वीस बसगाड्या होत्या. आज माझ्याकडे त्याहून अधिक गाड्या नि मशिनरी आहे. परंतु एसटीतल्या त्या नोकरीचा तो पहिला पगार घेतानाची माझी ती हूरहूर. तो आनंद. घामाच्या पैशाची ती उबदार अनुभूती मी कधीच विसरू शकत नाही. ते १९७६ साल होतं. मी मुक्त(?) झालो होतो. वेगळं काही करु पाहत होतो.

१९७७ साली अगदी ठरवूनच मी सिन्नरमध्ये किराणा मालाचं मोठं दुकान टाकलं. पण मला त्यात यश काही आलं नाही. मात्र सर्व देणी वगैरे देऊन रु. ९०००/- माझ्या हाताशी उरले. मी पुज्य झालो. असंच त्यावेळी वाटलं. दुकान एकदाच बंद करुन टाकलं.

त्याकाळात एक गोष्ट खूप चांगली घडली. मला उत्तम पुस्तकं वाचण्याची आवड निर्माण झाली. त्यातील 'पॅपिलॉन' हे पुस्तक माझ्या विशेष स्मरणात आहे. त्याकाळात उद्योगी नि निरलस मनाच्या काही मित्रांसोबत मला राहता आलं. त्यावेळी एन.एम. आव्हाडसाहेबांसारख्या इंजिनिअर आणि बांधकाम व्यवसायातील मित्रामुळेच कदाचित खडी-डबरच्या व्यवसायात उतरण्याचा निर्णय मी स्वत:हून घेतला असावा. त्यासाठीची जागा सरकारी लीजवर मिळाली. व्यवसाय सुरू झाला.माझी जिद्द आणि इच्छाशक्तीने उचल घेतली होती.

खडी-क्रशरचा उद्योग सुरू झाला. साईटवर जाण्यासाठी स्वत:चं म्हणून कुठलही वाहन मजकडे नव्हतं. भाड्याच्या ट्रकमध्ये येणं जाणं होई. केबीनमध्ये जागा नसली तर मागे बसावे लागे. आदळत-आपटत बसून मी प्रवास करायचो. पण या व्यवसायातलं यश मला खुणावत होतं.

कामावर जातांना घरुन फडक्यात बांधून नेलेली चटणी-भाकरी आनंदानं खात होतो. अपार मेहनत घेत होतो. आपला व्यवसाय पुढे चिकार मोठा होणार! अशी मनोमन खात्री वाटत होती. ते दिवस फार उमेदीचेच होते.

सिन्नर आणि माळेगावं एमआयडीसीची स्थापना आणि विस्तारीकरणाचा तो काळ मला माझ्याही उद्योगधद्याच्या दृष्टीने 'सुवर्णकाळ' वाटतो. सचोटी, गुणवत्ता, पारदर्शीपणा आणि अथक परिश्रम यामुळे व्यवसाय विस्तारत गेला. हाती पैसा नि जोडीला सन्मानही मिळत गेला.

१९९० साली इंडस्ट्रीजच्या माध्यमातून युरोप दौऱ्यावर जाता आले. या वेगळ्याशा अनुभवातून खूप काही शिकता आलं. मुख्य म्हणजे माझा स्वत:वरील आत्मविश्‍वास वाढला. आपल्या व्यवसायात नवीन तंत्रज्ञान नि आधुनिकीकरण करण्याचा माझा निर्णय पक्का झाला.

भारतात परतताच मी, पहिल्यापेक्षा जास्त क्षमतेचं क्रशर घेतलं. गाडी भरण्यासाठी म्हणून हॉपर सिस्टीम परिसरात पहिल्याने मीच विकत घेतली. दोन शिफ्टमध्ये काम सुरू राहिलं. दरम्यान मुलगा भाऊसाहेब हाताशी आला. क्रशरचे काम अपुर्ण वाटू लागले. म्हणून १९९७ साली अद्ययावत असा अस्फालटींग प्लांट सुरू केला.

या व्यवसायातील नवनवीन क्षीतिजं मला खुणावतच होती. गुणवत्ता आणि प्रामाणिकतेच्या जोरावर विविध कामे मला मिळत गेली. नाशिक ते शिर्डी रस्त्याचे ९० लाखाचे काम केवळ ४२ दिवसात मला पूर्ण करता आले. प्रामाणिकपणे केलेले कष्ट, यश आणि किर्ती देत होते. त्यामुळे मी उद्योग नेटाने वाढवत नेला. अनेक अत्याधुनिक मशिनरीज मला घेता आल्या. कामात एक प्रकारची सुसुत्रता आणि नेटकेपणा आणता आला.

जागतिक मराठी परिषदांना लावलेली सजग उपस्थिती मला उपयुक्त ठरली. विविध क्षेत्रातील खूप उंच नि मोठी माणसं मला जवळून पाहता आली. त्यात माधवराव गडकरी, लता मंगेशकर, मनोहर जोशी, मंगला

खाडिलकर आदींशी संवाद साधता आल्याचं समाधानही मोठं आहे. मुख्य म्हणजे स्वत:चं मूल्यमापन स्वत:च करण्याची एक विलक्षण शक्ती मला प्राप्त झाली. आपले पाय सतत जमिनीवरच असले पाहिजे! ही भावना मनात दृढ होत गेली.

या सर्व अनुभवांमुळे उद्योग व्यवसायाकडेच नव्हे तर एकूण जीवनाकडेच पाहण्याची माझी दृष्टी अधिक व्यापक नि सकारात्मक अशी झाली. त्यामुळेच माझ्या व्यवसायातील कर्मचारी-कामगार हे मला माझ्या कुटुंबातीलच एक घटक वाटतात.त्यांच्या भावभावना, त्यांची सुख-दु:ख समजून घेण्याचा माझा प्रयत्न असतो. त्यांच्या घामाची, कष्टाची जाणीव ठेवल्यामुळेच आमचा उद्योग इतका भरभराटीला आला आहे! असं मला खात्रीनं सांगता येतं.

स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जाहीर सभेत 'अध्यक्षपदाचा' मला मिळालेला सन्मान असेल किंवा माझ्या या बंगल्यावर पडलेला दरोडा असेल. वैयक्तिक सुख-दु:ख असतील. वेगवेगळे मान - सन्मान नि निराश होण्याचेही क्षण असतील मी कुठल्याच सुखाने कधी हूरळून गेलो नाही वा दु:खाने म्हणून कधी खचून गेलो नाही. पुन: पुन: नवी जिद्द ठेऊन मी वाट चालतच राहिलो.

या प्रवासात काही मित्रांचे ॠण मला विसरणे अशक्यच आहे. त्यात प्रकाशशेठ शहा, प्रकाशशेठ वाजे या मित्रांची साथ मला लाभली. इंजि. एस.टी गामणेंनी व्यवसायाची नवीन दृष्टी दिली. माजी आमदार राहिलेले शंकरराव नवले यांनी माझ्या उमेदीच्या काळात माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. पडत्या काळात असंख्य मित्रपरिवाराची आणि माझ्या पत्नीची अनमोल साथ मला सततच मिळाली. आज दोन कर्तुत्वान मुले-भाऊसाहेब आणि उदय हाताशी आले आहेत. आज त्यांनी माझ्या कामाची जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घेतली आहे. पत्नी, मुलं, सूना, नातू यांच्या सहवासात मी समाधानाचा आणि तृप्तीचा अनुभव घेत आहे.

'कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषू कदाचन!' या भगवद्‌गीतेतील

वचनाप्रमाणे आजही, या ऐश्वर्याने मी जराही बदललेलो नाही. साधी, कष्टाळू, प्रामाणिक माणसं मला मनापासून आवडतात. आजही न चुकता साईटवर मी चक्कर टाकून येतो. वडिलकीच्या नात्याने सर्वांची उमेद वाढवण्याचा माझा प्रयत्न असतो. घरी-दारी माझं वागणं स्वाभाविक असतं. जे आपल्याजवळ नाही, त्याचा आभास करायला मला कधीच आवडलं नाही. माझा तसा स्वभावही नाही. त्यामुळे या कलत्या-वयाकडेही मी आनंदाने पाहू शकतो. जिद्द, सचोटी, प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि अथक परिश्रम करण्याची तयारी या गुणांची पूजा बांधण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला. हे सर्व निकष हाडी-मासी मुरवले, की यशस्वी होणं अवघड नाही! याउपरही एक माणूस म्हणून तुम्ही किती सुंदर नि नितळ वागतात यावर तुमची यशस्विता ठरते!' असे मला वाटते.

केवळ नववी शिकलेले, स्वत:च अपार मेहनत घेऊन कष्टाचा कातळ फोडून आपल्या व्यवसायात उत्तुंग झेप घेतलेले भाऊ बोलत असतांना जाणवतं, की कुठल्याच मराठी माणसानं उद्योग-व्यवसायाचा आता बाऊ करुन घेऊ नये! विश्वासानं उद्योग करावा. स्वत:ला नि देशालाही मोठं करावं. पुंजाभाऊ सांगळे हे यासाठीचं एक मूर्तीमंत असं उदाहरण आहे. भाऊंचा हा प्रवास केवळ थक्कच करणारा नाही तर प्रेरणादायी आणि आदर्शही आहे. हे निश्चित!

भाऊंच्या घरातून निघण्यापूर्वी प्रा.डॉ. शंकर बोऱ्हाडे आणि मी त्यांच्या बाजूला बसून पोटभर जेवलो. मला माझा तो एक सन्मानच वाटला. भाऊंच्या सूनबाई आम्हाला आपुलकीने वाढत होत्या. तेव्हा भाऊ बोलण्याच्या ओघात म्हणाले, ''तुमच्या या लेखाचं जाऊद्या हो, पण यानिमित्ताने तुम्ही घरी आले तुमच्यासोबत मला जेवता आलं. चला दिवस आनंदात गेला!''

तेव्हा भाऊंच्या त्या भव्य बंगल्यापेक्षा, त्यांच्या विस्तारलेल्या व्यवसायापेक्षा त्यांच्या नावलौकिकापेक्षा भाऊंचा हा साधेपणा मला जास्त भावला.

मध्यंतरी भाऊंच्या या व्यवसायातील यशस्वी प्रयत्नांची नोंद अखिल भारतीय बिल्डर्स असोशियनच्या नाशिक शाखेने सन्मानपूर्वक घेतली. बांधकाम विभागाचे सचिव मा. श्री. डी.के देशपांडे यांच्या हस्ते भाऊंना सपत्नीक 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. तेव्हा वाटलं, भाऊंचं हे यश पाहायला आपले क्रांतीवीर वसंतराव नाईकसाहेब हवे होते!

# माझे गुरुवर्य
# भालचंद्र अनंत मोगल (सर)



आदरणीय विचारमंच उपस्थित गुरुवर्य सज्जनहो आणि विद्यार्थी बंधू-भगिनींना माझा सादर प्रणाम.

कवी म्हणून माझा छोटासा परिचय आपणाला असेल म्हणून विनयानं असं म्हणतो, की

**'कवी जेव्हा बोलतो प्राणातून**
**तेव्हा त्याला नसतं हसायचं**
**कवी जेव्हा बोलतो प्राणातून**
**तेव्हा कवितेसारखं बसायचं!'**

मला असं वाटतंय की आपण सर्वजण आज निखळ कवितेसारखं ताजं, टवटवीत, प्रसन्नपणे आणि रसिकतेने बसला आहोत. ते केवळ आपल्या आदरणीय श्रीयुत मोगलसरांच्या सेवापूर्ती सोहळ्यासाठी. आज या निमित्ताने सरांविषयी कृतज्ञतेने बोलतांना स्वाभाविकपणे आपण, मोगलसरांच्या प्रयोगशील उमद्या, व्यासंगी, चिंतनशील व्यक्तिमत्वाचा आणि निरपेक्ष बुद्धीचा आज गौरव करीत आहोत.

प्रथमत: मला हे सांगितलं पाहिजे, की सरांचा एक अत्यंत छोटासा का होईना परंतु एक विद्यार्थी असण्याचा मला आत्यंतिक अभिमान वाटतो. आज सरांचा गौरव करतांना नकळत आमचाही गौरव होतो आहे.

याची सुखद व नम्र जाणीव मला आहे. काहीसं विस्कळीत परंतु अत्यंत मन:पूर्वक असं मी सरांविषयी बोलणार आहे.

शिकण्यात स्वत:ला झोकूण देणं! कशाला म्हणावं, याचं उदाहरण कुणाला हवं असेल तर त्याने सरांचा एक तास प्रत्यक्ष अनुभवावा! असं मी म्हणेन. सरांचं एक थोर शिक्षक असणं आणि श्रीमंत माणूसपणाच्या या माझ्या आठवणी केवळ नॉस्टेल्जिया नाही किंवा शब्दांच्या चिमटीत पकडावं इतकं छोटं नि सीमित व्यक्तिमत्व सरांचं नाहीच मुळी! तर सर एक ध्येयवेडे व्रती शिक्षक म्हणून आपणास प्रिय व वंदनीय राहिलेले आहेत. हेच सांगणं आत्यंतिक अभिमानाने तसेच विनयाने अधोरेखित करण्याचा माझा हा एक प्रामाणिक प्रयत्न! असं मी मानतो.

सरांचं शिकवणं, प्रार्थनेच्या किंवा एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमात संगीत साथ करतांना संवादिनीवर अलवारपणे काही सूर काढणं, त्यांचं सुंदरसं हस्ताक्षर हे आम्हाला अभ्यासक्रमाचाच एक भाग वाटायचा. तरीही रुढार्थाने कोणत्या एखाद्या चौकटीत न बसणारं हे एक विलक्षण आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्व म्हणून माझ्या स्मरणात आहे.

सर वर्गावर यायचे, तेव्हा एखाद्या अस्सल शेतकऱ्याने अमाप उत्साहाने रोज आपल्या शेतात मळ्यात जावं, काळ्या आईशी प्रचंड एकरुप होऊन तिथं घाम गाळावा. नांगरावं, वखरावं, पेरावं, मळावं आणि त्यातून सुंदरशा मोत्यांची रास पिकवावी तसे आमचे मोगलंसर वर्गावर येतांना आपल्या हातात नांगर, वखर, पांभर शोभावी तसे गणिती व भूमितीय उपकरणे घेऊन आलेले असत. वर्गात कुठली अळमटळम नाही. कुठलीही तडजोड नाही. अभ्यास एके अभ्यास!

विद्यार्थी, पुस्तक, फळा, खडू, डस्टर आणि मोगल सरांचं अमाप उत्साहात शिकवणं म्हणजे साक्षात नांगरणं, वखरणं, सपाट्या, पाणी देणं, मळणं असंच काही वाटत राही. त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीबाबत आणि शैलीबाबत आपण सर्वजण अधिक नेमकेपणाने बोलू शकाल. पण वैनतेय विद्यालयाचा त्यावेळचा एक सामान्य विद्यार्थी आणि

संवेदनशील, उमलत्या मनाचा एक अबोल विद्यार्थी म्हणून मला मोगलसरांची गणित, भूमिती, भौतिकशास्त्र शिकवतांनाची उत्स्फूर्तता, उत्कटता आणि त्या विषयांशी संपूर्णत: एकजीव होणं मला अत्यंत विलक्षण वाटायचं. त्यांचं साधं, सोपं, सुंदर शिकवणं आणि एखादं कठीण वाटणारं गणित सुटल्यावर पंढरीच्या वारकऱ्याने हरीनामाच्या ठेक्यावर मारलेली आनंदी उडी, सरही त्यावेळी मारायचे. त्या उडीत उत्स्फुर्तता व सहजता असे. मोगलसरांची ती उडी माझ्या काळजात अजूनही गच्च रुतून बसलीय.

एरवी, कोवळ्या सशाचं काळीज घेऊन सरांच्या तासाला बसणारा मी. मला त्यावेळी एवढचं समजलं होतं, की कुणीतरी प्रचंड बुद्धीमत्तेची, प्रखर विव्दतेची, आणि भरपूर उर्जा असणारी थोर व्यक्ती आपल्या आयुष्यात आली आहे. मोगलसरांचं गणित-भूमिती समजून देतानाचं ज्ञान, कसब आणि ते शिकवण्याचं टेकनिक म्हणण्यापेक्षा पोटेन्शिअल खरोखरी शब्दातीत आहे.

स्वातंत्र्यवीर सावकरांच्या आजोळ गावाहून (कोठूरे) सर लूना वगैरेने रोज शाळेत यायचे. आणि विद्यार्थ्यांमध्ये संपूर्ण इथलेच होऊन जायचे. माझे वडील अण्णा मला मोठ्या कौतुकाने सरांविषयी सांगायचे. मोगलसरांची घरची मोठी श्रीमंती आहे. एखाद्या सुसंस्कृत, ब्राम्हण कुटुंबासारखं चांगलं शिस्तशीर कुटुंब आहे. सर जेवणाचा डबा तर इतका मोठा आणि छान आणतात, की आमच्या स्टाफचे दोघे-तिघे सर त्यात छान सामाऊन जातात.

मी स्वत: मात्र सरांचा डबा केवळ दुरुन पाहिलाय. या डब्यातील अमृतघास माझ्यासारख्या भीडस्त मुलाला चाखण्याचा अनुभव आला नसला तरी अगदी सर्वांच्याच छान पसंतीला पडणाऱ्या आमच्या गुरुमाउलींच्या (सौ.मोगल) हातांना काहीतरी दैवीचव निश्चितच असावी. कारण या डब्यामुळेच की काय आमचे मोगलसर सदैव तृप्त, समाधानी आणि प्रसन्न असायचे. सर नेहमीच बेभान होऊनच शिकवायचे. प्रचंड

उर्जा त्यांच्यात दिवसभर टिकून असे. आज या यानिमित्ताने आदरणीय गुरुमाऊलींच्या पवित्र हातांना व मन:पूर्वकतेला सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने कृतज्ञ नमस्कार करतो.

वास्तविक माझी प्रतिभा किंवा माझा साहित्यिक जीव जेमतेम तुळशीपत्राएवढा! मोगलसरांपुढे उभे राहतांना आजही मी खऱ्यार्थाने लटपटतोय. एक आदरयुक्त भीती मला सरांविषयी सतत वाटत आलेली आहे. परंतु एक मात्र खरेच, की सर आपल्या वैनतेयची केवळ शानच नव्हती तर एक मोठीच असेट होती. असं मी नम्रपणाने सांगतो.

सरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची अप्रतिम संधी आपण मला दिली खरी, पण मोगलसरांच्या संपुर्ण ऋणात राहणं हीच सरांना खरी मानवंदना ठरेल!

सरांच्या सेवापूर्तीनिमित्त हा सुंदर कृतज्ञतासोहळा आपण आयोजित केला आहे. आणि त्याचा मी एक 'साक्षीदार' असणं मला अत्यंत आनंददायी आणि भाग्याचं वाटतं आहे. सर, मी माझ्या आजवरच्या आयुष्यात केवळ पैसाच कमावला असता तर आज मला मिळालेलं हे पुण्य कदाचित अन्यत्र मिळू शकलं असतं का? याचा मी विचार करतो आहे. कारण सरांनी त्यांच्या आयुष्यात घडवलेल्या उत्कृष्ट पाच विद्यार्थ्यात मी एक आहे! याचा मला मनस्वी आनंद व अभिमान वाटतो. आपल्या विद्यार्थ्यात आज येथे एक प्राचार्य, एक प्रसिध्द डॉक्टर, एक सनदी अधिकारी, बोर्डात चमकलेला एक विद्यार्थी याबरोबर एक कवी म्हणून माझं असणं हे केवळ अव्दितीय आहे! असं मला वाटत आहे.

माझ्यासारख्या सर्वसामान्य विद्यार्थ्याला घडवतांना कुठेतरी आपले हात, सच्चे बोल माझ्यावर पडले आहेत. त्या प्रामाणिकशा परीसस्पर्शाने की काय मी पुढे थोडाबहूत घडलो. सर, आपले ते प्रयत्नांचे क्षण या इवलूशा काळजात मी वत्सलपणे जपले आहेत.

सर, त्यातूनच की काय, पुढे मी प्रथमश्रेणीत पदवीधर झालो. कुसुमाग्रज प्रतिष्ठानची साहित्यभूषण पदवीपरीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण

झालो. कविता-ललितादी गद्यही लिहीतोय. त्याचबरोबर शासकीय कर्मचारी वाचनालयासह काही सामाजिक संस्थांमध्येही काम करतो आहे. म्हणूनच की काय मला या समारंभाला निमंत्रीत करण्यात आलं असावं. एखाद्या अतिसामान्य राहिलेल्या विद्यार्थ्याचं संचित-संचित म्हणून वेगळे ते काय असतं? म्हणून सर आपले आणि माझ्या या प्रिय शाळेचे आशीर्वाद मला सतत हवे आहेत.

मोगलसरांचं हे सागरासारखं गहिरं, विशाल कर्तुत्व 'याचि देही याचि डोळा' मी अनुभवलय. सरांचं व्यासंगी, तेजस्वी आणि चिंतनशील व्यक्तिमत्व माझ्यासारख्या अनेकांना नेहमीच स्फूर्ती देत राहील.

आज कृतज्ञता सोहळ्यात मोगलसरांचं हे समृध्द आयुष्य विनयशीलतेने अधोरेखित करताना आज माझा उर अत्यंत अभिमानाने भरुन आला आहे. खरं खरं सांगायचं तर खूप दिवसांनी माहेरी आलेल्या सासुरवाशीणीसारखं एक सारखं मला भरुन येत आहे. कारण याच शाळेने आणि मोगलसरांसारख्या व्रतस्थ शिक्षकांनी कित्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे सोने केले. अशा पैकी एक ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचा शाळेच्याच पवित्र वास्तूत सरांच्या चरणी ही अक्षरफुले वाहतांना मला अतिशय धन्य वाटतय. मोगलसर किती समृध्द होऊन शिकवत होते याची मांदियाळीच व्यासपीठावर विराजमान झालेली आपण पाहतोय. पराक्रमी योद्धा जसा आपल्या अंगाखांद्यावर जखमा आणि पदके घेऊन हिंडत असतो तसे आपले मोगलसर त्यांच्या अंगाखांद्यावर त्यांनी आपल्या शिकवण्यातून कमविलेली ही गुणी विद्यार्थ्यांची संपती मिरवतील. सर, यादृष्टीने आपण खरोखरीच श्रीमंत आहात. सरांच्या ह्या आठवणी लिहितांना मला चंदनाची प्रतिमा आठवली. आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याला घडवावं, फुलवावं म्हणून हे चंदनाचं झाड आयुष्यभर मनसोक्त झिजत राहिलेलं आहे हे आपण पाहिलय.

हाडाचे शिक्षक असलेले मोगलसर सेवानिवृत्त झालेहेत असं म्हणतांना एकाचवेळी हा क्षण दोन वेगवेगळ्या अनुभूती देणारा वाटतो.

म्हणजेच हा क्षण सरांच्या विश्रांतीसाठी आनंददायी आणि आपणा सर्वांसाठी अतिशय हुरहुर लावणारा असा वाटतो आहे. कारण कविवर्य रवींद्रनाथ टागोर म्हणतात, की

'विश्रांतीवर अधिकार फक्त कामाचा, जसा पापणीवर डोळ्याचा'

या न्यायाने, आपल्या वाट्याला आलेला प्रत्येक क्षण सरांनी अक्षरश: कारणी लावलाय. याचं छोटसं नि त्यावेळी दररोजचं उदाहरण द्यायचं झालं तर आद. मोगलसरांना स्व. वामननाना मोरे किंवा शिवरामनानांनी दिलेली टणटण वाजणारी बेल (टोल) कधी ऐकू आली नाही. तशी जाणीव करुन देताच, एखाद्या संपूर्ण तंद्री लागलेल्या तपस्वी ऋषीची कठोर तपस्या भंग व्हावी! असंच काहीसं त्यावेळी व्हायचं नि चिकार उत्साहात असलेले मोगलसर जडशील पावलांनी वर्गातून निघून जायचे. सर वर्गातून जाताना आम्ही पाहायचो, की सरांचे पांढरे शुभ्र कपडे वारंवार फळा पुसून पुसून त्या पडलेल्या खडूच्या फक्कीने मळून-भरून गेलेले असायचे. तेव्हा त्यांच्या चष्म्याला, डोक्याला, हातांना पुस्तकांना सर्वत्र खडूचेच पांढरे थर जमलेले दिसायचे. आणि मुख्य म्हणजे आपलं हे रूप सरांच्या गावीही नसायचं!

मित्रहो, शिकवण्याच्या नादात, त्यांचं हे पांढरे शुभ्र होणं मला मात्र विलक्षण भावायचं. नव्हे याच शुभ्र हातांनी व मनाने सरांनी अक्षरश: धवल यश संपादन केलं. सर, आपल्या या शुभ्रविचारांना आमचे वंदन.

लौकिकर्थाने एखादा मान-सन्मान सरांच्या वाट्याला आला असेल-नसेलही, परंतु गेली तीन तपे सरांच्या अविश्रांत अशा चिकाटीतून, मेहनतीतून, कर्तव्य कठोरतेतून, परिश्रमातून उभी राहिलेली कितीतरी माणसं! मला वाटतं हाच सरांचा खरा गौरव आहे.

अगोदर आपली शाळा छोटी होती. गावही छोटं होत. परंतु आदरणीय दादासाहेब कराड, सोनी साहेब, स्व. रघुनाथपंत कोष्टी, उगांवकर आप्पा, मा. परीट गुरुजी, आद. व्यवहारेसर, माझे वडील उगलमुगलेसर, चकोरसर, कुळकणीसर, कुरकुरेसर, देवगावकर मॅडम,

जाधवसर, भोईसर यासारखी कितीतरी मोठी माणसं माझ्या शाळेत होती. आपल्या जुन्या शाळेतला तो गारवेल माझ्या मनाला आजही थंडावा देतो. किती अडचणीत भरायची आपली शाळा? पण सरांनी या अभावाचं कधी भांडवल केलं नाही. त्यांनी मोठ्या जिद्दीने प्राचार्य सोमनाथ आंधळेसर, डॉ. ओमप्रकाश बरोसनी (गणित १४९/१५०) मोहनजी रानडे, डॉ. बोरस्ते, डॉ. बिनायकिया, गणेश कराड असे कितीतरी विद्यार्थी घडवले.

हे अलौकीक असं विद्याधन आठवतांना सरांना आज खरोखरी आपल्या शिक्षकी वृतीचं, कष्टाचं चिज झाल्यासारखं वाटत असेल. एक कृतार्थ जीवन जगलेल्या सरांच्या असामान्य आयुष्यावर माझ्यासारख्या सर्वार्थानं लहान विद्यार्थ्याने आणिक काय बोलावं?

सरांनी अत्यंत तन्मयतेने फळ्यावर एखादं गणित किंवा एखादे प्रमेय सोडविल्यावर ते डस्टरने पुसून टाकतांना उडालेल्या खडूच्या एका धुळीकणाएवढं माझं कर्तृत्व! या शाळेसाठी, आपल्या विद्यार्थ्यांसाठी आपण एखाद्या नंदादीपाप्रमाणे तेवत राहिलात. आणि आम्ही शेकडो विद्यार्थी अक्षरश: उजळून निघालो.

सर, आज या अविस्मरणीय प्रसंगाने आपणाला भेटून, आपल्या विषयी बोलून, आपल्या शाळेच्या मांडीवर विसावून आज माझ्या मनाची तहानलेली मूळं आज तृप्त झाली, असं वाटतय.

या आपल्या प्रिय मोगलसरांना आणि आद.सौ. मोगल गुरुमाऊलीला, सरांच्या या क्रिम, दिग्गज विद्यार्थ्यांबरोबरच माझ्या सर्व बंधू-भगिनी जे वेळी-अवेळीच आपल्या पोटापाण्याला लागले किंवा ज्या बहिणी लवकर शहाण्या होऊन सासरी निघून गेल्या त्या माझ्या या शाळेतील हजारो बंधू-भगिनी, मित्र -मैत्रीणींकडून सरांना माझे हे प्रातिनिधीक वंदन, दंडवत!

सर, या सर्वांचा एक भाग्यवंत प्रतिनिधी म्हणून आपल्याविषयी आणि या शाळेतील प्रत्येक गुरुवर्यांबद्दल, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबद्दल मन:पूर्वक

ऋण व्यक्त करतो. मी या शाळेचा अत्यंत ऋणी आहे.

आज, मी हे सर्व धाडसं का व कसं केलं हे कविवर्य आनंद जोर्वेकरांच्या कवितेतून सांगतो-

**‘माझ्याच मनाआतून तो**
**आवेग आग्रही येतो**
**शाईतून श्रावण झरतो**
**प्राणसा...’**

.......**नमस्कार**

(गुरुवर्य श्री. मोगलसर यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात व्यक्त केलेले मनोगत)



## सूत्रसंचालक : कवी रवी!
# रवींद्र मालुंजकर

**‘माझ्या शब्दांची फुंकर**
**तुझ्या दु:खावर व्हावी**
**साऱ्या सरून वेदना**
**तुझी काया उजळावी!’**

शब्दांची अशी अलवार फुंकर घालणारी रवींद्र मालुंजकरांची कविता ही निव्वळ भावकविता नसते तर जाणिवांचे आकाश समर्थपणे पेलणारी ती एक समृद्ध आशयघनतेची कविता असते.

मुख्यत्वे गेय कवितेच्या माध्यमातून सर्वदूर परिचित झालेला हा तरुण कवी जेथे म्हणून कविसंमेलनात सहभागी होतो, त्या-त्या ठिकाणी

**‘पाऊस तुझ्या सयीचा**
**मम हृदयी झंकारतो**
**तुझ्या माझ्या मनातला**
**ठोका चुकवूनी जातो’**

अशा त्यांच्या काही सहाबहार कवितांची फर्माईशही होतेच.

उपजत गाता गळा, शब्दांवरची हुकूमत, अस्खलित मराठीपण, दाणेदार सुरेल वाणी यामुळे कवितेचं ते अक्षरश: सोनं करतात. लहानपणापासून त्यांची गाण्याविषयीची आवड येथे कामी आली आणि

त्यांचा काव्यमय सूत्रसंचालकाचा पिंड त्यातून पोसला गेला.

मालुंजकर काही वर्षे एका वृत्तपत्राचे सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणूनही काम पाहत होते. परंतु एक कवी, सूत्रसंचालक असल्यामुळे त्यांचं संकलन हे इतरांपेक्षा वेगळं नि वैशिष्ट्यपूर्ण असायचं. आपल्या या वृत्तांकनात ते ग्रामीण आणि नवोदितांना प्राधान्याने संधी द्यायचे. त्यांची ही बांधिलकी निश्चितच कौतुकास पात्र ठरावी, अशी होती. मध्यंतरी त्यांची प्रकृती काहीशी बिघडली आणि त्यांनी हे सांस्कृतिक प्रतिनिधीचं वृत्तपत्रातलं आपलं आवडतं काम जवळपास सोडूनच दिलं. परंतु सरांच्या त्या कामाची इतकी छाप रसिकांवर आहे की, त्यासाठी आजही मालुंजकरांच्या लेखन शैलीचं नाव आवर्जून घेतलं जातं.

नाशिक शहर म्हणजे महाराष्ट्राची एक सांस्कृतिक राजधानीच! कविसंमेलनांबरोबरच अनेक साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची येथे अगदी रेलचेल असते. त्यामुळे मालुंजकरांना सूत्रसंचालनाच्या अनेक संधी वारंवार मिळतच गेल्या. त्यासाठीची लागेल ती मेहनत घेण्याची तयारी, सूत्रसंचालनाची मूळात जाण आणि आवड यामुळे मिळालेल्या प्रत्येक संधीचं त्यांनी सोनं करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. 'झोकून देणं' हा शब्दप्रयोग त्यांच्यासाठी आम्ही वापरतो. इतकी पुरेपूर मानसिकता त्यांच्या कामात असतेच असते.

सूत्रसंचालनाच्या क्षेत्रात आणि सूत्रसंचालकाच्या व्यक्तित्त्वानं किंवा कलेनं त्यांच्यावर बालपणीच गारुड घातलं होतं. या क्षेत्रातील दिग्गज किंवा 'बापमाणसं' म्हणावेत असे सुधीर गाडगीळ, बच्चू पांडे, भाऊ मराठे, तुषार दळवी, प्रदीप भिडे, सचिन पिळगावकर, अमीन सयानी अशी कितीतरी नावं म्हणजे त्यांच्यासाठी जीव की प्राण! मैफिलीची रंजकता वाढवणं आणि कार्यक्रम भारदस्त करणं म्हणजे काय? हे संवादीपण मालुंजकरांनी जीवाचा कान करून ऐकलं... अनुभवलं... मनात साठवलं आणि मग सुरू झाला त्यांचा स्वत:चा सूत्रसंचालकाचा अखंड प्रवास!

खरं तर सूत्रसंचालन करणारी व्यक्ती दिसायला छान उंची-पुरी, देखण्या व्यक्तिमत्त्वाची वगैरे असावी. त्याचा पोषाख वैशिष्ट्यपूर्ण असावा या प्राथमिक आणि रूढ समजांना छेद देत मालुंजकर या क्षेत्रात घट्टपणे पाय रोवून उभे आहेत, हे महत्त्वाचे!

फारशी शारीरिक उंची नाही, डोळ्यांवर नंबरचा चष्मा, पळसेसारख्या ग्रामीण भागात बरेच दिवस राहायला असल्याने तेथील ग्राम्य बोलीचा, बोलण्यात- वावरण्यात काहीसा प्रभाव, शिक्षकी पेशाला शोभेल, असा टिपिकल सभ्य पेहराव, हातात उत्तमोत्तम कवितांचं बाड असलेली पिशवी असं हे काहीसं छोटच्या चणीचं व्यक्तिमत्त्व, एक सूत्रसंचालक म्हणून प्रथमदर्शनी नजरेत भरत नाही.

बरं आपल्या शाळेचं आणि कुटुंबाचं प्रत्येक काम ते इतकं व्यवस्थित करतात की हा माणूस हे सर्व व्याप योग्यप्रकारे कसे सांभाळत असेल याचं विशेष वाटतं. एकदा का कार्यक्रम स्वीकारला की, प्रथम तो कार्यक्रम समजून घेणं, वक्ते - संयोजनात कोण कोण आहेत? प्रमुख अतिथी, उपस्थित मान्यवर, असा सर्व अभ्यास नकळत  सुरू होतो. प्रत्यक्ष कार्यक्रमात अगदी ठरवून दिलेल्या वेळेच्या आत पोहचणं, कार्यक्रम पत्रिका, बॅनर, बैठक व्यवस्था, चहापान व्यवस्था, शाल, गुच्छसारख्या वस्तू देणाऱ्यांशी चर्चा, अशी चौफेर कामं एक तयारी म्हणून न सांगता ते पूर्ण करून घेतात. कार्यक्रम रंगतदार आणि आटोपशीर कसा होईल! यासाठी शेवटपर्यंत झटत राहण्याचा त्यांचा स्वभाव आहे.

संबंधित कार्यक्रमातील आपणही एक विशेष निमंत्रित किंवा महत्त्वाची व्यक्ती आहोत, हे विसरून कविता जगण्याची मालुंजकरांची बेहोषी स्तिमित करणारी असते.

आणि हो, प्रत्यक्ष, कार्यक्रम एकदा का सुरू झाला, की भले-भले अचंबित होतात. अरेच्या आत्ता-आत्ता आपल्यात असलेला साधा-सरळ दिसणारा हा माणूस प्रमुख मान्यवरांच्यात किती विश्वासानं वावरतोय. किती अचूक बोलतोय! त्यांचं निवेदन हे विलक्षण ओघवतं,

संवादी आणि सर्वांनाच खिळवून टाकणारं असतं. त्यांच्या सूत्रसंचालनात उत्तमोत्तम कवितांची पेरणी इतकी चपखल असते, की कुणाही रसिकाला ती भुरळ पाडते. कार्यक्रमाची उंची त्यामुळे निश्चितच वाढलेली असते.

यासाठीचा विद्याभ्यास त्यांचा सतत सुरू असतो. कुठे एखादं छान वाक्य वाचण्यात-ऐकण्यात आलं, कुठं सुंदर कविता मिळाली की, एखाद्या मधमाशीसारखं गोड-रसाळ कण जमा करणं अव्याहतपणे सुरू असतं. कार्यक्रमात त्यांना जी काही स्पेस सहज मिळाली असेल, तिचं मालुंजकर अक्षरश: सोनं करतात. केवळ पाट्या टाकणं हा त्यांचा स्वभाव नाही. जे करायचं ते सुंदर, देखणं आणि मनस्वीपणे!

कार्यक्रम छोटा असो वा मोठा. ग्रामीण असो की शहरी भागात असा कुठलाही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय ते देतात. आयोजकांचं मन:पूर्वक कौतुक करणं, रसिकप्रियतेला आणि उत्तमतेला जाहीरपणे गौरवणं, नवोदितांना मुख्य प्रवाहात आणणं, त्यांना योग्य तो मानसन्मान देणं ही त्यांना आपल्या माय-मराठीची छोटीशी सेवा वाटते. समोरच्या श्रोतृवर्गाचा अंदात घेत मालुंजकर हळूहळू पण सफाईदारपणे पेश होत राहतात. रसिकांचा अचूक अंदाज घेण्याची त्यांची क्षमता केवळ वादातीत आहे. कुठे थांबावं हे त्यांना बरोबर साधतं!

प्रासंगिकता, उत्स्फूर्तता या भांडवलावर त्यांचं सूत्रसंचालन हे ताजं, टवटवीत आणि स्मरणात राहणारं होतं. व्यासपीठावर कितीही महत्त्वाची आणि मोठी हस्ती असो मालुंजकर त्यांच्या मोठेपणामुळे दबून जात नाहीत. गोंधळून जात नाहीत. मुख्य म्हणजे भरकटत नाहीत. लटके संकोचत नाहीत. म्हणूनच विलासराव देशमुख, आर.आर. पाटील, छगन भुजबळ, अजितदादा पवार यांच्यासारखी कलंदर राजकीय हस्ती असो; निशिगंधा वाड, अलका कुबल, रमेश देव, सीमा देव, सयाजी शिंदे, कुलदीप पवार यांच्यासारखे चित्रपट कलावंत असो; कविवर्य डॉ. विठ्ठल वाघ, प्रा. फ.मुं. शिंदे, रामदास फुटाणे यांच्यासारखी स्वत: उत्तम बोलणारी साहित्यिक माणसं असोत कुठलाही उच्चपदस्थ अधिकारी,

खेळाडू, कलावंत असो; मालुंजकर आपलं काम त्यांच्यासमोरही चोख पार पाडतात. डॉ. विठ्ठल वाघांसारखा सर्वार्थाने मोठा माणूसही त्यांचं रांगड्या भाषेत मनापासून कौतुक करतो.

सूत्रसंचालक हा केवळ उपचार नसावा, ती मैफलीची अपरिहार्यता असावी! असा मालुंजकरांचा आग्रह. या त्यांच्या भूमिकेचा प्रत्यय घेण्यासाठी त्यांनी सूत्रसंचालन केलेला एकतरी कार्यक्रम जरूर ऐकावा. त्यात काय नसते? उत्स्फूर्तता, नावीन्य, जोश! यातून कार्यक्रम कसदार-रंगतदार करणं मालजुंकरांना सहज साधतं. कारण त्यात त्यांनी उत्तमोत्तम कविता पेराव्यात, त्या उत्तम आवाजात स्वत: गाव्यात, लोकगीतं, भजनं, भारूडं, संतवचनं अशी इतकी वैविध्यता त्यात आपसूक येते की, त्याचा एक अक्षरगोफ मनाला प्रसन्नता दिल्याशिवाय राहत नाही.

इतकं सर्व कुठून मिळवलं? कुठं वाचलं इतकं? आणि एवढं सारं कसं छान लक्षात राहतं! आणि इतक्या नेटक्यापणाने ते बोलण्यात, गाण्यात येतं तरी कसं? ही उत्सुकता अगदी प्रत्येकालाच त्यांच्याबद्दल वाटत राहते. कार्यक्रम संपल्यानंतर रसिकांचे कॉम्प्लिमेंटस् (अभिप्राय) मिळाले नाहीत, असं सहसा होत नाही. लोक आवर्जून भेटतात, कौतुक करतात. मालुंजकरांना हे अभिप्राय आनंद नि नव्या कामाला बळ देतात. ‘त्यातूनच अधिक चांगलं ते करण्याचं भान मला मिळतं!’ असं मालुंजकर विनम्रपणे सांगतात.

कवितेत आणि सूत्रसंचालनात खूप लोक उत्साहाने येतात. मोठ्या उमेदीनं सुरुवात करतात आणि आपली ताकद पणाला न लावताच मध्येच गळून पडतात. कवितेत तर रोज नवं काही भरारा उगवत राहतं नि खुरटून जळूनही जातं. पण मालुंजकर आपल्या प्रतिभेवर, अभ्यासावर आणि मन:पूर्वकतेवर गेली दोन-अडीच दशके या क्षेत्रात यशस्वीपणे मुशाफिरी करताहेत.

कविता म्हणण्यासाठी आणि सूत्रसंचालनासाठी मालुंजकर कोठे म्हणून गेले नाही. मोठ्या शहरांबरोबरच छोट्यात छोटं खेडं, वाडे पाडे,

वस्तींवर, दुर्गम भागातील एनएसएसच्या कॅम्पस्‌मध्ये त्यांनी कार्यक्रम केले आहेत. मिळेल त्या साधनाने प्रवास करून कार्यक्रम करण्याची त्यांची जिद्द वाखाणण्याजोगी असते.

अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने मालुंजकरांचं फिरणं म्हणजे आम्हा सर्व मित्रांसाठी एक कुतुहलाचा विषय! शाळेची वेळ आणि सुट्ट्या बरोबर ॲडजस्ट करून मालुंजकर कार्यक्रमांना जात असतात. त्यांच्या पत्नी म्हणजे आमच्या जयावहिनींचं त्यांना विशेष प्रोत्साहन असतं. स्वत: बी.एस्सी. असूनही वहिनी मालुंजकरांचे कार्यक्रम, त्यांच्या असंख्य मित्रांचे आणि सुहृदांचे घरी येणे-जाणे, पाहुणचार सारं काही आनंदानं करतात. त्यांच्या गुणी मुली कावेरी आणि निशाही त्यांच्या ऊर्जास्त्रोत आहेत. मालुंजकरांच्या आई गेल्यानंतरही या तिघींनी मिळून मालुंजकरांच्या चेहऱ्यावरचं प्रसन्न हसू कायम ठेवलं आहे.

स्वत: प्रसिद्धीपराङ्‌मुख असलेल्या मालुंजकरांना साहित्याचा बाजार मांडणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांबद्दल प्रचंड तिटकारा आहे. मालुंजकरांच्या एका कवितेत हा त्वेष किती संयतपणे व्यक्त होतो पहा...

**'कवितेने माझ्या । पेरावा सुरूंग**
**तोडावा तुरूंग । अन्यायाचा ॥'**

केवळ कविताच लिहून मालुंजकर थांबलेले नाहीत, त्यांनी नवोदित साहित्यिक-कवींसाठी 'शब्दांकुर' ही चळवळ काही वर्षे नेटाने चालवून दाखवली. या माध्यमातून हस्तलिखित चालवणे, काव्य लेखन व वाचन स्पर्धा आयोजित करणं, त्यांचा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम व्यवस्थित पणे आयोजित करून तो उत्साहात संपन्न करणं, हे मालुंजकरांना इतकं छान जमतं की, कुठे म्हणून नाव ठेवायला जागा उरत नाही. इतका स्वच्छ नि पारदर्शी मामला. अर्थात त्यांच्या या कामात त्यांना जीवलग मित्र परिवारासह जयावहिनी, कावेरी, निशा यांचीही मोलाची साथ मिळत असते.

मालुंजकर विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत. सर्जनशील कवी आहेत.

यशस्वी आणि लोकप्रिय असे सूत्रसंचालक आहेत. एक उत्तम असे माणूस आहेत. त्यांच्या या साहित्यातील योगदानाबद्दल त्यांना बरेच महत्त्वाचे पुरस्कारही मिळाले आहेत.

मालुंजकरांचे हे धडपडे व्यक्तिमत्त्व घडवण्यात त्यांच्या आई-वडिलांचा मोठा वाटा आहे. अत्यंत गरिबीची परिस्थिती असताना मालुंजकरांचं बी.एड्.पर्यंतचं शिक्षण तर त्यांनी पूर्ण केलंच. त्याचबरोबर सर्वांशी मिळून मिसळून वागण्याचे चांगले संस्कारही दिलेत.

आजवर पंधरा ते वीस नवोदित कवींना 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचं' स्वत: टंकलिखित प्रत उत्तमपणे तयार करून दिल्याने अनुदान मिळवून देण्यात मालुंजकरांचे प्रयत्न उपयुक्त ठरले आहेत. त्यानंतर कितीतरी उशिराने त्यांचा स्वत:चा 'आयुष्याचे गाणे' हा कवितासंग्रह या मंडळाकडून प्रकाशित झाला. त्याचा प्रकाशन सोहळा आम्ही मित्रांनी मोठ्या उत्साहात घडवून आणला. ज्येष्ठ विनोदी साहित्यिक म्हणजे आमचे दादासाहेब श्री. चंद्रकांतजी महामिने, कवी विलास शेळके, प्रा.डॉ. शंकर बोऱ्हाडे असे सर्वजण तेव्हा होते. पण या प्रकाशनाला त्यांचे आई-वडील उपस्थित असते तर! ही भावना अगदी सर्वांनाच चटका लावून गेली. मालुंजकर साहित्याच्या क्षेत्रात नावलौकिक मिळवते झाले तेव्हा त्यांचे आई-वडील दोघंही हयात नसणे! ही गोष्ट दुर्दैवी खरीच. पण मालुंजकर स्वत: फार भावनाशील नाहीत. आपलं दु:ख मनात ठेऊन इतरांसाठी झटत राहतात. कुठलाही लहान-मोठा माणूस त्यांचा मित्र असेल तर मालुंजकरांचे पत्र, फोन हे त्याला हमखास येणारच! एक प्रचंड ऊर्जा आणि उत्साह घेऊन मालुंजकरांची साहित्य क्षेत्रातील मुशाफिरी सुरूच आहे. नाशिक जिल्ह्यातील कवितेचा एक 'संदर्भकोष' म्हणूनही ते सर्वांना परिचित आहेत.


मालुंजकरांच्या लहानपणी घरात रेडिओ, टीव्ही वगैरे नव्हता. त्यावेळी शेजारच्या, मित्रांच्या घरी रेडिओ ऐकून त्यावर 'आपली आवड, बिनाका गीतमाला, कामगार सभा, बातम्या असे कार्यक्रम ऐकत हा

एकलव्य, वयाच्या पंचविशीतच सूत्रसंचालक म्हणून येतो काय नि हजारेक कार्यक्रमांचं यशस्वी सूत्रसंचालन करतो काय! ही बाब दुर्लक्षित करावी, अशी नक्कीच नाही. पुढे आकाशवाणी नाशिक, जळगाव, मुंबईवरून त्यांनी काव्यवाचनासह प्रासंगिक भाषणांचेही कार्यक्रम केले, आजही अखंडपणे करताहेत. अनेक वृत्तपत्रं, मासिकं, दिवाळी अंकातून ते लिहीत असतात. पळसेसारख्या खेडेगावात 'वासंतिक काव्योत्सवा'सारखा कार्यक्रमही ते करतात.

एकूणच कवितेसाठी त्यांनी केलेले काम खरोखर नोंदवून ठेवण्यासारखं आहे. रविवार साहित्यिक पुरवणीतून त्यांनी 'फुलोरा'मधून, विजयकुमार मिठे संपादित करत असलेल्या 'कादवा शिवार' या मासिकातील 'कवितेची पाऊलवाट'मधून, स्वत:च्या 'शब्दांकुर'मधून कितीतरी कवींना त्यांनी आवर्जून स्थान दिले, त्यांच्यावर भरभरून लिहिलं. त्या सर्व संकलनांची त्यांची पुस्तकंही आता येताहेत.

अनेक कवींचे काव्यसंग्रह वाचून ते प्रसंगी टंकीत किंवा डीटीपी करून आणि शेकड्याने पुस्तकांचं मुद्रितशोधन त्यांनी मन:पूर्वकतेने केलेलं आहे. वृत्तपत्रांत त्यांनी लिहिलेल्या ललितचे 'मन उधाण वाऱ्याचे' हे पुस्तकही नुकतेच आले. त्यास वैजापूरच्या साने गुरूजी प्रतिष्ठानचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारासह राज्यस्तरीय विविध पाच पुरस्कारही मिळालेले आहेत.

छोटी-मोठी बक्षीसं तर इतकी मिळालीत, की त्या स्मृतिचिन्हांमुळे मालुंजकर यांचं शोकेसच काय पण घरही लहान वाटू लागलं आहे. काव्यवाचन, सूत्रसंचालन, वृत्तांकन अशी त्यांची कामं अखंडपणे सुरू आहेत. स्वत: शिक्षक असून 'शिकणं' ज्या माणसाचं अजून संपलेलं नाही. अशा कार्यक्रमांसाठी सतत फिरस्ता असलेल्या माणसाला सूत्रसंचालन एखाद्या अवयवासारखं लगटून राहिलं आहे, त्या व्रतस्थ अशा कविमित्राचं नाव म्हणजे रवींद्र मालुंजकर!



# अजुनि चालतोचि वाट
# **द.शं. नाईक**

आज समाजात आपण जी 'मोठी' माणसं पाहतो त्यांचं मोठेपण समजून घेताना असं लक्षात येतं की, त्यातली बरीचशी धेंडं मूळात पोचट, उथळ वगैरेच असतात. ती कुणाच्या तरी कृपेने किंवा कोणाच्या तरी जीवावर मोठी झालेली असतात. समाज त्यांचा फोलपटपणा पाहतो, अनुभवतो पण अशां माणसांना स्वीकारण्याशिवाय आपल्याला पर्यायच उरत नाही. इतकं या लोकांनी आपलं (स्वत:चं) मोठेपण हेतूत: इतरांवर घट्ट लादलेलं असतं.

पण अशीही काही माणसं समाजात पायाचे दगड बनून नामनिराळे राहतात की, एखादा मोठासा झगझगीत कळस पाहताना मूलभूत पातळीवर निरपेक्षपणे काम करणारी माणसं खूपदा समाजापर्यंत मोठेपणा, गौरव, प्रसिद्धी या अर्थी पोहचतच नाही किंवा या सर्वांपेक्षा सतत चांगलं काम करत राहणं! हाच या लोकांचा जणू स्थायीभाव बनून जातो. म्हणून पैसा, प्रसिद्धी या गोष्टींपासून ही माणसं स्वत:च चार हात दूर राहतात.

अशा भल्या माणसांच्या शोधात एकदा मला दत्तात्रय शंकर नाईक हा थोर माणूस भेटला. उत्कर्ष कॉलनी, नाशिकसारख्या शहराच्या मध्यवस्तीतल्या त्रिवेणी अपार्टमेंटसमध्ये...

नाईकांविषयी प्राथमिक माहिती मिळाली होती ती अशी की, नाईक

मूळचे वेंगुर्ल्याचे. शिक्षण खांडेकरांच्या शिरोड्यात झालेलं. १९५५ साली सांगलीतून बी.ई. (सिव्हिल) पदवी परीक्षा उत्तीर्ण. व्यवसायनं कॉन्ट्रॅक्टर आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतात वगैरे.

भेटायला जाताना मनात आलं की, नाईक सरळधोपपणे नोकरी करते तर शासन सेवेत सचिव म्हणून सेवानिवृत्त झाले असते आणि आज ऐंशीचं वय म्हणजे थकले असतील बऱ्यापैकी. पडून असतील घरात.

जाताना माझ्यासोबत चिरतरुण असे आणि नाईकांचेच आपल्या गावातील बालमित्र पुंडलिक मोरजे सोबत होते. स्वत: नाईक, त्यांचा मुलगा प्रशांत आणि मुलाचे मित्र नाना सानप टीव्हीवर भारत-ऑस्ट्रेलिया मॅच पाहत बसले होते.

क्रिकेटची मॅच पाहत चहा-पाणी झाला. खेळाच्या आवडीवरून विषय निघाला, तेव्हा नाईक म्हणाले, 'वर लॉफ्टवर जी 'बेस्ट बॅटस्मन'ची आकर्षक ट्रॉफी दिसते आहे ती दस्तुरखुद्द सचिन तेंडुलकरची! नाशिकला भोसला शाळेच्या मॅचमध्ये त्याला मिळाली. मॅच संपल्यावर चहापानासाठी सचिन घरी आला तेव्हा त्यानेच आमच्या नातीला ती प्रेमाने देऊन टाकली. आमच्या सूनेचा सख्खा मामेभाऊ आहे ना सचिन!' सचिनशी त्यांच्या इतक जवळचं नि आपुलकीच्या नात्यानं छान वाटलं.

एवढा मोठा जगप्रसिद्ध खेळाडू आपला नातेसंबंधातला आहे हे सांगताना, सचिनचे वडील, प्रसिद्ध कवी, समीक्षक रमेश तेंडुलकरांविषयी मी त्यांना विचारलं तर नाईक म्हणाले, 'नाही बॉ तसा नाही आला काही संबंध. केवळ त्यांचं नाव व गाव मला चांगल्यापैकी माहीत आहे.'

'कसं काय?' असं विचारल्यावर नाईक अभिमानाने आपल्या गावाविषयी म्हणाले, 'मी कोकणचा नि तेंडुलकरही कोकणचेच!'

कोकणचा विषय निघाल्यावर या चिवट मातीतली किती तरी गुणी माणसं माझ्या आठवणीत येऊन गेली. जयवंत दळवी, ह.मो. मराठे, श्री.ना. पेंडसे, मधु मंगेश कर्णिक, पाडगावकर, शन्ना, मनोहर जोशी, नाथ पै, गावस्कर, मच्छिंद्र कांबळी, पाटेकर... वाटलं की कोकणच्या

मातीतली ही माणसं आपापल्या कामात खरी 'दादा' आहेत.

मग कोकणच्या अनुषंगाने काही आठवणी नाईकांनी सांगितल्या. त्यात कोकणचा प्रदेश आणि साहित्यातली सौंदर्य स्थळांविषयी नाईक भरभरून बोलत राहिले. त्यात कोकणी माणसाचं साधं-पापभिरू जगणं. वेतोबाला बोल लावणं. खवय्येगिरी, प्राप्त परिस्थितीशी झगडण्याची प्रचंड इच्छाशक्ती अशा काही गप्पा नाईकांकडून ऐकताना मन कसं अगदी ताजतवानं झालं. दरम्यान, प्रशांतने उपमा, लाडूचा नाश्ता देऊन कोकणी आदरातिथ्याचं आम्हाला दर्शन घडवलं.

माझं नाईकांचं काम समजून घेणं सुरू झालेलं होतं. त्यावेळी त्यांनी घेतलेली एक शांतशी पोझिशन, सांगण्याचा टोन इतकं हे सर्व अनौपचारिक साधं होतं की, मनातल्या मनात उगीच तुलना झाली ती ऐऱ्यागैऱ्या बोलघेवड्यांची. इकडे नाईकसाहेब अत्यंत तळमळीने आपल्या जगण्याविषयी, कामाविषयी शांतपणे बोलत होते. संघाच्या मुशीत तयार झालेली ही पिढी खरोखरी एक अभ्यासाचा विषय व्हावा. वैचारिक राजकीय मतभेद असतील. परंतु अभ्यास, व्यासंग, नि:स्पृह काम करण्याची वैचारिक बैठक, ध्यास या गोष्टींनी प्रभावित व्हावं असं वाटलं खरंच, असो.

१९५५ साली सांगलीतून बी.ई. सिव्हिलची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पाटबंधारे विभागात इंजिनिअर म्हणून सेवेत आलो. काही वर्षातच डेप्युटी इंजिनिअरचं प्रमोशन मिळालं. परंतु ही साचेबंद नोकरी करण्यात मन रमेना. खाजगी व्यवसाय उभा करून यशस्वी होण्याची जिद्द होती. म्हणून प्रतिष्ठेची आणि सुरक्षित वाटणारी सरकारी नोकरी सोडून दिली.

दातार-कुलकर्णी-नाईक यांनी मिळून 'सह्याद्री कन्स्ट्रक्शन्स' असा बांधकाम व्यवसाय सुरू केला. सह्याद्री पाईप्स मशिनरी असा अंतर्गत विस्तारही सुरू होता. सुरुवातीस या कंपनीने नाशिक जिल्ह्यातील तीन मोठ्या उपसा जलसिंचन योजनांचे काम यशस्वीपणे पूर्ण केले. नाशिक-उपनगर येथील ९९ बंगल्यांची स्कीम यशस्वीपणे पूर्ण करताना केवळ

साडेपंधरा हजारात लाईट-पाण्यासह ही योजना तत्कालीन मंत्रीमहोदय ना. वानखेडे यांच्या हस्ते लाभधारकांना हस्तांतरित केली. त्यावेळी त्यांनी काढलेले गौरवोद्‌गार प्रेरणादायी ठरले.

दारणा धरणाचं मजबुतीकरणाचं कामही आम्ही वेळेत व कमी खर्चात उत्कृष्टपणे पार पाडल्यामुळे आजही दारणा धरण त्याच्या वयाच्या शंभरीतही सुरक्षित धरण म्हणून सर्वांच्या उपयोगी पडत आहे. हा झाला व्यवसायाचा भाग. परंतु या सर्व कामांमध्ये त्यावेळेस सिमेंट पुरवठादार माधवराव पाटलांसारखी केवळ शब्दांवर काम करणारी अणि विश्वासूपणे काम करणारे असंख्य कारागीर नाईकांच्या स्मरणात आहेत.

लिफ्ट इरिगेशनच्या माध्यमातून जिल्हाभर फिरताना 'वनवासी कल्याण आश्रमाचं' काम करावं! असं आम्ही काही मित्र ठरवत होतो. आदिवासी बांधवांच्या अभावग्रस्त जगण्यातून अनेक प्रश्न निर्माण होताहेत. देशात अन्य राज्यात हे काम सुरू झालेलं होतं म्हणून याच धर्तीवर महाराष्ट्रतही नोंदणीसाठी जे एकवीस जण अग्रभागी होते त्यात नाईक हे एक होते.

काम सुरू झालं. नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील कनाशी आणि सुरगाणा तालुक्यातील गुही या ठिकाणी अगोदर वसतिगृहं सुरू झाली. त्यावेळेस कमिशनर रमाकांत झा यांनी जेव्हा हे काम स्वत: पाहिलं तेव्हा स्वत: एक शासकीय अधिकारी असूनही त्यांनी आम्हाला शाळा दिली.

या शाळेत अभ्यासाबरोबरच संस्कृती, संस्कार, भारतमाता पूजन, राष्ट्रगौरव असे पाठ आम्ही मुलांना देत असतो. शिक्षणानंतर महत्त्वाचे म्हणजे आरोग्य या बाबीवर आम्ही प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले, असे नाईक म्हणाले, तेव्हा जाणवलं की, मूलभूत पातळीवर काम केल्यामुळेच 'वनवासी कल्याण आश्रमा'ची संकल्पना खोलवर रुजली आहे. प्रत्यक्ष आदिवासी बांधवांमधीलच २०० आरोग्य रक्षक आज येथे काम करताहेत.

भिल्ल बांधवांसाठीचा 'शबरी' प्रकल्प असेल, वारकऱ्यांसाठी 'माणूस'चे

काम असेल, माणसं जोडण्याची ही पद्धत खरोखरी वाखाणण्याजोगी आहे.

महाराष्ट्र शासनाची मदत या संस्थेला अनुदान रूपात मिळते, ती विद्यार्थ्यांना संस्थेच्या मानाने आणि कामाची व्याप्ती पाहता पुरेशी होत नाही म्हणून वैयक्तिक मदतही जमा करुन हा ज्ञानयज्ञ अखंड पेटता ठेवलेला आहे. बालवाडी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेऊन कित्येक वनवासी मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी सिद्ध झाली आहेत.

अजून खूप मोठ्या प्रमाणावर काम करावं लागणार आहे. याचीही नम्र जाणीव नाईकांना आहे. या योजनेचं महाराष्ट्राचं अध्यक्षपदही नाईकांनी यशस्वीपणे सांभाळलेलं आहे.

नाईक म्हणतात, 'कोणतेही काम करताना आपल्या मनातल्या योजना राबविण्यासाठी दहा एक वर्ष पुरेशी असतात. नवनवीन नेतृत्व पुढं आली पाहिजे म्हणून जबाबदारीतून मिळालेली ही पदं मी योग्य हाती सोपवून अन्य कामांकडे वळत आलो आहे.'

नाईकांकडं वनवासी कल्याण आश्रम, रत्न-सिंधू मंडळ नाशिक. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, बळीराम ग्रामविकास संशोधन केंद्र, नाशिकसारखी महत्त्वाची पदे चालून आली; पण योग्य वेळ येताच नाईक नवी क्षितिज धुंडाळत राहिले. नवनव्या कामांमध्ये स्वत:ला झोकून देत राहिले.

नाशिक येथे नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने कोकणातल्या सहाशे कुटुंबांचा आपसातील परिचय. संवाद वाढवून एकटेपणा घालविण्याचं काम असेल, शेतीत सेंद्रीय खत वापरासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणं असेल. नाईक तनमनधन ओतून प्रत्येक काम करीत असतात. एखादं पद खाली ठेवलं म्हणून कामं सुटली असंही झालं नाही. प्रत्येक काम निष्ठापूर्वक पुढे नेत राहायचं हे व्रत आहे.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळात त्यांनी उभं केलेलं काम स्पृहणीय ठरलं आहे. माजी विद्यार्थी संघाची योजनाही सर्व शाळांतून त्यांनी

यशस्वीपणे राबविली. त्यास उत्तम असा प्रतिसाद मिळतो आहे.

नाईकांचा मुलगा प्रशांत त्यांचा व्यवसाय व्यवस्थित सांभाळतो आहे. वयाच्या साठीत साहित्यभूषण पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सुविज्ञ पत्नीची समर्थ साथ आहे. पुंडलिक मोरजेंसारखे सख्खे नि सच्चे मित्र आहेत. वयाची ऐंशी ओलांडली आहे. शरीर पहिल्यासारखं साथ देत नाही.

तरीही अजून खूप गरजू मुलं यापुढेही शिकवता येतील, आश्रमशाळेच्या कामाची व्याप्ती वाढवता येईल. माणसा-माणसातील अंतर आणखी कमी करण्यासाठी रत्नसिंधूच्या माध्यमातून खूप काही करायचं आहे. इथला गरीब शेतकरी उभा राहिला पाहिजे, यासाठी वयाच्या ऐंशीतही नाईक तडफेने काम करताहेत. कवी रेंदाळकरांची कविता नाईकांसाठी चांगल्या अर्थाने इथं लागू पडतो. 'अजुनि चालतोचि वाट, माळ (काम) ही सरेना...' दत्तात्रय शंकर नाईक हे न थकता अखंड काम करणाऱ्या पिढीचे खंदे पाईक आहेत.

आता आणखी वय झालंय. प्रकृती पुरेशी साथ देत नाही. पण पूर्वी केलेल्या सर्व कामांचा आनंद वाटतो. खूप काम करायचं बाकीही राहिलं आहे. ही अस्वस्थता जगण्याला ऊर्जा पुरविते. द.शं. नाईक हे असं सतत विचारशील असं ऊर्जाकेंद्र आहे. नव्या पिढीने त्यांचं काम पुढे नेण्याचा संकल्प सोडायला हवाय.



# शैलीदार
# डॉ. शंकर बोऱ्हाडे

शंकर बोऱ्हाडे, गोदेश्वर झोपडपट्टी, वीटभट्टी रस्ता, सिन्नर : ४२२१०३ (जि. नाशिक) कधीकाळी हा निवासी पत्ता असलेला आणि राष्ट्रसेवा दलातील डॉ. नितीन गुजर यांनी दोन वेळचं जेवण आणि त्याबदली काहीतरी काम म्हणून त्यांच्याच दवाखान्यात 'कम्पाऊंडर'चं काम दिलेल्या शंकर बोऱ्हाडे या कार्यकर्त्याचा प्रवास आज प्रा. 'डॉक्टर' शंकर बोऱ्हाडे, सारांश, कॅनॉलरोड, गोसावीनगर, जेलरोड, नाशिक : ४२२१०१ या स्वत:च्या देखण्याशा बंगल्यात झालेला आहे. एक कम्पाऊंडर ते डॉक्टर हा शंकर बोऱ्हाडेंचा प्रवास खरोखरच कुणालाही स्तिमीत करणारा असाच आहे.

उमलत्या वयात किंवा तारुण्यात दवाखाना आणि शाळा यामध्ये झाडू मारणारे हे धडपडे हात आज सिन्नर महाविद्यालयात उमलती पिढी घडवताहेत.

एक 'कम्पाऊंडर ते डॉक्टर' असा हा संघर्षमय प्रवास वरवर फार भव्यदिव्य नसला तरी त्या दरम्यानचे शंकर बोऱ्हाडेंचे अनुभव मात्र विलक्षण म्हणावेत असे आहेत.

मागच्या पिढीपर्यंत असं अभावग्रस्त जगणं आणि परिस्थितीशी झगडून उच्च पदापर्यंत गेलेली अशी कितीतरी माणसं आपण पाहिलीहेत,

वाचलीहेत, अनुभवलीहेत. परंतु शंकर बोऱ्हाडे हे केवळ पाट्या टाकणारे किंवा ऐषारामी प्राध्यापक बनून राहते तर तेही गर्दीतलेच एक 'कॉमन' असे झाले असते, पण चळवळीचा किडा ज्यांच्या मेंदूत, पेशींमध्ये किंवा नसानसात अजून बऱ्यापैकी शाबूत आहे, अशा शंकर बोऱ्हाडेंबद्दल आपण जाणून घेणार आहोत.

शंकर बोऱ्हाडे 'मरणगाथा' काव्यसंग्रहाचे कवी. म्हणून अगोदर आणि नंतरही त्यांची ओळख एक कवी म्हणून बऱ्यापैकी राहिलेली आहे. मग 'स्पॉट लाईट'मधून त्यांनी काही व्यक्तिचित्रं लिहिली. त्यात त्यांनी कधी कुणाला झोडलं, ओपन केलं, पण यापेक्षा तेव्हा लक्षात राहिली त्यांनी जाणीवपूर्वक अधोरेखित केलेली स्वरूप आणि कुरूप अशी दोन्ही प्रकारची अफलातून माणसं. ही माणसं सर्वसामान्यांच्या तशी परिचयाची होतीही, पण शंकर बोऱ्हाडेंनी त्या माणसांची एक 'वेगळी' ओळख त्यातून आपल्याला करून दिलेली होती.

यामध्ये लोककवी वामनदादा कर्डक, ज्येष्ठ विद्रोही साहित्यिक बाबुराव बागूल, दया पवार, अप्पा टिळक, सिन्नरचे पी.एल. सर, कवी आनंद जार्वेकर, अरुण काळे, रमेश जाधव, मोहन गायकवाडांपासून बंड्या कुलकर्णी, दीपकसारख्या कितीतरी माणसांवर त्यांनी जे लिहिलंय ते मूळापासून वाचण्यासारखं आहे.

ही सर्व माणसं शब्दबद्ध करताना बोऱ्हाडेंनी अधोरेखित केलेलं त्यांचं माणूसपण किंवा वेगळेपण अत्यंत हृदयस्पर्शी झालेलं आहे. त्या सर्वांसाठी बोऱ्हाडेंनी आपल्या लेखनशैलीचा एक वेगळा प्रत्यय वाचकांना दिलेला आहे.

प्रामुख्याने कवी म्हणून सर्वपरिचित असलेले बोऱ्हाडे व्यक्तिचित्रांइतक्याच प्रभावीपणे वैचारिक लेखही लिहू शकतात. यासाठी त्यांचं 'उजेडाआधीचा काळोख' हे पुस्तक आवर्जून वाचावं, असं आहे. केवळ वाचून किंवा अभ्यास करून असे लेख,अनुभव कुणी नाही लिहू शकणार, असं वाटतं. तर बोऱ्हाडेंनी तळागाळापर्यंतचा समाज स्वत:च

अनुभवला असल्याने त्यांची लेखणीची ताकद अशी जाणवतेच!

बोऱ्हाडेंचं 'कडा आणि कंगोरे' हे पुस्तक असेल, साधना, देशदूत, गांवकरी, सकाळ, व्यासपीठ दिवाळी अंकातील त्यांचे लेखन हे नुसतं लोकप्रिय झालेलं आहे, असं नाही तर त्यांचा एक वाचकवर्ग त्यामुळे तयार झालेला आहे. नित्य नवं, वेगळं काही लिहावं तर ते शंकर बोऱ्हाडेंनी! थेटपणे लिहिणार. चुरचुरीत लिहिणार. संपूर्ण अस्वस्थ करणारं असं त्याचं लेखन मी खूप मन लावून वाचलंय, वाचतोय... त्यांच्या लेखन शैलीच्या कुणीही प्रेमात पडावं, असं अचूकपणे नि थेटपणे ते लिहितात.

लिहिण्याबरोबर जगण्याचे कुठलेच असे थेट अनुभव बोऱ्हाडे नाकारत नाही. मग निवडणुकीच्या रणधुमाळीवर लिहिणं असो, राजकीय पुढाऱ्यांचे वाढदिवस असो, कविसंमेलनाचं आयोजन असो, पुस्तक प्रकाशनासारखा कार्यक्रम असो किंवा त्यांच्या शिक्षक बँकेतील निवडणुकीत प्रत्यक्ष उतरणं असो. अगदी थेटपणे बोलणारा हा माणूस आपल्या पारदर्शकतेतून समोरच्याला जिंकतो. आपलसं करतो. त्यामुळेच अल्पसंख्याक असूनही आपल्या शिक्षक बँकेत सर्वाधिक मतानं विजयी होण्याचा मान ते पटकवात. सचिव होतात. बँक चांगल्या अर्थाने दणाणून सोडतात.

आणि एवढं सगळं नाशिकमध्ये छान रमलेले, स्थिरावलेले बोऱ्हाडे सर प्रसिद्धी, नावलौकिक, पैशाच्या वगैरे मोहात न पडता प्राध्यापकाची ऑर्डर मिळताच सातारासारख्या दूरच्या गावाला निघूनही जातात.

नवं गाव, नवी माणसं, दूरवरचा प्रवास, नाशिकच्या मातीशी काहीशी तुटलेली मूळं जुळेपर्यंत 'पीएच.डी.'चा निर्णय होतो. 'जागृतीकार पाडळेकरांच्या वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास' हा स्वत:च्या आवडीचा विषय प्रबंधासाठी निवडलेला. डॉ. दिलीप धोंडगे त्यांचे मार्गदर्शक. डॉक्टर होण्याचा प्रवास सुरू होतो.

पण स्वस्थ बसू देईल तो बोऱ्हाडेंचा पिंड कुठला? पीएच.डी.चा

अभ्यास... कुटुंब ते नोकरी या दरम्यानचा ४५०-५०० किलोमीटर अंतराचा प्रवास, स्वत:च्या चाळीशीनंतरचे ताणतणाव, प्रश्न, नॅक हे सारं सहन करत, सतत नवनव्या प्रश्नांना भिडण्याचा त्यांचा स्वभाव आहे. स्त्रियांचे विविध प्रश्न असतील, जातीय दंगली असतील बोऱ्हाडेंमधला कार्यकर्ता सतत जागृत असतो.

तेथे असताना तेथील होरपळणारा दुष्काळ त्यांना टोचला. मातीशी घट्ट नाळ असलेल्या बोऱ्हाडेंनी जनावरांच्या चाऱ्याच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत केलं. आहे ते पशूधन वाचवलं पाहिजे, मिळेल तेथून चारा जमा करून तो गुरांना मिळाला पाहिजे, यासाठी त्यांनी स्वत: पथनाट्य लिहिलं. चुणचुणीत मुलांकडून ते करून घेतलं. ठिकठिकाणी त्याचे चाळीसेक प्रयोग झाले आणि पन्नासएक हजाराच्या वर रक्कम यातून उभी राहिली.

हे सर्व करताना स्वत:चेही पाच हजार त्यात घातले. पथनाट्यातून मिळालेली चिल्लर रक्कम बंधी करतानाचा वैतागही सहन केला. हे पैसे गरजूंपर्यंत पोहोचावेत म्हणून धावाधाव केली. परंतु असले कष्ट, पाठपुरावा करणं बोऱ्हाडेंच्या अंगी पक्क मुरलेलं आहे. हाती घेतलेलं काम त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केलं.

त्याचं कारण विचारलं तर 'संस्कार'! असं बोऱ्हाडेंचं उत्तर असतं. 'कोणाचे? तर कल्पवृक्ष काका, डॉ. पंढरीनाथ कुलकर्णी, सुलोचना कुलकर्णी, भा.वि. जोशी, इंदूमती जोशी, पी.एल. देशपांडे सर' अशी ब्राह्मणी नावं येतात आणि प्रत्यक्षात चळवळ आणि बांधिलकी मात्र दीनदलितांसाठी, हे कसं? तर बोऱ्हाडे सांगतात, 'ही सर्व माणसं जाती पलीकडची देवमाणसं आहेत. त्यांना एखाद्या विशिष्ट जातीत बांधणं चूक आहे. त्यांच्याकडूनच हा ध्येयवाद शिकलो. उभा राहिलो. त्यांच्या ऋणातून मुक्त व्हायचे नाही. काम करत रहायचंय.' सेवादलात राहून 'माणूस' हीच त्यांची ओळख झालेली!

'तुमच्या मित्रांविषयी काही सांगा?' असं विचारलं तर म्हणाले, 'झोडग्याचे कमलाकर देसले, फ्रान्सिस वाघमारे, अमोल बागूल, आनंद

जोर्वेकर, अरुण घोडेराव आदी मित्रांशी माझी पारदर्शी आणि उत्तम मैत्री राहिलेली आहे.' माझ्यातला संवेदनशील कवी आणि माणूस या मित्रांनी जीवंत ठेवला! असं बोऱ्हाडे सांगतात.

आपल्याला टीबी झाला तेव्हा सुधीर जोशी, कपिल पाटील, अलका निऱ्हाळी, दीपक या मित्रांनी खूप मदत केली. मानसिक आधार दिला. ८२-८३ साली रोगमुक्त झालो. तेव्हा हे मैत्रं मला वेगळ्या अर्थानं धीर देत राहिलं.

बोऱ्हाडेंचा मित्रपरिवार मोठा आहे. डॉ.विठ्ठल वाघांसारखे दिग्गज कवी असोत, नानासाहेब बोरस्तेंसारखे शिक्षक आमदार माणूस असो किंवा सुदामराव सागंळेंसारखा उद्योजक असो. बोऱ्हाडे त्यांच्याशी अगदी मन मोकळेपणाने बोलतात.

चळवळीतल्या मित्रांनी मला खूप काही दिलंय असं त्यांना वाटतं. लिहिणं, वाचणं, मत-मतांतर, चर्चा भरपूर व्हायच्या. तेथेच वैचारिक बैठक पक्की झाली. ध्येयवादानं झपाटण्याच्या त्या काळात १९७७ चं असेंब्लीचं इलेक्शन, नामांतर आदी चळवळीत मी सक्रीय होतो. त्यावेळी कायदा मोडला म्हणून झालेला तुरुंगवास, ते मोर्चे, परिसंवाद, साहित्यिकांबरोबरच्या चर्चा असा फुल फॉर्ममध्ये काम करत होतो. बोऱ्हाडेंना चळवळीचा हा भरातला काळ अनुभवता आला. त्या मंतरलेल्या आठवणींचा खजिना ऐकताना मोहरून जायला होतं.

आमच्या एका मित्राने हुंडा घेतला म्हणून प्रत्यक्ष लग्नात आम्ही शून्य रुपये खर्च करून निषेधाचा गाढव मोर्चा काढला. तो ऑल इंडिया लेव्हलवर गाजला. भटक्यांची परिषदही आम्ही घेतली. मरणगाथातल्या कविता, चळवळीची गाणी म्हणत दया पवार, बाबुराव बागूल ते विजय तेंडुलकर अशा कितीतरी दिग्गजांबरोबर काव्यवाचनाची संधी मिळाली. विजय तेंडुलकरांच्या घरी प्रिया तेंडुलकरांच्या हातचा चहा तर मिळायचाच, पण तेंडुलकरांना 'ऐकणं' हा अनुभव खूप समृद्ध करून जायचा. जगण्याचे श्रीमंत अनुभव त्यावेळी घेतले. वैचारिक जडणघडणीचा तो काळ होता.

असं बोऱ्हाडेंना वाटतं.

बालपणीचा विषय निघाला तर त्यावेळी फारसं विशेष काहीच घडलं नाही. शरीराला नि मनाला घट्टे पडले ते तेव्हाच. जगण्याचे विलक्षण अनुभव बालपणातच घेतले. गरिबीमुळे आई रोज रोज वांगेच करायची. कुपोषण झालेलं म्हणून टीबीही झाला. वडील कलंदर. वाघ्या-मुरळीत गायचे. त्यावेळी मला त्यांच्यासारखं व्हावं वाटे. घरातून पळून जायचं ठरवलं, पण सकाळी उठायच्या आत वडिलांच्या तमाशाची गाडी निघून गेली. मी मागे राहिलो. लहानपणी प्रचंड गरिबी, दारिद्र्य आणि हाल सोसले. बरं झालं गाडी सुटली. मी मागे राहिलो मास्तर-बिस्तर होण्यासाठी. शंकर बोऱ्हाडेंच्या तोंडून त्यांचं बालपण ऐकताना अंगावर काटे येतात. बोऱ्हाडे मात्र 'ते दिवस' आजही छान एन्जॉय करतात.

१ जुलै १९८४ ला आदरणीय भा.वि. जोशी आणि इंदूमती जोशींनी बारागाव पिंप्रीत त्यांना शिपाई म्हणून लावलं. बोऱ्हाडेंनी तेही काम अत्यंत मन:पूर्वकतेने केलं. शाळा झाडणं, सारवणं, पाणी भरणं, बिलं भरणं अशी सर्व कामे चोख केली. त्यामुळे क्लार्क झालो नि पुढे बढती म्हणजे शिक्षक झालो, असं बोऱ्हाडे सहज सांगतात.

'तुमचा हा सर्व प्रवास इतका विलक्षण आहे की, त्यावर एखादी चरित्रात्मक कादंबरी आपण जरूर लिहावी!', असं मी बोऱ्हाडेसरांना सूचवलं. तेव्हा ते म्हणाले की, 'हो, माझ्याजवळ सांगण्यासारखं खूप आहे. वेळ मिळेल तसं सारं काही 'ॲज इट इज' मी लिहून काढण्याचा प्रयत्न करणार आहे.'

शिक्षक झालो नि आयुष्य कुठेतरी स्थिर झाल्यासारखं वाटलं. वाचन, चिंतनही वाढलं. दया पवार, बाबा आढाव, यदुनाथजी, कुसुमाग्रज आदी मोठ्या माणसांशी चर्चा करण्याइतपत तयार होत गेलो. वेगवेगळे कार्यक्रम राबवत होतो. आंतरजातीय मेळावाही घेतला. स्वत: शकुंतला या मुलीशी आतंरजातीय विवाह केला.

दरम्यान, लिहिताही झालो होतो. साक्षेपी संपादक दत्ता सराफ, सुरेश

अवधूत, यांनी लिहिण्यासाठी विषय सूचवले. मी लिहिलेलं या संपादकांनी आवर्जून छापलं. प्रेरणाही दिली, असं मोठ्या कौतुकाने बोऱ्हाडे सांगतात. मुख्य म्हणजे चळवळीसाठी एक नवं प्रभावी हत्यार त्यांच्या हाती आलं. बोऱ्हाडेंनी ते प्रभावीपणे वापरलंही! एखाद्या विषयाच्या थेट मूळाशी जाऊन अतिशय अभ्यासपूर्ण, थेट, उपरोधिक, चुरचुरीत आणि लोकांच्या मनातलं असं अचूक लिहिण्यामुळे शंकर बोऱ्हाडेंचं लेखन उत्सुकतेने, आवर्जून वाचलं जातं. त्यावर चर्चा होते. मत-मतांतर होतात. प्रतिक्रियांचा अक्षरश: पाऊस पडतो. हा अनुभव आहे.

हे सर्व लेखन ज्यांनी कुणी वाचलं असेल त्यांना बोऱ्हाडेंची तळमळ, वेगळेपण आणि त्यांच्या शैलीविषयी कौतुक वाटावं असाच तो प्रयोग असतो. माझं बोलणं, धीटपणे वागणं, बुल्गानीन दाढी, लिखानाचे विषय, त्यांची शीर्षकं, शैली संपूर्णत: वेगळा मामला. मला जाणवलं ते मी थेटपणे लिहितो.

मी स्वत:ला साने गुरुजींचा 'धडपड्या मुलगा' मानत आलोय म्हणून ते आपल्या एका कवितेत लिहून जातात,

'हे निर्मात्या, हे विश्वात्म्या' हे परमेश्वरा
हे अल्ला, हे आकाशातील बाप्पा
असा रोज डोळ्यातून पाऊस पाडण्यापेक्षा
वरून राजाची कृपा कर
खूप खूप पाऊस पडू दे,
खूप खूप पाणी दे
शेतकऱ्याची दावण भरू दे
काळ्या आईला श्रीमंती दे!'

प्रचंड गरिबी, हालअपेष्टा, चळवळ, वेगवेगळ्या नोकऱ्या, लिखाण, कविता, जगणं-वाचणं आणि तळागाळातला जीवनानुभव घेऊन आयुष्यात जाणीवा जपण्याची उर्मी कुठून आली? असं विचारल्यावर बोऱ्हाडे

गदिमांच्या गाण्याचा संदर्भ देतात. 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख...' त्यातल्या कुरूप वेड्या बदकासारखं आयुष्य जगताना साहित्याने मला माझ्यातला 'राजहंस' दाखवून दिला.

मग मी मागे वळून पाहिलेलं नाही, स्वत:ला घडवत गेलो.लिहित-वाचीत राहिलो. चालत राहिलो...

या सर्व धडपडीच्या प्रवासात समृद्धी देणारी थोर माणसं, दिलदार मित्र भेटत गेले. शंकऱ्याचा शंकर झालो. कम्पाऊंडरचा डॉक्टर झालो. आमच्या शकुंतला वहिनींनी शंकर बोऱ्हाडे नावाचा हा धुमसता विस्तव प्राणपणाने जपला आहे. सामाजिक कार्यकर्त्याचं शिक्षण पूर्ण केलेला हर्षवर्धन हा त्यांचा नम्र मुलगा आता त्यांच्या हाताशी आलेला आहे. वडिलांची प्रयोगशील वृत्ती त्याच्यातही आहे. आता कुठेतरी आयुष्य स्थिर झालेलं आहे, असं म्हणता येईल. असं ते फार नम्रतेने सांगतात. आजही त्यांची लेखणी मात्र तोच उत्साह, उमेद ठेऊन लखलखते आहे. काकांना अस्वस्थ नि अंतर्मुख करते आहे.

शंकर बोऱ्हाडेंना मी 'सर' म्हणतो. ऑफबिट लेखनाबरोबरच सरांचा रोखठोकपणा, फटकळपणा, सच्चाई मला 'राजहंसी' वाटते. ज्येष्ठ पत्रकार दत्ता सराफ, डॉ. विठ्ठल वाघ, विलास शेळके, कमलाकर देसले, खलील मोमीन अशा कितीतरी माणसांना 'शंकर बोऱ्हाडे' आपला जवळचा मित्र वाटतो, यातही खूप काही आलंच!

'सारांश' काय तर डॉ. शंकर बोऱ्हाडे हा एक अफलातून, शैलीदार नि लढवय्या असा माणूस आहे.



# लाखमोलाचा चित्रकार मित्र
# **अवी जाधव**

नाशिक जिल्ह्यात आमचा एक अघोषित असा साहित्यिक ग्रुप आहे. कवितेचे विविध कार्यक्रम, पुस्तक प्रकाशने, चित्रप्रदर्शनं, विशेषत: कविसंमेलने अशा वेगवेगळ्या साहित्यिक कार्यक्रमांमध्ये आमचं भेटणं -बोलणं होतं. समविचारी अशा या ग्रुपमध्ये आम्ही बहुतेक सर्व कवी-लेखकच आहोत. दीपक दंडवते, मनोज कापडे, खंडेराव सोळसे, सुनील जगताप. कमलाकर कहाणे, हेमंत पोतदार, प्रमोद जावळे, विष्णुपंत गायखे, प्रदीप म्हसकर अशी न लिहिणारी पण अत्यंत रसिक अशी माणसंही आहेत. चित्रकार आहेत ते अवी जाधव! मुळचे पिंपळगाव बसवंतचे! गरीब परिस्थितीतून आलेले. दिसायला अत्यंत साधेसे. नम्र पेशाने शिक्षक परंतु वृती विद्यार्थ्याची. डोळ्यात कमालीचं भाबडेपण. विलक्षण उत्सुक नजर. बोलतांना काहीसं अस्पष्ट बोलतात. डोक्यावरचे केस विरळ झालेले. छोट्या चणीचे. बाल-कुमारांच्या चित्रांमध्ये रमणारा सच्चा कलावंत माणूस! स्वभावाने पारदर्शी, नितळ म्हणून त्यांचं व्यक्तिमत्व मनाला सहज भावतं.

लोकमत दैनिक त्यावेळी नाशिकला नुकतंच रुजू झालेलं होतं. त्यातून 'चित्र रंगवा' मधून चित्रकार अवी जाधव हे अपरिचित नाव प्रथमच माझ्या वाचनात आलं. त्यांची चित्रे मुलांबरोबरच मोठ्यांनाही

आकर्षित करुन घेणारी वाटली. चित्रं फारशी रेखीव, सुंदर नव्हती. पण त्यात एक वेगळेपण होतं. स्वत:ची अशी शैली होती. मला ती आवडली. त्यांची चित्रं पाहत गेलो. नि मनोमन ह्या माणसाला भेटायचं मनात पक्क होत गेलं.

लोकमतचं कार्यालय तेव्हा शालीमार चौकात होतं. तेथे किरण अग्रवाल यांना भेटलो. त्यांना अवी जाधवांच्या चित्रांचा अभिप्राय दिला. अवी जाधवांचा पत्ता विचारला. तर ते म्हणाले 'अवी जाधव, मु.पो. चांदोरी, ता. निफाड, जि. नाशिक!' चांदोरी म्हटल्यावर मला बरं वाटलं. चला आपल्या निफाड जवळचाच माणूस आहे. भेटू एकदा त्यांना.

एका रविवारी मी चांदोरीला उतरलो. शाळेतल्या एका मुलाला अवी जाधवांचा पत्ता विचारला, तर त्याने आपल्या सरांचं घरच जवळून दाखवलं. जुन्या ऐतेहासिक वाड्यातलं मातीचं घर. मोठमोठे खांब, भक्कम सराया, कडीपाट पण आता मोडकळीस आलेलं. वृद्ध-थकलेलं घर. सुटी असल्यामुळे अवी जाधव घरीच होते. अत्यंत साधं दिसणं, राहनीमान आणि बोलणंही. शेणाने सारवलेल्या जमीनीवर झोऱ्या टाकून आम्ही खालीच बसलो. परस्पर परिचय झाला. घरात न सांगताच आम्हाला चहाही आला. वहिनींशी परिचय झाला. पाठोपाठ दोन मुलं, त्यात मोठी मुलगी धाकटा मुलगा. पहिली भेट असूनही संकोच वगैरे वाटला नाही. मनोमन माझी या घराशी गट्टी झाली.

खूप वर्षांपासूनची आपली मैत्री असावी, अशा आपुलकीने अवी जाधव बोलत राहिले, ' मी पिंपळगाव बसवंतचा. चित्रकलेची आवड होती म्हणून तेच शिक्षण घेऊन रयत शिक्षण संस्थेत शिक्षक झालो. बदली चांदोरीलाच आहे. चित्रं काढतो. वेगवेगळ्या शाळेतल्या मुलांना चित्रांची गोडी लागावी म्हणून उपक्रम राबवत असतो!' साधारण तास-दोन तास मनमोकळ्या गप्पा झाल्या. त्यांची कितीतरी चित्रं पाहून झाली. ती चित्रं दाखवतांना मी पाहत होतो, किती भाबडेपण आहे या माणसात. कोणत्या काळात वावरतोय हा चित्रकार? चित्रकार व्हॅन गॉव्हसारखं

आपल्या प्रेयसीनेच काय, कुणीही कान कापून मागितला असता तर त्यांनी तो अगदी दिला असता! असं त्यांचं सगळं वागणं-बोलणं नि देहबोली.

नंतर त्यांनी आम्हाला त्यांच्या चांदोरीच्या शाळेत कार्यक्रमासाठी बोलावलं. तीच उत्सुकता, तीच असोशी, तोच भाबडेपणा. कार्यक्रम छान रंगला. शाळेने आम्हाला थोडं बहुत मानधन नि चहापाणी दिला होता. कार्यक्रम संपला. म्हटलं निघूयात घरीच! परंतु अवी जाधव आम्हा चार-पाच कवींना आग्रहाने घरी घेऊन गेले. वहिनींनी एकटीने आमच्यासाठी छान स्वयंपाक केलेला होता. वहिनींना धन्यवाद देत आम्ही तृप्त जेवलो. गप्पाटप्पा झाल्या. अवी आता सर्वांचेच मित्र झाले होते.

अधुन मधून फोनवर कार्यक्रमात आमच्या भेटी होत राहिल्या. दरम्यान मित्रांमधल्या दोघा-तिघांच्या पुस्तकांची मुखपृष्ठ, रेखाटने वगैरे त्यांनी केली. चित्रकार म्हणून खास असं 'मागणं' (रेट) नाही.आग्रह नाही. आता नवनवीन कामांवर ते भरभरुन बोलायला लागले. परंतु प्रत्यक्षात ते कसं साकारणार! याविषयी मी साशंक असे. त्यांना स्वत:चं व्यंगचित्रांचं मासिक वा साप्ताहिक काढायचं होतं. त्यांना पाण्यावरची, अंधश्रध्देवरची, ग्रामस्वच्छतेवरची चित्रमालिका करायची होती. नाशिकला स्टुडिओ वजा कार्यालय घ्यायचं होतं. असं खूप काही.

निफाड तालुक्यातून वेगवेगळ्या शाळेत त्यांच्या चित्रकला स्पर्धा होत असत. मी त्या बातम्या वाचत असे. पण हा उमदा कलावंत येथेच अडकून पडतो, की काय असं वाटलं. पण ती त्यांची पायाभरणी होती. आता त्यांनी खरोखरीच एक-दोन चित्रमालिका तयार करुन त्यांची प्रदर्शनं सुरू केली होती. त्यातलं एखादं दुसरं चित्रप्रदर्शन मी पाहून आलो. समाधान वाटलं. माणूस ट्रॅकवर आहे. (प्रवास योग्य दिशेने सुरू आहे, असं वाटलं).

दरम्यान अवी जाधवांच्या पत्नी आजारी आहेत असं समजलं. म्हटलं असेल एखादा छोटा-मोठा आजार. खूप खोदून विचारलं तेव्हा त्यांनी पत्नीला 'कॅन्सर' झाल्याचं सांगितल. मी जाऊन भेटून आलो. एकट्याचा

पगार. मुलं लहान. उमेदीचं वय. उपचार सुरू होते. नाशिकला त्यांच्या घराचंही जमून येत होतं. जीवाच्या आकांतानं त्यांनी पत्नीला वाचवण्याची धडपड केली. परंतु त्यात त्यांना यश आलं नाही. नवीन घरात त्यांना खूप काही नवनवीन करायचं होतं. त्यात दर महिन्याला एकदा गप्पाभेट असंही ठरलं होतं. कुटुंब नाशिकला हलवलं. उपचार सुरूच होते. तरीही वहिनी गेल्या. अवी जाधव पुरते खचून गेले. वृद्ध आई-वडील, पदरी दोन लहान मुलं. अवी जाधव त्यावेळी आणखीच दीनवाणे वाटले. दोनदा मी त्यांना भेटायला गेलो. दु:खाचे कढ सरत नव्हते. समजवण्या पलिकडे मीही काही करु शकलो नाही.

किती उत्साहाने आले होते अवी जाधव नाशिकला. चित्रांचं काम, वहिनींचे उपचार, मित्रांच्या भेटी, पण या आजारात वहिनींच्या जाण्यानं सारच संपलं असं वाटलं. वहिनींना एकदा गंगेवर नेऊन नदीपात्रातले वाहणारे दिवे त्यांना दाखवायचे होते. पत्नीची इतकी छोटी मागणी आपण पूर्ण करू शकलो नाही याचं त्यांना वाईट वाटलं. मी ह्या प्रसंगावर एक लेख लिहिला. एरवी माणसं स्वत:वर लिहिलं की सुखावतात मात्र अवी जाधव त्यामुळे अधिकच विचारशील झाले. त्यांचा गिल्ट अधिकच वाढला.

वहिनींच्या दशक्रियेत मित्र म्हणून मी एकटाच हजर होतो. अवी जाधवांना मी न्याहाळत होतो. शून्य नजरेने त्यांनी सर्व विधी आटोपले. शेवटी पोटभर जेवले. मला वाटलं, वहिनींच्या प्रदीर्घ आजारानंतर हा माणूस प्रथमच पोटभर जेवला असावा. अशा झालेल्या दु:खात म्हणे सडकून भूक लागते. नंतर पुन: त्यांचं ते एकटेपण, उदासपण पाहता पाहवत नव्हतं. जडशीळ पावलाने निघण्यापूर्वी अवी जाधवांच्या कलावंत मनाचा अन्वयार्थ लावणं कठीणच गेलं. कलावंत माणूस. मुळातच हळवा. भाबडा नि त्याच्या वाट्याला ही अशी परिस्थिती! सर्वच दु:खदायक नि अवघड वाटत राहिलं.

त्यानंतर दिवाळीच्या खरेदीला माझं मेनरोडला जाणं झालं होतं.

रविवार कारंजावर अवी जाधव नि त्यांची दोन मुलं येतांना दिसली. त्या सर्वांना पाहून विलक्षण गलबलून आलं. अवी जाधव मुलांचे बाबा होतेच आता आईही झाले होते. मन घट्ट केलं. त्यांना एक जवळच्या दुकानात चहासाठी बसवलं. मुलांशीही बोललो. अगदी न राहवून त्यांना पुनर्विवाहाबद्दल व्यवस्थितपणे समजवलं. माझं हे म्हणणं यापूर्वी त्यांनी एकदम उडवूनच लावलं होतं. आता मात्र त्यांनी शांतपणे ऐकून तरी घेतलं. नाशिकला घेतलेला भाड्याचं कार्यालय वजा स्टुडिओ. मुलांचं शिक्षण, स्वत:ची शिक्षकाची नोकरी, वृद्ध आई-वडील यामुळे माझा नेटाचा प्रयत्न त्यांनी समजून घेतला. होकार मात्र दिला नाही. माझी उमेद वाढली. आमच्या वाचनालयाने आयोजित केलेल्या एका चित्रकला स्पर्धेला ते परिक्षक म्हणून आले होते. त्यावेळी त्यांनी निवडलेली चित्रं अत्यंत वेगळी होती. चित्रांची भाषाच त्यावेळी त्यांनी आम्हाला शिकवण्याचा प्रयत्न केला. गोदागौरव पुरस्कारात सुप्रसिध्द कार्टुनिस्ट आर.के. लक्ष्मण आले होते. तेव्हा सभागृहातील जमीनीवरच फतकल मारुन आरकेंना जीवाचा कान करून त्यांचं ऐकणं. मला त्यांचं हळवं मन माहित होतं. त्यामुळे ते आपलं ऐकतील असा विश्वास वाटत होता. काही जवळचे नातेवाईकही त्यांना समजवत होते. मला त्यांचं एकटेपण संपवून पुन: उभं राहिलेलं पाहायचं होतं.

नाशिकचं त्यांचं कार्यालय आता आमच्या भेटीचं ठिकाण झालं होतं. त्यांची मुलगीही त्यांना कामात मदत करत होती. कामासाठी एक-दोन माणसंही होती. काम मिळवून ते पूर्ण करण्याचं काम स्वत: अवी जाधव पाहत. पण धावपळ फार व्हायची. माणसांचा पगार हा एक प्रश्न असे. मुलीलाही अभ्यास, घर वगैरे सांभाळून कार्यालयात येणं अवघड होऊ लागलं. मग एकदाचं हे कार्यालय त्यांनी बंद करून टाकलं. आपल्या घरातच त्यांनी कार्यालय सुरू केलं. धावपळ थोडीशी कमी झाली. कामं वाढत गेली. वेगवेगळ्या कार्यालयातून त्यांना कामं मिळत गेली.

शासनाच्या अनेक कार्यालयातून त्यांचं काम सुरू झालं. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक तसेच महत्त्वाच्या चौकातून त्यांच्या चित्रांचे मोठाले फ्लेक्स झळकले. जिल्हा परिषदेचीही काही कामं आली. दर्शनी जागी त्यांच्या चित्रांना स्थान मिळालं. थोडाबहूत पैसा मिळाला. प्रसिद्धी तर मिळत होतीच. त्यामुळे त्यांच्या मनाला जरा उभारी आली. पैसा, प्रसिद्धी बरोबरच आपल्या चित्रांतून लोकप्रबोधनाचंही काम होतंय, हा आनंद त्यांना महत्त्वाचा वाटत होता. 'पुरात नागरिकांनी घ्यायची काळजीचं' त्यांचं एक चित्र तर शहरा-शहरातून ठळकपणे लावलं गेलं, शिवाय केंद्र शासनाच्या अखत्यारितील पोस्ट कार्डावर आपण पत्ता टाकतो, त्याच्या शेजारी अर्ध्या जागेत त्यांचं चित्र सन्मानानं आलं. गर्दीत घ्यावयाची काळजीची त्यांची चित्रं शासनाने आपल्या दिनदर्शिकेसाठी वापरली. आपल्या मित्राचं हे कौतुक आम्ही मित्रांनी अभिमानाने डोळे भरून पाहिलं.

याच आनंदात किंवा मन:स्थितीत अवी जाधव लग्नाला तयार झाले. त्यांचं लग्न झालं. पुन्हा नव्याने संसार सुरू झाला. मुलांनाही आई मिळाली. वाटलं, चला चांगल्या मनाचा आपला मित्र पुन्हा उभा राहिला.

उपजत विनोदी चित्रांचं अंगं, सूक्ष्म निरीक्षण शक्ती, प्रचंड काम करण्याची उमेद यामुळे त्यांच्या चित्रांची एक धाटणी, शैली आता छान विकसित झाली किंवा ती अधिक प्रगल्भ झाली. वृत्तपत्रं, मासिकं, पुस्तकं, दिवाळी अंकांतून, त्यांच्या स्वत:च्या 'हास्यनगरी' या साप्ताहिकातून त्यांची चित्रमुशाफिरी जोरदार सुरू झाली. ज्येष्ठ विनोदी साहित्यिक चंद्रकांत महामिने, विजयकुमार मिठे, स्वत: अवी जाधव आणि मी असा एकत्र प्रकाशन करतानाचा एक सुंदर फोटो माझ्या संग्रही आहे. इतर कामांच्या व्यापामुळे हा अंक पुढे बंद पडला. मात्र तो वेगळ्या म्हणजे शालेय पातळीवर त्यांनी प्रभावीपणे उपयोगात आणला. त्याला प्रचंड प्रतिसाद सर्वत्र मिळाला.

परंतु थांबतील ते अवी जाधव कसले? वेगवेगळ्या शाळांमधून

मुलांच्या स्पर्धांतून, चित्रकलेच्या उपक्रमांमुळे त्यांची ओळख मुलांमध्ये होतीच. ती आता 'हास्यनगरी' या त्यांच्या स्वत:च्या अंकातून नियमितपणे सुरू झाली. आम्हा मित्रांना त्यांचा कायम आग्रह असतो की, 'मला मुलांसाठी सकस साहित्य हवंय!' त्यांच्या अंकाचा आवाका इतका अफाट आहे की, मूळात आपण बालसाहित्य असे किती लिहितो? मी त्यांना खूपदा नम्र नकारच कळविला आहे. ते मात्र स्वत:च चित्र, कविता, गोष्टी, विनोद लिहून अंक नेटाने पुढे पुढे नेताहेत. याचं कौतुक वाटतं. त्यांचा मुलगा नि मुलगी आता महाविद्यालयात गेली आहेत. पत्नीची मनाजोगती साथ लाभते आहे. चित्रकलेची विविध कामं सुरूच असतात. घर पुन्हा एकदा नव्याने हसू-खेळू लागलं आहे.

आता त्यांच्या कार्टुन चित्रांनी खरं तर धमालच केलेली. या हुकमी चित्रांतूनच त्यांनी 'मुलांसाठी पर्यावरण साक्षरता' म्हणून 'येरे येरे पावसा' हे चित्रमय पुस्तक केलं. उमलत्या वयातच मुलांना पर्यावरण साक्षरतेचे धडे द्यावे! हा अवी जाधवांचा ध्यास. म्हणून एक बोलकं व्यंगचित्र, सोबत पर्यावरण संथेच्या स्वरचित दोन ओळी अशा स्वरूपाचं पुस्तक त्यांनी तयार केलं. हे पुस्तक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, प्रकाशक मे. महाबळ एन्व्हायरी इंजिनीअर्स प्रा.लि. मार्फत स्वीकारलं. **संपूर्ण फोरकलरमध्ये तब्बल एक लाख प्रतींचं हे पुस्तक केंद्रीय कृषीमंत्री शरद पवारसाहेब यांच्या हस्ते प्रकाशित झालं.**

या प्रकाशनात मा. शरद पवारसाहेब यांनी अवी जाधवांच्या चित्रं आणि त्यांच्या आशयाचं भरपूर कौतुक केलं. शिवाय हे पुस्तक भारतातील सर्व प्रमुख भाषांतून अनुवादित करावं! अशी इच्छा व्यक्त केली. मा. शरद पवारसाहेब हे निवडक वाचणारे, रसिक वाचक आहेत. त्यांचा अभिप्राय एखाद्या कलावंताला वगैरे मिळणं ही महत्त्वाची अशी गोष्ट आहे.

हा कार्यक्रम झाल्यानंतर अवी जाधव माझ्याकडे आले. आनंदात होते. त्यांनी मला हे पुस्तक सप्रेम भेट दिले. मी त्यावर एक-दोन ठिकाणी

लिहिलं. त्यावर इथं तिथं आवर्जून बोलत राहिलो. अवी जाधवांना आपल्या कलेचं चीज झाल्यासारखं वाटलं, पण त्यानंतरही त्यांचे पाय जमिनीवरच राहिले. वागणं, बोलणं तेच. त्यांच्या या धावपळीत माझ्या 'रोजनिशी : एका चिमुरडीची' या बालकविता संग्रहाचं मुखपृष्ठ आणि आतली सर्व रेखाटनं त्यांनी केली. अवी जाधव या नावाची मोहर माझ्या साहित्यिक जीवनावर उमटून घ्यायची होती, ती या निमित्ताने छानपणे उमटली.

आजही अवी सुटीचं वगैरे नाशिक शहरात भेटतात. मन:पूर्वकतेने बोलतात. केलेल्या नि करावयाच्या कामांची माहिती देतात. त्यांचा उत्साह, उमेद वाखाणण्याजोगी असते. नामांकित चित्रकारांच्या मांदियाळीत त्यांचं चित्रकार म्हणून असलेलं स्थान मला नक्की माहीत नाही. परंतु आदरणीय चित्रकार शिवाजी तुपे सर, दशरथ सोनार, आनंद सोनार, पंडित सोनवणी, मुक्ता बालिगा, धनंजय गोवर्धने, कैलास ह्याळीज, ज्ञानेश सोनार, शिशिर शिंदे, ज्ञानेश बेलेकर, अशोक बोढरे, प्रफुल्ल आणि राजू सावंत चित्रकलेतील अशी कितीतरी उंच माणसं नाशिकमध्ये आहेत. त्यांच्यात एक अवी जाधव हा माझा निर्मळ मनाचा मित्रही आहे. ते केव्हाही मला भेटो, किंवा फोनवरचं त्यांचं बोलणं असो त्यांना माझ्याशी खूप बोलायचं असतं, सांगायचं असतं. मला त्यांचं हे भाबडेपण त्यांच्या नजरेत लख्ख जाणवत राहतं.

एकदा ते माझ्यासमवेत जळगाव आकाशवाणीच्या कार्यक्रमासाठी आले. माझा तेथे कार्यक्रम होता. अगोदरच्या रात्री गप्पांचा फड रात्रभर रंगून रेल्वेतही आम्ही अखंड बोलत होतो. त्यावेळी अवी जाधवांनी सांगितलेली एक हकीकत मला येथे सांगण्याचा मोह होतो.

त्याचं असं झालं, अवी जाधव एकदा शाळेच्या कुठल्याशा ट्रेनिंगला पंढरपूरला गेले. पहाटेच विठ्ठल मंदिरात पोहोचले. तेथे फारशी गर्दी नव्हती. पुजारी नि अवी जाधव. देवाचं न्हानणं अवी जाधव पाहत उभे होते. वय तिशी-पस्तीशीचं, स्वभाव भिडस्त. पण काय योग जुळून

आला, न्हाताना म्हणून देवाच्या अंगावर एकही वस्त्रालंकार नाही आणि अवी जाधवांनी तशातच मोठ्या उत्कटतेने आणि भक्तिभावाने देवाला हात लावला आणि एखाद्या लहान बाळाला आईने चोळून-चाळून अंघोळ घालावी, तसे देवाला चार-पाच वेळा नखशिखांत त्यांना न्हानता आले. कुणी रागावलं नाही. कुणी हटवलं नाही. जणू देवालाच या कलावंत हाताने अंघोळ करून घ्यायची होती. साक्षात देवस्पर्शाने अवी थरारले. त्यावेळी जणू त्यांचे हातच नाहीत तर देहच सोन्याचा झाला.

अवी मंदिराबाहेर आले. विचार आला, एरवी पांडुरंगाचं नुसतं दर्शन किंवा चरणस्पर्श किती अवघड असतो. मग ही कुठली प्रत्यक्ष अनुभूती! नाही आता या धन्य, पुण्यवान झालेल्या हातांनी चांगलंच काम करायचं.

अवी जाधव सांगत होते, त्यांचे हात मी हातात घेतले. कपाळाला लावले. सगळं उत्स्फूर्तपणे. मला अवी जाधवांचं कौतुक वाटलं. लाखमोलाचा नि अपूर्व असा क्षण.

चांदोरी ते नाशिक, बालचित्रकला स्पर्धा ते कलेक्टर ऑफिस आवारातली भलीमोठी चित्रं, छोटी चित्रप्रदर्शनं ते लाख प्रतींचं पुस्तक, पत्नीचं उजाड करणारं आजारपण ते पुन्हा स्थिरावलेलं घर, मातीच्या घरातल्या भिंतीवरची त्यांची चित्रं ते सरकारी दिनदर्शिकेवरची त्यांची कार्यालयात लागलेली चित्रं, लाकडी टेबलही नसलेलं त्यांचं घर ते संगणकादी सुखसोयींनी युक्त त्यांचं कामाचं ठिकाण, उदास, दुःखी मुलं ते हसरी मुलं, कालच्या स्वप्नाळू डोळ्यात आता कामांची गर्दीच गर्दी! हे सारं सारं मी अगदी जवळून पाहिलं. आपल्या चित्रांमुळेच हा माणूस पुन्हा उभा राहिला. त्यांच्या लाखमोलाच्या सोनेरी हातांना हे अक्षरवंदन.



# कवितेचा लसलसता कोंब
# **किरण भावसार**

आपल्या नाशिक जिल्ह्यातून जी नवीन पिढी कविता लिहिते आहे त्यातलं एक तरुण, कसदार नाव म्हणजे किरण भावसार! उद्याच्या कवितेचं किरण हे एक अत्यंत आश्वासक असं नाव आहे.

किरण मूळचा सिन्नर तालुक्यातील वडांगळीचा. कनिष्ठ, मध्यवर्गीय म्हणावी अशी कौटुंबिक परिस्थिती. या खेडेगावात किरणची शेतीवाडी किंवा एखादा मोठा व्यवसाय नाही. किरणच्या आणि त्याच्या भावाच्या नोकरीच्या दृष्टीनेही हे गाव गैरसोयीचं. बारा बलुतेदारीसारख्या पिढीजात गुंतावळीतून किरण आणि त्याचं घर वडांगळीच्या मातीत आपली मूळं गच्च रुतवून आहेत.

बोकडबळी आणि होळीला जावयाची धिंड काढणारं वडांगळी गाव आताशा 'किरण भावसारचं वडांगळी!' म्हणून आम्हा कविमित्रांमध्ये परिचित झालेलं! वास्तविक किरणचा काव्यसंग्रह अजून प्रकाशित व्हायचा आहे. तसेच किरणच्या कवितांची सकसता अजून पुरती सिद्ध व्हायची आहे.

परंतु किरणच्या अप्रकाशित कविता आणि त्यानुषंगानं किरणचं माणूसपण अधोरेखित करावं एवढं वेगळेपण किरणकडे निश्चितच आहे. त्याच्या नितळ कवितेप्रमाणेच किरणचं साधेपण, सच्चेपण प्रत्येकाला

भावल्याशिवाय राहत नाही. किरण हसतो. बोलतो तेव्हा वाटतं, इतकं निष्पाप मनाचं माणूस कुठे असतं? हो किरण अंतर्बाह्य एक गोड मनाचा माणूस आहे, अशी आम्हा सर्व मित्रांची खात्री पटली आहे.

आपल्या वडांगळी गावाबद्दल, तेथील प्रत्येक माणसाबद्दल, त्यांच्या जगण्याबद्दल त्याला विलक्षण आपुलकी आहे. या गावानं, येथील माणसांनीच माझं अवघं भावविश्व समृद्ध केलं, असं विन्रमपणे सांगताना किरण म्हणतो, की 'अगदी कालपरवापर्यंत माझ्या मनात एक अस्सलता होती. जीवंतपणा होता. कुठल्याही पूर्वीच्या खेड्यातलं निर्मळ वातावरण माझ्या या गावात होतं. अडल्या-नडल्याला मागं न सरणारी माणसं होती. आजही थोडंबहुत ते आहेच, परंतु वैश्विकतेच्या लाटेवर नकळत माझंही गाव अपरिहार्यपणे स्वार झालंय'! किरणचं वडांगळी या आपल्या गावावर विलक्षण प्रेम आहे. ते त्याच्या लिहिण्या बोलण्यातून सतत जाणवत राहतं.

आपल्या गावातील बदललेली परिस्थिती किरणने त्याच्या 'गाव' या कवितेत इतक्या अलवारपणे टिपली आहे की, हे अनुभव एकट्या किरणचे राहत नाही. तर त्याची ही कविता प्रत्येक खेड्याचं प्रतिनिधित्त्व करते.

'गाव' ही कविता म्हणजे किरणचा केवळ नॉस्टेल्जिया नाही. या कवितेतून त्याला केवळ स्मरणरंजन करायचं नाही तर बदललेल्या गावातून 'हरवलेलं माणूसपण' आपलं काळीज ओलंकिल्ल करतं. किरणच्या कवितेची उंची, तिची आशयघनता न्याहळताना या कवितेचे दोन तुकडे इथे देण्याचा मोह होतोय.

**'किती बदललं गाव आता**
**गाव गावात राहिलं नाही**
**धड खेडंही उरलं नाही**
**अन शहरही झालं नाही'**

आणि शेवटी विलक्षण चटका लावून जाणारा या कवितेचा शेवट...

**‘फोन, विजेचे खांब आले**
**टीव्ही, व्हिडीओ गेम आले**
**शहर होता होता माझे**
**गाव कुठे वाहून गेले?’**

सतरा कडव्यांची (काळीज तुकड्यांची) ही संपूर्ण कविता (तीही स्वत: किरणच्या तोंडून) ऐकताना प्रत्येकालाच आतून खरोखर चरचरायला व्हावं. अंतर्मुखता येते असं आम्ही अनुभवलं आहे.

किरणची कविता पंचक्रोशीत गाजली. कुसुमाग्रज पुरस्कृत कवी गोविंदसारखी मानाची बक्षीसंही त्याला साहित्य स्पर्धेतून मिळाली. कामगार कल्याण मंडळांचं अनुदानही त्याच्या संग्रहाला जाहीर झाले होते. कवी रवींद्र मालुंजकर आणि मी संबंधित मंडळाच्या कार्यालयातही जाऊन आलो. खात्री केली. तयारीला लागलो. ‘मुळांवरची माती सांभाळतांना’ हे शीर्षकही आम्ही निश्चित केलं. पण कुठे काय अडचण आली कुणास ठाऊक! ना मंडळाने किरणला काही कळवलं किंवा ना किरणने त्यांच्याकडे काही विचारणा केली. सिद्ध झाल्याशिवाय प्रसिद्ध व्हायचं नाही! असं किरणचं स्वत:चं मत.

कविता लिहिणं, वाचणं किंवा त्या ऐकणं किरणला मनापासून आवडतं. त्या कुठे स्पर्धेला पाठवाव्यात, मासिकांना प्रसिद्धीसाठी द्याव्यात, आपला काव्यसंग्रह प्रकाशित व्हावा, यापैकी कुठलीच हौस किरणला नाही. कवी गोविंद पुरस्कारासाठीही, त्याला न विचारता मीच त्याची ‘आई’ ही कविता पाठवली. विशेष म्हणजे तिला प्रथम पुरस्कार मिळाला. किरणला आनंद झाला, पण तो ‘आपल्या मित्रानेच हे काम केलं याचा’! असं वेगळेपण किरणच्यात अगदी ठासून भरलंय.

आम्हा दोघा-तिघा मित्रांकडे किरणच्या कविता आहेत. आम्ही त्या त्याच्याकडून हट्टाने मागून घेतल्या. कविता चांगल्याहेत, म्हणून व्यासपीठ, कादवा शिवार, शब्दांकूर, देशदूत, कवितेची पाऊलवाट सारख्या ठिकाणी त्या दिल्या. त्यांना प्रसिद्धी मिळाली. हे सारं किरणच्या पश्चात. मुळात

किरण एक बेफिकीर प्रवृत्तीचा माणूस नाही. परंतु स्वत:साठी काही करायचं म्हटलं की, किरण आपसूक संकोचून जातो. आक्रसून जातो. त्याच्या या स्वभावाचा सुरुवातीला आम्हाला राग यायचा. पुढे त्याची निरागसता आमच्या सवयीची झाली  नि मग आमचा राग कुठल्याकुठे पळून गेला.

एक कवी म्हणून  किरणच्या कवितांबद्दल मला खूप काही लिहिताही येईल. परंतु त्यापेक्षा किरणमध्ये आम्ही मित्रांनी जे माणूसपण अनुभवलं, ते इथं सांगणं, मला फार महत्त्वाचं वाटतं. ते फार भव्यदिव्य नसेल, पण काळजात घर करणारं असं आहे. किरणच्या जगण्यात एक साधेपणा आणि स्वाभाविकता आहे. त्यामुळे आम्हाला तो जरा जास्तच आवडतो.

रुढार्थानं किरणला कुठलं म्हणून व्यसन नाही. साधं पानसुपारीचं, चहा-कॉफीसुद्धा त्याला नको असते. कुणाशी भांडण-तंडण, कुणाचा हेवा, लांडी-लबाडी, इर्षा हे शब्द त्याच्या शब्दकोषात जणू नाहीतच. कुठलाही साधा माणूस असेल किरण त्याला सन्मानाने वागवणार. शिवाय कुठे काही चांगलं सुरू असेल तर किरण तेथे असणार! किरणला वाईट म्हणणारा एकही माणूस अद्याप आम्हाला कुणालाच भेटलेला नाही.

मध्यंतरी किरणने मला फोन केला. एटीएममधून माझे दहा हजार रुपये गेले आहेत. मला तुझी मदत हवीय. मी लागलीच निघालो. एटीएम कार्ड  त्याने ज्याच्याकडे दिलं होतं त्या किरणच्या कंपनीतल्याच माणसावर माझा संशय होता. परंतु किरण त्याच्याविषयी वाईट विचार करण्याचं नावच घेईना. यथावकाश सत्य समोर आलं. मी संशय घेतलेला किरणचा तो माणूस खरोखरच निर्दोष निघाला, पण आपल्यामुळे आपल्या दोन मित्रांना त्रास झाला, याचं किरणला खूपच वाईट वाटलं. कामाच्या गर्दीत त्या भल्या माणसाला क्षमापत्र द्यायचंही कसं नि काय मी विसरून गेलो. या प्रकरणाची मला शिक्षा मिळाली, ती किरणच्या कोषात जाण्याची! एक-दीड वर्ष फोन, पत्रापत्री, भेट सबकुछ बंद! म्हटलं, 'गमावला आपण एक छान मित्र!' पण किरण मुळात गोड माणूस. पुन:

घरी आला. जणू काही घडलंच नाही असा. माझ्या कविता ऐकल्या. खूप भरभरून बोलला. तोच पहिला लाघवीपणा, तेच प्रेम! पण एका नि:ष्पाप मित्रावर आपण संशय घेतला, याचं त्याला आजही खूप वाईट वाटत राहतं.

किरण असा स्वत:ला शिक्षा करून घेतो. आपण उगाच विचार करत राहतो, असं वाटलं. किरण आहेच मुळी खरा विचारशील!

किरणला रोजच्या व्यवहारात चांगली-वाईट माणसं भेटतात. त्यांच्याशी बोलावं लागतं. त्यांच्यासोबत काम करावं लागतं. ती माणसं आपापल्या पद्धतीनं अभिव्यक्त होत राहतात. परंतु किरणचं आपलं राजहंसासारखं! चांगलं असेल तेच घ्यायचं. त्याचं कौतुक करायचं. वाईट मात्र तेथेच विसरून जायचं. त्याचा म्हणून पुन: उच्चार कुठे करायचा नाही.

मित्रहो, किरणचा असा नम्र दावा आहे की, माझ्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या आयुष्यात मी कुणालाच शिवी दिलेली नाही. अगदी मनातल्या मनातसुद्धा नाही! मात्र प्रसंगानुरूप राग-संताप जरूर येतो, पण अगोदर मी स्वत:ला तपासून घेतो. समोरच्याच्या ठिकाणी स्वत:ला पाहतो. विचार करतो आणि शांत होतो. आदर्शवत वागणं फार अवघड नसतंच मुळी! असं किरणला वाटतं.

यावर मी त्याला विचारलं की, 'तुझं चिडणं, संतापणं तू कसं नोंदवतो?' त्यावेळी किरण म्हणाला, 'सुमंतकाका गुजराथींसारखी माणसं नाही का शांतपणे राहत? शिवाय घरातल्या आया-बाया कसं निमूटपणे ऐकून घेतात. हे मनात आणाचयं नि नॉर्मल होऊन जायचं!' तरीही किरणला वाईट अनुभव येतातच. एखादा मुजोर पोलिस अधिकारी किरणची काहीही चूक नसताना किरणवर हात उगारतो. हे ऐकून आम्ही मित्र चरचरतो, संतापतो, पण आई या कवितेत किरण सात्विकपणे असं काही लिहून जातो,

**'तुझा मायेचा पदर कधी कळलाच नाही**
**आज पोळल्या दिसांची झळ सोसवेना आई'**

किरणच्या याच आई कवितेला प्रतिष्ठेचा कवी गोविंद पुरस्कार मिळाला होता. त्यावर किरणची प्रतिक्रिया अशी होती, 'की, आईचाच हा एक गौरव आहे.' स्वत:ला सतत असं निमित्तमात्र ठेवणारा त्याचा स्वभाव सर्वांनाच विलक्षण आवडतो.

किरणच्या कविता वाचताना वाचकाला असं वाटतं, की किरण एखाद्या शेतकरी किंवा कामगार घरातून आलाय. इतके बारकावे आणि विभ्रम किरण आपल्या कवितेतून टिपतो. वास्तविक किरणची स्वत:ची पांडभरही जमीन नाही. किरणच्या घरात कुणी कंपनी कामगारही नव्हते, पण शेतीवरची त्याची प्रत्येक कविता मला विलक्षण आवडलीय. दुष्काळातल्या शेतकऱ्याचा हुंकार व्यक्त करणारी त्याची एक कविता पाहा-

**'दोन दिवसात पडल पाऊस**
**तव्हर तग धरून रहा**
**कोरडी डाखळं चघळीत - चघळीत**
**नव्या निळ्याची वाट पहा'**

किरण, वयाच्या पस्तिशीपर्यंत वडांगळीत राहिला. आता सिन्नर शहरात तो वास्तव्याला आहे. सिन्नरच्या बायोकेमिकल कंपनीत संगणकावर भांडार (स्टोअर) ची आकडेमोड तो करतो. एक कवी, प्रामाणिक माणूस आणि आदर्श कामगार म्हणून कंपनीतही त्याने स्वत:ची अशी प्रतिष्ठा मिळवली आहे.

परंतु घरी आल्यावर ते करकरीत, यंत्रवत जगणं विसरून किरण आपल्या मित्रांमध्ये, माणसांमध्ये संपूर्ण गावचाच होऊन जातो. नीलेश मालाणी, बाळासाहेब भोरकडे, अरुण घोडेराव अशा कितीतरी मित्रांमध्ये त्याला एखाद्या सासूरवाशिणीसारखं आपलं गाव आठवत राहतं. म्हणून तो लिहू शकतो,

**'पंचमीचा सण दूरदेशी प्राण**
**हेलकावे मन हिंदोळ्यावर'**

किरणच्या कवितेत दुष्काळ येतो. त्यापाठी येणारं दु:ख येतं. कंपनी कामगारांच्या व्यथा आणि तुटलेपणही येतं. परंतु या परिस्थितीत किरण आशावादी असतो.

**'ओसाड रानातला शेवटचा मोर तो**
**वेड्या बाभळीच्या काटवनात**
**अजून तग धरून आहे**
**... आज तरी पडेल पाऊस!'**

आभाळाच्या, रानाच्या, माणसांच्या, पावसाच्या किरणच्या कवितांतून दु:ख येतं, वेदना येते. पण किरणची कविता कुठे तडजोड करत नाही. लढण्यासाठी जिद्द पेरते. बेकार तरुणाचं भावविश्व अत्यंत संयतपणे मांडताना किरण लिहितो,

**'कोठवर करावेत पाढे पाठ**
**संयम आणि सहनशीलतेचे**
**भवितव्य गहाण ठेऊन**
**कुणाकुणाच्या वाहाव्यात पालख्या**
**खांद्यांची सालपटं निघेपर्यंत'**

या कवितेच्या शेवटी किरण लिहितो,

**'मित्रहो, तुमचे धगधगणारे अश्रूच नव्या क्रांतीचे दूत बनतील!**

सिन्नरचं दिग्विजय कला-क्रीडा मंडळ, त्याच्या कंपनीतलं साहित्य मंडळ, वडांगळीचं वाचनालय, सिन्नर तालुका पत्रकार संघ, कादवा शिवार, स्वत:च्या घरातच त्याने निळू फुलेंच्या शुभहस्ते उद्‌घाटन केलेलं छोटसं वाचनालय, अंधश्रद्धा निर्मूलन समिती असं विस्तीर्ण क्षितिज त्याच्या प्रचंड उत्साहाला सतत खुणावत असतं. कवी खलील मोमीन, रवींद्र मालुंजकर, गौरवकुमार आठवले, विजयकुमार मिठे, राजेंद्र सोमवंशी अशा कितीतरी कवींच्या कवितांवर त्याला भरभरून बोलायचं असतं. साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रमात सामील व्हायचं असतं. हातात मिळेल ते मन:पूर्वक वाचायचं असतं. सतत कुणाच्यातरी उपयोगी पडण्यासाठी

घराबाहेर पडायचं असतं.

वास्तविक किरण हा काही फार भव्यदिव्य असा कवी किंवा माणूसही नाही. नेमकेपणानं सांगावं, अधोरेखित करावं असं वेगळेपणही त्याच्यात नाही. तो जो काही आहे, तो अत्यंत सच्चा दोस्त! त्याची नि माझी मैत्री केवळ आनंददायी वाटावी अशीच. म्हणजे आमचे स्वभाव, आवडी-निवडी जुळल्या. पण जेव्हा-केव्हा भेटतो, तेव्हा किरण 'दिल'से भेटतो. मनमोकळा बोलतो, वागतो. एरव्ही तो कुठल्याशा कोषात असतो. मी त्याला विचारत नाही. तो मला सांगत नाही.

बाकी आमचे मित्र त्याविषयी चिंता करतात. कधी हसतातही. पण मला मात्र किरणची खात्री असते, तो जेथे कुठे असेल आपल्या आठवणीत असेल, चांगला वागत असेल, उत्तम ते लिहित-वाचत असेल, गावाशी, आपल्या माणसांशी प्रामाणिक असेल. म्हणून मी त्याला कवितेचा लसलसता कोंभ म्हणालो. त्याला गर्दीचं, प्रसिद्धीचं, कौतुक करून घेण्याचं खरोखरी वावडं आहे. त्याचं हे अलिप्तपण मी समजून घेतो. त्याला त्याची स्पेस देतो.

कवितेच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने अगदी सुरुवातीलाच आम्ही काही कवीमित्र किरणच्या वडांगळीला गेलो होतो. कविता ऐकायला त्याचं अख्खं गाव लोटलं होतं. वाटलं, 'किरणच्या कवितेनं एक गाव घट्टपणे बांधलय!' वाटलं प्रत्येक गावी असा एक किरण असावा.

शब्दात न पकडता येणाऱ्या किरणच्या वागण्याच्या खूप सुंदर-चांगल्या आठवणी आम्हा मित्रांकडे आहेत. या लेखाच्या निमित्ताने मी चांगला कसून प्रयत्न करून पाहिला. परंतु तो नितळ, नेमका किरण अलगद निसटलाच! एखादं सुंदर फुलपाखरू असोशीनं धरायला जावं आणि केवळ त्याच्या पंखाचे रंगच बोटांना तेवढे लागावेत. फुलपाखरू आपलं आपल्याच विश्वात विहरत रहावं! तसा आमचा किरण आहे.

## अखंड चांगलं ‘लिहिता’ हात

## **तुकाराम नवले**



श्री तुकाराम घमन नवले. जन्मतारीख १८ मार्च १९३३ म्हणजे वय वर्षे ७८! शिक्षण एस.एस.सी. (जुनी), पेहराव पांढरा शर्ट, पायजमा, डोक्यावर गांधी टोपी, डोळ्यांवर चष्मा, चेहरा कमालीचा शांत, समंजस! दिसण्यात कमालीचा साधेपण, अबोल स्वभाव.

अशा वर्णनाचा माणूस जन्मसामान्यात कितींना माहीत असेल! माझ्या माहितीप्रमाणे ही संख्या अगदी नगण्य असू शकेल! कारण रोजी-रोटीची आणि एकंदर जगण्याची लढाई लढताना अशी माणसं शोधून त्यांच्याशी ‘संवाद’ साधणं किंवा दररोज भेट घेऊनही अशा माणसांचं वेगळं असं काम समजून घेणं, कित्येकांचं अक्षरश: राहूनच जातं.

तरी मात्र नाशिकसारख्या सांस्कृतिक वातावरण बऱ्यापैकी असलेल्या गावातही सुशिक्षित, साहित्यिक, रसिकांनी या विषयाच्या मुळाशी जावं, असं काही निश्चितपणे तुकाराम घमन नवलेंसारख्यात असतंच असतं. नव्हे कळत-नळकत या माणसांनी आपलं भावविश्व छानपैकी फुलवलेलं असतं. सुखावलेलं असतं. अशा एका काहीशा अपरिचित राहिलेल्या चांगल्या माणसाची ही एक मनस्वी ओळख.

प्रसिद्धी माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे आजकाल कितीतरी बऱ्या-वाईट माणसांना अतोनात प्रसिद्धी मिळत आहे. छोटसं काम प्रचंड असं

दाखवून लोकांना इमोशनल केलं जातंय. प्रसिद्धीचा सोस असलेली अर्धीकच्ची माणसं स्वत:चा उदोउदो करून घेताहेत. उत्सवी सामाजिकता सर्वत्र फैलावते आहे. नको ती माणसंच इथं तिथं प्राधान्याने दिसताहेत. ज्यांना पाहून अक्षरश: शिसारी आणि चीड यावी अशी मठ्ठ, मुजोर माणसं आपल्या हसऱ्या छबीत आपल्यावर बेसुमार आदळताहेत.

परंतु तुकाराम घमन नवले त्यातले नाहीच मुळी. ते आपलं नेमून दिलेलं काम अगदी नित्यनेमाने आणि अचूकतेने करताहेत. मुख्य म्हणजे अगदी निष्ठेने करताहेत. आपल्या अल्पश: कामातून अनेकांना समाधान वाटतंय म्हणून! मग त्यातच समाधान मानून रोज नवं काहीतरी देण्याची त्यांची आस अजून संपलेली नाही. त्यांच्या या कामाला म्हणे जवळपास साठ वर्षे पूर्ण होताहेत!!!

खरं तर आजच्या संगणकीय युगात आणि माहितीच्या प्रस्फोटात तुकाराम घमन नवलेंसारख्या 'फलक लेखन' करणारा माणूस जगालेखी दुर्लक्षित राहणं, हे स्वाभाविकच आहे. पण हे केवळ फलक लेखन नाही. ही केवळ हौस नाही. हस्ताक्षर चांगलं आहे! हे मिरवण्याची शेखी नाही. कुणाला आदर्श ठरेल, ना ठरेल. परंतु छोटीशी पणतीदेखील अखंड तेवत राहून परिसर कशी उजळून टाकते, मात्र एक सुंदर उदाहरण म्हणून **'घेतला वसा टाकणार नाही' या पद्धतीने तब्बल साठ वर्षे तुकाराम घमन नवले सुंदर हस्ताक्षरात अखंडपणे फलक लेखन करताहेत.'**

१८४० साली नाशिक येथील 'सार्वजनिक वाचनालय, नाशिक' अर्थात 'सावाना' ही संस्था सुरू झाली. विपूल ग्रंथसंपदा (जवळपास दोन लाखांच्या वर), साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल, नाशिक जिल्हा साहित्यिक मेळावा, बालभवन, विविध साहित्यिक, शैक्षणिक, कार्यक्रम, आमदार पुरस्कार यामुळे मराठी सारस्वतात 'सावाना' ही संस्था सर्वांच्या आदरास पात्र ठरली आहे.

'सावाना' ही संस्था तमाम रसिकांच्या मनातलं जणू एक जागृत देवस्थानच झालेली आहे. सावानाविषयी मी अधिक काही लिहिणं

म्हणजे पंढरपूरच्या पांडुरंगावर लिहिणं! असंच काही होईल. मुख्यत्त्वे 'सावाना'चा हा संदर्भ अशासाठी की, लौकिकार्थानं एवढ्या मोठ्या संस्थेत तुकाराम घमन नवले आजही वेगळीशी ग्रंथसेवा निष्ठेने करताहेत.

केवळ पोटार्थी असल्यामुळे नोकरीचा एक भाग म्हणून एखादं काम करणं आणि त्यापलिकडे जाऊन जाणीवपूर्वक काही 'देणं' यातली निस्पृहता, निष्ठा मला महत्त्वाची वाटते. अशाच काहीशा अपरिचित उदात्ततेचा हा परिचय.

१८४० सालापासून या ना त्या निमित्ताने सावानात आजवर, कितीतरी लोक येऊन गेले असतील. साहित्यिक, रसिक, बालवाचक, मुक्तद्वारला भेट देणारे असे साधारण लाखो- कोटी माणसं आजवर सावानात येऊन गेली आणि येताहेत.

१९५१ पासून सावानात प्रवेश करताना तेथे एक-दोन तरी फलक प्रवेशद्वारात असतातच. तसे ते एकूण तीन-चार फलक आहेत. त्यावर यश, निवड, नियुक्ती, सुयश, दुःखद निधन, कार्यक्रमांबद्दलचे, स्पर्धेचे आवाहन असा संबंधित मजकूर तर असतोच याबरोबर मौलिक, वाचनीय अशा पुस्तक परिचयासारख्या मजकुराचा एक फलकही असतोच!

या लिखानात पुस्तकाविषयीचा शंभर दीडशे शब्दापर्यंतचा सुंदर मजूकर असतो. अर्थात त्यात गाजलेल्या किंवा विशेष ठरलेल्या साहित्यकृतींबद्दलची माहिती असते. पुस्तकाची पाठराखण (ब्लर्ब) लिहिण्याकामी त्यांना उपयोगी पडतो. विशेषतः महात्मा गांधी, रवींद्रनाथ ठाकूर, शिवराम कारंथ, महाश्वेतादेवी, मुन्शी प्रेमचंद, फुले, आंबेडकर, सावरकर, शेक्सपियर, गौरी देशपांडे, सानिया, पुलं, कुसुमाग्रज, साने गुरूजी, अनंत सामंत, चंद्रकांत महामिने, राजन गवसांपासून अपर्णा वेलणकर, मनीषा कुलकर्णींसारख्या काही चांगलं लिहिणाऱ्यांना तुकाराम घमन नवलेंनी आपला सुंदर हस्ताक्षरात अक्षरबद्ध केलेलं असतं.

पुस्तकाच्या पाठराखणच्या मजकुराबरोबरच एखाद्या अप्रतिम पुस्तकातील चांगला उतारा, प्रसंग, एखाद्या पात्राचं स्वगत, मनोगत,

निसर्गवर्णन असा वाचनीय मजकूर की, जो खूप असा चिंतनीय आणि कलात्मकही असतो. असा मजकूर असलेला हा फलक वाचताना वाचक सुखावतो. तो छोटासा मजकूर वाचून संबंधित पुस्तक वाचण्याची इच्छाही मनात निर्माण होते आणि इतका सुंदर मजकूर ज्यांनी लिहिला, त्या हातांनाही नकळत दाद मिळून जाते, 'वाऽ क्या बात है!'

... तर या पुरुषभर उंचीच्या काळ्या फळ्यावर टपोऱ्या मोत्यासारख्या दाणेदार अक्षरात तुकाराम घमन नवलेंनी आपली कर्तव्यता, निष्ठा, एकाग्रता अतोनात ओतलेली असते. कोण वाचणारेय आपण लिहिलेला फळा? कुणाला वेळेय? मग कधी काढा खराब अक्षर किंवा टाका पाट्या! करा काहीही भरताड... असं ते कधीच करत नाही. जे काही दररोज लिहायचं, ते मन:पूर्वकतेने... विचारांतीच! सुंदर... देखणं.

मित्रहो, एरव्ही चार आठ दिवस, महिनाभर किंवा एखादं दुसरं वर्ष आपण रोजनिशी लिहायचं ठरवतो. तरी त्यात खंड हा पडतो; चुका नि खाडे होतातच. परंतु सलग सत्तर वर्षे फळ्यावर, खडूने एकाच सरळ, वळणदार अक्षरात, अजिबात खाडाखोड न करता सुंदरपणे सातत्याने, अखंड लिहित राहणं सोपं आहे का? नि विशेष नाही का?

तुलनाच करायची झाली तर खडूने सर्वाधिक लिहावं लागतं, शाळा-कॉलेजातल्या शिक्षकांना. पण फळा साफ कोणी व कितीवेळा करायचा. हात नि कपडे मळतात. खडूची बारीक धूळ नाका-तोंडात जाते. या भीतीने कुठेकुठे ब्लॅकबोर्ड हे व्हाईट झाले आहेत नि खडू ऐवजी तसे जाड स्केचपेनसारखे पेन आले आहेत. मुळात फळ्याचा उपयोगही गणित - विज्ञानाचे विषय वगळता तुनलेने खूपच कमी झाला आहे.

तसेच प्रत्येक गावात विविध संघटनांचे, पक्षांचे फलक आपल्याला जागोजागी दिसतात. त्यावर उत्तम रंगरंगोटीही दिसते. कार्यकारिणी वगैरे मजकूरही पेंट केलेला असतो. मग उरलेल्या जागेत कुणी बरा हस्ताक्षरवाला व्याकरणाच्या भरमसाठ चुका करत याला त्याला वाढदिवसाच्या, निवडीच्या स्वागताच्या शुभेच्छा लिहितो. कधी कुणाचा

निषेध, बंद वगैरे. पुढे-पुढे १५ ऑगस्ट, २६ जानेवारी चिरायू होवो! असा काही दणदणीत मजकूर लिहिला की, वर्षभर हे फलक अक्षरश: काही लिहिण्यापासून अस्पर्शच राहतात.

त्यातत्या-त्यात शाळेतला एखादा सुंदर हस्ताक्षर असलेला शिक्षक किंवा काही कार्यालयातून फलक लेखन करणारा उत्साही कर्मचारी, एखादं दोन वर्षे किंवा दोन-पाच वर्षे फलक लेखन करून 'दमलो बुवा आपण!' म्हणून नवीन लागलेल्याच्या हातात खडू सोपवून आपली इतिकर्तव्यता साधतो. म्हणजे आरंभशूरता ही कुठे संपतच नाही.

पण तुकाराम घमन नवले यांनी असं काहीच न करता एखाद्या व्रतस्थासारखं १९५१ सालापासून आजपर्यंत अखंड फलक लेखन सावानात एकटय़ानेच सुरू ठेवलेलं आहे. वयाच्या ऐंशीव्या वर्षीही त्यांच्या हाती असलेल्या खडूची पकड अजून गच्च आहे, हे विशेष!

जुनी एसएससी शिकलेला हा माणूस १९५१ साली सावानात एक शिपाई म्हणून सेवेला प्रारंभ करतो. पुढे वाचनालयाच्या वतीने ग्रंथपालन वर्गाचं पुणे येथील प्रशिक्षण उच्च श्रेणी मिळवून त्यांनी पूर्ण केलं आणि मग सावानातच एक कारकून म्हणून ते सेवेत आले.

केवळ 'फळा' लिहून झाला. आता चला चहाला किंवा चला पाय मोकळे करून येऊ! असं कधीच वेळ दवडण्याचं काम ते करत नाहीत. दररोज कामावर येताना किमान अर्धा तास वेळेत पोचणं, मस्टरवर सही करणं, फळा काढणं, तो स्वच्छ पुसून निवडलेल्या पुस्तकातील मजकूर एकाग्रतेने फळ्यावर सुंदर हस्ताक्षरात उतरवतील, त्यांचं अगदी हे ठरलेलंच.

स्वत:च लिहिलेल्या या फळ्यावरचा मजकूर ते पुन: वाचून घेतील. आपणच लिहिलेल्या राजस अक्षरांकडे तृप्त नजरेनं पाहतील आणि दिवसभरासाठी आपल्या दिलेल्या कामात अगदी सहज गढून जातील.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, डॉ. अ.वा. वर्टी, बाबुराव बागूल, डॉ. चंद्रकांत वर्तक, बाळासाहेब सराफ, डॉ. बा.वा. दातार, मो.ग. तपस्वी

यांच्यापासून ते ज्याला म्हणून वाचता येतं असा प्रत्येक लहान थोर वाचक हा फलक वाचण्यासाठी थांबतोच. याची जाणीव सदैव त्यांना चांगलं लिहिण्यासाठी बळ देत असते. ग्रंथपाल म्हणून जिल्हा ग्रंथालय संघावर सहकार्यवाह म्हणून तसेच सावानाच्या नव्या इमारतीच्या देखभालीचे व हिशेबाचे काम असेल तुकाराम घमन नवलेंचं प्रत्येक काम अत्यंत चोख असतं. व्यवस्थित नि स्वच्छ असतं! १९९२ साली तुकाराम घमन नवले सावानाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सलग ६१ वर्षे सेवा केलेल्या या गुणी हाताच्या माणसाला वाचनालयाने लगेचच पुन: आपल्यात सामावून घेतलं. त्यालाही वीस वर्षे पूर्ण झाली. आजच्या स्वेच्छानिवृत्तीच्या प्रलोभनात अकाली प्रौढ माणसं आराम करणं पसंत करतात. त्यांच्यासाठी तुकाराम घमन नवले हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरावं. सरकारवाडा येथे वाचनालयाची मुख्य इमारत असताना डॉ. अ.वा. वर्टी यांनी त्यांना, असं लिहिण्यासाठी सुचवलं आणि तेव्हापासून अखंडपणे हे अक्षरधन गंगामाईच्या प्रवाहाप्रमाणे झुळझुळत रसिक मनांचा काठ सुखावत पुढे-पुढे चाललंय. साहित्य सागरातून 'चांगलं' ते शोधून लोकांना 'देण्याचं' काम त्यांनी निष्ठेने सुरूच ठेवलं आहे.

आपल्या शाळेने, आपल्या शिक्षकांनी आणि आई-वडिलांनी आपल्याला चांगलं लिहायला, वाचायला शिकवलं, त्याचा उपयोग काय केवळ पोट भरण्यासाठीच करायचा का? अशा भावनेने नियमित नि अखंड फलक लेखन करणारे तुकाराम घमन नवले या कामाचं श्रेय सावानाच्या मोठ्या मनाच्या माणसांनाही देतात. 'माझ्या माणसांनी मला सेवेची संधी दिली!' असं त्यांना नम्रपणे सांगावसं वाटतं, यातही खूप काही आलंच!

सुंदर हस्ताक्षरांची माणसं मनानंही सुंदर असतात. त्यामुळे चांगले विचार कोणते? लोकांना काय आवडेल? याचंही भान त्यांच्याजवळ आहे. पण याच हातांनी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, डॉ. अ.वा. वर्टी, डॉ. वसंतराव गुप्ते, मो.ग. तपस्वी, आनंद जोर्वेकर, अरुण काळे, डॉ. बा.वा. दातार, मु.शं. औरंगाबादकर यांसारख्या आपल्या माणसांच्या निधनवार्ता

लिहिताना माझे हात दु:खवेगाने थरथरले, असंही ते भावगर्भतेने सांगतात.

या त्यांच्या कामाचा यथोचित गौरवही वेळोवेळी झालेला आहे. आदर्श ग्रंथालय सेवक म्हणून पुणे नगर वाचनालयाने व रोटरी क्बल नाशिकने त्यांचा सत्कार केलेला आहे. अर्थात हे सत्कार आदर्श ग्रंथसेवक म्हणून होते. त्यांचा अक्षरगौरव अद्याप व्हायचाय!

त्यांच्या इतक्या मोठ्या प्रदीर्घ सेवेत कितीतरी उच्चशिक्षित व सुंदर हस्ताक्षर असलेले नवनवीन कर्मचारी आले नि गेले. पण सावानाचं फलक लेखन करताहेत ते केवळ तुकाराम घमन नवलेच! शिपाई, सहायक ग्रंथपाल, ग्रंथपाल आणि आता विशेष सेवेवरची नियुक्ती असा गौरवास्पद प्रवास करून तुकाराम घमन नवले हे मनाने आणि वृत्तीने जराही बदललेले नाहीत. त्यांच्या या हिरवेकंचपणाचं मूळ शोधलं असता जाणवलं, की, 'लोकरंजन कला केंद्र' या हौशी नाट्य संस्थेच्या 'अबोल झाली सतार', 'कन्या सासुराशी जाये' आदी नाटकांतून त्यांनी छोटच्या-मोठ्या भूमिका केलेल्या आहेत. म्हणजे मुळात त्यांचं कलावंत असणं, हेही फार महत्त्वाचं आहे. म्हणतात ना कलावंत माणूस मनानं नेहमीच ताजातवाणा राहतो, तो कधीच थकत नाही.

तुकाराम घमन नवले हे असंच एक न थकणारं हिरवंगार नाव आहे. त्यांच्याजवळ जे आहे ते त्यांनी अखंडपणे सुंदरतेने देण्याचा ध्यास घेतला आहे. त्यांच्या जीवनातला तो एक आनंदाचा भाग बनून राहिला आहे. 'जीवन सुंदर करण्यासाठी माझाही खारीचा वाटा!' अशा नम्र भावनेने अखंड ६० वर्षे लिहिता हात असलेल्या तुकाराम घमन नवलेंना मन:पूर्वक सलाम आणि त्यांना तसं अव्याहत लिहू देणाऱ्या प्रिय 'सावाना'लाही माझा सलाम! आता शेवटी एकच मागणं की, प्रत्येक गावात 'सावाना'सारखं समृद्ध अक्षरधाम असावं आणि तेथील प्रत्येक सावानात किमान एक तुकाराम घमन नवले असावेत! उद्याचं जग सुंदर होण्यासाठी हे आवश्यक वाटतं!





दोन तरुण मित्रांविषयी

# राजेंद्र सोमवंशी सुहास सुरळीकर

माझ्या शाळा-कॉलेजच्या वयात आमच्या निफाडला फार बहारदार असं साहित्यिक-सांस्कृतिक वातावरण होतं, असं नाही. गावात धार्मिकता मात्र अतिशय चांगली होती. गणपतीत जी काही नाटकं वगैरे व्हायची तेवढीच. बाकी टुरिंग टॉकिजचे फिल्म तुटणारे सिनेमे, एखाद-दुसरा संगीत मेळा, गुंजाळांकडे होणाऱ्या वार्षिक कव्वाल्या, असं एकंदरीत फार दुर्मिळच चांगलं काही पाहायला-ऐकायला मिळायचं.

परंतु स्व. शांतीलालजी सोनीसाहेबांच्या प्रयत्नांतून एकदा आम्हाला निफाडमध्ये शांतीनगर येथे पंडित भीमसेन जोशींना ऐकण्याचा सुवर्णयोग मिळाला. एकदा लावणीसम्राज्ञी सुलोचनाताई चव्हाणही आम्ही ऐकल्या. अशा एक-दोन ठळक आणि अविस्मरणीय आठवणी आहेत. परंतु उत्तमोत्तम व्याख्यानं, साहित्य संमेलन किंवा मेळावा, परिसंवाद, वेगवेगळ्या स्पर्धा, पुस्तक प्रकाशनं, चर्चा वगैरे असे कार्यक्रम निफाडला फारसे होत नव्हते. असे सर्व कार्यक्रम पुणे, मुंबई, नाशिकसारख्या मोठ्या शहरातूनच होत असत. आम्ही ते वृत्तपत्रांतून वाचत असू.

मात्र, आमची ही हौस कुठेतरी आमच्या महाविद्यालयात गॅदरिंगला वगैरे पूर्ण व्हायची. छोट्याशा निफाड गावात महाराष्ट्रातला मोठात मोठा साहित्यिक, व्याख्याता किंवा कलावंत येत असे. त्यात कॉलेजची मुलं-

मुली, गावातले रसिक यांची गर्दी, बक्षीस वितरण, मुलांचा अतिउत्साह यामुळे निवांतपणे ऐकणं असं व्हायचं नाही. मुलांना मस्ती, मज्जा करायची असे. हे वातावरण साधारण १९८६-८७ पर्यंत तरी तसेच होते. त्यात मीही एक होतो.

कॉलेजच्या स्पर्धांतही आम्ही 'वासरात लंगडी गाय शहाणी' असू! स्पर्धक मुलंच मूळात कमी असायची. माझा हिरमोड व्हायचा. साहित्य स्पर्धांना क्रीडा स्पर्धेच्या तुलनेत दुय्यम स्थान असे, मला तसे जाणवत असे.

कसा नि काय, पण मला लायब्ररीचा छंद लागला. १९१९ साली स्थापन झालेलं आमचं माणकेश्वर वाचनालय हे माझ्या आनंदाचं एक निधान झालं. 'अ'वर्गाच्या या वाचनालयात पेपर, पुस्तकं, मासिकं भरपूर यायची. मी माझ्या मित्रांना आग्रह करून तेथे घेऊन जायचो. त्यात नीलकंठ कुंदे, रत्नाकर सोनवणी, राजेंद्र शिंदे असे माझे मित्र होते. पुढे आणखी काही विचारशील मित्र मला मिळाले. हा ग्रुप गावात सभ्य नि हुशार मुलांचा असा ग्रुप होता. प्रमोद जोशी, मधुसुदन भानूवंशी, विद्याधर कुलकर्णी, संजय केशव गोसावी, विश्वनाथ बबन शिरसाठ असे काही मित्र होते. त्यात स्पर्धापरीक्षा, वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा होई. पण मी पडलो सेवादलवाला आणि ते संघीय विचाराचे. त्यामुळे या ग्रुपमध्ये माझी भूमिका श्रोत्याची आणि पहिल्या ग्रुपमध्ये वक्त्याची.

याचवेळी राजेंद्र सोमवंशी आमच्या ग्रुपमध्ये अधून-मधून येत असे. ओळख वगैरे झाली. गुटगुटीत तब्बेत, तेजतर्रार डोळे, धारदार नाक, टापटिपीचं राहणं, ओठांवर भरघोर मिशा एवढं एक इंप्रेशन राजूबाबत आमच्याकडे होतं. दोन-चार वेळा गावात फेरफटका मारण्यासाठी तो आमच्यासोबत आल्याचं आठवतं. क्रिकेट खेळण्यासाठी व पाहण्यासाठीही तो आमच्यासोबत असायचा. त्याच्याशी तेव्हा विशेष गट्टी जमली नाही. परंतु माझ्याशी त्याचं वागणं नेहमीच आदबशीर आणि एखाद्या लहान भावासारखं राहिलं. मी तेव्हा छात्रभारती विद्यार्थी संघटनेत होतो.

बी.कॉम. होता-होताच मी नोकरीला लागलो. बदली येवल्याला. नंतर धुळ्याला. शेवटी नाशिकला आलो. हळूहळू मी कवितेत थोडाबहूत परिचित होत गेलो. एव्हाना आमच्या निफाडलाही साहित्य क्षेत्रात काही हालचाली दिसत होत्या. राजेंद्र सोमवंशी हे माझे तेव्हाचे मित्र, त्यात एक महत्त्वाचे काम करीत होते. ते आता क्रीडा शिक्षक म्हणून सेवेत होते. मोठ्या तयारीने आणि विश्वासाने माझ्याशी बोलत होते. मध्ये चांगला दहा-बारा वर्षांचा गॅप गेलेला होता. मला सोमवंशींचं कौतुक वाटलं ते त्यांच्या कवितेच्या समान प्रेमामुळे!

माझे वडील आणि लहान भाऊ किरण यांच्याकडून मला निफाडची एकूणच प्रगती ऐकायला मिळत होती. त्यात राजेंद्र सोमवंशी यांचंही नाव असे. मला समाधान वाटत होतं की, त्यावेळी आपण विद्यार्थी चळवळीत अग्रभागी असूनही काही विशेष करू शकलो नाही. निदान सोमवंशीसर आता उमेदीने, उत्साहाने काही करताहेत तर चांगलंच आहे. वरचेवर आमच्या भेटी होत राहिल्या. आम्ही साहित्यावर बोलत राहिलो.

निफाड इंग्लिश स्कूलमध्ये एक क्रीडा शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कामाची स्वतंत्र छाप पाडली. अनेक गुणी क्रीडापटूंना घडवलं. माणकेश्वर वाचनालयाचे संचालक म्हणूनही ते काम पाहताहेत. आता ते मला 'विवेकसर' आणि मी त्यांना 'सोमवंशीसर' असं आदरार्थी म्हणू लागलो. त्यांच्या पुढाकाराने निफाडमध्ये काही साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रम घडू लागले होते किंवा त्यात त्यांचा सहभाग हा महत्त्वपूर्ण असे. निफाड संस्कृती गौरव या वैशिष्ट्यपूर्ण संस्थेने 'पहाट पाडवा' चे दोन कार्यक्रम संपन्न केले. पहिल्याच कार्यक्रमात साहित्यिक गुढीचं उद्घाटन माझ्या हस्ते झालं. निफाडच्या संस्कृतीवर मी बोललो. त्यात माझे मित्र सुनील भुतडा, राजू सोनी, कमलाकर कहाणे, बंटी शिंदे, प्रवीण कराड, ॲड. भरत व प्रवीण ठाकरे आदी मित्रांमध्ये राजेंद्र सोमवंशी हे एक बिनीचे असे संयोजक होते. कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका, मानपत्र, संगीत मैफिल, सूत्रसंचालन, पेपरचं कव्हरेज या कामात

सोमवंशीसर होतेच. हा कार्यक्रम आम्हा सर्वांनाच आनंद देऊन गेला.

त्यानंतर कविसंमेलनासाठी कितीतरी वेळा माझे निफाडला जाणे झाले. माझ्या पुस्तकांना वेळोवेळी मिळालेल्या पुरस्कारांबद्दल प्रत्येकवेळी निफाडला सत्कार हा झालेला आहे. माझी शाळा वैनतेय विद्यालय, निफाड इंग्लिश स्कूल, सरस्वती विद्या मंदिर, माणकेश्वर वाचनालय, कॉलेज, ग्रामपंचायत, मार्केट यार्ड, दत्त मंदिर ट्रस्ट यांनी वेळावेळी मला गौरवलं. मला हे सत्कार स्वीकारताना संकोचल्यासारखं वाटलं. माझ्या योग्यतेपेक्षा माझा कितीतरी मोठा सन्मान निफाडने केलेला आहे. त्यात राजेंद्र सोमवंशी हे आवर्जून असत.

राजेंद्र सोमवंशी हे स्वत: जोमाने कविता लेखन करू लागले. ‘सामना’ वृत्तपत्रातून त्यांनी लिहिलेल्या बातम्या ‘लक्षवेधी’ ठरल्याहेत. मला त्यांच्या काव्यलेखनाचं, सादरीकरणाचं कौतुक वाटतं. कधीकाळी पोटापाण्यासाठी ब्रॉस बॅण्ड पथकात बॅण्ड वाजवणारा हा मुलगा आता शिक्षक झाला आहे. वाचनालयाचा पदाधिकारी झालाय. जिल्हा ग्रंथालय संघाचा संचालक आहे आणि महत्त्वाचं म्हणजे काव्यलेखनात नाव कमावतो आहे, याचं मला कौतुक वाटत राहिलं. त्यांच्या घरात साहित्यिक म्हणावी अशी कुठलीही पार्श्वभूमी नव्हती. परंतु जिद्दीने ते या क्षेत्रात आले आणि आपली पाळंमूळं रुजवताहेत, असं म्हणता येईल.

निफाडमध्ये कवीसंमेलनं होणं! आता सवयीची झाली आहेत. कार्यक्रमाचं संयोजन, देखणं आयोजन, सूत्रसंचालन, प्रत्येक कवीला ‘टोकन’ का होईना, असं मानधन, चहा-पाणी किंवा प्रसंगी जेवणाची व्यवस्था (काही वेळेस आपल्या स्वत:च्याही घरी) त्यांनी मन:पूर्वकतेने या सर्व गोष्टी केल्या आहेत. ज्या निफाडमध्ये एखाद दुसरा अपवाद वगळता मुख्यत्वे कीर्तनं, भारुडं, भजनं, प्रवचनं, सप्ते हेच कार्यक्रम लोकांनी अनुभवले. त्याच निफाडमध्ये राजेंद्र सोमवंशी यानी खऱ्यार्थाने कविता निफाडमध्ये रुजवली, वाढवली! असे म्हणता येईल. प्रसंगी टीका, टिंगलटवाळी आणि कौतुकही वाट्याला आले. या कशानेच ते

व्यथित किंवा अतीउत्साहात आले नाहीत. एक प्रगल्भ समंजसपणा त्यांच्यात दिसून आला. ते तो वाढवताहेत, असं दिसतंय.

अशाच एका कवीसंमेलनात राजेंद्र सोमवंशी यांनी माझी ओळख तरुण कवी, संगीतकार सुहास सुरळीकर यांच्याशी करून दिली. देवगाव (निफाड) येथील हा तरुण, जिंदादिल कवी राजाभाऊंच्या शाळेत एक संगीत शिक्षक. अत्यंत लाघवी, नम्र आणि अगत्यशील स्वभावाचा. मला आठवतंय, ते मला प्रत्यक्ष ओळख होण्यापूर्वीच ओळखत असावेत. पहिल्याच भेटीत त्यांनी माझ्या पायांना हात लावून अदबीनं नमस्कार केला. त्यात औपाचरिकता किंवा कृत्रिमता नव्हती. मी त्यांच्या आदरामुळे अतिशय संकोचून गेलो. आजच्या काळात इतकी चांगली मुलं आहेत! याचं कौतुक वाटतं.

आमच्या मैत्रीला साधारण चार-पाच तरी वर्षे झालीत. सुहासजींचं नम्र वागणं, जराही बदललेलं नाही. त्यांचं वागणं मला नेहमीच स्वाभाविक असं वाटत आलेलं आहे. स्वत: एक शिक्षक असूनही 'ऐकताना' त्यांची मन:पूर्वकता मनाला आनंद देऊन जाते. त्यांचं हे विद्यार्थी असणं. भविष्यात त्यांना नक्कीच उपयोगी पडणार! हे निश्चित.

सुहास हाडाचा संगीतकार. शब्द दिसले की, त्याची चाल त्यांच्या मनात संगीताचा वारसा त्यांना आपले मामा रवींद्र पगारे यांच्याकडून मनात छान आकारत असते. संगीताची पदवी त्यांनी मिळवलेली आहे. त्यामुळे तरुण वयातच त्यांचं वाद्यांशी खेळणं सुरू झालेलं. काही स्वतंत्र, वेगळ्या चाली बांधायचा ते प्रयत्न करताना दिसतात. राजेंद्र सोमवंशी आणि त्यांची जोडी म्हणजे जशी राम-लक्ष्मणाचीच जोडी किंवा आजचे संदीप खरे-डॉ. सलील कुलकर्णी यांची जोडी! राजाभाऊंनी कसदार शब्द लिहावेत. सुहासजींनी त्यावर देखणा संगीतसाज चढवावा.

प्रयत्नांती गाणं बसतं, टेपरेकॉर्डवर, मोबाईलमध्ये वगैरे ते रेकॉर्ड होतं. त्यांच्या या विविध प्रयत्नांना माझा नेहमीच पाठिंबा असतो. म्हणून त्यांच्या हक्कांच्या श्रोत्यांमध्ये एक नाव असतं. विवेकसरांचं! मी त्यांची

प्रत्येक गोष्ट लक्षपूर्वक ऐकतो. त्यात जाणवलेल्या चांगल्या-वाईट गोष्टी हक्काने सूचवतो. उत्तम 'कानसेन' आणि त्या दोघांचा मित्र म्हणून 'खरा अभिप्राय देणं!' मी माझं कर्तव्यच समजतो.

हे दोघेही तरुण मित्र आपापल्या क्षेत्रात बऱ्यापैकी हातपाय मारताहेत. सोमवंशीसर उमेदीने आणि सातत्याने कविता, बालकविता, गाणी वगैरे लिहिताहेत. मध्यंतरी त्यांचा 'गम्माडी गंमत' हा बालकवितांचा देखणा संग्रह झाला. आदरणीय श्री. बा.य. परीट गुरुजींनी या संग्रहाला शुभाशीर्वाद दिले. त्यांच्या आग्रहामुळे या संग्रहाला मी स्वत: प्रस्तावना लिहिली. प्रकाशनालाही आम्ही सर्व आवर्जून गेलो होतो. निफाडला एका भरगच्च कार्यक्रमात प्रकाशन झालं. या संग्रहाला जळगाव येथील जैन फाऊंडेशनचा बालसाहित्यरत्न हा मानाचा पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

विविध काव्यवाचन आणि काव्यलेखन स्पर्धेत राजेंद्र सोमवंशी यांच्या कवितांना बक्षीसं मिळाली आहेत. त्यात व्यासपीठ दिवाळी अंक, कवी सोपानदेव पुरस्कार, (सावाना आयोजित) शब्दांकुर अशा विविध स्पर्धांचा त्यात समावेश आहे. 'कवितेची पाऊलवाट' या रवींद्र मालुंजकरांच्या संकल्पनेतील कवितेच्या कार्यक्रमात ते आता एक बिनीचे कवी झाले आहेत. उत्तम सादरीकरण आणि गोड गळ्यामुळे त्यांची कविता रसिकप्रिय होत आहे.

मध्यंतरी त्यांनी काही पाऊसतुकडे लिहिले. 'तिचा नि माझा, ऋतू आठवणींचा' या संग्रहातून ते युवादिलाची धडकन पकडण्यात यशस्वी झालेले दिसतात. कवितेतील वेगवेगळे प्रयोग करणं सोमवंशीसरांना आवडतं.

सोमवंशी सरांचं आपल्या कुटुंबावर नितांत प्रेम आहे. आपले आई-वडील आणि आत्या हे त्यांचे दैवत. सौ. सुनीतावहिनी आणि कु. मृणाल, कु. देवश्री या दोन गोड मुली म्हणजे त्यांचे ऊर्जाकेंद्रच! शिवाय शालेय वातावरणंही त्यांना इतकं पूरक मिळालेलं आहे की त्यांची

बालकविता तेथे दिवसेंदिवस छान बहरते आहे. तसंच सुहासजींचं. वडील संजय नि आई अलका असं एक सुसंस्कृत असं प्रेमळ कुटुंब त्यांना लाभलंय. स्वामी समर्थांचे संस्कार घरात आहेत. आमचा हा युवा मित्र अजूनतरी विवाहबंधनात अडकलेला नाही. इतके सुहासजी 'तरुण' आहेत. आम्ही सर्वजण त्या गोड क्षणाची वाट पाहत आहोत. असो.

'डोक्यात आला **आई माझ्या एकच प्लॅन**
**आता बनायचंय मला सुपरमॅन!**'

राजेंद्र सोमवंशींकडे गेय कवितेचं अंग मुळचंच आहे. त्यांची कविता येते, तीच मुळी गाणं होऊन. त्यानंतरचं काम सुरळीकरांचं. ते तिला 'आपली' चाल देतात. गद्दे पंचविशीतली मुलं खरं तर टिंगलटवाळी किंवा नुसत्या अमाप उत्साहातलीच असतात. परंतु सुरळीकर नेहमीच 'मॅच्युअर्ड' वागतात. नम्रतेचं नि आपुलकीचं वागतात. तितकाच त्यांचा गळाही गोड आहे. एखाद्या नदीसारखं त्यांच्यात संगीत खळाळत असतं.

'आनंद ओवी' नावाचा कार्यक्रमही हे दोघे मिळून करतात. त्यात मराठी, हिंदी भावगीतं, भक्तिगीतं, गझलांची सुरेल मैफल ते साकारतात. त्याचबरोबर एक हळूवार काव्यस्पर्शांची अनुभूती देणारा 'रंग कवितेचे' तसेच आईविषयक कविता आणि गाण्यांचा 'माय माझी...' हा भावस्पर्शी कार्यक्रमही त्यांनी बसवलेला आहे. 'गम्माडी गंमत' हा बालकवितांचा कार्यक्रम विविध शाळांमधून ते सादर करत असतात. याचबरोबर ही जोडगोळी वेगवेगळ्या कार्यक्रमांचं संयोजन, व्यवस्थापन, सूत्रसंचालन करण्यात आघाडीवर असते. सोमवंशीसर मुळचे सुंदरपूरचे असल्याने हे सर्व कार्यक्रम ते 'सोमसुंदर निर्मित' या बॅनरखाली करतात.

२००९ साली संगमनेर येथे मंगेश पाडगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनात या दोघांनी काही बालगीतं सादर केली. चार हजार मुलांनी ही गाणी अक्षरश: डोक्यावर घेतली. वन्समोअर मिळाला. शेकडो मुलांनी त्यांचे ॲटोग्राफ घेतले. संयोजक श्री. मालपाणी यांनी संधी दिली नि ही करामत घडली. हे संमेलन खऱ्या

अर्थाने दोघांनाही प्रचंड ऊर्जा देणारे ठरले.

निफाडसारख्या तालुक्याच्या गावात राहून आपला शिक्षकीपेशा सांभाळून कविता आणि संगीताचा छंद हे दोघं प्राणपणाने जोपासताना दिसतात. तेव्हा त्यांचं 'वेगळेपण' जाणवतं. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनावरील एक सीडी या द्वयीने मोठ्या उमेदीने प्रकाशित केली आहे. शिवाय एक बालगीतांची सीडीदेखील प्रकाशनासाठी तयार आहे. स्वामी समर्थांवर काही भक्तिगीतं लिहून तीही स्वरबद्ध करण्यात आलेली आहेत.

एकूण काय तर सतत काही ना काही चांगलं ते करण्याचा प्रयत्न सुरू आहे. लाखमोलाचं भांडवल त्यात गुंतवलं आहे. परंतु मन:पूर्वकता ती तर अनमोल! कधी वाटतं या तरुण मित्रांना 'सावध' राहण्यास सांगावं. पण त्यांचा उत्साह नि उमेद इतकी दांडगी की, नकळत या तुफानाला मी सलाम करतो. कवी संदीप खरे आणि संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांच्या 'आयुष्यावर बोलू काही', 'अगोबाई ढगोबाई'सारख्या विविध प्रयोगांसारखंच यांचेही प्रयत्न नेहमी सुरू असतात. संधी मिळणं, योग्य पद्धतीने कवितेचा प्रचार-प्रसार होणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे.

कविता नि संगीत ही अशी 'चीज' आहे की, तुम्ही एकदा का प्रवाहात आलात की, तुम्ही थांबत नाहीत. प्रवाहप्रतीतच होतात. थकत नाहीत. तुम्ही चालत राहतात. पंढरपूरच्या वारकऱ्यासारखी वारीची ओढ लागते. तशी ही युवादिलाची जोडी कविता-संगीत साधनेची वाट अखंड तुडवीत कुठल्यातरी अनाम ओढीने निघाली आहे! मला खात्री आहे की, आज ना उद्या त्यांना त्यांचा 'पांडुरंग' भेटल्याशिवाय राहणार नाही.



# जिद्दी
# **मोहन पगारे**

पाटबंधारे विभागात कनिष्ठ लिपिक असलेले मोहन पगारे हे एक अपंग कर्मचारी, पण मनाने आणि वृतीने सक्षम म्हणून आपल्या अपंगत्त्वाचा बाऊ न करता त्यांनी आपलं सर्वोतम योगदान देत 'अपंग कल्याण राज्य पुरस्कार' पटकावून आपलं श्रेष्ठत्त्व सिद्ध केलं आहे.

आपले आयुष्य म्हणजे नेमके काय असते? तर वेदनांची छोटी-मोठी मालिका. प्रत्येक जीव जन्माला येतो तोच मुळी आईला वेदना देत. परंतु या वेदनादायी आयुष्यात काही माणसं आपलं उणेपण, दुःख विसरून चांगलं वागतात, नम्र वागतात, इतरांच्या उपयोगी पडतात, भरपूर व चांगलं काम करून समाजासमोर आदर्श ठेवतात. कळत-नकळत या कामाची नोंद म्हणून कौतुकाची भक्कम थाप कधी पाठीवर पडते. असे पुरस्कार या माणसांच्या लेखी एक निमित्त असतं. पण निरंतर चांगलं काम करणं! असा ह्या माणसांचा स्थायीभाव असतो.

आपण आज परिचय करून घेणार आहोत ते पाटबंधारे विभागांतर्गत नांदूमध्यमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक येथे कनिष्ठ लिपिक म्हणून सेवा कार्यरत असलेले मो.ना. पगारे यांचा. कारण या विभागात पगार बिलाचा टेबल सांभाळणारे. मोहन पगारेंचा दि. २८ जानेवारी २००४ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या शुभहस्ते रवींद्र नाट्य मंदिर,

प्रभादेवी, मुंबई येथे अपंग कल्याण राज्य पुरस्कार देऊन यथोचित सन्मान करण्यात आला होता.

पगार बिलाचं काम तसं जिकिरीचं. सतराशेसाठ हिशेब. कुणाचं इन्क्रिमेंट, रिकव्हरी, फंडाचे हप्ते, इन्कम टॅक्स, डिफरन्स, पगार प्रमाणपत्र असा दररोजचा वैतागी मामला असतो. तरीही मो.ना. पगारेंसारखी चांगली माणसं हा व्यस्त टेबल हसतमुख सांभाळतात. असा एकंदरीत चांगला वाटावा असा अनुभव आहे. असो.

तर आपण माहिती करून घेतोय ती मोहन पगारेंची. मोहन नारायण पगारे मूळचे दिंडोरी तालुक्यातील उमराळे बुद्रुक गावचे. घरची परिस्थिती तशी नाजूकच. घरात आठ बहिणी, दोन भाऊ असे दहा भावंडं. आई-वडील शेती आणि जोडीला मोलमजुरी करायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी परिस्थितीशी दोन हात करीत आई वडिलांनी मोठ्या हिकमतीने मुलांना शिकवलं.

मोहन पगारेंचं एसएससीपर्यंतचं शिक्षण उमराळे गावातच झालं. दरम्यान, तिसरीला असताना मोहन पगारेंना पोलिओ झाला. खूप औषधोपचार करूनही गुण आला नाही. उजवा पाय कायमचा अपंग झाला. त्यात मोहन पगारे आठवीला असताना २९ मार्च ७९ रोजी त्यांच्या आईचं निधन झालं. अपंग मोहनच्या आयुष्यात स्वत:च्या शरीर अपंगात्त्वापेक्षाही मोठा आघात आईच्या जाण्यामुळे झाला.

वडिलांनी दुसरं लग्न न करता मुलांना आनंदानं वाढवलं. नेटानं शिकवलं. आपल्या मुलांना बापाबरोबर स्वत:च आईचंही प्रेम दिलं. यथावकाश मुलं शिकली. नोकरीला लागली. मुलींची लग्न झाली. आयुष्य कुठेतरी स्थिर झालं.

आपल्या वडिलांनी मुलांसाठी म्हणून दुसरं लग्न न करणं हा मोहन पगारेंना आपल्या वडिलांचा एक मोठा त्याग वाटतो. वडिलांच्या या त्याग भावनेचा, त्यांना अभिमान वाटतो. वडिलांच्या संस्कारातूनच आपल्या अंगी नम्रता आली, असं पगारेंना वाटतं.

मार्च १९८१ ला पगारे दहावी उतीर्ण झाले. इच्छा असूनही घरच्या नाजूक परिस्थितीमुळे महाविद्यालयीन शिक्षण मोहन पगारेंना घेता आलं नाही. अत्यंतिक गरज म्हणून ते करंजवण धरण विभागात चौकीदार म्हणून सेवेत आले. शिक्षण व कामाची चुणूक पाहून कनिष्ठ लिपिक म्हणून त्यांना बढती मिळाली. हा सर्व काळ उमेदवारीचा किंवा केवळ शिकण्याचाच होता, असं पगारे प्रामाणिकपणे कबूल करतात.

नव्वद साली मोहन पगारेंची बदली नाशिकला झाली. त्यावेळेसच करंजवण विभाग आणि आताच्या नांदूरमध्यमेश्वर विभागात आल्यानंतर पगारेंच्या कर्तुत्वाला आणि कलागुणांना भरपूर चालना मिळाली. तत्कालीन कार्यकारी अभियंता ना.भा. घुगे, म.का. थोरात, जे.एम. लिहितकर, प्रमोद मांदाडे, गिरीष जगतापसाहेब या सर्वच अधिकाऱ्यांनी पगारेंवर विश्वास टाकला आणि पगारेंनी तो समर्थपणे पेललाही. एक अपंग कर्मचारी असूनही पगार बिल, गोपनीय पत्रव्यवहार पगारेंनी कुशलतेने सांभाळला. वेळेत आणि चोख काम केल्यामुळे त्या त्या वेळी त्यांना प्रशस्तीपत्र व आगावू वेतनवाढी मिळत गेल्या.

पण मोहन पगारेंच्या दुर्देवाचे फेरे संपलेले नव्हते. ८ एप्रिल ९३ रोजी एका विचित्र अपघातात पगारेंच्या दोन्ही कानांच्या शिरा तुटल्या. 'ऐकू येणं' हा विषय त्यांच्यासाठी कायमचा बंद झाला होता. त्यांच्या आवाजावरही परिणाम झाला. खूप औषधोपचार झाले. परंतु उपयोग झाला नाही.

परंतु पगारे डगमगले नाहीत. बहिरेपणाचं दु:ख, पायाचा पोलिओ, चिरका आवाज या अपंगत्त्वाने खचून न जाता त्यांनी स्वत: भरपूर काम करायचं सुरूच ठेवलं. भरपूर काम अंगात होतच. आता ऐकणं आणि त्यामुळे बोलणं हा विषय जवळपास बंद झाल्यामुळे काम हीच पगारेंची गरज झाली. प्राथम्यता झाली.

१९९६ च्या पाचव्या वेतन आयोगाचा संपूर्ण विभागातील कर्मचाऱ्यांचा फरक काढणं असो, त्यांची वेतन निश्चिती असो, कुणाचे या टेबलावरील

काहीही काम असो, कुठलीही अपेक्षा न ठेवता कामाचा त्वरित फडशा पाडत मोहन पगारेंनी सर्वांचीच वाहवा मिळवली. या कामामुळे आणि चांगल्या वागणूकीमुळे पगारे आपल्या विभागात लोकप्रिय होत गेले. सर्वांचे आपुलकीचे एक स्नेही झाले.

१९९० पासून ते आजपर्यंत मोहन पगारेंनी आपल्या कामाचा कधी कंटाळा केला नाही. चुकाही अगदी नगण्य. त्यामुळं दरवर्षी अधिकाऱ्यांकडून त्यांना चांगल्या कामाबद्दल प्रशस्तीपत्र ठरलेलं. कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंतापासून मुख्य अभियंतासारख्या सर्वोच्च अधिकाऱ्यांकडून त्यांचे गौरव झाले आणि आता थेट मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्कार! अप्रतिम म्हणावे असे पगारेंचे विलक्षण कर्तुत्व केवळ त्यांच्या कामावर उभे राहिले आहे.

अपंग कर्मचारी म्हणून सोयी-सवलतींचा फायदा घेऊन त्यांना आपलं काम चुकवताही आलं असतं. परंतु पगारे स्वस्थ बसणाऱ्यातले नाहीत. कामाचा निपटारा जलद आणि अचूक होण्यासाठी त्यांनी आपले सहकारी राज सोनवणे यांच्या मदतीने संगणकही व्यवस्थित शिकून घेतला. आज पगारे स्वत: आपलं हे सर्व काम संगणकावरच अचूक करतात.

कार्यालयातील व परिसरातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध तसेच शासनाच्या अल्पबचतीचं उद्दिष्ट ओलांडून त्यांनी गुंतवणुकीतही मोठं काम केलेलं आहे. अपंग कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन, शासन निर्णय उपलब्ध करून देणं हा त्यांना आपल्या कर्तव्यांचा एक भाग वाटतो.

शासन सुटीचे दिवस आणि कार्यालयाव्यतिरिक्त वेळ ते आपल्या अपंग बांधवांसाठी देतात. त्यांना जे-जे म्हणून सहकार्य लागेल ते ते देण्यासाठी पगारे नेहमी उत्सूक व अग्रेसर असतात.

अपंग कल्याण संस्था, नॅब, राज्य कर्मचारी संघटना, महात्मा फुले लोक नाट्य जनसेवा मंडळ, उमराळेसारख्या विविध संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, भगवान

गौतम बुद्ध यांच्यावरील साहित्य अभ्यासणं, प्रासंगिक वाचन करणं हा पगारेंचा छंद आहे.

स्वत: एक अपंग कर्मचारी असून इतर धडधाकट सहकाऱ्यांमध्ये मिळून-मिसळून त्यांच्या बरोबरीने, पेक्षा काकणभर सरस काम करून त्यांनी स्वकर्तुत्वावर अपंग कल्याण राज्य पुरस्कार पटकावला. आईचं प्रेम, वडिलांचे संस्कार, गावाचं ऋण तसेच रमेश राख, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, चित्रकार धनंजय गोवर्धने, इ.एन. निकम, राज सोनवणे, हर्षद शहा यांच्या मार्गदर्शनातूनच मी हे यश मिळवू शकलो! असं पगारे नम्रपणे सांगतात.

पगारेंच्या या यशाबद्दल त्यांच्या सुहृदांनी त्यांच्या घरी सत्काराचा कार्यक्रम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद मादाडेंच्या प्रमुख उपस्थितीत साजरा केला. तेव्हा एखाद्या लग्नाला, मोठ्या कार्याला जमावा इतका समाज, मित्र-नातेवाईक, गोतावळा पगारेंचे कौतुक करायला जमला. हे पगारेंच्या सुस्वभावातून दिसून आलेलं फलित आहे.

परिस्थितीच्या अधीन होण्यापेक्षा प्राप्त परिस्थितीवर मात करण्यात यशस्वी झालेले मोहन पगारे सत्काराला उत्तर देताना (मनात म्हणाले (असतील) डोळ्यांनीच बोलत राहिले.

**'आयुष्यात काय केवळ**
**काटेरी डंख आहेत?**
**डोळे उघडून पाहा तरी**
**प्रत्येकाला फुलपाखराचे**
**पंख आहेत!'**

मोहन पगारे हे असंच एक जिद्दी फुलपाखरू आहे. अशा मोहन पगारेंचं कोणालाही. कौतुक तर वाटतचं शिवाय अभिमानही!

## गोष्ट समंजस आक्काची

# सौ.वंदना सांगळे



आम्हा चार भावंडात ती सर्वात मोठी. तिचं नाव वंदना! पण आम्ही सर्वजण तिला 'आक्काच' म्हणतो. तिचं हे 'आक्कापण' तिने पहिल्यापासूनच फार छान जपलेलं आहे. ती रंगाने गोरीपान. छोट्या चणीची. मात्र नाकेडोळे नीटस असलेली. कमालीची शांत, समंजस नि अभ्यासात बऱ्यापैकी हुशार.

म्हणजे मला तिच्यासंबंधी इयत्ता पहिलीपासूनचं अंधुक-अंधुक आठवतं. आक्का माझ्यापेक्षा एक वर्ष अगोदर शाळेत जात होती. पाच-साडेपाच वर्षे वयात मलाही शाळेत घालण्यात आलं. शाळेत जाण्यावरून मी भोकाड पसरायचो. शाळेत जायला नाहीच म्हणायचो.

आक्का मात्र निमूट शाळेत जायची. अगदी उत्साहाने जायची. शाळेत शिकवलेला प्रत्येक अभ्यास घरी करून पाहायची. शाळेत शिकवलेलं तिला सारे समजे. परीक्षेत तिला पैकीच्या पैकी गुण मिळत. माझी मात्र काठावर पास होण्याची पंचाईत. हे झालं प्राथमिक शाळेतलं.

पण मला स्वच्छ आठवतंय की, आपण हुशार म्हणून तिने कधीही जरासुद्धा गर्व केला नाही. त्यावरून मला किंवा आम्हा भावंडांना चिडवलं वगैरे नाही. कधीच कुठल्या गोष्टीसाठी हट्ट केला नाही. खाऊ दिला नाही, कमी दिला, हे आवडतं ते आवडत नाही, ती शांतपणे सारं

स्वीकारत असे. मी प्रत्येकवेळी आदळआपट करायचो. नाही म्हणायचो. सर्वजण म्हणत, 'कुठली खावखाव सूटली या कार्ट्याला! सारखा पिसाळल्यासारखा करतो. अक्का बघ...' मला त्यामुळे आक्काचा राग यायचा.

अभ्यास करणं तिला आवडायचं. घरातली कामं आटोपली की, ती अभ्यास करत बसलेली असे. शिवाय परीक्षा असो-नसो भल्यापहाटे स्वत:च गजर लावून नियमितपणे उठणं तिला आवडे. मला मात्र पहाटेची साखरझोप आवरायची नाही. ती होती काहीशी धांदरट किंवा घाबरटच, पण प्रयत्नपूर्वक प्रत्येक गोष्ट ती अचूक साधायची. म्हणजे घरकाम, शाळा, अभ्यास, चांगलं वागणं यात कुठेच म्हणून ती मागे पडायची नाही.

तिचं हस्ताक्षर आमच्या अण्णांसारखंच सुंदर नि वळणदार. तत्कालीन नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी पद्मनाभय्या यांच्या हस्ते तिला सुंदर हस्ताक्षराचं बक्षीस मिळालं होतं.

चौथीच्या स्कॉलरशीपची परीक्षा ती उत्तीर्ण झाली होती. परंतु मेरिट न मिळाल्यामुळे तिला शिष्यवृत्ती मिळत नव्हती. याचं तिला वाईट वाटे. अण्णांचा तुटपुंजा पगार. आईचं आजारपण याची समज तिला माझ्यापेक्षा कितीतरी वर्षे अगोदर आलेली होती. याउलट दहावीपर्यंत मी मनसोक्त हुंदडलो होतो.

आक्का मात्र सतत घर, शाळा, घरकाम नि अभ्यासातच दिसायची. साध्या गोळ्या, चॉकलेससाठी तिच्या हातात कधी पाच-दहा पैसेही मी कधीच पाहिले नाहीत. तिलाही ते नकोच असायचे. गल्लीत वगैरे मुलींबरोबर-मैत्रिणींसोबत एखादा खेळ खेळताना मी तिला कधीच पाहिले नाही. मला तसे मुळीच आठवत नाही. बैठे खेळ मात्र ती उत्तम खेळे. अंपल-चंपल, सागरगोटे यात ती हरायची नाही. गुलाबाईची (भोंडला) गाणी तिची तोंडपाठ असायची. ती ते सुंदरपणे म्हणे.

तिचं निर्मळ राहणं, दोन गच्च वर बांधलेल्या वेण्या, तो व्यवस्थित

सरळ भांग, दररोज व्यवस्थित गृहपाठ पूर्ण करणं, अभ्यासातली हुशारी यामुळे वर्गातल्या मुली तिच्याशी मैत्री करायला धडपडत. तिच्या वह्या मागत. तिच्याबरोबर शाळेत जात. मला तिचा हेवा वाटे.

तिच्या शाळेच्या गणवेषाचाही एक किस्साच आहे. म्हणजे ती आठवीत असताना तिचा फ्रॉक आपरा (तोकडा) झाल्यामुळे आईने घेरपट्टीला तो उसवून टाकला. नववीला तो आणखी तोकडा वाटू लागला म्हणून की काय आईने त्याला घरीच एका जुन्या फ्रॉकची पट्टी शिवून टाकली. हे मी सांगतोय ते १९७८-७९ सालचं. म्हणजे मुळ फ्रॉक, त्याला उसवलेली घेरपट्टी आणखी तो वेगळ्या फ्रॉकचा तुकडा असा तिहेरी पट्टेदार फ्रॉक घालून आक्का न लाजता (?) शाळेत जायची. आक्काचा कुठलाही फ्रॉक घालून चांगला पोटऱ्यापर्यंत खाली असलेला आईला हवा असे. आक्का न लाजता, न कुरकुर करता तो घालायची.

तिच्या दहावीतच म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षातच तिचं लग्न ठरलं. म्हणून एका वर्षासाठी कशाला नवीन फ्रॉक? (घरात तंगी ही असायचीच) म्हणून याच फ्रॉकवर दहावीलाही ती निमूट शाळेत जात राहिली, पण मी काय करणार होतो? आईचा नि आक्काचा यावरून मला राग येई. तो पट्टेदार फ्रॉक तिला फारच बेंगरूळ दिसायचा, पण आक्का मुळात दिसायला चांगली होती. म्हणून तिचं हे बेंगरूळपण त्यात खपून गेलं.

कोणताही क्लास, शिकवणी वगैरे न लावता ती तिच्या वर्गात पहिल्या पाचात येई. दहावीला तिला चांगले ६९ टक्के गुण मिळाले. इंग्रजी विषयात तर तिला ८२ टक्के गुण मिळाले. इंग्रजीत ती निफाड केंद्रात सर्वप्रथम आली, म्हणून वैनतेय विद्यालय या आमच्या शाळेने तिचा सत्कार स्टेट बँक ऑफ इंडियाचे तत्कालीन जनरल मॅनेजर श्री. नाडकर्णी आणि स्टेट बँकेचेच एक अधिकारी असलेले माजी कसोटी क्रिकेटपटू अजित वाडेकर यांच्या हस्ते संपन्न केला.

या सर्व आनंदात मी मनातून धास्तावलेला असे की, आपलं दहावीला कसं होणार? आक्काने वडिलांचं नाव मोठं केलेलं? आणि

मी मुलगा असून माझी गाडी ट्रॅकवर येत नव्हती, पण त्याबद्दल आक्काने न मला कधी काही शिकवलं ना काही सांगितलं. ती नेहमीच आत्ममग्न असे.



दहावीला असताना ती जरा जास्तच सुंदर दिसायची. त्यात तिच्या लग्नाचं ठरलेलं. राष्ट्र सेवा दलाचे भारताचे महामंत्री असलेले श्री. बा.य. परीट गुरुजी वडिलांना म्हणाले, 'अहो, उगलमुगलेसर काय सुंदर दिसते तुमची वंदना. हिला शिकवा पुढे. ती हवाईसुंदरी होऊ शकते!' वडिलांनी गुरुजींचं ऐकलं नाही पण गुरुजींचा त्यावेळीचा तो अभिप्राय आमच्या छान स्मरणात आहे. आक्काचं लग्न ठरल्याप्रमाणे दहावीनंतर लगेचच झालं.

मुळात अभ्यासात ती फार हुशार वगैरे नव्हती. परंतु प्रत्येक बाबतीत ती नेहमीच सर्वोतम असा प्रयत्न करायची. त्यात कमालीचं सातत्य असे. त्यामुळे उत्तम यश मिळवणं तिला जमत असे. शाळेतून म्हणजे अगदी पहिलीपासून अभ्यास किंवा एखादी खोडी करणं वा अशी एकही तक्रार घरी कधीही आली नाही. मी मात्र हेलपाडत राहायचो. अभ्यासात मागे-मागेच पडायचो. शाळेत-घरी मार खाणं माझं सवयीचं झालेलं होतं. तिचं आपलं एखाद्या स्थितप्रज्ञासारखं. मला तिच्यासारखं वागावं वाटे, पण खेळकरपणा, व्रात्यपणा अंगातून जाता-जात नव्हता. असं साधारण माझं नववीपर्यंत चाललेलं. आक्का मात्र जन्मजात शहाणी असल्यासारखी समंजस!

वयाच्या पंधराव्या वर्षीच तिचं लग्न झालं. ती सासरी गेली. म्हटलं, चला आपली तुलना एकदाची संपली. तिची जुनी पुस्तकं मी वापरायचो. म्हटलं, आता कॉलेजात 'फ्रेश' पुस्तक वापरूयात. आपलं स्वतःच काही उभारूयात असं वाटलं.

पण निफाडसारख्या तालुक्याच्या गावातून ती एकदम खेड्यात जाखोरीला नांदायला गेली. तिथे त्यांचं एकत्र कुटुंब. सवय नसताना तिला नदीवरून हंड्याने पाणी भरून आणवं लागे, शेतीकाम, गाईगुरांच करणं,

चुलीवरचा स्वयंपाक, अलका कुबलला सिनेमातून दाखवावी तशी ती एक गरीबगाय सून होती. ते पाहून-ऐकून मला कावरंबावरं झाल्यासारखं होई. पण तेव्हा मी लहान होतो ना?

तिच्या संयमीपणाने वागण्याची कितीतरी उदाहरणं मला माहिती आहेत. त्यातलं एकच सांगतो, थंडीत पहाटे उठायचं, पाणी भरणं, घरं सारवणं, शेतीकाम, पायाला चिखलमाती लागायची. त्यामुळे तिच्या पायाला इतक्या भेगा पडल्या की, तिला चालता येईना. चिरांतून रक्त यायचं. वेदना व्हायच्या. मुळात ती नाजूक. साधं व्हॅसलीन, सॉक्स वगैरे तिने कुणाकडे मागितले नाहीत. अण्णा एकदा तिला न्यायला गेले तर ती घरात ढुंगणाने खरकत चालत होती. तिला खेडं मानवत नव्हतं. पण तिने कुठलीच म्हणून तक्रार आमच्याकडे केली नाही.

म्हणून वडिलांनी त्यावर एक उपाय शोधला, तिने डी.एड्. करावं! तिच्या सासरकडून त्यास थोडा विरोध झाला. त्यात तिला दिवस गेलेले. प्रयत्नपूर्वक तिने प्रथम श्रेणीत डी.एड. पूर्ण केले. त्यातच तिला मुलगा (प्रशांत) झाला. जिल्हा परिषदेत तिला शिक्षिकेची नोकरीही मिळाली. तिची धावपळ मला पाहावयाची नाही. तेव्हा मी बारावीला होतो. तेव्हा तिचं बाळ मी आनंदानं सांभाळलं. सासर, नोकरी, बाळ अशी कसरत करताना तिच्या मेहनतीला सीमा नव्हती.

त्यातून एकच घडलं, हे सर्व पाहात-पाहात मी घडत गेलो. मी नम्र होत गेलो. मला कष्टाची सवय लागली. नोकरीला लागेपर्यंत घरातील पाणी भरण्यापासूनची सर्व कामं मी आनंदानं करायचो. अगोदर असलेला ढ ढगाचा मी त्यामुळे कॉलेजात मात्र एक बऱ्यापैकी विद्यार्थी झालो. मी सपाटून अभ्यासाला लागलो. संपूर्ण प्रयत्न केला की, यश मिळतंच! हा पाठ मला जणू आक्कानेच दिला. तिला आठवलं की, मी माझं तरुणपण सोडून अकाली प्रौढ होऊन जायचो.

पुढे ओझरला तिचा नवीन संसार सुरू झाला. भाड्याचं घर, शिक्षिकेची नोकरी. संसाराची जुळवाजुळव, पण तिने हळूहळू सर्व

व्यवस्थित उभं केलं.

त्यानंतर माझ्या एका मोठ्या आजारात मला नाशिकहून पुण्याला ससून हॉस्पिटलला हलवण्याचं ठरलं. सोबत काही कपडे, वस्तू हव्यात म्हणून ताई-अण्णांनी आक्कालाच तिच्या घरी ओझरला पाठवलं. येताना धावपळीत वगैरे तिच्या एक पायातली तोरडी गळून पडली. घाबरून तिने देवाकडे मागितलेलं 'देवा माझ्या दादाला या आजारातून सुखरूप बरं कर, मी पुन्हा आयुष्यात पायात तोरड्या घालणार नाही!'

डॉक्टरांच्या उपचाराने त्या जीवघेण्या आजारातून मी संपूर्ण बरा झालो. त्यावेळी आक्काचं वय होतं अठरा वर्षाचं.

आज आक्काने पंचेचाळीशी पार केलेली आहे. मेहुणे चांगल्या नोकरीत आहे. तिचा मुलगा प्रशांत पुण्याला एका मोठ्या कंपनीत सहाय्यक महाव्यवस्थापक आहे. मुलगी अभियांत्रिकेची पदवीधर झालेली आहे. सून आणि जावई इंजिनिअर आहेत. अपूर्व नावाचा तिला एक गोड नातू आहे. असं तिचं छान मार्गी लागलं आहे.

माझ्या या आक्काचा हा समंजस प्रवास जगालेखी फार भव्यदिव्य नसेलही! पण तो दुर्लक्ष करावा, सहज घ्यावा किंवा आजच्या मानाने तिचं ते वागणं तसं ग्रेटच! कारण आक्काची गोष्ट फार पुरातन काळातलीही नाही.

आक्कासारख्या गुणी, समंजस मुली कालपरवापर्यंत घरोघरी होत्याच होत्या. आपल्या पाठ्यपुस्तकातील 'पाडवा गोड झाला' या धड्यातील मोठ्या बहिणीसारख्या. आज जग किती बदलतंय. मुली अभ्यासात हुषार, वागायला स्मार्ट, पण मोठ्या माणसांचा मान-मराबत न ठेवणं, घरकाम टाळणं, उद्धट वागणं, ते स्वत:साठी जगणं, स्वत:चा आनंद, असचं चित्र मोठ्या प्रमाणात दिसतंय. त्याअर्थी आक्काच्या काळातल्या मुलींचं वागणं मला ग्रेट वाटतं! पंचवीस-तीस वर्षांपूर्वीच्या त्या मुलींचं ते विलक्षण साधेपण, ते समंजसपण कुठं कोणी का नोंदवलं नाही? त्याची योग्य ती दखल साहित्याने तरी कुठे घेतली आहे?

कवितेच्या किंवा लिहिण्याच्या किंचित प्रतिभेवर मला पंचवीस-तीस बक्षीसं मिळाली, माझे अनेक सत्कार, कार्यक्रम झाले किंवा माझ्या योग्यतेपेक्षा माझं कितीतरी अधिकच कोडकौतुक झालं. मला अनेक मानसन्मान मिळाले. माझ्या लेखनाचं, पुस्तकांचं सर्वांनाच अप्रूप वाटतं. परंतु मुळात गुणी असलेली आक्का मात्र आज एका लहानशा खेड्यातून व्रतस्थपणे उद्याची पिढी घडवतेय. याचं मनोमन कौतुक नि आश्यर्यही वाटतं. त्याची नम्र आणि हृदयस्थ पोच म्हणजेच गोष्ट समंजस आक्काची!

आता महत्त्वाचं एक सांगतो, माझ्या त्या आजारापासून (१९८३) आक्का पायात कधीच तोरड्या घालत नाही. तोरड्या न घातलेले आक्काने पाय मला स्वत:ला जगातील सर्वाधिक सुंदर नि पवित्र पाय वाटतात!



# एक वेगळा सेंच्युरियन
# **प्रदीप गुजराथी**

स्वत:साठी जगणारी माणसं म्हणजे निव्वळ सरपटतच असतात. त्याला चालणं म्हणत नाही. शेणातल्या किड्यांसारखं त्यांचं वळवळणं काय ते सुरू असतं. आत्ममग्नांच्या या विश्वात आपल्याबरोबर इतरही कुणी राहतं, त्यांच्यासाठी आपलंही काही कर्तव्य किंवा देणं असतं! हे जणू त्यांच्या गावीच नसतं. प्रसिद्धीच्या कुबट घामेजलेपणात, त्यांच्यात माणुसकीचे झरे कुठून येणार?

परंतु या कोलाहालात काही माणसं अखंड संवेदनशीलता काळजात घेऊन दुसऱ्यांसाठी भरीव असं योगदान देत असतात. त्यांना 'माणूस' असं म्हणतात! कुणाचं लक्ष असो नसो, ती स्वत:शी प्रामाणिक राहून आपलं कामं निमूट करत राहतात. त्यात त्यांना समाधान मिळतं किंवा असं एखादं चांगलं काम हाच त्यांच्या जगण्याचा एक भाग बनून राहतो.

सरकारी कार्यालयातून विशेषत: पोस्ट-तार खात्यातून कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावरचं हसू आजकाल दुर्मिळ झालेलं आहे. वाढती लोकसंख्या, सरकारी यंत्रणेकडून असलेल्या लोकांच्या अपेक्षा नि चिकार जबाबदारीची कामं वेळेत पूर्ण करण्याचा नियम, यामुळे ती प्रचंड कामं नि लोकसंपर्काचा ताण-तणाव यामुळे येथली माणसं नेहमीच गंभीर वगैरे दिसतात. खुलून हसणं नि बाहेरच्या जगाशी समरसून एकरूप होणं, त्यांना वेळेअभावी

किंवा पारंपरिक मानसिकतेमुळे शक्यच होत नाही. दिवसभराच्या कामानेच इतका पिट्ट्या पडतो की, त्यानंतर कसली आलीय समाजसेवा नि कसलं आलंय संवेदनशील मन!

पण, या समजुतीला अपवाद म्हणजे आमच्या टेलिफोन (आताचं बीएसएनल) खात्यातला मनमाड येथील मित्र 'प्रदीप गुजराथी!' टीव्हीवर एक जाहिरात आहे, एक बाई कामावरून घरी परत येत असते तरीही तिला तिची एक ओळखीची बाई विचारते, 'काय कुठं बाहेर निघालात वाटतं?' इतकी ती बाई घरी परततानाही फ्रेश असते! तसा आमचा हा मित्र! त्याला तुम्ही केव्हाही भेटा त्या जाहिरातीतल्या बाईसारखा नेहमी ताजा टवटवीत नि हसतमुखच असतो!

आज पन्नाशीला असूनही प्रदीप एखाद्या तरुण्याबांड खेळाडूसारखा उत्साहाने नुसता खळाळत असतो. केव्हाही भेटा, 'दिलसे' भेटणार. प्रसन्न हसणार. आस्थेने चौकशी करणार. 'रक्तदानाविषयी काही सेवा, मी तयार आहे!' आहे की नाही प्रदीपचा जिंदादिलपणा!

प्रदीपला भेटायला येणाऱ्यांमध्ये, त्याच्या कामात व्यत्यय आणणारे किंवा मुद्दाम वेळ घालविणारे अशी माणसं त्यात नसतातच. वास्तविक प्रदीप एक उत्साही कवी, वात्रटीकाकार त्यामुळे कवीसंमेलनं, साहित्य संमेलनं याशिवाय 'रक्त आणि रक्तदान' हा एक त्याच्या काळजातला विषय. त्यासंबंधाने एखादा विषय चर्चेत असला तर प्रदीपच्या उत्साहाला भरते येते.

रक्तदानाचा विषय निघाला की, प्रदीपची कळी विशेष खुलते. एखाद्या रक्तदान शिबिराचे आयोजन असो. ब्लड बँकेतलं काम असो. कुणासाठी रक्त हवं असेल किंवा कुणाला रक्तदानाची माहिती हवी असेल, प्रदीपला यासाठी मुद्दाम खुलवावं लागत नाही. प्रदीप या विषयावर उत्साहाने बोलत राहतो. 'रक्त' हा विषय त्याने जाणीवपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक अभ्यासलाय. त्याविषयीची प्रदीपची तळमळ एखाद्या व्रतस्थासारखी असते.

यासाठी प्रदीप केवळ कोरडी भाषणं (लेक्चर्स) झोडत नाही. या जिंदादिल कवीहृदयाच्या आमच्या मित्राने **१९८२ ते २०१० या काळात तब्बल १०० वेळा रक्तदान केलेलं आहे!** गेल्या २६ वर्षापासून रक्तदान चळवळीतील त्याचं काम अव्याहतपणे सुरू आहे.

अर्थातच हे पवित्र कार्य केवळ विक्रमासाठी किंवा शेखी मिरवण्यासाठी म्हणून नाही. इतक्या विक्रमी वेळा रक्तदान करुन प्रदीपला हेच दाखवून द्यायचच, की रक्तदानातून आपल्या शरीरावर काहीही वाईट परिणाम होत नाही. खरोखर इतक्या वेळा रक्तदान करून प्रदीप छान गोरापान, गुटगुटीत, टुणटुणीत, उत्साही नि तजेलदारच दिसतो.

त्याचं हे उत्साहीपण वृतपत्रातून, मासिकातून त्याच्या खुसखुशीत चुरचुरीत अशा लेखनातून जाणवतं. 'एव्हरग्रीन' या शब्दाचा अर्थ समजावून सांगताना खुशाल 'प्रदीप'चं उदाहरण द्यावं!

रक्तदानाचा हा विषय त्याच जिव्हाळ्याने त्याने आपल्या घरातही छान रुजवलाय. सौ. आशावहिनी आणि चिरंजीव आकाश यांनाही त्याने आपल्या रक्तदानाच्या कामाची गोडी लावलेली आहे. त्यांची साथ मला प्रेरणादायी वाटते, असं प्रदीप विनयानं सांगतो. त्यामुळेच रक्तदानाच्या जनजागरणात शेकडो 'रक्तदाते' उपलब्ध करून आजवर हजारो रुग्णांचे प्राण वाचवण्यात प्रदीप यशस्वी ठरला आहे.

रक्तदान शिबिर म्हटलं, की प्रदीपला ते स्वत:च्या घरचं काम वाटतं. तो तेथे मन लावून झटतो. त्यावेळी प्रदीपच्या नजरेत असतो देशाचे रक्षक असलेला सैनिक, रुग्णशय्येवर असलेला रुग्ण व लाल रक्त असलेला कुठल्याही धर्माचा माणूस! तेव्हा त्याचा भावार्थ असते, विंदांची कविता...

**'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे**
**घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे!'**

म्हणून प्रदीपला निराश, उदास असं मी कधी पाहिलं नाही. मनमाड-नाशिक असं अप-डाऊन असो, कुठे परगावचं एखादं कविसंमेलन असो,

रक्तदान शिबिर असो त्याचं उत्साहीपण नोंदवल्याशिवाय राहवत नाही.

कुणा गरजूला 'रक्त' हवं आहे ना? त्याला ते तत्काळ नि विनासायास मिळावं! यासाठी प्रदीप सतत प्रयत्नशील असतो. त्याबद्दल त्याला काही एक नको असतं. मात्र गरजू व्यक्तीची रक्ताची गरज पूर्ण झाली, की या घेतलेल्या रक्ताची भरपाई त्याच्या कुटुंबीय सदस्यांनी पैशांबरोबरच स्वत: रक्त देऊनच पूर्ण करावी! असं त्याला प्रामाणिकपणे वाटतं.


सुदृढ अशा प्रत्येक व्यक्तीने दरवर्षी स्वत:हून रक्तदान करावं. माणुसकीच्या भावनेतून हे काम प्रत्येक तीन महिन्याच्या अंतराने आवर्जून करण्यामुळे रक्ताची गरज पूर्ण होईल, असं प्रदीप सांगतो तेव्हा त्याचं या कामातलं मनस्वीपण लक्षात येतं. रक्तदान आणि प्रदीप यांना वेगळं करणं त्याच्या वयाच्या साठीपर्यंत तरी नियमाप्रमाणे अशक्यच आहे! रक्ताचं नातं म्हटलं की, प्रेम आपोआपच वाढतं. ते केवळ 'वंश परंपरेतून' येतं! हे मात्र प्रदीपसारख्यांना कधीच मान्य नसतं. या जीवन-मरणाच्या खेळीत सर्व गरजू, मित्र प्रदीपला साथ देतातच असं नाही पण स्वत: प्रदीप मात्र एकटा जिगरबाज सचिन तेंडुलकरसारखा धैर्याने, नेटाने लढून मानवतेसाठी रक्तदानाची अद्वितीय अशी सेंच्युरी मारूनही या कामात घट्ट पाय रोवून उभाच आहे.

त्याच्या या कामात त्याने काही लेखनही आवर्जून केलं. कवी अनंत फंदी पुरस्काराने सन्मानीत (डिसेंबर २००७) त्यांच्या काव्यसंग्रहाचं नावही आहे रक्तगंध! दुसरं त्याचं पुस्तकही 'रक्तदानावरची घोषवाक्ये. उखाणे आणखी बरेच...' या शीर्षकाचं म्हणजे प्रदीपच्या प्रत्येक कामात आपसूक येतं ते केवळ रक्तदानच!

जनकल्याण रक्तपेढी, नाशिक या संस्थेचा तो संचालक आहे. शिवाय मनमाड सार्वजनिक वाचनालयातही तो संचालक आहे. रक्तदानातील या अतुलनीय कामगिरीबद्दल त्याला जिल्हा नेहरू युवा पुरस्कार, रक्तानंद संस्था ठाणेचा 'रक्तकर्ण पुरस्कार', जीवन संजीवनी पुरस्कार, धुळगाव, रक्तकर्ण गौरव चिन्ह, संत गाडगेबाबा प्रतिष्ठानचा निष्काम कर्मयोगी

पुरस्कार, अंकुर साहित्य संमेलन, अकोले यांचा जीवनदाता पुरस्कार आदी महत्त्वाच्या पुरस्कारांनी प्रदीपला सन्मानीत करण्यात आलेलं आहे.

नाशिक जिल्ह्यातील रक्तदान चळवळीचा पुढे जेव्हा केव्हा इतिहास लिहिला जाईल त्यात एक सुवर्णपान प्रदीप मदनलाल गुजराथी, मनमाड या आमच्या कविमित्राचं निश्चितच असेल! इतकं मोठं काम प्रदीपने केलेलं आहे. प्रदीपच्या या पवित्र कामाला माझा दिलसे लाल सलाम!



# ताजं टवटवीत जगणं
# **पुंडलिक फालक**

माझ्या घराच्या खिडकीतून जमिनीचा एक छोटासा तुकडा (खरं तर ९१ वाराचा प्लॉट) दिसतो. रोज सकाळी उठल्यावर किंवा येता-जाता हा हिरवाकंच तुकडा न्याहाळणं हा माझा छंद.

माझा हा आनंद वाटून घ्यायला माझं अख्खं घरही माझ्या सोबतीला असतं. आज काय केळीला घड लागलेले दिसताहेत. उद्या काय वांगे काय छान लागलेहेत. पोपईला पोपयाही किती लागल्याहेत ना? फुलझाडंही कशी छान फुललीहेत.. असं सर्व मनोहारी हिरवेपण मनाला अखंड प्रसन्नता देत राहतं.

...आणि या चिमुकल्या हिरव्यागार तुकड्यात अगदी गावाकडच्या पेहरावातील (ओपन शर्ट, धोतर, टोपी) असा पंच्याहत्तरीचा माणूस आपला समस्त अनुभव पणास लावून इथे अनेकविध प्रयोग करीत असतो. खरं तर त्यात रमत असतो. या ताज्या टवटवीत मनोवृत्तीचं नाव आहे पुंडलिक रामचंद्र फालक!

मी पाहतोय तसं या चिमुकल्या शेतीत पुंडलिक फालक यांनी इतके वेगवेगळे आणि यशस्वी प्रयोग केलेत की झाड आणि माणूस यांचं प्रसन्न नातं उमलताना-पाहताना आपण श्रद्धस्थ व्हावं. सिमेंटच्या जंगलातलं हे ओॲसिस अगदी कुणालाही जगायला बळ वगैरे देणारं आहे.

असे म्हणतात की, जीवन फुलपाखरासारखे जगावे. पण जीवनाचे ध्येय मात्र मधमाशीसारखे असावे. या सुंदर विचाराने काही माणसं कष्टप्रद जीवनही सहजतेने जगतात आणि सततच्या चिकाटीतून मधमाशीसारखा गोडवा निर्माण करीत राहतात. स्वत:साठी, कधी पिल्ला-लेकरांसाठी म्हणून जमा केलेला हा आनंद जेव्हा इतरांचाही होतो, तेव्हा या आनंदाचं मोलही मोठं असतं.

पुंडलिक फालक ते असेच एक सर्जनशील निर्माते आहेत. पूज्य साने गुरुजी, कवयित्री बहिणाबाई चौधरी, बालकवी ठोंबरेंच्या मातीतला हा माणूस आपल्या मसकावद (खुर्द) आणि एकूणच खान्देशच्या मातीबद्दल भरभरून बोलतो. 'नाशिककडे पैसा आहे, पण वस्तू नाही. खान्देशात वस्तू भरपूर आहेत. खान्देशच्या मातीतच एक चिवटपणा आहे. या मातीनेच आम्हाला अमर्याद कष्टाची प्रेरणा दिली.'

लहानपणी घरात एकत्र कुटुंबपद्धती होती. आजोबा मिठाराम दगडू फालक उत्तम आयुर्वेदिक डॉक्टर होते. उत्तम लेखक होते. म्हणून झाडपाला आणि वाचनाचे संस्कार बालवयात आणि घरातच मिळाले.

आजोबांच्या या संस्कारात आजही वयाच्या ऐंशीतही चष्म्याशिवाय वाचन सुरू आहे. ऐतिहासिक पुस्तकं हा जीव की प्राण. झाडा-माणसात रमणं हाच त्यांचा छंद बनून राहिला आहे.

लहानपणी गाव कसं फुला-फळांनी बहरेललं असायचं. कोणती म्हणून फळं खायची राहिली नाहीत. भरपूर फळं खाल्ली. खूप खेळलो-कुदलो. घरात दूध-तूप तर इतकं असायचं की, त्या खाण्यामुळेच आजही नखात रोग नाही. डोळ्याला चष्मा नाही. पायात चप्पल-बूटाचीही गरज नसते. वयाच्या ऐंशीतही कणा ताठ आहे. अजूनही दहा मैल पायी चालण्याची धमक अंगात आहे.

विशेष म्हणजे फालककाकांनी आयुष्यात कोणत्याच पेस्ट किंवा मंजनने दात घासले नाहीत. फक्त रोज चूळ भरली की फ्रेश. दातांचा वास नाही. दातदुखी नाही. आजही ऊस मोडून खायला सांगा. फालक

काकांची मजबूत शरीरयष्टी पाहिली की आजच्या चाळीशीतल्या माणसांची कीव यावी. टिकाव-फावड्याने शेती करताना पाहताना या माणसाचा खरोखरी हेवा वाटतो, पण वागणं-बोलणं अत्यंत नम्र, खान्देशी मार्दवाचं. लहानपणी सेवा दलाचे संस्कार झाले म्हणून श्रमप्रतिष्ठा अंगात भिनली. १९३६ साली फैजपूरच्या काँग्रेस अधिवेशनाच्या स्मृतीही मनात ताज्या आहेत. पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, गाडगीळ, खान्देशचे धनाजी नानाजी चौधरींसारखी उंच माणसं आम्ही पाहिली, ऐकली. स्वातंत्र्याच्या लढाईचा माहोल जवळून पाहिला, चळवळीची गाणी म्हटली, प्रभातफेऱ्या काढल्या. ते भारलेले दिवस, त्या स्मृती आजही फालककाकांच्या अगदी काल परवा घडल्यासारख्या मनात ताज्या आहेत. पुढे स्वातंत्र्य मिळालं. सर्वत्र उत्साहाचं-आनंदाचं वातावरण होतं. दरम्यान, १९४४ साली व्ह.फा. उत्तीर्ण झालो. इंग्रजी दहावीपर्यंत पाहोचलो होतो. पण शेतीच करायचं डोक्यात होतं. (शेती करणं त्यावेळी प्रतिष्ठेचं मानलं जाई) खूप मेहनतीनं शेती पिकवली. पैसा कमावला. लग्न केलं. फिरण्याची व नवं-नवं पाहण्याची हौस म्हणून संपूर्ण भारत फिरलो. परंतु नाशिक-त्र्यंबकबद्दल मनात एक आपुलकी होती. पवित्र भावना होती. कधीकाळी या गावात आपलं वास्तव्य होईल, असे स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण तसे व्हायचे होते. १९६०-६५ सालानंतर गावाकडच्या विहिरीचं पाणी बसलं. मळे सुकत गेले. मोटा बंद झाल्या. बागायत कमी झाली. शेती तोट्याची झाली.

प्राप्त परिस्थितीत त्यावेळी न खचता म्हशी सांभाळल्या. लाकुडफाटा विकला. मुलींची लग्नं चांगल्या घरात लावून दिली. रघुवीर आणि तीर्थराज ही त्यांची दोन मुलं उत्तम शिकली. दोघंही नाशिकच्या औद्योगिक वसाहतीत इलेक्ट्रिशियन म्हणून नोकरीला लागली. स्थिरस्थावर झाल्यावर मुलांकडेच राहायला आलो.

कामटवाडेसारख्या चांगल्या वस्तीत 'किनारा'सारखी देखणी वास्तू उभी राहिली. बंगल्याला लागूनच ९१ वाराचा फ्लॉट माझ्या शेतीच्या

हौसेसाठी मुलाने खरेदी केला. फालककाका हा प्रवास सांगताना तृप्त दिसतात. जमिनीचा हा तुकडा हाती आल्यावर फालककाका कामाला लागले. अगोदर सर्व जमीन नांगरून-वखरून घेतली. त्यात काळ्या मातीची भर घातली. स्वत:च जमेल तसं शेणखत जमा करून त्यात टाकलं. जागेचं नियोजन केलं आणि या चिमुकल्या शेतीत पीक निघू लागलं. आजमितीस या शेतीत केळीची चार-पाच झाडं (कंद), दोन-तीन पोपया, वांग्याची झाडं, आंबा, तूर, नारळ, पालक, मूळा, लसून, कांदा, अळू, वाटाणा, वाल, गवती (पाती) चहा, कढीपत्ता, अक्कलकरे (मसाल्यात वापराचे), मेथी, ज्वारी, हरभरा, आंबटचुका, सीताफळ, टोमॅटो, मिरची, पोकळ्याची भाजी, कापूस, नागवेली, चिकू, लिंबू, इतकं सर्व काही त्यात आहे.

एक पीक निघालं की दुसऱ्याची तयारी सुरू असते. मोठी फळझाडंही आहेत. कसले-कसले वेलही वाढत असतात. या शेतीतून किती पीक निघतं. उत्पन्नात ते किती परवडतं, हा भाग अलाहिदा, परंतु सतत, काहीतरी काम करीत राहणं आणि नवीन काहीतरी उगवत राहणं, फुलवणं हे विनम्र अशा फालककाकांना पाहणं आवडतं. नातवांना ही सर्व जिवंत हिरवीगार करामत दाखवणं! त्यांच्या आवडीचा भाग झालेला आहे.

सकाळी उठावं, पाण्याची खळखळून चूळ भरावी, स्नान, देवपूजा करावी आणि पेपरवाचन आटोपलं की या शेतात यावं, केरकचरा काढावा, चिमुकल्या झाडांना प्रेमाने हात लावावा, 'झाडांनाही हृदय असतं' या विचाराने झाडांची सुख-दु:खं समजावून घ्यावी, त्यांना पाणी द्यावं, त्यांची निगा राखावी अशी देव-घेव सुरू असते. झाडांच्यात रमताना फालककाका इतके तल्लीन होऊन जातात की, पांडुरंगाने सावतामाळ्याचा मळा सांभाळावा, तसे फालककाका या शेतीत रमून जातात. फालककाकांच्या तब्येतीचं आणि उत्साही असण्याचं गुपित विचारलं असता ते म्हणाले की, 'कुठे काय, कळणाची भाकरी, शेंगदाण्याची चटणी, मेथीची भाजी आणि दूध. बस्स. सकाळी लवकर

खावून घेतलं, दणदण काम केलं की, किप फिट!'' सतत काहीना काही काम करत राहणं हेच व्यसन, मित्र व्यसनी वगैरे असूनही पान, तंबाखू, विडी-सिगारेट, मांसाहार वगैरे कधीच केला नाही. सतत चांगलं वागण्याचं, राहण्याचा ध्यास घेत राहिलो. त्यामुळे मुलंही निर्व्यसनी आहेत. आपलं चांगलं वागणं हीच सगळ्यांना शिकवण असते. त्यासाठी वेगळं काही शिकवावं लागत नाही.

एकदाच मिळालेला मनुष्यदेह छान कारणी लावावा. सुंदर-सुंदर झाडं लावावी, वाढवावीत, मुला-नातवांत शांतपणे रमावं. व्यसनपाणी करू नये. सर्वांशी प्रेमाने वागावे हे तत्त्वज्ञान स्वीकारून आजपर्यंत जगत आलोय, असं फलककाका सांगतात.

विशेष म्हणजे झाडांप्रमाणे त्यांची आपल्या राहुल, रेणू, रत्ना, आकाश आदी सर्व नातवांशीही गच्च मैत्री आहे. नातवांना सोबत घेऊन झाडांमध्ये काम करण्याचं समाधान त्यांना वाटतं. उद्याची ही पिढी झाडांशी मैत्री ठेवून असायलाच हवी! असा त्यांचा हट्ट असतो. मुलांचं खेळणं असो, अभ्यास असो, त्यांना शाळेत पोहोचवणं असो फालककाकांना तो एक आनंदाचा भाग वाटतो. घरोघरी असे एक प्रेमळ आजोबा असावेत, असं वाटतं.

प्रत्येकालाच फालककाकांसारखा छान शेतजमीनीसारखा असा एखादा तुकडा झाडं वगैरे वाढविण्यासाठी मिळेलच असं नाही. पण प्राप्त जागेत प्रत्येकाने झाडं ही वाढवलीच पाहिजेत. आपल्या घरातल्या नातवांना झाडांशी मैत्री करायला शिकवलं पाहिजे. कार्यप्रवण राहणं म्हणजेच हिरवंगार टवटवीत राहणं! असं फालककाकांना वाटतं.

फालककाकांच्या शेतीत एक औषधी कोरफडही दिसली. तेव्हा वाटलं फालककाकांसारखी माणसं ही समाजातली औषधी माणसंच! आपण त्यांना आदरपूर्वक वंदन करायला शिकणं आणि फुलासारखं त्यांचं मन जपणं! हे तर आपण सहज करू शकतो ना?



# नाविन्यपूर्ण संगीतकार
# **मधुकर झिराडकर**

सध्या नाशिकमध्ये वास्तव्यास असलेले व आकाशवाणीचे मान्यताप्राप्त संगीतकार श्री. मधुकर झिराडकर यांचा परिचय...

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होताच आपला पूर्ण वेळ 'संगीता'साठीच देवून आज 'मधुकर झिराडकर' हे नाव नाशिकच्या संगीत विश्वात अत्यंत आदराने आणि प्राधान्याने घेतलं जातंय. अशा संगीतकार झिराडकरांचा हा अल्प परिचय.

शाळेत-महाविद्यालयात शिकत असतानाच वेगवेगळ्या वाद्यांशी त्यांची जवळीक वाढू लागली. गाणे-संगीत अंगात भिनू लागले आणि वेध लागले ते संगीतकार होण्याचे; पण घरात मात्र त्या दृष्टीने अनुकूल वातावरण असं नव्हतं. मग त्यांनी स्वत:च पैसे जमवून हार्मोनियम विकत घेतली, तीदेखील घरी रागावतील म्हणून काही दिवस मित्राकडेच ठेवली आणि स्वत:च स्वत:चे गुरू होऊन ते संगीत शिकू लागले. काही निवडक पुस्तके मात्र त्यांनी समोर ठेवली. तासन्‌तास कलेचा व्यासंग, अनुभव यातून अल्पकाळातच त्यांना पुष्कळसं जमून गेलं, पण त्यामागे होती ती कठोर तपश्चर्या. दरम्यान, चरितार्थासाठी त्यांनी शासन सेवेत नोकरी पत्करली. सन १९५६-१९९४ पर्यंत मंत्रालयात न.वि. विभाग, नगरपालिका प्रशासन व पर्यावरण विभागांत नोकरी करीत ते जिद्दीने अप्पर सचिवपदापर्यंत

पोहोचले. कार्यबाहुल्यात 'संगीत' मात्र सुरूच होतं. मैफिली, रियाज, गाणी ऐकणे, चाली देणे असे नित्य त्यांचे काम सुरूच होते. यातूनच झिराडकर अधिकाधिक शिकत गेले. प्रगल्भ होत गेले. ही वस्तुस्थिती आहे.

या क्षेत्रातील त्यांच्या कलेची दखल घेऊन त्यांना शासनाच्या अर्थ विभागाच्या लॉटरीसाठी तीन ॲड साँग्स (जिंगल्स)ची कामे देण्यात आली. त्यात अरुण इंगळे, श्रीकांत पारगावकर (पुणे) हे गायक होते. लागलीच त्यांना मुंबई दूरदर्शनवर पर्यावरण या विषयावर 'राहुल व वनराणी' ही संगीतिका सादर करण्याची संधी मिळाली. कामाच्या रगाड्यात सुटी मिळताच सर्व वेळ संगीत कलेसाठी खर्च होई. त्यात त्यांना मनस्वी आनंद होताच. तरीही झिराडकर 'व्यावसायिक कलाकार' मात्र कधीच होऊ शकले नाहीत, ही खंत आजही त्यांना लागून राहिलेली आहे.

झिराडकरांच्या हिंदी-उर्दू स्वररचना तर इतक्या उल्लेखनिय होत्या, की मुंबईतील 'जी सिरीज' कंपनीने 'खुशबू' या नावाने त्यांची गझल कॅसेट काढली. खुशबू कॅसेटबद्दल 'जनसत्ता' दैनिकात झिराडकरांच्या नाविन्यपूर्ण संगीताची तारीफ करण्यात आली होती.

निवृत्त होताच त्यांच्यातल्या संगीतकाराने पुन: नव्याने उभारी घेतली आणि १९९५ मध्ये 'म्युझिक कंपोझर' म्हणून मुंबई आकाशवाणीवर त्यांची निवड झाली. 'भावसरगम'सारखा सुमधूर गीतांचा कार्यक्रम केल्यानंतर बाबासाहेब सौदागर यांच्या कविता त्यांना स्वरबध्द करण्यास देण्यात आल्या आणि मग संगीतकार म्हणून झिराडकर प्रकाशझोतात आले. 'देखण्या उन्हाचे डोळे अंगाला बिलगून जाते...' हे गीत वैशिष्ट्यपूर्ण ठरले व ते कमालीचे लोकप्रियही झाले.

यानंतर त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने उघडला तो मुंबईचा दूरदर्शनचा पडदा. यावरील सुगमसंगीताचा कार्यक्रम लक्षवेधी ठरला. रवींद्र बिजूर आणि शामा चित्तार या प्रथितयश गायकांमुळे झिराडकरांकडे नवनवीन

गायकांची गर्दी वाढू लागली.

दरम्यान, आकाशवाणीवरदेखील कार्यक्रम सुरूच होते. रवींद्र बिजूरांबरोबरच शामा चित्तार, शोभा जोशी, मिलिंद इंगळे, वैजयंती लिमये, मंजिरी सावंत, सरिता भावे आदी नामवंत गायकांनी त्यांची गाणी गायली.

रोज नवनवीन शिकण्याची हौस असलेल्या झिराडकरांची ओळख पुढे पद्मश्री अब्दुल हालीम जाफर खाँ या जगविख्यात सितारवादकाबरोबर झाली. त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्व व प्रगल्भतेमुळे झिराडकर भारावून गेले. दिलदार खाँ साहेबांनी त्यांच्या रचना तर ऐकल्याच. परंतु मार्गदर्शन करून कौतुकही केलं. शिवाय नामवंत अशा शास्त्रीय गायक-गायिकांशी ओळख करून दिली. म्हणून खाँ साहेबांना झिराडकर गुरुस्थानी मानतात. तसेच गिनिज बुकात नोंद झालेले संगीतकार राजेंद्र बर्मन यांच्या 'स्वरांकूर' संस्थेचे सचिव म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्याचबरोबर त्यांच्या पन्नासाव्या सुवर्णजयंती महोत्सवात श्रेष्ठ व दिग्गज कलाकारांची ओळख करुन देणारे निवेदन झिराडकरांचेच होते.

झिराडकर नाशिक कलानगरीत स्थायिक झाल्यावर त्यांची प्रथम ओळख झाली ती शीघ्रकवी गोपाळराव देशपांडे यांच्याशी. सूरही जुळले, हळूहळू ओळखही वाढत गेली. स्व. कुसुमाग्रज, गोपाळराव देशपांडे, किशोर पाठक, मोहन ओढेकर, प्रशांत महाबळ, गंगाधर पाटील आदीच्या कविता स्वरबध्द होऊ लागल्या. निवेदक म्हणून नावारूपास आलेले शाम पाडेकर, सदानंद जोशी आणि गायकही ताज्या दमाचे! प्रसाद दुसाने, अपर्णा देशपांडे, यशोधरा गोसावी, रेणू पाटणकर, अझर जावेद, विनोद कुळकर्णी, संजय किल्लेदार, विद्या कुलकर्णी (एकबोटे) सारख्या गायकांनी त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली आवडीने गाणी गायली.

नाशिकमध्ये १९.६.१९९९ रोजी लोकहितवादी मंडळाच्या वतीने 'ज्योतिकलश'मध्ये नाशिकच्याच कवी व गायक अर्थात संगीताने नटलेला 'मन भिजलं' आणि कारगील शहीद जवानांसाठी प्रणाम म्हणून

'मानवंदना तुला जवाना' हा कार्यक्रम परशुराम सायखेडकरमध्ये झाला. त्या गीतांचे बोल आणि झिराडकरांचे संगीत चिरकाल रसिकांच्या मनात रुंजी घालत राहणार, यात संदेह नाही. नाशिक आकाशवाणीवर त्यांनी जून ९९ मध्ये कविश्रेष्ठ कुसुमाग्रज, किशोर पाठक व गोपाळराव देशपांडे यांच्या कवितांवर बसविलेला सुगमसंगीताचा कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रमदेखील चांगलाच श्रवणीय झाला.

झिराडकर नाशिकमधील कवींबरोबरच कवी ग्रेस यांच्या कविता स्वरबध्द करण्यात मग्न आहेत. 'नाशिक फेस्टीवल'साठीही त्यांची निवड झालेली होती. सध्या अनेक कार्यक्रमांत झिराडकरांचं नाव प्राधान्याने असतं!

प्रथितयश कवींबरोबरच प्राधान्याने नवोदित कवी, उदयोन्मुख गायक, वादक हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय. 'प्रयोग' आणि 'कार्यक्रम' सातत्याने सुरूच आहेत. त्यासाठी झिराडकरांचं तनमनधनाने झोकून देणं थक्क करणारं आहे. तरीही कार्यक्रमाची आखणी, बैठका, रियाज, कलाकारांचं मानधन व प्रत्यक्ष कार्यक्रमावर होणारा आवश्यक खर्च यासाठी संगीत मैफिलीसाठी एखादे भक्कम व्यासपीठ आणि प्रायोजक मिळणं, त्यांना आवश्यक वाटते. वयाच्या सत्तरीनंतरही झिराडकरांच्या रक्तात संगीत पक्के भिनलेले आहे. संगीत हेच त्यांचे जीवन झाले आहे. नव्हे आत्मा, श्वास झाला आहे, याचा परिचय त्यांच्या इंदिरानगर येथील 'निनाद' या राहत्या घरी गेल्यावर प्रत्येकालाच येतो. प्रसिद्ध संगीतकार स्व. आर.डी. बर्मनसाहेबांनी झिराडकरांना दिलेली कार, गुरुवर्य खाँसाहेबांनी दिलेला तंबोरा दिवाणखाण्यात प्रथम दर्शनीच आपले स्वागत करतो. तेथेच होर्मोनियम आणि तबलाही आहे. त्यात मंद आवाजात ऐकू येणारे कर्णमधुर संगीत असे सर्व संगीतमय माहोल नित्याचे. झिराडकरांना कोणत्याच विषयाचं वावडं नसलं तरी संगीत या विषयावर ते विशेष खुलतात. आलेले अनुभव आणि नवीन माणसांकडूनही काही नवीन शिकता येईल का? याचा शोध सुरूच असतो. ते म्हणतात, या कलेत

मी विद्यार्थी म्हणून शेवटच्या क्षणापर्यंत संगीताभ्यास सुरूच ठेवणार आहे.

घरात स्वागतासाठी नेहमीच हसतमुख असतात त्या त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. ज्योतिमादीदी. संगीत चर्चेत त्याही आवडीने सहभागी होतात. त्यांनाही संगीताचा उत्कृष्ट कान तर आहेच, त्याच बरोबर चांगली समजही आहे. झिराडकरांच्या चारही विवाहित कन्या संगीतात अभिरुची ठेवणाऱ्या आहेत. म्हणून घरात संगीत या विषयाला आवश्यक असे वातावरण, प्रोत्साहन आहे. तेव्हा झिराडकरांची संगीत साधना यशस्वीपणे अखंड सुरू राहो, अशी नटराजचरणी प्रार्थना करतो.

रमेश उबाळे यांच्या 'मन मुठीतून घरंगळताना' या काव्यसंग्रहातील काही निवडक कवितांचा झिराडकरांनी एक सांगीतीक कार्यक्रम केला. तो कार्यक्रम ऐकताना उपस्थित सर्व कवींना असं आवर्जून वाटलं की, झिराडकरांनी आपली एकतरी कविता स्वरबद्ध करावी! इतकी ती एक जमून आलेली मैफिल होती. मी स्वत: असा एक भाग्यवान कवी आहे की, माझ्या कवितेला त्यांनी स्वरसाज चढविलेला आहे. माझ्या त्या कवितेची ओळ होती.

'करता तुझी पाठवण, झाली हळवी आठवण!'

होय, आकाशवाणीवर स्वरबद्ध झालेलं हे गीत माझी एक हळवी आठवण आहे!



# निवेदक क्षेत्रातील परिपूर्ण आवाज
# **स्मिता रणदिवे**

'जो विचारशील आहे, प्रयत्नवादी व आशावादी आहे, त्याला यश प्राप्त करणं अवघड नसतं. यशाची गंगोत्री माणसाच्या उच्च विचारात आहे. ज्याचे विचार थोर, ज्याची मेहनत अपार किंवा ज्याच्या विचारांचे क्षितिज गगनाला गवसणी घालण्याइतके अमर्याद, तोच खरा यशस्वी'! असे मानले जाते.

रेडिओ मिर्चीच्या 'जॉकी' असलेल्या आपल्या नाशिकच्याच स्मिता रणदिवे यांना नाशिकरोडच्या त्यांच्या आईच्या घरी आम्ही भेटायला गेलो. होय, स्मिताजींचं माहेर आपल्या नाशिकरोडचं आहे. घर तसं आई-वडिलांचं! तरी बैठकीतच स्मिताजींचा प्लेझंट लूकमधील एक क्यूट चेहऱ्याचा फोटो लावलेला. तो फोटो इतका बोलका आहे की, अगदी नाही म्हटलं तरी अगदी कुणाचंही लक्ष त्यावर आवर्जून जावं. ब्लॅक ॲण्ड व्हाईटमधील स्मिताजींची ही छबी एखाद्या निरागस, कोमलतेची सुंदर साक्ष देते, असेच वाटते. स्वत: स्मिताजींनीच आमचं हसून स्वागत केलं. घरात त्यांचे आई-वडील होते. दोघेही अगत्यशील वाटले. मध्येच त्यांचा भाऊ (कॅप्टन) आम्हाला जॉईन झाले आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांचे यजमान (पती) डॉ. अमित हेही त्यावेळी उपस्थित होते. या सर्वांच्यात स्मिताजींबरोबर आमच्या मुलाखतवजा गप्पा सुरू झाल्या.

दरम्यान, आईंनी छान कांदापोहे नि चहा करून आणला.

प्रथम स्मिताजींना मी आमची ओळख करून दिली. आमचे मित्र दीपक दंडवतेंनी अगोदर तशी रुजवात करून दिलेली होतीच. कादवा शिवारची भूमिका थोडक्यात सांगितली आणि आपली मुलाखत ही केवळ एका सिलेब्रिटीची अंकातील उपस्थिती किंवा प्रसिद्धीचा सोस वगैरे नाही, हे अगदी आवर्जून सांगितले.

तर आपल्याच नाशिकची मराठी-इंग्रजी अशा माध्यमातून शालेय शिक्षण झालेली व घरात निवेदक, सूत्रसंचालक, उद्घोषक असली काही स्टार पार्श्वभूमी नसताना आपल्या नाशिकची एक मुलगी आपल्या जादूई आवाजाने 'पुणं' कसं जिंकते! किंवा येथील ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी म्हणून आपण कसे एक आयडॉल (प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व) ठरू शकता! हे त्यांना सांगितलं. याशिवाय इतर सर्वसामान्य रसिकांसाठी रेडिओ जॉकीचं काम, स्वरूप आणि कामाचे प्रत्यक्ष अनुभव जाणून घेणं याचीही उत्सुकता मनात होती. एका वेगळ्या कलाक्षेत्रातील गुणी कलावंत असलेल्या स्मिताजींचा परिचय कादवा शिवारच्या राज्यभरातील रसिक वाचकांना करून देण्याचा मानस सांगितला.

'कादवा शिवार'ची भूमिका आमच्या दीपक दंडवतेजींनी प्रत्यक्ष भेटीपूर्वी करून दिलेली होती आणि आता आपल्या मुलाखतीमागील उद्देश सांगितला. त्यावेळेस स्मिताताईंच्या चेहऱ्यावर जे भाव उमटले ते इतके प्रसन्न, ताजे, टवटवीत आणि उत्साहाचे होते की, आम्हाला मुद्दाम म्हणून प्रश्न विचारून त्यांना बोलतं करावं लागलं नाही. उलट विचारांचे 'सूर' छान जुळत गेले. मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. त्याचा हा वृत्तांत, स्मिताजींच्याच शब्दात.

'माझे वडील मिलिटरीत. आई प्रेसमध्ये नर्स म्हणून सेवेत. आमचं कुटुंब मध्यमवर्गीय. आई-वडील, एक भाऊ आणि मी, असं छान चौकोनी कुटुंब. आमच्या घरातच वाचनाचे संस्कार होते. आजोबा उत्तमराव रणदिवे कवी होते. पणजोबा तर कीर्तनकार होते. आईवडील

शिस्तप्रिय आणि प्रेमळ. आधुनिक विचारांचे. घरातील सर्वांनाच वाचन, गायन व वक्तृत्व वगैरेमध्ये अतोनात रस. त्यामुळे घरात कुणीही मला एक 'मुलगी' म्हणून वेगळं वागवल्याचं एकही उदाहरण माझ्याजवळ नाही. माझा स्वभाव मुळातच बोलका. उत्साही. त्यामुळे प्रत्येक स्पर्धेत मला भाग घ्यावासा वाटे. लहानपणापासून मी भरपूर गाणे ऐकायची!

गाणं ऐकण्याबरोबरच ते म्हणण्याचीही विलक्षण आवड मला होती व आहे म्हणून संगीतकार नौशादजींचे शिष्य राहिलेल्या पं. महंमद हुसेनजींकडे मी गायनाचा क्लासही लावला होता. संगीताचं थोडंबहूत शिक्षण त्यांच्याकडे मी घेतलं आहे. मराठी व नंतर इंग्रजी माध्यमात माझं शिक्षण झालं. बी.एस्सी. पर्यंत शिक्षण नाशिकलाच झालं. त्यावेळी एन.सी.सी. घेतल्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वात एक शिस्तप्रियता व रुबाबदारपणा आला, असं मला वाटतं.

तशी अभ्यासात वगैरे मी फार स्कॉलर नव्हते. सत्तरएक टक्क्यांपर्यंत माझी रेंज असे. पण शिक्षण चालू असताना कलाक्षेत्राकडे माझी विशेष ओढ असे. पेपर वाचन, रेडिओ ऐकणं, टीव्हीवर विविध कार्यक्रम पाहणं मला विशेष आवडे आणि आपणही असं छान बोलू शकतो हा विश्वास मनात होता. त्यावेळी नाशिक आकाशवाणीवर असलेले निवेदक संजय भुजबळ यांची मी फॅन (चाहती) होते. त्यांचा सुस्पष्ट, गोड आवाज, शब्दांची अचूक फेक आणि निवेदनातील नवेपणा, ताजेपणा, हजरजबाबीपणा मला भावला होता. त्या वेडात मी एकदा थेट नाशिक आकाशवाणीवर पोहोचले. तेथे मी संजय भुजबळांना प्रथमच भेटले. ते माझ्याशी व्यवस्थित बोलले. शिवाय आकाशवाणीचे तत्कालीन कार्यक्रम अधिकारी लियाकत अली सय्यद यांनाही मी भेटले. त्यांनी माझ्यातील 'आवाज' अचूक ओळखला. माझा आवाज चांगला असण्याची एक रसिक दाद दिली. इंटर म्हणून काम करण्याची सूचना केली. लागलीच मी तेथे कामाला सुरुवात केली. पंधराएक दिवस मी तेथे मजेत काम केलं. त्यानंतर गोविंदा न्यूज लिंकवर मी एक न्यूज रायटर होते. गोविंदा

धूममध्ये मी होते. एका कार्यक्रमाचे साधारण १५० रुपये मानधन मला त्यावेळी मिळत असे. परंतु हे उमेदिचे दिवस मी छान एन्जॉय केले.

दीडेक वर्षे अशी सर्व प्रकारची पडतील ती कामं मी समरसून केली. 'साद-पडसाद' हा आकाशवाणीच्या रसिकश्रोत्यांच्या पत्रोत्तराचा कार्यक्रम मी केलेला आहे. त्याचं २-३ महिन्यांचं मानधन एकत्रित मिळालं आणि आपण 'कमावती' झाल्याचा पहिला आनंद माझ्या आजही छान स्मरणात आहे. परंतु करियरसाठी उच्च शिक्षणही आवश्यक वाटत होतं. म्हणून एम.एस्सी. करण्यासाठी म्हणून मी पुण्याला गेले. तिथे मी 'किडयां'चा सूक्ष्म अभ्यास करणार होते. पण तो करताना कलेचाही 'कीडा' मनात रुंजी घालत होता.

तशात पुणे आकाशवाणीवर दिवाळीत एक जाहिरात माझ्या ऐकण्यात आली, 'निवेदका'ची! ऑडिशनला साधारण आम्ही ३००० मुलं-मुली होतो. ऑडिशन दिली, पण पुणेरी लोकांच्यात आपल्यासारख्या नाशिककराचा कसा काय निभाव लागणार? या विचारात उत्साहाने दिलेली ही ऑडिशन पुढे मी चक्क विसरूनही गेले.

आणि काय आश्चर्य! तीन महिन्यांच्या अवधीनंतर मला प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलवण्यात आले. तेव्हा मला प्रथमच समजलं की, आपली निवड ही आकाशवाणीसाठी झालेली नसून 'रेडिओ मिर्ची' ह्या टाईम्स ऑफ इंडियाच्या खासगी चॅनलसाठी झालेली आहे. ते साल होतं-२००२! निवेदनासाठी भाषेचा खास असा 'लेहजा' समजून घ्यावा लागला होता. त्यासाठी उत्तम ते ऐकणं, वाचन, निरीक्षण, चिंतन, मनन यातून मी घडत होते. म्हणूनच की काय, माझं काम छान चाललेलं होतं. अशीच एकदा तुळशी बागेत चादरी विकत घेताना केवळ माझा आवाज ऐकून तेथे असलेल्या एका श्रोत्याने मला अचूक ओळखलं. माझ्या आवाजाची मला दाद दिली होती. असंच एकदा मी रिक्षातून जात असताना आमचं रिक्षातलं आपसातलं बोलणं ऐकून रिक्षावाल्याने मला ओळखलं, शिवाय माझ्या 'खुबसूरत' या कार्यक्रमाचंही नाव

सांगितलं. तेव्हा माझं मलाच कौतुक वाटलं. आनंदही झाला.

मुळात माझा आवाज उद्घोषकासाठी फार स्पेशल किंवा टिपिकल वगैरे नाही. त्यात फारसा गोडवाही नाही, याची मला नम्र जाणीव आहे. परंतु माझे शब्द प्रभावी व्हावेत आणि भाषा सौष्ठव होण्यासाठी मी घेत असलेली मेहनत यामुळे अशा प्रकारचे अनेक चांगले अभिप्राय तर मिळालेच आणि प्रत्यक्ष कामावरही चांगल्या संधी मिळत गेल्या. 'उत्तम निवेदक' होण्यासाठी माझे परिश्रम सतत सुरू असतातच. त्यामुळे माझ्या कामात एक सफाईदारपणा जरूर आलेला आहे. त्यामुळे रेडिओ मिर्चीवर मोठमोठ्या सेलेब्रिटीजबरोबर प्रत्यक्ष कार्यक्रम करण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची अपूर्व संधी मला मिळाली. त्यात भारतरत्न पं. भीमसेन जोशी, स्वरसम्राज्ञी लतादीदी, चित्रपट तारका आशा पारेख, धर्मेंद्र, जॅकी श्रॉफ, अमिर खान, महेश मांजरेकर, कंवलजीत, श्रेयस तळपदे, स्मिता तळवळकर, अशोक सराफ-निवेदिता जोशी, समिरा गुजरपासून क्रिकेटपटू संदीप पाटील, कपिलदेव अशा साधारण दीडेकशे स्टार कलावंत-खेळाडूंबरोबर काम करण्याचा माझा अनुभव, आनंद केवळ अवर्णनीय असा आहे.

याहीपेक्षा अधिक समाधान देणाऱ्या गोष्टी या कामातून मला जरूर मिळालेल्या आहेत. माझा रेडिओ मिर्चीवरचा कार्यक्रम ऐकून पुण्यातील एक मतीमंद असलेली मुलगी दररोज त्यादरम्यान जेवण करते. परंतु एकदा लाईट गेली म्हणून रेडिओ लागला नाही. म्हणून माझा कार्यक्रम ऐकू न आल्यामुळे ती मुलगी जेवेना. शेवटी तिच्या आईने मला फोन करून तिच्याशी बोलायला सांगितलं. मी इकडून 'हॅलो, हॅलो' करत असताना समोरून काहीच आवाज येत नव्हता. त्यानंतर आईने परत बोलायला सुरुवात केली, 'माझी मुलगी तुमचा हा कार्यक्रम ऐकतच जेवण करते. आज लाईट नसल्यामुळे तिला तुमचा आवाज ऐकता आला नाही. म्हणून खूप मेहनतीने तुमचा नंबर मिळवला. कारण ती मतीमंद आहे.' मी तिचं माझ्या आवाजावरचं ते प्रेम ऐकलं नि आपण या क्षेत्रात आल्याची सर्वात

सुंदर 'कॉम्प्लिमेंट' त्यादिवशी मला मिळाली. काळजातल्या एका कुपीत मी ती 'दाद' अलवारपणे जपून ठेवलेली आहे. तसेच २००६ साली तेथील रोटरी क्लबने 'व्होकेशनल आर.जे.' म्हणून कवी संदीप खरेंच्या हस्ते पुरस्कार देऊन मला सन्मानीत केले. तसेच पुण्यातीलच ८२ वर्षे वयाचे एक चव्हाणकाका म्हणून माझे फॅन आहेत. ते मला नियमित अभिप्राय देतात. सूचना वगैरे करतात. त्यांचंही समाधान पुरस्काराइतकंच मला मोलाचं वाटतं. 'रातबाकी' नावाचा माझा कार्यक्रम पुन: सुरू करावा म्हणून रसिकश्रोत्यांनी केलेली मागणीही मला माझ्या कलासाधनेची एक मोठी पावती वाटते. 'पुराणी जीन्स' हा माझा कार्यक्रम तर सर्व युवकांत प्रचंड लोकप्रिय आहे. त्याच्याही कितीतरी सुंदर आठवणी, अभिप्राय माझ्याकडे आहेत. त्यामुळे मी सुखावले जरूर. त्यापेक्षा अशा चौफेर अभिप्रायातून मी आणि माझं निवेदन खुलत-बहरत गेलेलं आहे. सामाजिक बांधिकली म्हणूनही काही कार्यक्रम मी अगदी मन:पूर्वकतेने केले. त्यात अंध मुला-मुलींसाठी सुरू केलेला वाचन प्रकल्पात मी रसिक श्रोत्यांनाही सहभागी करून घेतलं. त्यासाठी ५०० रसिक श्रोत्यांनी आपली नावे स्वत:हून नोंदवलीहेत. चांगल्या चित्रपटांच्या सीडीज, सायकल, एक खेळणी, एक पुस्तक आम्ही या मुलांना दिलीत. 'चलते चलते' या आमच्या कार्यक्रमातून ही कल्पना पुढे आली. आमच्या या उपक्रमाला रसिकश्रोत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. मुलांना निर्भेळ, सृजनात्मक आनंद मिळाला. कुठे सासू-सुनांचे संबंध चांगले झाले. मुलांनी चांगलं वागण्याचा संकल्प केला. मुलं छान वाचती झाली. अशा चौफेर अभिप्रायातून माझ्या कामाला गती आली, शिवाय निश्चित अशी एक दिशाही मिळाली.

**'पुरानी जिन्स', 'खुबसूरत', 'चलते चलते' अशा माझ्या विविध कार्यक्रमातून '९८.३ एफ.एम. रेडिओ मिर्ची' वरून सोमवार ते शुक्रवार माझा आवाज नाशिकसह पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर या जिल्ह्यातील श्रोते दररोज ऐकत असतात.** त्यांचे

अभिप्राय मनाला सुखावून जातात. उत्साह वाढतो. कामात नावीन्य आणि चांगलेपणा येण्यासाठी मी सतत प्रयत्नशील राहते.

माझ्या या 'आवाजी' दुनियेत एक काळजातला आवाज मला भक्कम अशी साथ देत आलाय, तो म्हणजे माझे यजमान (पती) डॉ. अमित यांचा! आमचं दोघांचं क्षेत्र एकच असलं तरी ते एक प्रोफेशनल असे आवाजाचे कलावंत आहेत. विविध जाहिराती, कार्यक्रम, निवेदन, सूत्रसंचालनाची कामे ते आपला पेशा वगैरे सांभाळून व्यवस्थितपणे करतात. माझ्या या रेडिओ मिर्चीच्या कार्यक्रमात नाव, पैसा, ग्लॅमर, प्रसिद्धी तर चिकार आहे. परंतु त्याचा कुठलाही हेवा, गैरसमज वगैरे न करता माझे पती डॉ. अमित मला सतत प्रोत्साहित करीत आलेले आहेत. त्यांच्या सूचना, अनुभव यामुळेच या क्षेत्रात आज मी भक्कमपणे पाय रोवून वाटचाल करत आहे. त्यांनी या कामी वेळोवेळी मला दिलेल्या टिप्स नेहमीच उपयोगी पडतात. माझं काम हे अधिक देखणं, वेगळं आणि परफेक्ट होण्यात अमित यांचा वाटा महत्त्वाचा आहे. डॉ. अमित यांचा स्वत:चा आवाज अगदी स्पेशल नि उच्च प्रतिचा आहे. आम्ही दोघांनी मिळून पुण्यात अनेक कार्यक्रम केले आहेत. त्यापेक्षा एक नवरा, मित्र, मार्गदर्शक अशा वेगवेगळ्या नात्यात घरासह त्यांनी मला छान समजून घेतलं आहे. एक स्वतंत्र माणूस, स्वतंत्र कलावंत म्हणून त्यांनी मला दिलेली 'स्पेस' माझा उत्साह, समाधान वाढवत असते. आमचं दोघांचं लग्न ठरवून झालेलं असलं तरी व्यवसायातलं साधर्म्य, स्वभावातलं साम्य आणि कलेची साधना या त्रिवेणी संगमातून आमचे 'सूर' 'मेड फॉर इच अदर'सारखे छान जुळलेहेत.

माझ्या या नोकरीत केवळ चांगलेच अनुभव गाठीशी आहेत, असं नाही तर रेडिओ मिर्ची ऐकून काही फॅनचे मला आलेले फोन्स कधीकधी त्रासदायक वाटले. एका फॅन्सने तर माझा इतका पिच्छा पुरवला की, कुंडली आणि फोटो पाठवून लग्नाचे प्रपोजल त्याने माझ्याकडे मांडलं. तेव्हा रेडिओ मिर्चीने माझ्या नवऱ्याला, 'मॅडमला तुम्ही सोडवायला थेट

आतपर्यंत येत चला!' म्हणून विनंतीपूर्वक सुचवलं. तो फॅन काहीतरी पंचावन्नएक वयाचा होता. त्यावेळी डॉ. अमित यांनी मला समजून घेतलं. 'तुझा आवाज छान आहे. त्यामुळे असे प्रसंग येत राहतील. आपण आपलं काम करत रहावं', पुढे कंटाळून तो फॅन अर्थातच गायब झाला. कधीकाळी ज्या संजय भुजबळांची मी फॅन होती, त्यांची एका कार्यक्रमात आमची भेट झाली. त्यांनी मला माझ्या कामाचा छान अभिप्राय देताना 'तुमच्या आवाजाचं, आमचं घर फॅन आहे', असा दिलखुलास अभिप्राय दिलेला मला आठवतो. त्यावरून मी एकच गोष्ट समजले की, 'आपलं काम योग्य दिशेने सुरू आहे!' एवढं सांगून स्मिताजींनी आपलं निवेदन छान वेळेत, अचुकपणे पूर्ण केलं.

'रेडिओ मिर्ची', युवकांच्यात तर प्रचंड लोकप्रिय आहे. परंतु आपल्या जादूई आवाजाने रेडिओ मिर्ची घराघरात आणि मनामनात योग्य पद्धतीने पोहोचविण्याचं काम स्मितानाई करताहेत. एक निवेदक, उदघोषक, रेडिओ जॅकी म्हणून अनेक थोर, दिग्गज अशा कलावंत, खेळाडूंबरोबर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. परंतु परिस्थितीने गांजलेल्या, पीडित, दुःखी अशा हजारो-लाखो सर्वसामान्य माणसांच्याही आयुष्यात काही क्षणांचा एक निर्मळ, निर्भेळ, सात्विक आनंद आपल्या आवाजाने स्मितानाईंनी पेरण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. कादवा शिवारच्या रसिक श्रोत्यांच्यावतीने त्यांच्या या कलेला मनापासून दाद म्हणून असे म्हणता येईल की,

'माणूस किती मोठ्या माणसात वावरतो, यापेक्षा तो किती मोठ्या समुदायाला प्रेम देऊ शकतो, हे महत्त्वाचं!' स्मितानाई, हे त्यांचं एक सुंदर उदाहरण आहे.



# वैशिष्ट्यपूर्ण कर्मचारी
# **सुभाष दिवटे**

सरकारी माणूस म्हटला की, रुटीनता, रुक्षता हीच त्याची ओळख. त्यामुळेच सरकारी माणूस आणि त्याची प्रतिमा हा आजच्या जनमानसातला एक टिंगलटवाळीचा विषय झालेला आहे, प्रत्यक्षात मात्र तसे नसतेही. ही झाकली 'माणकं' बऱ्याचदा प्रकाशात किंवा प्रसिद्धीच्या झोतात येत नाहीत इतकंच! कारण त्यांचं काम, छंद, आवड हा मूळात शासनसेवेचाच एक भाग असल्याने त्यांच्या या 'वेगळेपणाची' नोंद फार तर सरकारी दप्तरात (गोपनीय अहवाल, सेवापुस्तक इत्यादी) होते. ही सरकारी दप्तरातली नोंद सर्वसामान्य जनतेपर्यंत सहसा येत नाही.

कर्तव्यभावनेबरोबरच या कामात ते आपलं संपूर्ण कौशल्य, अंगमेहनत, मुख्य म्हणजे 'जिव्हाळा' त्यात ओतत असतात. त्याची त्यांच्या शरीराला, मनाला सवय होते नव्हे तोच या लोकांचा छंद असतो. एखाद्या अभिजात कलावंतासारखं, व्रतस्थ तपस्यासारखं हे सर्व काम अत्यंत निष्ठेने सुरू असतं. अशाच एका छंदिष्ठ सरकारी कर्मचाऱ्याचा हा परिचय.

'सुभाष दिवटे' हे त्यांचं नाव. हा माणूस १७५ वर्षांपासूनचं अमूल्य असं सरकारी दप्तर (रेकॉर्ड) अत्यंत प्राणपणाने गेली ३५ वर्षे सांभाळतोय. महत्त्वाचं म्हणजे दिवटे हे 'दप्तरी' या पदावर काम करत नाहीत. ते नाशिक पाटबंधारे विभाग या अत्यंत जुन्या अशा सरकारी

कार्यालयात 'सहाय्यक आरेखक' या पदावर कार्यरत असताना विभागीय आरेखकाचं काम (पदभार) सांभाळून हे अत्यंत जुनं आणि अमूल्य असं सरकारी दप्तरही सांभाळताहेत.

स्वत:चं नेमून दिलेलं काम सांभाळून हे दप्तर व्यवस्थित जतन करून ठेवणं, ते कार्यालयाच्या गरजेनुसार तात्काळ उपलब्ध करून देणं ही दिवटे यांची खासियत आहे.

१८३२ सालापासूनचं हे जुनं रेकॉर्ड सांभाळणं हे दिवटेंना ठरवून दिलेलं काम नव्हतच मुळी. याकामी विभागीय कार्यालयातून 'अभिलेखापाल' (दप्तरी) नावाचं एक स्वतंत्र पद असतं. पण कामाची पद्धत पाहून हे रेकॉर्ड त्यांच्याकडेच राहिलं. कदाचित या जागी दिवटेंऐवजी एखाद्या बेजबाबदार, कामाशी काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या हातात हे रेकॉर्ड असतं तर २-५ वर्षांतच हे रेकॉर्ड 'अभिलेखा कक्षात' (रेकॉर्ड रूम) गठ्ठे बांधून कुठेतरी पडलं असतं. दुर्लक्ष होऊन, जीर्ण-शीर्ण होऊन त्याची विल्हेवाटही लागली असती, पण ते होणे नव्हते.

कारण 'दिवटे' हे केवळ सरकारी मानसिकता असलेले कोणी ऐरेगैरे कर्मचारी नाहीत, ते स्वत: एक 'कमर्शियल आर्टिस्ट' असल्याने या ब्रिटिशकालीन कागदपत्रांचं मोल त्यांनी जाणलं आणि स्वत: पुढाकार घेऊन हा अमूल्य ठेवा 'जतन' करण्याच्या दृष्टीने आपल्या कार्यभारात मागून घेतला. एखाद्या गूढ कलावंताचं व्यक्तिमत्त्व लाभलेल्या या माणसाच्या सुंदर हस्ताक्षर असलेल्या हातांमध्ये हा अमूल्य ठेवा आजही सुरक्षितपणे विसावला आहे.

आपल्या चित्रशाखेतल्या मूळ कामांबरोबरच आवश्यक ते कामाचे रेकॉर्ड सांभाळणं हे त्या-त्या अनुरेखकाचं काम असतं. यात ५-१० वर्षांचं रेकॉर्ड कमी-अधिक सर्वच जण सांभाळतात. पण दिवटेंनी १९७० साली शासनाच्या पाटबंधारे विभागात सेवा प्रवेश केल्यानंतर ब्रिटिशकालीन कामांचा दुर्मिळ कागदपत्रांचा खजिना पाहिला आणि त्यांच्यातला छंदिष्ट कलावंत जागा झाला. कारण या खजिन्यात होती १८३२ सालापासूनची

दुर्मिळ पत्रं, चामडी कव्हरच्या धारिका, क्षेत्रमापन पुस्तके (फिल्ड बुक्स) यातील स्केचेस पाहण्यालायक आहेत. क्लॉथ पेपरवरची अत्यंत रेखीव अनुरेखने (ट्रेसिंग्स), मूळ अंदाजपत्रके, कामांच्या फोटोंचे अल्बम्स, प्रोजेक्ट रिपोर्टस् विशेषतः दारणा, गंगापूर, चणकापूर, नांदूरमध्यमेश्वर आदी धरणांच्या कामांची मूळ जंत्री, बाड येथे ठेवलेले आहे. सुभाष दिवटेंनी हे सर्व रेकॉर्ड व्यवस्थित झटकून-पुसून स्वच्छ केलं. विषय व वर्षवार लावलं. सुटी कागदं जुळवून ती व्यवस्थित टाचून घेतली.

अतिशय आपुलकीने जतन केलेला हा ठेवा धूळ, वाळवी, कसर, उंदीर-घुशी आणि कालौघात सततच्या हाताळण्याने खराब होऊ नये म्हणून दिवटे या फाईली, कागदपत्र अधून-मधून स्वतःच झटकतात, साफसूफ करतात.

त्यासाठी ही कागदपत्रं एखाद्या कापडात व्यवस्थित बांधून ठेवणं, त्यात डांबरगोळ्या टाकणं तेथे डीडीटी पावडर मारणं, कधी फाईलींना ऊन दाखविणं असं त्यांचं काम सारखं चालू असतं. तेव्हा अंगावर उडणारी धूळ, कोळीष्टकं (जाळं) पाहून लोकांचं हसणं याचं त्यांना काहीच वाटत नाही. परंतु एखाद्या महत्त्वाच्या कागदपत्राचा कोपरा मोडला तर दिवटेंचे डोळे मात्र पाणावतात.

या सर्व कागदपत्रांमधली बरीचशी कागदपत्रं बनविलेल्या शाईतून आणि टाकच्या सहाय्याने लिहिलेल्या मोडी भाषेतली आणि इंग्रजी चौथ्या लिपीतली आहेत. सुंदर कामाचं हे अत्यंत दुर्मिळ दप्तर पाहणं हा एक श्रीमंत अनुभव असतो. दिवटे आपल्या कलासक्त निगराणीत हा खजिना सुरक्षितपणे सांभाळताहेत. सुंदर हातांच्या या व्रतस्थ छंदिष्टाचं हृदय नक्कीच आईचं असावं म्हणूनच ही अक्षरं फुलपाखरं इतकी वर्ष विश्वासानं इथं विसावताहेत... दिवटेंसारखी ध्येयवेडी कलावंत माणसं सेवानिवृत्त झाल्यावर पुढे काय? हा प्रश्न मात्र सरकारी चौकट आणि सध्याच्या भावभावनेत खूपच अस्वस्थ करून जातो. एवढं मात्र नक्की!



# सच्चा हिंदुस्थानी
# शेख साहेब इनामदार

वडिलमाणसं म्हणजे संसारातल्या सावल्या. संसारात होणारे मनस्ताप, बसणारे चटके या सावलीत बसून विसरायचे असतात.

आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीत अशा घनगर्द सावल्या बऱ्यापैकी दुर्मिळ झालेल्या असताना गोरेवाडी, नाशिकरोड येथील शेख महंमद शेख हुसेन (वय वर्ष ६७) यांच्या घरात **त्यांचे वडील वय वर्षे तब्बल १२३ वर्ष म्हणजे 'शेख साहेब इनामदार' अजूनही ताठ कण्याने सर्व कुटुंबाला मायेची ऊब देताहेत.**

वय वर्षे १२३ असलेला इतका जुना-जाणता दीर्घायुषी माणूस आपल्या 'नाशिक'मध्ये राहतोय म्हटल्यावर गोरेवाडीला बाबांच्या घरी जायचं ठरवलं. पण जाता जाता इतका उशीर झाला की, शेख साहेब एक वर्षाने अधिक मोठे झाले, पण एकदा ठरवूनच गेलो. चांगला सुटीचा दिवस पाहून... रमझान ईदला जाणं झालंच नाही. मी गेलो तो दिवस 'ख्रिसमस'चा होता.

मी पूर्वकल्पना न देताच गेलो होतो. ओळख वगैरे सांगितली. लागलीच बाबांजवळच्या खुर्चीवर बसायला मिळालं. चहापाणीही अगत्यानं झालं. दरम्यान, बाबांच्या घरात कुणी ख्रिश्चन बांधव बाबांचे आशीर्वाद घ्यायला आणि बाबांच्या कुटुंबीयांना भेटायला आले होते.

बाबांच्या त्या चिमुकल्या खोलीत तीन धर्माचा नकळत संगम झाला होता. बाबा मुस्लीम धर्मीय, मी हिंदू आणि तो खिश्चन माणूस! मनात पुरता विरघळून गेलो होतो. असं वाटलं, त्या क्षणी 'माणूस' नावाचा धर्म छान उमलल्यासारखा वाटला.

अब्दुल हमीद, हमीद दलवाई, तसलिमा नासरीन, अरुणा असफअली, सानिया मिर्झा, सुरैय्या, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, महंमद रफी, किरमाणी, भारतरत्न बिस्मिल्ला खाँ, खान अब्दुल गफारखान, मिर्झा गालिब किंवा आपल्या नाशिकचे गुलाम महंमद जोया, आदम बाबा, खलील मोमीन यांसारखी अशी कितीतरी माणसं मला प्राणप्रिय असल्यानं याचं दरम्यान भावनेनं मी इनामदारांच्या (बाबांच्या) घरी गेलो होतो.

२० डिसेंबर १८८० रोजी जन्मलेला हा माणूस १२३ व्या वर्षी कसा दिसत असेल? आयुष्याच्या उत्तर सायंकाळी किती क्षीण दिसत असेल? बाबांचा आजचा आहार-विहार, सवयी, दिनक्रम, घरातल्या माणसांशी त्यांचा संवाद, त्यांचे तारुण्याचे (उमेदीचे) दिवस, बदलत गेलेली सामाजिक परिस्थिती स्वत: शेख साहेब इनामदार (बाबा) यांची या सर्वांप्रती असलेली मतं जाणून घेण्याविषयी मी प्रचंड उत्सुक होतो.

त्या दृष्टीने बाबांचा नातू रईस शेख यांच्या मदतीने बाबांशी संवाद सुरू झाला. मला बाबांच्या प्रकृतीविषयी एकूणच काळजी वाटत होती, तर रईस म्हणाले, 'काही नाही बाबा अजून कडक आहेत, फक्त जरा जोरात बोला बाबांशी. ते बोलतील तुमच्याशी भरपूरऽऽ.'

रईस त्यांना माझा 'विषय' सांगायचे. बाबा त्यावर खरोखरच भरपूर बोलायचे. बाबांचे निळेशार डोळे, काहीसा सुकलेला चेहरा एकदम बोलायला लागायचा. १२३ वर्षांचे हे विभ्रम मी वाचत होतो. बाबांचे कान कुठल्याशा किरकोळ अपघाताने पुरेसे काम देत नव्हते, पण नजर बोलकी आणि आवाज अजून खणखणीत वाटला.

बाबांच्या तब्येतीचं रहस्य विचारणं! हा माझा सर्वाधिक उत्सुकतेचा प्रश्न होता. कारण १२३ वर्षे वयाचा माणूस हा एकदम गिनीज बुकात

नाही, पण लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड सारख्यात तरी नोंद करावेत; असं काही विशेष बाबांकडे आहेच आहे. निदान वय आणि फिटनेस तर अगदी निश्चित!

या वयात बाबा सकाळी अंड्याचा नाश्ता घेतात. दुपारी भात-पोळी, रात्री हलका आहार. कधी शेव मुरमुरे, बिस्किटस्, पाव वगैरे खायला त्यांना आवडतं. मांसाहार करतात परंतु जेवण तसं कमीच आहे. एकच वेळ पोटभर जेवतात. हाच नियम घरातल्या सर्वांनी आपल्याला लावून घेतलाय म्हणून बाबांचे मुलं, नातू-पणतू तब्येतीने ठणठणीत आहेत.

तरुणपणी काय विशेष आहार वगैरे? व्यायाम तालीम करायचे का? तर 'कुठे काय? बस्स आपलं साधं जेवण. वेळेवर खायचं. पोटाला लागेल तेवढेच खायचं. तालिम वगैरे केली नाही. पण पायीच फिरायचो फार. पोहायचो. शिकार करायची हाच व्यायाम. छंद.' बाबा असं अगदी सहजपणे सांगतात.

शिकारीचा विषय निघाला तर बाबा म्हणाले, ब्रिटिश अधिकाऱ्यांसोबत शिकारीसाठी खूप फिरलोय. अंगात ताकद होती. स्वभाव निडर होता. शिकारीसाठी बंदुकीचं लायसन होतं. म्हणून शिकारीसाठी पाचगणी, लोणावळा, माथेरान अशा जंगली भागात शिकार करायचो. या जंगलांमध्ये वाघ, रानडुक्करं, हरण, ससे खूप मारले. वाघाची शिकार केल्याबद्दल २६.१२.१९४३ रोजी ब्रिटिश सरकारने आकर्षक मेडल देऊन माझा गौरव केला. बाबा उत्साहानं सांगत राहतात.

बाबांचे शिकारीचे फोटो पाहताना हरखून जायला होतं. १९२५ साली इंडिया सिक्युरिटी प्रेसची स्थापना झाली. बाबा त्याचे साक्षीदार आहेत. पंचवीस पैसे रोजावर खूप माणसं कामाला लावली. या कामावर स्वत: सुपरवायझर असूनही पोहणे, शिकार, फिरणं यात काही तांत्रिक बाबींची पूर्तता नोकरीसाठी म्हणून करून घेतली नाही. तरी मात्र प्रेसचा सर्वात वयोवृद्ध कर्मचारी म्हणून प्रेसने २५ सप्टेंबर १९९४ रोजी ७० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष स्मृतीचिन्ह, गौरवपत्र देऊन बाबांचा हृद्य सत्कार केला.

आज हीच प्रेस मुद्रांक घोटाळ्यामुळे देशभर गाजते आहे. हे बाबांना फारसं माहीत नाही, पण आयुष्यातला सर्वात दुर्दैवी प्रसंग म्हणून 'भारताची फाळणी!' असं शेखबाबा खिन्न मनानं सांगतात.

बाबा 'सच्चे हिंदुस्थानी' हे केवळ बोलण्यापुरते नाही. भारत देशाबद्दलचा अभिमान त्यांच्या नसानसात ठासून भरलेला आहे. 'अपना भारत!' म्हणून अत्यंत अभिमानाने ते आपल्या देशाबद्दल बोलतात. गांधीबाबांची आठवण काढतात. 'चरखा चला चला के, स्वराज्य हम ले लेंगे' हे बाबांच्या मनात एकदम घट्ट बसलेलं. राहून राहून त्यांना ह्या स्मृती आवेगाने येतच राहतात. अगदी पुनः पुनः पुनः...

स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष असा सहभाग घेतला नाही, पण महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच नाशिकचे क्रांतीवीर वसंतराव नाईक, सौंदाणकर, आबासाहेब देशपांडे यांची नावं त्यासंबंधाने बाबांच्या बोलण्यात येतात. सभा, मिटिंगा, प्रभातफेऱ्या, चले जाव असं काय काय बाबा अत्यंत उत्साहाने सांगतात. तेव्हा तो सगळा इतिहासच ते आपल्यासमोर उभा करतात.

स्वातंत्र्य मिळालं. देशाची फाळणी झाली. देशभर हिंदू-मुस्लीम दंगे सुरू झाले. त्यामुळे काही नातेवाईकांनी बाबांना पाकिस्तानात जाण्याविषयी सुचविलं, पण बाबांनी कोणांचही ऐकलं नाही. हिंदुस्थानलाच त्यांनी आपला वतन मानलं.

हळूहळू सर्व परिस्थिती पूर्वपदावर आली. देशाची व माणसांची घडी बसत होती. बाबा गोरेवाडीत राहायला आले. 'माझा धर्म माझ्या घरात होता. पाच वेळा नमाज पढत होतो. रितीरिवाज चुकत नव्हते, पण हे सर्व करताना दोस्त, बाजूवाले तर हिंदूभाईच होते. (म्हणून बाबा मराठी छान बोलतात.) गोरेवाडीतलं मारुती मंदिर त्यांनी आपल्या हाताने उभारलं. या मंदिराचे बाबा अध्यक्ष होते. आजही विश्वस्त म्हणून बाबांची पाटी तिथं आहे.

त्यामुळे देवाची यात्रा असेल, यात्रेच्या शर्यती, तमाशे यात मी

अग्रभागी असायचो. ते दिवस फार मजेचे होते. बाबा आठवणीत रमून जातात.

१९५० साली प्रेसला मोठी आग लागली होती. तेव्हा बाबांनी आपला जीव धोक्यात घालून ती आग विझवली. नंतर प्रेसच्या मजदुरांसाठी थेट मुंबईच्या आयुक्तांपर्यंत ते जाऊन आले. पगारवाढ करून आणली. असं विस्कळीतपणे बाबा सांगतात, पण त्यामागची कळकळ किंवा त्यांचं सच्चेपण लपत नाही.

बाबांना सर्व कलेत, कामात चांगला 'हात' म्हणून ओळखलं जाई. शेख यासीन इस्माईल या आपल्या दत्तक मुलाच्या गावी जाऊन, ते शेती चांगली कशी करता येईल! याचं प्रात्यक्षिक द्यायचे. गावातल्या सर्वांना नावानिशी ओळखायचे. विचारपूस करायचे. वाढतं वय त्यांच्या उत्साहापुढे कधी आड आलं नाही.

एवढ्या प्रदीर्घ प्रवासात कोणती मोठी माणसं तुम्ही पाहिलीत? असं विचारल्यावर बाबा म्हणाले, 'शिर्डीचे श्रीसाई बाबा यांच्याशी प्रत्यक्ष बोललोय. गाडगे बाबांना ऐकलंय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राम मंदिर प्रवेश, मोरारजी देसाई, भाऊसाहेब हिरे, वसंतराव नाईक, महम्मद अली, शौकत अली, व्हिक्टोरिया ब्रीज, गनुगाड्या पहिलवान, भय्यासाहेंबाचा वाडा' असं असंगतवार बाबा सांगतात. ऐकताना बाबांच्या स्मृतीची तारीफ करावी, असं काही बाबा सांगतात. एकूणच शेखसाहेब म्हणजे एक चालता-बोलता चमत्कारच आहे.

त्यात प्रामुख्याने १९७१ साली झालेल्या भारत-पाक युध्द काळात बाबांनी नागरी संरक्षणाचे मोठे काम केलं, हेही येतं. त्याचा पुरावा म्हणून या कार्याबद्दल १९६० साली नाशिक कलेक्टर साहेबांच्या हस्ते मिळालेलं 'संग्राम पदक', गौरवपत्र बाबांच्या अभिमानाचा विषय असतो. आपल्या देशाबद्दल हजारदा गौरवाने बोलणाऱ्या बाबांबद्दलचा स्नेहभाव अधिकच दृढ होत जातो. ब्रिटिश राजवटीत फिश मोरेस यांसारखे निर्भय अधिकारी पाहिले. स्वराज्याची चळवळ पाहिली. हिंदुस्थानची आझादी पाहिली.

जीनांनी केलेली देशाची फाळणी पाहिली. महात्मा गांधी पाहिले, आंबेडकर, गाडगेबाबा पाहिले. हिंदू-मुस्लिमांचा भाईचारा पाहिला. प्लेगच्या साथीत भाऊ गमावले. कालौघात पत्नी गेली. काही मुलं गेले. त्याचबरोबर मुलांचे भरलेले संसार पाहिले. नातू-पणतू पाहिले. त्यांचं प्रत्येकाचं चांगलं वागणं, संस्कार पाहिले. साहेबांनी असं खूप पाहिलं, सोसलं आणि अनुभवलंही!

असं खूप पाहिलेले, साहिलेले बाबा अजूनही ताठ कण्याने जगण्याची उमेद बाळगून आहेत. हा देश सुखी व्हावा, येथली माणसं सुखी व्हावीत यासाठी मी रोज प्रार्थना करतो, असं बाबा सांगतात.

बाबांच्या स्वतंत्र सुटकेसमध्ये एक नवं कोरं शेषन कार्डही दिसलं, त्यावर बाबांचं वय आहे १०० वर्ष! आता बाबा १२३ पार करून १२४ मध्ये प्रवेशकर्ते झाले आहेत. बाबांच्या बोलण्यात स्वाभाविकपणे पुन्हा पुन्हा 'चरखा चला चला के स्वराज्य हम ले लेंगे' येतच राहतं. १२३ वर्षांच्या या सच्चा हिंदुस्थानीच्या पवित्र चरणांना वंदन करावं म्हणून त्याच्या पायाशी झुकलो तर बाबांनी पायच आकसून घेतले आणि म्हणाले, 'गाडगे बाबांनी पाया पडायला नाही सांगितलं कोणाच्या... जा सुखी रहा!' येताना माझं मन तुडुंब भरलेलं होतं आणि 'चरखा चला चला के...' ची गुंज बाबांसारखीच माझीही झालेली.

*(नाशिक पाटबंधारे विभागाच्या आदर्श कर्मचारी ठरलेल्या कौसरजी शेख यांचे आजोबा असलेले शेखसाहेब इनामदार हे दिनांक १६ मे २००४ रोजी पैगंबरवासी झाले.)*



## अर्थपूर्ण बांधिलकीचे चेहरे

# संजय श्रीवास्तव अरुण भुतडा

असे म्हणतात की, जीवन फुलपाखरासारखे जगावे पण जीवनाचे ध्येय मात्र मधमाशीसारखे असावे! तद्वतच काही माणसं अखंड जीवनरस गोळा करीत समाजापुढे चांगलासा आदर्श उभा करीत असतात.

निफाड शहरातील संजय श्रीवास्तव, अरुणकुमार भुतडा ही अशापैकीच ध्येयवेडी माणसं. तशी माझ्या बालपणापासूनच परिचयातली. परंतु निफाडच्या संस्कृती गौरव कार्यक्रमात ती नव्यानं भेटली. संवादाचा विषय 'निफाडची संस्कृती आणि माणसं' हा होता.

पोटापाण्यासाठी प्रत्येकालाच काहीतरी छोटा मोठा नोकरी-व्यवसाय करावाच लागतो, पण तो करताना आपण समाजाचंही काही देणं लागतो! या भावनेनं त्यांनी व्यापार-व्यावसायिक-उद्योजक अशा काही समविचारी मित्रांना बरोबर घेऊन निफाड शहर बुक सेलर्स ॲण्ड स्टेशनर्स असोसिएशन, निफाड ही संस्था ऑगस्ट १९९९ मध्ये स्थापन केली. संस्था म्हटली की, अपरिहार्यपणे कार्यकारिणी आली. नफा-तोट्याची गणितं आली. उत्सवी कार्यक्रमातून प्रसिद्धीची चढाओढ आली. परंतु विनता-कादवेच्या पवित्र संगमावरील या संस्थेने आपली व्यावसायिकता जपतानाच उपरोक्त सर्व मतांना छेद देत सामाजिक परिषदेचे प्रणेते न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची निफाड ही जन्मभूमी आहे, याचा विसर पडू दिलेला नाही.

आपल्या प्रयोगशीलतेतून निफाड शहराला ज्यांनी एक सामाजिक-सांस्कृतिक असा चेहरा दिला असे निफाडभूषण स्व. शांतीलालजी सोनी यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या संस्थेत गौतम चोरडिया, दीपक बागमार, नयन कायस्थ, महेश चोरडिया, योगेश बागरेचा, राजेंद्र व्यवहारे, शशिकांत जोशी, सुधीर कायस्थ, सुनील राऊत आणि संतोष कायस्थ यांसारखी ताज्या दमाची छोटा-मोठा उद्योग-व्यवसाय करणाऱ्या उत्साही कार्यकर्त्यांची संस्था उत्तमपणे संघटित केली आहे.

संस्था स्थापन करून ती आर्थिक वगैरे पातळीवर यशस्वी होणं, हा जरी कौतुकाचा भाग असला तरी राष्ट्र सेवा दलाच्या संस्कारातून आलेले संस्थेचे अध्यक्ष संजय श्रीवास्तव आणि स्व. छगनलाल चोरडिया यांच्यासारख्या मनमिळावू व्यक्तिमत्त्वाच्या हाताखाली तयार झालेले सचिव अरुणकुमार भुतडा हे दोघे उच्च विद्याविभूषीत असल्याने या बिनीच्या जोडीने, आपल्या सहकार्यांच्या साथीने, असोसिएशनच्या कार्याला सर्वसमावेशक अशी निश्चित दिशा दिलेली आहे. कारण कारगील फंड असो, गुजराथ भूकंपग्रस्तांना आर्थिक मदत असो, रक्तदान शिबिरं असो, पाणपोईची सेवा असेल, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार असेल किंवा छोट्यात-छोट्या व्यावसायिकाला आणि ग्राहकांना उपयुक्त मार्गदर्शन असेल संस्थेने निफाड परिसरात स्वत:चा एक वेगळासा ठसा उमटविला आहे.

हे सर्व करीत असताना पौराणिक-ऐतिहासिक महत्त्व असलेल्या आपल्या निफाड शहरातील न्यायमूर्ती रानडेंबरोबरच, कादवा-विनता नदीच्या संगमावरील संगमेश्वराच्या हेमांडपंथी मंदिराचं, पुरातन विठ्ठल-रुख्मिणी मंदिराचं, अत्यंत देखण्या रूपात उभ्या राहिलेल्या गणपती मंदिराचं, शांतीनगर येथील सप्तश्रृंगीच्या देवी मंदिराचं आणि प्रा. सोमनाथ आंधळे यांच्यासारखे उपक्रमशील प्राचार्य राहिलेल्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय आदी निफाडच्या भूषणावह असलेल्या वास्तुंचं महत्त्व जाणून संस्थेने नुकत्याच प्रकाशित केलेल्या आगळ्यावेगळ्या

मार्गदर्शिकेच्या मुखपृष्ठावर या सर्वांना आवर्जून स्थान दिलेलं आहे.

संस्थेच्या या मार्गदर्शिकेत संपूर्ण निफाडमधील व्यापार, व्यावसायिक, उद्योजक क्षेत्रातील किराणा, धान्य, गिरणी, टेलर्स, हार्डवेअरपासून ते केशकर्तनालय, पान स्टॉल, ब्रह्मवृंदापर्यंत सर्वांनाच सुयोग्य स्थान दिलेलं आहे. कुणी म्हणून सुटल्यासारखं वाटत नाही. याशिवाय यामध्ये शासकीय, निमशासकीय कार्यालय, बँका, रक्तपेढी ॲम्बुलन्स, अग्निशामक, सर्पमित्र, रक्तदाते अशा पन्नासच्या वर प्रकारांतील उद्योजकांचे नावं, पत्ता, दुकान व घरचा फोन नंबर देताना प्रत्येक पानांवर एक उद्‌बोधक सुविचार देऊन संस्थेच्या जाणिवांचे आकाश किती व्यापक आहे, याची प्रचिती दिली आहे. केवळ जाडजुड, भरमसाठ चुकांची आणि जाहिरातींनी भरलेली टेलिफोन डायरी काढणं आणि गल्लाभरू वृतीची कितीतरी माणसं आपण पाहिली असतील. पण या संस्थेच्या मार्गदर्शिकेत इतक्या प्रकारचे उद्योग, समाजाच्या सर्व थरातील माणसं, त्यांची उपयुक्त अशी माहिती आणि तीही उत्तमप्रतीच्या कागदावर बिनचूक देणं खरोखरच स्तुत्य आहे. यासाठी खूप मेहनत ही माणसं घेत असतात. सर्व मित्रांनी ती यात घेतलीय. संस्थेने या सर्वांसोबत आजच्या ताण-तणावाच्या आणि अस्थिर जगात आवश्यक अशी रक्तदानासंबंधी, रक्तदाबाविषयी, मधुमेहाची, हृदयविकारावरची महत्त्वाची माहिती संकलित करण्याचा नेहमीच प्रयत्न असतो.

व्यापारी हा एक सृजनशील माणूस असतो. त्यालाही कलासक्त मन असतं. साहित्यात रुची असते. संस्कृतीबद्दल नितांत आदरभाव असतो या भावनेने आपल्या व्यापारी बांधवांनी आपला उद्योग व्यवसाय सांभाळून वेळ काढून साहित्यात अभिरुची घ्यावी, वाचतं व्हावं, आपापसात सुसंवाद करावा अशा विचारांनी संस्थेच्या नियमित बैठका होत असतात. संजय श्रीवास्तव, अरुणकुमार भुतडा, नयन कायस्थ, विलास व्यवहारे, गौतम चोरडिया, शशी जोशी, सुनील राऊत असे सर्वच जण याकामी आपलं योगदान देत असतात. निफाडमधे विविध, सामाजिक संस्था

असतील, ग्रामदैवतांचे यात्रा-उत्सव असतील, माणकेश्वर वाचनालयासारखी वाचक चळवळ असेल किंवा सुनील भुतडा, राजाभाऊ सोनी, अशोकभाऊ कापसे, बाळासाहेब कुंभार्डे, माणिक पंढरीनाथ कुंदे, मधुभाऊ शेलार, राजेंद्र सोमवंशी आदींनी नव्याने स्थापन केलेली 'संस्कृती गौरव'सारखी साहित्यिक चळवळ असेल, संस्थेने या सर्वांच्या कार्यात तनमनधनाने सोबत राहण्याचा संकल्प सोडलेला आहे.

संपूर्ण निफाड शहर आणि परिसराची मनं बांधण्याचा अट्टहास करणारी निफाड शहर बुकसेलर्स ॲण्ड स्टेशनर्स असोशिएशन ही केवळ नफा-तोटा पत्रक प्रकाशित करणारी, कागदोपत्री पदं मिरविणारी केवळ व्यापारी संस्था नाही तर समाजातील शेवटच्या माणसापर्यंत जाऊन त्याला आपल्यासोबत 'उभं करण्याची' उमेद बाळगून काम करत असलेली एक विचारशील चळवळ आहे. माझ्या प्रिय निफाडमधील या विचारशील मनांना माझा मनापासून नमस्कार.



## तरुण वैज्ञानिक
# इला खुळगे-देशपांडे

तरुण वैज्ञानिक पुरस्कार आपल्या नाशिकच्या इला खुळगे हिला प्राप्त झाल्याची बातमी वृत्तपत्रात वाचली. तेव्हा हा एक अनोखा पुरस्कार पटकावणाऱ्या इला खुळगे या आमच्या वाचनालयाच्या परिचित नावाबद्दल अधिक कुतुहूल जागं झालं. केवळ अभिनंदन, यश, निवड, नियुक्ती, सुयश यापुरतीच ही बातमी (विषय) विसरून जाऊ नये, असे मनोमन वाटलं.

शासकीय वाचनालयाच्या कुठल्याशा कार्यक्रमात अप्रतिम अशी रांगोळी मांडताना मी इलाला प्रथम पाहिलं. त्यावेळीच जाणवलं, की ही चुणचुणीत मुलगी वाचनालयाच्या संचालिका शुभदा राजेंद्र देशपांडेंची केवळ भाची नाही. रांगोळीत देखणे रंग भरणारे हे हात निश्चितच वेगळे आहेत. ही तल्लीनता विलक्षण आहे! मला तिचं हे जीव तोडून काम करणं विलक्षण आवडलं होतं.

'यंग सायटिस्ट' आणि रांगोळी रेखणारे गोल्डन हँड यांची सांगडही मनात नीट घालता येईना. सायंटिस्ट आणि रांगोळी! किती विरोधाभास वाटतो ना? की, तो पूरक म्हणावा!

'रिसायकलिंग ऑफ पॉलिएस्टर' या विषयाबद्दल मी बऱ्यापैकी अनभिज्ञ असणं आणि दुसऱ्या बाजूला इलाचं फर्स्ट क्लास ॲकॅडेमीक

करियर हा विषय समजावून घेण्याच्या दृष्टीने खुद्द इलाकडेच एक प्रश्नावली दिली आणि 'चिमुरडी इला ते यंग सायंटिस्ट' हा यशस्वी प्रवास अधोरेखित करायचं ठरवलं. त्यावर इलाचं जे प्रामाणिक आणि टची (भिडणारं), असं निवेदन आलं ते तिच्याच शब्दात जसंच्या तसं देणं मला शक्य होणारं नसलं तरी या सळसळत्या विचारांची उत्कटता मनात रेंगाळत रहावी, तरुण मनांनी त्यातून प्रेरणा घ्यावी, अशा मगदूराची आहे.

इला म्हणते, '१९८०-८१ साली सिडकोत फारशा चांगल्या शाळा नव्हत्या. माझी रवानगी म्हणूनच आजोळी करण्यात आली. रचना विद्यालयाच्या बालवाडीत मी प्रवेश घेतला. रचना शाळेत आमची आजी नीला कुलकर्णी, आजोबा श्री. य.अ. कुलकर्णी यांच्या प्रेमळ शिस्तीच्या, संस्कारात मी वाढले. मामा व मावश्यांची लहानपणापासून चालत आलेली पुस्तकं, या बालवाङ्मयात काय नव्हतं - कुतूहल, फास्टर फेणे, कथामाला, चंपक, किशोर, मिशा (इंग्रजी मासिके) अशी कितीतरी पुस्तकं मी आवडीने वाचलीत. त्यात आई-बाबा दोघेही कलावंत. मनाची माणसं! ते दिवसच सुंदर होते. चित्रं-पेंटिंग्ज, वाचन, खेळणं, वेगवेगळ्या स्पर्धांतून भाग घेणं, बक्षीसं (हमखासच) मिळवणं! असा मनमोकळा विस्तीर्ण कॅनव्हास अगदी घरातच मिळाला. या सर्व वाचनाचा उपयोग माझ्या वैचारिक जडणघडणीत झाला. वक्तृत्व, निबंध स्पर्धेत, रोजच्या व्यवहारात, बोलण्यात एक प्रकारची सफाई-विश्वास आला. स्पर्धेतील पारितोषिकांनी मन सुखावलं. उमेद दिलीच; परंतु यानिमित्ताने झालेलं चांगलं वाचन, चिंतन, मनन यामुळे जगण्याची एक सुंदर दृष्टीही मला मिळाली.

अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन, वेगवेगळ्या स्पर्धेतील सहभाग, माझ्या मनातले नवनवीन प्रश्न, विचार यांनाही घरातून योग्य मार्गदर्शन मिळालं. भरपूर प्रोत्साहन मिळालं. त्याचा उपयोग माझा आत्मविश्वास वाढण्यात झाला. प्रत्येक माणूस हा सर्जनशील असतोच! या विचारांनी नवनवीन शिकण्याची जिद्द मनात होती. त्यामुळे स्वतंत्र विचार करण्याची

सवय, प्रश्न उभे करणं, त्यावर उत्तर शोधणं, माझं मलाच आवडायचं. त्यासाठी शाळेतले शिक्षक, आजी-आजोबा, आई-बाबा, मावशी, मामा यांच्याशी झालेल्या खुल्या चर्चांनी मला घडवलं. दहावीला ७८ टक्के गुण मिळवल्यावर विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. परंतु बारावीला गणित या विषयात चक्क अनुत्तीर्ण झाले.(या निमित्ताने इलाने सांगितलं की, दहावी-बारावीत एखाद-दुसऱ्या विषयात नापास होणाऱ्या गुणी मुलांना पालक अशा वेळी किती धारेवर धरतात. अकारण अपमानीत करतात आणि मग ही उमलती मनं पुन्हा कधीच पूर्ण फुलत नाही).

पण माझ्याबाबतीत हे अपयश अक्षरश: सुदैवीच ठरलं. आईने माझ्या भावना समजून घेतल्या. मला समजून घेतलं. त्यावेळी आईची समंजस, उबदार साथ माझं करिअरचं दार उघडून देणारी ठरली. आईला माझ्यातील कलावंत मन दिसत होतं. त्यामुळे आर्किटेक्ट, मेडिकल, इंजिनिअरिंगऐवजी तिने मला चक्क  माझ्या आवडीची गृहशास्त्राची (होमसायन्स) आवडणारी शाखा दिली.

एसएमआरके महिला महाविद्यालयात बी.एस्सी. इन होम सायन्स (टेक्सटाईल्स) साठी प्रवेश घेतला आणि कॉस, थिटा किंवा अंकाच्या जंजाळात रूक्ष आकडेमोड करण्यापेक्षा गृहशास्त्राच्या जीवन अभ्यासात मी छान रमले.

येथे सगळं कसं मनाला भावणारं, आनंददायी, उपयुक्त आणि उत्कट! ही तिन्ही वर्ष एखाद्या फुलपाखरासारखे मी विहरत राहिले, जीवनरस गोळा केला. म्हणजे या महाविद्यालयात असताना माझ्यातल्या कलावंत मनाला चिकार घुमारे फुटले. अभ्यासाबरोबरच रांगोळी, चित्रकला, फोटोग्राफी, गिर्यारोहण, गायन-संगीत, कवितावाचन, बागकाम असा चौफेर संचार सुरू होता. अगदी पहिल्याच क्रमांकाची बक्षीसं मिळत गेली, कौतुकात न्हाऊन निघणं काय असतं! ते सर्व येथे छान अनुभवलं .

दरम्यान, आईच्या मार्गदर्शनाखाली चित्रकला छंदवर्ग मी सुरू केले. शिक्षण घेताना कमावते होण्याचा आनंदही काही और असतो.

महाविद्यालयाचा अभ्यास, सबमिशन्स, स्पर्धा-बक्षीसं, छंदवर्गाचे क्लासेस यात मी मस्त तयार झाले.

आज वाटतं की, आईने योग्यवेळी मला विद्याभ्यासात हवं ते करू दिलं! म्हणून आपण उभे राहू शकलो, असे समंजस पालक किती मुलांना मिळतात? उलट ती आपल्या सुप्त इच्छा-आकांक्षा मुलांवर लादून त्यांना पूर्ण कोमेजूनच टाकतात. याद्दष्टीने मी भाग्यवान खरीच!

उच्चपदस्थ अधिकारी होऊन केवळ पैसा कमावणं, म्हणजे जीवन नाहीच मुळी. तर मिळालेल्या प्रत्येक संधीचं सोनं करणं, त्याचा आनंद उपभोगणं, जीव तोडून मेहनत करणं आणि घामाची फुलं हुंगणं! याशिवाय मोठा आनंद नाही, हा विश्वास मला वाचनातून मिळाला.

बी.एस्सी. इन होम सायन्सची पदवी मिळाल्यावर उच्च अभ्यासक्रमासाठी मुंबईत जाणं झालं. निर्मला निकेतन महाविद्यालयात डॉ. इला डेडियाजींसारख्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाच्या प्राध्यापिकेशी सूर जुळले. एम.एस्सी.च्या संशोधात त्यांचं बहुमूल्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मला मिळालं.

'रिसायकलिंग ऑफ पॉलिएस्टर' हा विषय माझा मीच निवडला. सुरुवातीस बहुतेक लोकांनी नाकं मुरडली. परंतु प्लास्टिकच्या वेस्टेजपासून मी प्रत्यक्ष कापडच तयार करून दाखविलं, तेव्हा मात्र सर्वांनी माझं भरपूर कौतुक केलं. मी पुन्हा एकदा छान यशस्वी झाले होते.

आतापर्यंत मी केवळ माझ्याबद्दलच बोलत आले. परंतु एक मध्यमवर्गीय घरातील मुलगी पर्यावरणाबाबत छोटसं का होईना पण महत्त्वपूर्ण काम उभं करू शकते! याविषयी सांगताना फार आनंदही वाटतोय. दैनंदिन वापरातल्या प्लास्टिकच्या कचऱ्याचा आणि मूळ पॉलिएस्टरचा धागा बनविताना जे सहा-सात टक्के फायबर वेस्ट तयार होते, हे सर्व वेस्टेज जगातल्या एकूण वस्त्रनिर्मितीच्या सदतीस टक्केपेक्षा अधिक पॉलिएस्टर उत्पादनात वापरले जाणे आवश्यक आहे, असं मला वाटतं.


भारतात दहा-पंधरा वर्षांपासून या सर्व कचऱ्याचा अगदी अल्पसा पुनर्वापर सुरू आहे, पण वेगवेगळ्या कारणांसाठी उपयुक्त असं हे वेस्टेज संपूर्णत: वापरलं जावं, असा माझा विषय होता. यावर संशोधनात्मक काम करताना निगेटिव्ह थिंकींगने अनेक प्रश्न मला विचारले गेले, परंतु मी ठाम होते. प्रयत्नांती मी माझं हे संशोधन यशस्वीपणे पूर्ण करू शकले.

याबरोबरच पृथ्वीचं तापमान वाढतयं, लोकसंख्या वाढतेय, भूगर्भातील पाण्याची पातळी खाली खाली जातेय. इंधन कमतरता, पर्यावरणाचा असमतोल, पाणी टंचाई असे अनेक विषय मला अभ्यासासाठी आजही खुणवताहेत. माझ्यातला रिसर्चर मला वैज्ञानिक दृष्टिकोनातून काम करण्यासाठी प्रेरणा देतोय. संशोधनाच्या मर्यादा असल्याच, तर त्या आर्थिक सहाय्यता आणि लोकसहभागाच्या आहेत. त्यासाठी भविष्यात मला शिक्षिका व्हायचं... हे माझं स्वप्नं होतं. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करायचीय, मुलांमध्ये प्रचंड ऊर्जा असते, ते धडपड करायला तयार असतात. आपण त्यांना साथ द्यावी, असं काही ठरवलं होतं. इला असं खूप आत-आतून बोलत असते. यंग सायंटिस्ट म्हणजे एक जिद्द आहे. मेहनत आहे, काम करण्याची दिशा आहे, जबाबदारीची जाणीव आहे आणि मुख्य म्हणजे आपली ओळख आहे. ती मिळवताना खूप चांगल वाचलं, काही लिहून पाहिलं. स्पर्धामध्ये सहभाग घेतला. शेकड्यानं बक्षीसं मिळवली. आदर्श विद्यार्थिनी ठरले. उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व म्हणून गौरव झाला. अनेक चांगल्या शिबिरात सहभाग घेतला.. स्वत:ला शोधत गेले... हा शोध संपलेला नाही... किंबहुना ही तर सुरुवातच आहे! इला अशी सर्व गुणसंपन्न यंग सायंटिस्ट आहे.

विद्यार्थीदशेतच मनात ठरविल्याप्रमाणे विद्यावाचस्पती (डॉ.) इला सध्या ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक असून तेथील एका फॅशन इन्स्टिटयूटमध्ये लेक्चरर आहे.

'नापास मुलांची गोष्ट' या पुस्तकात इलाचा एक धडा घ्यावा का?

## स्मृतिरूप शीघ्रकवी
# गोपाळराव देशपांडे



कालपरवा - एक अतीव दुःखद बातमी समजली. नाशिकचे ज्येष्ठ कविवर्य गोपाळराव देशपांडे यांचं रेल्वे अपघातात दुःखद निधन झालं.

गोपाळराव मुळचे जळगाव जिल्ह्यातील उतराणे येथील! पण आपल्या वनखात्यातील नोकरीच्या निमित्ताने गेली ३०-३५ वर्षे गोपाळराव देशपांडेंच्या कवितेची मूळं खऱ्यार्थानं नाशिकच्या मातीत रुजली होती.

अत्यंत साधी राहणी आणि निर्व्याज मन. त्यामुळे बोलण्यात एक ऋतुजा, लाघवीपण. गोपाळराव कवितेवर बोलू लागले की, ऐकत राहावं वाटे. इतकं उत्कट, ओघवतं आणि मनस्वी बोलणं काळजाला थेट भिडत असे. माझ्यासारख्या नवोदित कवीमित्राशीही ते भरूभरून बोलत. तेव्हा त्यांच्याप्रतीचा माझा आदर हा नेहमी वाढता असाच राहिला.

'शीघ्रकवी' म्हणून कवीकूळात त्यांना विलक्षण मान होता. गोपाळरावांची कविता प्रतिमांचे अलंकार घेऊनच आलेली असायची. त्यांच्या कवितेचा गोडवा मनाला थंडावा देत राही.

गोपाळरावांच्या कवितेला निसर्ग आणि प्रेमाचे भरपूर आकर्षण होते. प्रेयसीच्या अवखळ, आनंदी वृत्तीचे मनोरम चित्र ते हुबेहुब उभे करीत असत. मनातल्या मनात त्यांच्या कविता उमलत असाव्यात, असे सारखे वाटे. म्हणून त्यांच्याशी संवाद साधणं हा एक आनंदानुभव असे.

गोपाळराव म्हणायला ब्राह्मण होते. पण ते खरं तर कुठल्याच जाती-धर्माचे नव्हते. इतकं छान निर्मळ, निरागस असे ते फक्त कवीजातीचे माणूस होते. महाराष्ट्रातील नामवंत संगीतकार, गायकांमध्ये ते कधी भेदभाव करत नसत. जितकं भरभरून गदिमा, पुलंबद्दल बोलतील तितक्याच उत्कटतेने शाहीर साबळे, विठ्ठल उमपांबद्दलही बोलतील. कितीतरी उर्दू शायर त्यांचे खास मित्र होते. उर्दू मुशायऱ्यात ते एक हुकमी असे शायर असत. खरं तर गोपाळराव म्हणजे मराठी कवितेतील एक अजातशत्रू माणूस होते.

कविता या माणसाच्या नसानसात अक्षरश: भिनलेली होती. म्हणून त्यांनी मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, गुजराती, उर्दू, अहिराणी अशा भाषांतूनही विपूल अशी काव्यनिर्मिती केलेली आहे. त्यांच्या अशा कितीतरी छंदोबद्ध कवितांची सुंदर गाणी सुप्रसिद्ध गायक रवींद्र साठे, उत्तरा केळकर, चंद्रशेखर गाडगीळ, रवींद्र बिजूर, अपर्णा देशपांडे, ज्योती गुंडाळे, डॉ. ज्योती बानुबाकोडे, सुप्रिया आगाशे, वसुधा परांजपे आदी थोर गायक- गायकांनी गायली आहेत.

त्याचप्रमाणे नाशिकचे प्रसिद्ध संगीतकार व गोपाळरावांचे अत्यंत जीवाभावाचे मित्र मधुकर झिराडकर, श्रीकृष्ण चंद्रात्रे, अनंत केळकर, ध्रुवकुमार तेजाळे आदी महत्त्वाच्या संगीतकारांनी त्यांची गाणी स्वरबद्ध केली आहेत.

**'येते तुझ्यााच मागे**
**तू थांब ना जरासा**
**तोडोनि बंध सारे**
**देते तुला दिलासा'**

अशी एकाहून एक अवीट आणि सरस गाणी त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरली. डझनभर कॅसेटमधून त्यांची ही गाणी आली. अमर झाली. पण गोपाळराव मात्र शेवटपर्यंत तेच साधेसे गोपाळराव राहिले. त्यांचा सार्थ उल्लेख नाशिककर 'महाकवी' असा करत असले तरी

गोपाळराव स्वत:ला कवितेच्या वारीतला ‘एक वारकरी’ समजत असत.

गोपाळराव अंतर्बाह्य कवीच होते. आपण स्वत: किती छान, शीघ्रपणे लिहितो, आपलं नाव किती मोठं आहे, आपण आपलं नाव कसं पुढे रेटलं पाहिजे वगैरे गोष्टी त्यांच्या गावी कधीच नसायच्या. गोपाळरावांची बेफिकिरी अशी की त्यांच्या कितीतरी सुंदर- सुंदर कविता, गाणी त्यांनी प्रवासात वगैरे हरवून टाकल्या. प्रवासात मिळेल त्या चिटोऱ्यावर, बस - रेल्वेच्या तिकिटावर लिहून ठेवल्या, त्या कविता त्यांच्यांही नकळत रानभरी झाल्या. त्यांच्या स्वत:च्या बहुतेक कविता त्यांना मुखोद्‌गत होत्या. त्या त्यांनी व्यवस्थित वहीत- डायरीत उतरवून ठेवल्या नाहीत. त्यांचा संग्रह प्रकाशित केला नाही. गोपाळरावांच्या जाण्यानं त्यांचं हे विपूल असं अक्षरधन कायमसाठी कवीबरोबर निघून गेलं आहे, याचं खूप वाईट वाटतं.

गोपाळराव आकाशवाणीचे मान्यताप्राप्त कवी होते. नाशिकच्या कवी मंडळाचे ते अध्यक्ष राहिलेले आहेत. कवितेवर नि:स्सिम प्रेम असलेला सच्चा माणूस म्हणून ते उत्कटपणे जगले. त्यांच्या प्रतिभासंपन्न अशा शैलीतून भावगीतं, भक्तिगीतं, गवळण, लावणी, पोवाडा, गझल, कव्वाली असे सारे-सारे रसास्वाद समर्थपणे अभिव्यक्त होत राहिले.

‘आपला प्रत्येक शब्द सुंदर असावा. त्यात कडवटपणा नसावा. आपण केवळ हळवे असणे महत्त्वाचे नाही. प्रत्येक कवी संवेदनशीलतेने जगला पाहिजे तरच त्याची रचना काळजात भिडते’, असं गोपाळरावांना वाटत असे

आपल्या छत्तीस वर्षांच्या रुक्ष अशा शासन सेवेत राहूनही आपल्यातील कवीला त्यांनी कधीच कोमेजू दिले नाही. पैसा, प्रसिद्धी, नावलौकिक यापासून कित्येक योजने दूर असलेले गोपाळरावांचे अकाली पितृछत्र हरपल्यावर त्यांनी आपल्या आईसह आपल्या भावाला आणि दोन बहिणींना प्रेमाने सांभाळलं. पुढे स्वत:च्या पाच मुलींना सांभाळतांनाही कवितेचं हे सुगंधी झाड उत्तरोत्तर फुलतच गेलं. त्यांच्या या कवितेचा

घमघमाट मी स्वत: अनेकदा अनुभवला आहे.

आपल्या प्रिय अशा पाच मुलींचे संसार व्यवस्थिपणे मार्गी लावल्यावर हळवे झालेले गोपाळराव लिहून गेले--

**‘गेल्या उडून चिमण्या,**
**रिते वाटे घरटे,**
किंवा
**‘सारे सारे मज आठवते**
**बावरी मी ही झाले होते**
**या राधेचा साँवरिया तू,**
**कुंजवनी मी रमते...’**

अशी अत्यंत हळूवर नि तरल कविता लिहित असलेले कविवर्य गोपाळराव देशपांडे कालपरवा रेल्वे अपघातात मृत्यू पावले. इतक्या हळव्या, कोमल मनाच्या गोपाळरावांचं जाणं अगदी प्रत्येकालाच मनाला चटका लावून गेलं आणि त्यावेळी मनमोहन नातू यांच्या कवितेची आठवण झाली.

**‘शव या कवीचे जाळू नका हो जाळू नका**
**जन्मभर तो जळतच होता**
**फुलेही त्यावर उधळू नका हो, उधळू नका**
**जन्मभर तो फुलतच होता!’**

आता उरल्याहेत त्या केवळ त्यांच्या कवितास्मृती! त्यांच्या कवितेतून-गाण्यांतून ते आपल्याला पुन्हा पुन्हा भेटत राहतील हे खरे, पण गोपाळरावांच्या जाण्यानं मनाला अतीव वेदना या झाल्याच! हेही खरेच.

गोपाळरावांचे मित्र असलेले मधुकर झिराडकर, आर.एम. तोडकर, मधुअण्णा झेंडे, शाम पाडेकर, शिरीष भालेराव, चंद्रकांत महामिने आणि माझ्यासह कितीतरी मित्रांनी आपल्या या कवीमित्राचं ‘गीत शाकुंतल’ हे पुस्तक प्रकाशित करण्याचा संकल्प सोडलेला आहे. गोपाळरावांना ही सार्थ आदरांजली ठरावी, असे वाटते.

जळगाव जिल्ह्याचा तो अत्यंत मायाळू परिसर, कवितेसाठी समरसून जगलेले म्हणजे मराठीतील दोन श्रेष्ठकवी एक बालकवी आणि दुसरे आपले गोपाळराव देशपांडे. दोघांचाही मृत्यू रेल्वे रुळावर! हा कुठला असेल ऋणानुबंध? कवितेच्या या दोन सुंगधी झाडांची अशीच गळाभेट व्हायची होती का?

एक मात्र निश्चित, गोपाळराव तुम्ही आणि तुमची कविता, बालकवींच्या कवितेप्रमाणेच अमर राहणार आहे!



# जुनं ते सोनं
# पंढरीनाथ सोनवणी

पंडित भीमसेन जोशी, आशा भोसले, सुरेश वाडकर, उत्तरा केळकर, जयवंत कुळकर्णी, पुष्पा पागधरे यांसारख्या प्रथितयश गायकांनी ज्यांची गाणी गायली, 'भीमस्मृती' कार्यक्रम ऐकून दस्तरखुद्द कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी ज्यांची प्रशंसा केली, संगीतकार सी. रामचंद्र, दत्ता डावजेकर, शांताराम नांदगावकर, गोविंद पोवळे यांसारख्या दिग्गजांबरोबर ज्यांनी अनेक कार्यक्रम केले, 'वहिनी साहेब' या मराठी चित्रपटाची गाणी ज्यांनी लिहिली, अखिल भारतीय नाट्य परिषदेचा उत्कृष्ट गीतकार म्हणून सलग तीन वर्ष 'छोटा गंधर्व पुरस्कार' ज्यांना लाभला, कवितेच्या निमित्तानं नाशिक नगरपालिकेचं सभागृह ज्यांच्यासाठी 'हाऊसफुल्ल' झालं! अशा भावस्पर्शी गीतलेखन करणाऱ्या पंढरीनाथ (अण्णा) सोनवणींचा आज आपण परिचय करून घेणार आहोत.

अण्णा मुळचे गंगापूर गावचे. आई-वडिलांना एकुलते एक. घरची गरिबी. गावात चौथीपर्यंत शिक्षण झालं. पाचवीला नाशिकच्या सेंट्रल स्कूलमध्ये नाव दाखल झालं, परंतु शाळेत त्यांचं मन कधीच रमलं नाही. त्यावेळी मुंबईचं पाच रुपये तिकीट होतं. स्वत: जमवलेल्या पैशांनी अर्ध्या तिकिटासाठीचे अडीच रुपये जमले नि अण्णा घरी न सांगता-कळवता मुंबईला आपल्या बहिणीकडे पळून गेले. दहा-बारा वर्षांचं कोवळ वय.

काहीतरी करून दाखविण्याची जिद्द मनात. बहिणीकडे जाऊनही कष्ट सुटले नाहीत. इस्त्रीच्या टेबलापर्यंत उंची पुरत नव्हती. मधल्या पाय ठेवण्याच्या फळीवर उभं राहून जेमतेम काम जमून जाई. माटुंग्याला व्हीजेटीआय कॉलेज हॉस्टेलचं काम मिळालं होतं. ते स्वच्छंद जग अण्णांना भुरळ घाली. त्यावेळी या परिसरात राज कपूर, त्यांचे वडील पृथ्वीराज कपूर, शशी कपूर, कन्हैयालाल, मन्ना डे यांसारखी बडी माणसं अण्णांना जवळून पाहता आली. होता होईल तेवढं जग डोळ्यात साठवत जगताना अण्णा अनुभवाची प्रचंड शिदोरी जमा करीत होते.

तो दुसरा महायुद्धाचा काळ होता. व्हिक्टोरिया कॅम्पमध्ये सैनिकांचा पाडाव होता. त्यांच्या कपड्यांना इस्तरी वगैरे करण्याचं काम अण्णांच्या मेहुण्याकडे होतं. या कपड्यांची ने-आण लहानगे अण्णाच करीत. त्यावेळी सैनिकांच्या कॅम्पमध्ये मोकळं फिरणं-पाहणं होई. अण्णांना तेथल्या पुस्तकांची भूरळ पडली होती. सैनिकांनी ते हेरलं होतं. कॅम्प सोडताना सैनिकांच्या ट्रंकभर पुस्तकांचा अमूल्य खजिना अण्णांच्या स्वाधीन झाला होता. त्यात उत्तमोत्तम पुस्तकं होती. पण अण्णांना मोहिनी घातली होती ती गदिमांच्या पुस्तकांनी! अण्णा माडगूळकरांचं गीतरामायण, त्यांची विविध गाणी-कवितांची पुस्तकं वाचणं, ती पाठ करणं, गुणगुणणं आणि आपणही असंच काही छान लिहून पहावं अशी इच्छा अण्णांच्या मनात त्यावेळी निर्माण झाली. अण्णांमध्ये गीतलेखनाचं बीज पडलं ते इथंच!

१९६१ साली अण्णा नाशिकला परत आले. पुन्हा इस्त्रीकाम सुरू झालं. घराची जबाबदारी अंगावर होतीच. त्यात लग्न, संसार सुरू झाला. त्यावेळी फार स्वस्ताई होती. माणसं सच्ची होती. थोड्याशा पैशात प्रपंच चाले. उरलेल्या वेळात लिहिणं, वाचणं, फिरणं, नाटकं, संगीत असा छान दिवस जाई. हळूहळू कवितेचे मित्र जमत गेले. इस्त्रीच्या दुकानावरच मैफिली रंगू लागल्या. आपण लिहिलेलं इतरांना दाखवावं, त्यांचं ऐकावं यातून सुधारणा होत गेली. २६ डिसेंबर १९६६ साली अण्णांची पहिली

कविता 'गांवकरी'तून प्रसिद्ध झाली. कविता अशी होती,

**अशीच वेडी संध्या होती**
**हात तुझे ग माझ्या हाती**
**गत जीवनाची अवीट स्मृती**
**ओठांवरती गुंजत होती ।।**

यथावकाश 'कवी मंडळा'ची स्थापना झाली. कार्याध्यक्ष, अध्यक्ष म्हणून त्यात अण्णा प्रमुखस्थानी होते. काव्यवाचनाबरोबरच 'गीतयात्रा' या एक कवी एक संगीतकार या कार्यक्रमाने अण्णा आणि कवी मंडळ सर्वत्र लोकप्रिय होत गेले. १९६७ मध्ये अण्णा त्यावेळेस अतिशय लोकप्रिय अशा आकाशवाणीचे मान्यताप्राप्त कवी झाले. अण्णांची सदाबहार गाणी आकाशवाणीवरून घराघरातून नि मनामनात पोहोचली. वृत्तपत्र, साप्ताहिके, मासिकं, दिवाळी अंकांतूनही लिखाण सुरू होतंच. त्याबद्दल वाचकांची अनेक पत्रं, अभिप्राय अण्णांना आवर्जून मिळत. त्यातून अतोनात ऊर्जा मिळे. कार्यक्रम, स्पर्धा, मैफिली यांना मग कमी नसे. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर अण्णा आणि त्यांचे एक सहकारी कवी गोपाळराव देशपांडे यांनी गीत रामायणासारखा 'भीमस्मृती' हा कार्यक्रम बसविला. त्याचे अनेक प्रयोग झाले. सर्वत्र या कार्यक्रमाचं उत्स्फूर्त असं स्वागत झालं. 'भीमस्मृती' पुस्तकरूपानेही अण्णांच्या नावे जमा आहे.

त्यावेळी नाशिकला वास्तव्याला असलेले (आता पिंपळनेर येथे स्थायिक झालेले) जिंदादिल कवी बापू देशमुख, नरेश महाजन, पद्माकर कांबळे, गोपाळराव देशपांडे या कवींसमवेत 'शब्धगंध' संस्थेची स्थापना करताना गेय कविता किंवा छंदोबद्ध कविता लेखन, त्यांचं वाचन तसेच विदेह सौंदाणकर आदी संगीतकारांकडून त्या स्वरबद्ध करून त्यांचे कार्यक्रम सादर करणं, नाटकांसाठी गीतं लिहिणं, कधी नाटकातून काम करणं (अण्णांनी मुंबईच्या सुशीला शेजवाडकरांबरोबरही काम केलेलं आहे!) असा सर्व अण्णांचा उत्साहाचा भाग बनून राहिला होता. एकंदरीत

दिवस उमेदीचे होते. बहारीचे होते.

१९८२ साली 'अंबरझुला' हा पहिला काव्यसंग्रह स्वतंत्रपणे अण्णांच्या नावाने प्रकाशित झाला. त्या अगोदर कितीतरी गाणी, कविता, संगितीका, नाट्यगीतं, भावकथा यातून अण्णांचं नाव रसिकांसमोर सारखं झळकत होतं. या सर्व कार्यक्रमांचे पुरावे किंवा सुखद स्मृती म्हणून वृत्तपत्रांचे कात्रणं, निमंत्रण पत्रिका, फोटो, प्रमाणपत्रं, वाचकांची आलेली पत्रं, सारं सारं अण्णांनी छान जपून ठेवलं आहे, ते व्यवस्थितपणे जतन केलं आहे. हे सर्व करताना आपल्याच क्षेत्रातील कविश्रेष्ठ तात्यासाहेब शिरवाडकर, नाटककार वसंत कानेटकर आणि डॉ. अ.वा. वर्टीसारखी ऋषितूल्य माणसं यांना गुरुस्थानी मानून त्यांचा आशीर्वाद घेणं, त्यांना कार्यक्रमांना बोलावणं, प्रसंगी त्यावर चर्चा करणं होई. पण हे सर्व या त्रयीचा मान राखून. उगाच पुढे पुढे करणं नाही, मुद्दाम काही 'दाखवणं' नसे. काही विशेष करायचं ठरवलं की तात्यासाहेंबाकडं जाणे होई. 'प्रसाद' म्हणून 'खोबऱ्याचा लाडू' मिळायचा. पाठीवर कौतुकाची थापही पडे. तात्यासाहेब आमच्या बहुतेक कार्यक्रमांना आवर्जून येत. आमचा तो आनंदाचा नि अभिमानाचा विषय असायचा, असं आजही अण्णा अत्यंत विनयानं सांगतात. साध्या-सोप्या परंतु भावपूर्ण गीतांइतकेच अण्णांचे वागणे मृदू आहे.

कविवर्य नारायण सुर्वे सुरुवातीच्या काळात वरचेवर नाशिकला कुसुमाग्रजांकडे येत. अण्णांनाही आवर्जून भेटत. एकदा कविवर्य सुर्वे अण्णांना म्हणाले,'अण्णा, तात्यासाहेब फार छान बोलत होते तुमच्याविषयी!'.

आपल्या पश्चात तात्यासाहेबांनी आपल्याबद्दल चांगलं बोलणं हा प्रसंग (अभिप्राय) अण्णांना एखाद्या महत्त्वाच्या सन्मानासारखा वाटतो. अशाच सुवर्णक्षणांनी अण्णा लिहिते राहिले. त्याचबरोबर साधारण ६५ ते ८५ पर्यंत अनेक कवी, गायक, संगीतकारांना व्यासपीठ व लोकप्रियता मिळवून देण्यात अण्णांचं 'कवी मंडळ', 'शब्दगंध'अग्रभागी होतं. दोन

मुली आणि पाच मुलगे शिकून व्यवस्थित सेटल झाले. एखाद्या गोकुळासारखं घर भरलं. अण्णांचा कवितेचा आणि गृहस्थाश्रमाचा संसार रांगेला लागलेला होता. तरीही 'कुठं थांबायचं' हे अण्णांनी निश्चित केलं. संग्रहाव्यतिरिक्त ४००-५०० कविता-गाणी लिहून झाल्या. मोठा मुलगा जितेंद्रने हे सर्व साहित्य छान डीटीपी करून 'हिरवळ' या नावाने दोन खंड करून सावानात वाचकांसाठी ठेवले आहेत. ही सर्व गाणी अवीट अशी गोड आहेत. आजची रिमिक्स गाणी अण्णांना आवडत नाही. 'जुनं ते सोनं' असं अण्णांच मत आहे. छंदोमय, गेयता असलेली जुनी गाणीच आनंद देतात. ती टिकून राहतील, असं अण्णा म्हणतात. आज ७५ (पंच्याहत्तरी) उलटून गेलेल्या अण्णांची दृष्टी काहीशी क्षीण झालीये. आवाज कापरतो. हालचाली मंद झाल्याहेत तरी कवितेवर केव्हाही बोलायचं म्हटलं की, अण्णा पुन्हा ताजे टवटवीत होतात. आजही आठ-आठ तास दुकानावर थांबून इस्त्रीचं वगैरे काम करतात. नाशिकच्या भद्रकाली रोडवरील सिलेस्टा धुलाई केंद्रात आजही अण्णा उत्साहाने काम करताना शांत-तृप्त आनंदी दिसतात.

अण्णांच वाढतं वय नि चिरतरुण मन यांची सांगड घालताना आकाशवाणीवर अत्यंत गाजलेली अण्णांची (पंढरीनाथ सोनवणी) पुष्पा पागधरेंनी गायलेली लावणी आठवली...

**'कुठवर सांगू सख्या तुम्हाला**
**किती सांगू अन् कशी**
**राजसा घडवा मला ठुशी'।**

आयुष्यभर इतरांच्या कपड्यांना इस्त्री करून देणाऱ्या या मनस्वी कवीने स्वत:च्या मनाची इस्त्री कधीच चुरगळू दिली नाही. अण्णा नेहमीच एक स्वच्छ, नीटनेटके हिरवेकंच असे कवी राहिले!



# विदाऊट शॉप - टीपटॉप!
## **चंद्रकांत दत्तात्रय चांढोले**

आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये काही 'व्यक्तिमत्त्व' आपलं स्वत:चं असं वेगळपण जपतात. पुढे जाऊन तीच त्यांची ओळख ठरते. अशी माणसं समाजाच्या कुतुहलाचा वगैरे विषय होतात. एक छंद-नाद म्हणून अशी काही ध्येयवेडी, छंदवेडी, नितळ, निरलस जगणं जगणारी माणसं शोधीत मी आपला माझ्याच तंद्रीत चाललो होतो. तर काल-परवा आमचे मित्र कटारे भेटले. माझ्या लिखानाबद्दल बोलत होते, 'तू लिहितोस ते ठीकहे, पण जरा अशांवरही लिही, ज्यांना दोनवेळेची भ्रांत पडलीये... भर उन्हात, उघड्या अंगानं आतडे पिळवटून कोणी दुप्पट-तिप्पट वजन खेचत चाललाय... एखाद्या सडलेल्या भिकाऱ्याच्या ठसठसणाऱ्या जखमेवर लिही. आणखी लग्नाचं वय निघून गेलेल्या उदासी पोरा-पोरींवर लिही..'

अस्वस्थशा अपेक्षा ठेऊन कटारे बोलून गेले. मला ही माणसं दिसलीच नाहीत असं नाही, पण समाजाला, वाचकांना ह्या भणंगतेतून, ठसठसत्या वेदनेतून आपण नेमकं काय द्यायचं? वास्तविक अशी माणसं कोणत्याही संवेदनशील मनाच्या डोक्यात गच्च रुतून बसलेली असतात, पण कुठल्याशा मर्यादातून ही दु:खी माणसं आपण कागदावर सहसा उतरवतच नाही.

मेनराडवरील गाडगे महाराज पुतळ्याजवळून जो भद्रकालीरोड जातो त्या रोडवरच विजयानंद-दामोदर टॉकीजच्या डाव्या बाजूला असलेल्या दुकांनासमोर रस्त्याकडेला चंद्रकांत दत्तात्रय चांढोले गेली ४०-५० वर्षे अक्षरश: उघड्यावर मशीनकाम करतात. विजयानंद-दामोदरला सिनेमे पाहताना, मेनरोडला खरेदीसाठी वगैरे फिरताना, सायंताराचा साबुदाणा वडा किंवा बुधा हलवाईची जिलेबी घेण्यासाठी या रस्त्याने आपण किती वर्षापास्नं गेलेलो आहे. तेव्हा या रस्त्याच्या कडेला सात-आठ मशिन कामवाल्यांची ओळ आपण कित्येकदा पाहिलीय. त्यांचं चाललेलं काम पाहिलं आहे.

अगदी नडच पडली तर या माणसाकडून कधी आपण छोटी-मोठी कामंही केली असतील, पण हार्ट ऑफ नाशिकच्या येथल्या गर्दीत नाईलाजाने होतो तो फक्त व्यवहार! त्यांच्याशी बोलणं-बिलणं मनात. अशी असंख्य माणसं आपल्या लेखी असतात फक्त गर्दी... चेहरे. या गर्दीतल्या रस्त्यावरच्या माणसांनाही मन असतं. स्वत:चं म्हणून आयुष्य असतं. कुटुंब असतं. हेच आपण समजूनही न समजल्यासारखे वागत असतो. असो. तर इथं ही माणसं बसायला एक स्टूल किंवा खोकं, डोक्यावर एक विटलेली छत्री, कात्री, मशीनकामाचं सामान असलेली छोटा पत्रटी डबा एवढेच सामान घेऊन वर्षानुवर्षे मशीनकाम करताहेत! याची उत्सुकता होती, म्हणून ठरवून गेलेलो. नमस्कार-बिमस्कार झाला. ओळख सांगितली. 'आपली माहिती पायजेय.' असं म्हणालो. पण सायकलवाला त्यात पोऱ्याभाई म्हणून चांढोले मेनरोडच्या मानसिकतेतून आपल्याच कामात गर्क. मी आपला राहुल द्रवीडसारखा चिवट एक एक धाव काढावी तसा प्रश्न पेरत गेलो.

'नाव काय तुमचं काका?'

'चंद्रकांत दत्तात्रय चांढोले!'

'गाव?'

'खुद्द सिन्नरच!'

'कपाळावर हा टिळा कसलाये?'

'कुलदैवताचा!'

'काय काय शिवता तुम्ही?'

'काय काय म्हणजे? सगळंच शिवतो. शर्ट-पँट, चोळी-ब्लाऊज, अंडरपँट, जुने-नवे आणखी 'अल्टर'ही करतो..!'

'अरे व्वा' शिकलात किती तुम्ही काका?'

'मॅट्रीकपर्यंत!'

'तरीही हे असं उघड्यावर मशीन काम?'

'माझे आई-वडील इथंच बसून हे काम करायचे. मलाबी हेच काम आवडलं. झाली चाळीस-पन्नास वर्षे हे काम इथंच बसून करतोय! ८५ साली सिडकोत नंबर लावून सोताचं घर घेतलं!''

'घरी कोण कोण असतं? मुलगा केवढाय? त्यालाही या धंद्यातच..?'

'नाही, नाही. पोरगा नाहीय मला. आठीबी पोरीच हेत मला.'

'बाप रेऽऽ मग कसं भागवता या मशीनवर सर्वांचं? आणखी कोणी कमवतं?'

'नाही मी एकटाच कमवतो. त्यात सर्व पोरींची झाली लग्नं. आता राहिलो आमी दोघं!'

'जावई काय करतात?'

'जावई ना एक शिक्षक. एकाची रिक्षाये. दोघे रेडिमेडच्या धंद्यात. दोघी भाश्यालाच दिल्या...!!'

'बरं मशीन कुठे ठेवतात रात्री?'

'१५ ऑगस्ट लॉजवर. आधी तीन रुपये महिना होता. आता पन्नास रुपये महिना. काय त्रास नाही. यवस्थीतेय!'

'नगरपालिका, अतिक्रमणवाल्यांचा काही त्रास?'

'नाही बॉ. दहा रुपये पावती रोज. आलेच कवा गाडीवाले तर जरा पाय आकसून मागं सरायचं...!'

'दुकान असावं असं इतक्या वर्षात वाटलं नाही का?'

'वाटलं. पण बरंय आपलं हेच.'

'काही शोकपाणी? किती रोज भेटतो साधारण आपल्याला?'

'शोकपाणी लई जास्ती न्हाई, पण पाच-सा वर्षापासून तर पिक्चरबी बंद करून टाकला. धंदा म्हणालं तर होतो शे-दोनशे. घरीबी मशीन हाये एक. ठीक चाललंय!'

'पण पावसाळ्यात?'

'पावूस कुठं रोज पडतो वो. अन् ही छत्री न्हाई का डोक्यावर!'

मी आपला अनिल कुंबळेसारखे प्रश्न वळवत, फिरवत होतो पण चांढोले मॅथ्यू हेडनसारखे मला छान बुकलत होते. वाईट याचं वाटतं की, आपण तथाकथित मध्यमवर्गीय लोक उद्याची चिंता करीत व्यर्थ काळज्यांनाही किती दळीत बसतो. चांढोले वरवर तरी एकदम खूश दिसले. बरं वाटलं. चांढोलेंचं मशीन काम चालू. रस्त्यावरचे एखाद-दुसरे 'माझे उभं राहून चांढोलेंना प्रश्न विचारणं' पाहत असावेत असं वाटलं. बाजूवाले मशीनभाऊ तर 'काय चाललय?' म्हणून कान टवकारूनच होते. प्रश्नांचा रीळ तसाच मनात ठेवून 'चला येतो!' म्हणून सायकलला टांग मारून निघालो खरा, पण मनातून कुठं चांढोले जाताहेत? चांढोलेंना भेटण्यापूर्वी या रस्त्यावरच्या मशीन कामवाल्यांची अपेक्षिलेली विसंगती तर फारशी कुठं जाणवलीच नाही की, चांढोलेंनी सांगितलेली ही केवळ एकच बाजू होती?

म्हणजे मुलाची वाट पाहत आठ मुलीच झाल्या. मग मुलगा नसल्याची खंत. मॅट्रीकपर्यंत शिकून सुरक्षित-स्थिर नोकरीपेक्षा कुठून या धंद्यात पडलो! कधी ऐसपैस बसावं वाटलं, पाठ टेकावी वाटली तर एवढ्या गर्दीच्या रस्त्यात कुठं आडवं पडायचं? अजून किती वर्षे या मशीनची उचलमांड अगदी रोजच्या रोज करायची? चांढोलेंच्या निमित्ताने असे असंख्य प्रश्न मनात उगवत होते की, पन्नासएक वर्षे थेट उन्हाळे-पावसाळे खावून ही माणसं घट्ट पडल्यासारखी निबर झाली असतील. आपल्याला कणव वाटावी अशा परिस्थितीत 'फिल गूड!' सारखा

अनुभव ही माणसं कसा घेऊ शकता? फार मोठ्या अपेक्षा न ठेवता, आहे त्यात समाधान मानणं हेच खरं जीवन असावं का? असं काय काय मनात येत राहिलं. मनात खालीवर घुसळत राहिलं.

मांजरीसारखं अगदी प्रत्येक भांड्यात उत्सुकतेनं डोकावून 'काही मिळतंय का?' हे आवर्जून पाहण्याची माझी सवय चांगली की वाईट? की जग अशाच व्यामिश्रतेनंच भरलेलं आहे? किंवा एखाद्या आवडत्या लेखकाची नवी कोरी कादंबरी खूप अपेक्षेने वाचावी आणि तीत आपल्याला हवं ते 'ऑफबिट' असं काहीच हाताशी लागू नये तसं काही 'कॉमन' असणारेही चेहरे भेटतात. पण पुस्तकं काय किंवा माणसं काय ती मुळापासून वाचत राहिली तर हळूहळू का होईना अगदी प्रत्येकातून काही ना काही तरी मिळतंच हे निश्चित! म्हणजे आपले चांढोलेंच पाहा ना, ४५ वर्षे विदाऊट शॉप कसे अगदी टीपटॉप(?) आहेत ते? आहे की नाही विशेष?



# श्रद्धेनं गाणारा गळा
# **स्नेहल मालपाठक**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर म्हणजे एक दुष्काळी तालुका, परंतु सांस्कृतिकदृष्ट्या वैभवशाली इतिहास मात्र या गावाला पुरेपूर लाभलाय. सिन्नरच्या मातीत एक पिढीजात कष्टाळूपणा आणि सोशिकता असल्यानं इथलं जे जे म्हणून काही आहे, त्यात अस्सलता असली तरी एक दुर्लक्षलेपण या गावाच्या वाट्याला आलेलं आहे. या वास्तवतेत स्नेहल मालपाठकसारखे लवलवते कोंब मात्र जिद्दीनं अंकुरताहेत, वाढताहेत. स्नेहलच्या जिद्दी संगीत साधनेचा हा एक मनोज्ञ परिचय.

स्नेहलचे वडील दत्तात्रय भिकाजी मालपाठक हे मुळात गायक. घरच्या परिस्थितीमुळे संगीताचं कोणतंही शास्त्रशुध्द शिक्षण मिळालेलं नसतानाही त्यांनी पंचक्रोशीत एक गायक म्हणून मोठा नावलौकिक त्यांनी मिळवला आहे पण आपण 'संगीत' हा विषय घेऊनच शिकलो तर...! या विचारांनी छोट्या स्नेहलची वाटचाल सुरू झाली.

त्यावेळी स्नेहलचं वय होतं, अवघं पाच वर्षाचं! बालवाडीत असतानाच स्नेहलकडे सर्वांचं लक्ष वेधलं गेलं होतं. या कौतुकातूनच ती अधिक जाणिवेने गाण्याकडे पाहत होती, शिकत होती. उठता-बसता आणि सतत 'गाणं' हेच तिचं आता अन्नपाणी झालं होतं.

शालेय जीवनात बहुतेक सर्वच मुलं गाण्यात, नाचात भाग घेतात.

स्पर्धेत बक्षीसं मिळवितात. त्यात खूपदा हौस आणि मिरवणं असतं किंवा आई-वडिलांच्या उत्साहाचा अतिरेकही असतो. पुढे पुढे मर्यादा स्पष्ट होऊन ही 'हौशी' मंडळी आपसूक गळून पडतात.

स्नेहलसारखा मुलींचं मात्र तसं नसतं. जे काही करायचं ते मन:पूर्वक, समरसून. स्नेहल या चारचौघींपेक्षाही अधिक निष्ठेनं गात होती. स्नेहलचं हे विशेष तिच्या वडिलांच्या (बाबांच्या) लक्षात आलं. म्हणून जाणीवपूर्वक तसे प्रयत्न सुरू झाले. प्रथम तिचे बाबाच तिचे संगीताचे गुरू झाले. पुढे डॉ. विकास कशाळकरांकडे तिचे शास्त्रीय संगीताचे शिक्षण सुरू झाले. घरात बाबा गात होतेच. आता जोडीला स्नेहलचा कसून रियाज सुरू झाला.

स्नेहलचे आई-बाबा दोघेंही नोकरी करणारे. घरात सुप्रिया, स्वत: स्नेहल आणि धाकटी भैरवी अशा तीन बहिणी, भाऊ दर्शन, आजी-आजोबा आणि आई -बाबा असं भरलेलं घर असतानाही स्नेहलचा रियाज कधी चुकला नाही. स्वत:साठी मुद्दाम वेळ काढून जागा शोधून स्नेहलचं गाणं आळवणं सुरू राहिलं. त्यात खंड असा पडला नाही.

दरम्यान, तिच्या शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात तिचं स्थान तर पक्क असेच. शिवाय स्नेहलला अभिनयाचं उत्तम अंग असल्याने नाटकातून तिने उत्तमोत्तम अशी कामेही केली. बक्षीसं मिळवली. पण नाटकात तिला मुळी रमायचंच नव्हतं. तिला आपलं संगीतातचं छान करिअर करायचं होतं. छोटी बहीण भैरवीसाठी अभिनयाचं क्षेत्र सोडून स्नेहल पुढे गाण्यातच रमली.

असंच एकदा तिच्या बाबांच्या लक्षात आलं की, स्नेहलच्या आवाजातील कोवळीक जाऊन त्यात एक 'तयारीचा' सूर आता येतो आहे मग त्यांनी आपल्या गाण्याच्या मैफलीत स्नेहलला साथीला बसवलं. स्नेहलचा आवाज रसिकांच्या पसंतीस उतरत होता. स्नेहलचं गाणं लोकांच्या परिचयाचं होऊ लागलं. भावगीत, भक्तिगीतं, भजन, लावणी, मुख्य म्हणजे गझलेत किंवा एकूणच सुगम गायनात स्नेहलचा सूर नेमका

लागत होता. छोट्या-मोठ्या मैफिली, वेगवेगळ्या संगीत स्पर्धेतून स्नेहल आपलं गाणं घोटत राहिली.

आपल्या सिन्नर गावात कुठलाही महत्त्वाचा कार्यक्रम असो स्नेहलचं स्वागतगीत, पसायदान सिन्नरकरांना परिचयाचं झालं होतं. अर्थातच ही सुरुवात होती. हळूहळू गीतरामायण, स्वरमैफलीत अगोदर वडिलांच्या साथीनं आणि आता स्वतंत्रपणे स्नेहल गाते आहे. वय तरुण होत गेलं तसं स्नेहलचं गाणंही अधिक गोड होत गेलं. नाशिकच्या एसएमआरके महाविद्यालयात गाण्यासाठी म्हणून प्रथमच तिला चांगलं वातावरण मिळालं. नाशिकच्या प्रथितयश गायिकांसोबत गाण्याची संधी तिला मिळाली. पुढे पुण्याला म्युझिक याच विषयात तिने एम.ए.चं शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलं आणि लहानपणी पाहिलेलं स्वप्न तिने सत्यात उतरवलं. अविराज तायडे यांचं बहुमोल मार्गदर्शन तिला मिळालं.

नाशिक आणि पुणे येथे तिला खूप शिकायला मिळालं. तुलनेने संधी अशा तिला कमीच मिळाल्या. परंतु या सर्वातून तिला मिळालेला अनुभव महत्त्वाचा होता.

पुढे टॅलेंट-९९ या स्पर्धेत सर्वोकृष्ट गायनाच्या बक्षिसासह आपल्या शाळा, कॉलेज, नाशिकच्या शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालयाच्या कला विभागात, अनेक संस्थांच्या कार्यक्रमातून विशेषत: 'नादब्रह्म'सारख्या ग्रुपमधून स्नेहलचे गाणे अधिक ताकदीने पेश होत राहिले.

त्यामुळेच स्नेहलला नादब्रम्ह २००३ ची कै. कुमुदताई अभ्यंकर शिष्यवृत्ती मिळाली. याबद्दल सर्वत्र तिचं कौतुक झालं. सत्कारही झाले.

नुकताच ई-टीव्ही मराठी वरील 'सप्तसूर एक सरगम' या लोकप्रिय कार्यक्रमातून स्नेहलने यशस्वी सहभाग घेतला होता. त्यावर प्रतिक्रिया विचारली असता स्नेहल म्हणाली की, 'ही केवळ एक सुरुवात आहे. मुळात आपण श्रद्धेनं गात राहणं महत्त्वाचं!'

आशा भोसले, सुरेश वाडकर, पं. जितेंद्र अभिषकी, मालिनी

राजूरकर, संजीव अभ्यंकर, वीणा सहस्त्रबुध्दे, वसंतराव देशपांडे, भीमराव पांचाळे ही स्नेहलची गाण्यातली दैवतं. तासन्‌तास त्यांची गाणं ऐकणं, गाण्याचा अभ्यास करणं आणि नियमित रियाज करणं हा स्नेहलचा दिनक्रम आहे.

केवळ सिन्नरपुरती किंवा नाशिक परिसरात स्नेहल एक परिचित गायिका असली तरी स्नेहल त्यात असमाधानी आहे. कलावंत नेहमी अतृप्त असावा, खूप प्रसिध्दी मिळाली नाही तरी स्वत:ची ओळख, स्थान हे कलावंताला मिळालंच पाहिजे. त्यादृष्टीने स्नेहल संगीत क्षेत्रात जिद्दीने पाय रोवते आहे. अपार कष्ट घेते आहे.

आज सिन्नरमध्ये ज्या कुणी रसिकांनी स्नेहलच्या आवाजात गीतरामायण, कृष्णजन्माष्टमी, पहाट पाडवा यासारखे तिचे स्वतंत्र कार्यक्रम ऐकले असतील, त्यांना स्नेहलची ही जिद्द, वेगळेपण सहज जाणवलं असेल. नव्हे स्नेहलचा स्वर हा आपल्या परिसरातील एक महत्त्वाचा आवाज ठरावा! अशी तिची तयारी सुरू आहे.

सिन्नरसारख्या तालुक्याच्या गावात गाण्याच्या फारशा संधी नाहीत. नाशिकमध्ये सोयीच्या दृष्टीने नाशिकबाहेरच्या कलावंतांना अभावानेच संधी मिळते. हे सर्व ज्ञात असूनही स्नेहलने आपलं सिन्नर गाव हे सोडलेलं नाही. तिला या गावात राहूनच स्वत:ला घडवायचंय, आणखी गायनाची नवीन पिढी घडवायचीय. हा तिचा ध्यास आहे.

आज स्नेहलच वय आहे २२ वर्षांचं! या वयात तरुण मुलामुलींना केवळ आपलं स्वत:चं पडलेलं असतं. तिथे स्नेहल गावातल्या उद्याच्या नवांकुरांचा विचार करतेय. ही गोष्ट निश्चितच स्पृहणीय आहे. (एव्हाना स्नेहलच्या कामाला सुरुवातही झालेली आहे). 'माझी स्पर्धा माझ्याशीच!' असं मानून स्नेहलचं स्वत:ला घडवणं सुरू असतं. चांगल्या कविता, गाणी निवडून त्या स्वतंत्रपणे गाणं हा तिचा छंद बनून राहिला आहे. सुरेश भटांच्या गझला स्नेहल परिणामकारकतेने सादर करते. परंतु वेगळेपण सांगायचं झालं तर गझलनवाज भीमराव पांचाळेंची गझलं,

त्यांच्या गझलांच्या चाली स्नेहलच्या नवीन अभ्यासाचा व आनंदाचा भाग बनून राहिल्या आहेत. भीमराव पांचाळेंच्या गझल तिला तिच्या आवाजात रसिकांपर्यंत पोहचवायच्या आहेत. भीमराव पांचाळे, यशवंत देव, श्रीधर फडके यांसारखी प्रयोगशील माणसं तिला आदर्श वाटतात.

आकाशवाणी, दूरदर्शन, दूरचित्रवाणीच्या अनेक वाहिन्या, कॅसेट, सीडीतून संधी मिळेल तेव्हा मिळेल. आपण, श्रद्धेनं आणि आनंदाने गाणं गात रहावं! ही स्नेहलची जीवन निष्ठा आहे. याचं विश्वासाने स्नेहल सिन्नरसारख्या तालुक्याच्या गावात आपलं गाणं गाते आहे. प्राणपणाने गाणं जपते आहे.

लौकिकार्थाने स्नेहल एक प्रथितयश गायिका नाहीच मुळी, पण ज्या काहीशा खेडूत वातावरणात आणि ज्या निष्ठेने स्नेहल गाते आहे. ते गावोगावच्या नवोदित गायकांना, कलावंतांना हुरूप देणारं असं आहे. नव्हे स्नेहलसारख्या अस्सल कलावंतांनीच आपल्या गावाचं, खेड्यांचं सांस्कृतिक वातावरण खऱ्या अर्थानं जिवंत ठेवलंय. आपलं जगणं 'अर्थपूर्ण' करण्यात महत्त्वाचा वाटा उचललाय. हे तर शंभर टक्के खरंच!



# आमचे टलूतात्या
# **मदन शंकर उगलमुगले**

निफाड तालुक्यातील विंचूरजवळचं डोंगरगाव हे आमचं गाव. माझं शिक्षण पूर्ण होईपर्यंत म्हणजे साधारण १९८६ पर्यंत आमच्या या गावात एसटीची सोय नव्हती. मग निफाडहून विंचूरपर्यंत गेलो की, पालखेड कॅनॉलच्या रस्त्याने आम्ही पायीच डोंगरगावला जायला निघत असू. उन्हं मी म्हणतंय... पायात चपला नाहीत... रस्त्याने सारी धूळ, फुफाटा, रस्त्याच्या कडेला एखादं झाड म्हणून नाही. घशाला तहानेने कोरड पडली तरी वाटेवर लागून एखादी वस्ती किंवा घर नाही. त्याकाळी कुठे होत्या आजच्यासारख्या बिसलरी किंवा वॉटरबॅगच्या चैनी? दोनेक किलोमीटरचा पायरस्ता पार दमवून टाकायचा मला. मुळात मी हडकुळा, अशक्त. काळा-सावळा असला तरी नाजूक प्रकृतीचा. एवढं अंतर चालून गेलो की, मला आजारल्यासारखं व्हायचं.

एवढं कमी आहे की, काय आमचं घर थेट गावाच्या एका कोपऱ्याला. चांभार आळीजवळ. त्यामुळे चावडीसमोरून जाताना वडिलांचं नाव चिंतामण असूनही तेथील लोक 'ए चिंधूचं पोर आलं...' किंवा आमची घरची बैलजोडी व्हंडी असल्यामुळे 'ए एकू, तुमचे बैल हे पाय आशेऽऽ' असं म्हणून हाताची मूठ आवळून दोन बोटं किंचित मुडपून वर करीत असे. व्हंड्या शिंगांची ॲक्शन करून मला चिडवायचे.

मला या दोन्ही गोष्टींची चीड येई. परंतु माझा स्वभाव उलटून उत्तर देण्याचा नव्हता. मनात मात्र चीड येत असे.

घरी आलो की, चांगलं तांब्याभर पाणी पिताना माझी नजर टलूतात्या कुठे दिसतात का? हे शोधत राही, पण ते कुठले आलेहेत दुपारी-तिपारी घरी यायला. ते सवसांजच्यालाच घरी यायचे, पण निफाडहून गाडीत बसताना विंचूरला, रस्त्यात किंवा गावात तरी ते दिसावेत, असं मला वाटत राही. कारण ते माझ्याशी गोड बोलायचे. माझी आस्थेने विचारपूस करायचे. मला न आवडणाऱ्या शाळेच्या, अभ्यासाविषयी 'ब्र'ही काढायचे नाहीत. मी त्यांच्याजवळ न भीता जायचो. प्रेमाने जायचो. ते माझ्या पाठीवरून कौतुकाचा हात फिरवीत. माझ्या येण्याचा त्यांना आनंद झालेला दिसत असे. बाकी माणसं हाडतूड करायचे, असं नाही, पण 'इवेक आला' एवढी एक प्रतिक्रिया दिली की, जो तो आपल्या कामात गढून जायचा. प्रत्येकालाच काहीना काही काम हे असेच.

तीस-पत्तीस वर्षांपूर्वीचं आमचं गाव. ते काय, एक चावडी, मंगलोरी कौलांची एक प्राथमिक शाळा. भेंडीच्या झाडाचा एक पार. वाणीन काकीचं एक छोटसं किराणा दुकान. मारुती मंदिर, गणपती नि एक शंकराच्या पिंडीचं मंदिर, एक उंचसं मोठ्या बाबाचं स्थान, पाचपन्नास उंबऱ्याचं गाव. कामाची सारी माणसं मळ्यात, कामानिमित्त काही विंचूर, लासलगाव किंवा नाशिकला कुठंकुठं, पोरं इकडं-तिकडं पांगलेली. दिवसभर डोंगरगावात मला कंटाळा यायचा. त्या लहान वयात कुठली येणार दुपारची झोप?

मग मी काय करायचा, आमच्या घरासमोरच्या आडावर दिवसभर बाया-माणसं आडाचं पाणी शेंदताना दिसायच्या, ते पाहत राहायचो. घिसाड्याच्या पालावर उभं राहून काय बाय चाललेलं काम पाहत उभं राहायचो. लोहाराच्या त्या भात्याची दोरी आपणही हातात घेऊन लयीत खालीवर करावी, असं वाटे. परंतु माझा स्वभाव लाजाळू. भेंडीखाली सुताराच्या मेटावर चाललेलं कामही मी आवडीनं पाहायचो. पटाशी,

कानस, रंधा, करवत, पाचर हे शब्द नि त्यांचं काम पाहताना ते कामही करून पाहावं वाटे. आख्खी बैलगाडी, नांगर, वखर, फण तयार होताना मी पाहिले आहेत. शिवाय गावात कुणी बाज विणतंय, कुणी चिलीम ओढतंय, न्हावी कुणाची दाढी, डोकी किंवा चूच करतोय जे दिसल ते मी न्याहाळून पाहायचो. कधी गोखरं वेचून खा, कधी पाटावर अंघोळ कर, असा दिवस निघून जायचा, पण माझा एक डोळा टलूतात्या केव्हा घरी येतील! हे शोधत राहायचा.

टलूतात्या घरी आले की, आमच्या घराला एक जीवंतपणाच यायचा. ते आले की, ते कुणाला तरी हाक मारत यायचे, 'एऽ संजू, विजू कोणंय रे तिकडं' असं प्रसन्न मनाने यायचे. टोपी खुंटीवर टांगायचे. सदरा काढायचे. कोप्रीवर राहायचे. तोंड-हातपाय धुवायचे. त्यांच्यासाठी चहा व्हायचा. तो ते मलाही विचारायचे. त्यांच्या हातातला पेपर किंवा विंचूरहून आणलेला खाऊ आम्ही मिळून खायचो. ते माझी आवर्जून वात-पुस्त करायचे. मला मूठभर मास चढल्यासारखं गोड वाटायचं. दिवसभर ते घरीच रहावेत असं वाटत रहायचं.

संध्याकाळी माझ्या उत्साहाला भरते यायचे. मारुती मंदिरात, काही घरातून हरिपाठ सुरू असे. गाईगुरं घरी परतलेली असत. चावडीसमोर आता कर्त्या माणसांची उठसब असे. गप्पा-टप्पा, शेकोट्या, पोरांचे नाना खेळ, मस्ती, त्यात एखादं लग्नकार्य असेल तर त्याची तयारी, वाद्यांचे आवाज, जागरण, गोंधळ असं काही तरी गावात कुठे असायचं. त्यावेळी माझ्या आनंदाला पारावार राहत नसे. तात्याही त्यात एक असत. गावातले ते कुणी महत्त्वाचे माणूस वगैरे आहेत, असं वाटायचं. कुणा गडीमाणसांना ते प्रेमाने कातवायचे तेव्हा मला 'फुगीर' झाल्यासारखं वाटायचं. तालुक्याच्या गावात माझे वडील-अण्णा किती दबून राहायचे.

दिवसभर गावाबाहेर राहणारे तात्या गावात इतके लोकप्रिय नि महत्त्वाचे कसे? हा प्रश्न तेव्हाही मला पडायचा. पण मी कुणाला कधी विचारलं नाही, पण तात्या दिसायचे सात्विक नि प्रेमळ. डोक्यावर

इस्तरीची पांढरी स्वच्छ टोपी, पांढरा शुभ्र शर्ट, खांद्यावर निळीचं मऊसूत उपरणं, मसराईचं स्वच्छ धोतर, पायात कापडी किंवा रबरी बूट, मूळात होते ते काटकुळेच, पण गोरेपान. नाकीडोळी तरतरीत. बोलताना ते प्रेमाने बोलत. त्यांचं चालणं-बोलणं अदबशीर असे. एकूण काय तर टलूतात्या हे माझ्या आवडीचं नि आनंदाचं असं माणूस होते.

ते सकाळी लवकर उठायचे. स्वच्छ आंघोळ करायचे. टिनोपॉलमध्ये धुतलेले आणि नीळ घातलेले कपडे घालायचे. चहाऐवजी कपभर दूधच घ्यायचे. त्यांना बरं नसायचं की काय म्हणून ठकूकाकू त्यांना त्यांच्या गोळ्या आठवणीने काढून द्यायची. मग ओट्यावर उभं राहून ते घरातल्या कुणाचं नाव न घेता शेतातल्या कामाची लाईन लाऊन द्यायचे. उगीच थोडं कातावल्यासारखे करायचे. घरातले सारेजण त्यांचं म्हणणं ऐकून घ्यायचे. कारभारी होते ना ते घराचे. मला त्यांचं दटावणंही आवडे. कारण त्यात एक आपुलकी असे. प्रेमळपणा असे. निघताना ते माझ्याशी फार बोलत नसत, पण ‘ए विवेक, उन्हात खेळू नको, इळवारी जेवून घे’ असं सहज उच्चारलेलं एखादं वाक्यही मला आनंद देऊन जायचं. मी खरं तर मोहरूनच जायचो.

अण्णांपेक्षा ते वयाने लहान होते. त्यानंतर रामनाथ तात्या, सोन्याआत्या, सखूआत्या यांना गावातच दिलेलं. तुळसाआत्याला शिवऱ्याला दिलेलं. हरीतात्या एक चुलतचुलते, नि बारा चुलत आत्या. मुरल्याबाबांच्या भीमादादाचं घर, आणखी वाड्यातले सख्ये-चुलत भाऊबंद, त्यांची पोरंसोरं असा मोठा गोतावळा तात्यांनी प्रेमाने सांभाळला. भाचरांची, पुतण्यांची लग्नकार्य, त्यांची सुख-दुःखं, देणं-घेणं, माहेरवाशीणींची-जावयांची वास्त-पुस्त हे सारं तात्या आवडीने करायचे. शिवाय गावातले, विंचूरचे, गुंजाळवाडीचे, पाबळवाडीचे, कुठले कुठले त्यांचे मित्र, सोयरे, धायरे यांच्या कामात त्यांचा दिवस निघून जायचा. कुणाकुणाची लग्नकार्य, हळद, साखरपुडा, सुपारी, बस्ता, परतमूळ, तीर्थयात्रा, माऊंदे, मौंजी, दशक्रिया, कोर्ट-कचेऱ्या, बैठकी, आजारपण, शासकीय-खासगी

कामं, बाजारहाट अशी त्यांच्या कामाला खळ नसे. बरं या माणसांमध्ये त्यांना कुणी लांबचा-परका, गरीब-श्रीमंत असा वाटायचा नाही. सर्वजण जवळचे. महत्त्वाचे. त्यामुळे टलूतात्या सर्वांना आपले वाटायचे.

त्यामुळे प्रत्यक्ष शेतीकाम असं त्यांनी कधी केलं नाही. आजोबा, आजी, काकू, रामनाथतात्या, संजूदादा, एखादंदुसरा गडी कामाला असे. ते रोज कुठल्या न कुठल्या कामात असत. कामांनी दमून जात. आधीच कृश असल्यामुळे रात्री थकून जात. जेवणखाण मोजकं. जेवता जेवता ते झालेल्या कामांची चौकशी करीत. बाहेरच्या कामांची माहिती देत. क्वचित कुणाला चेष्ठेने बोलायचे. कुणाला चिडवायचे. पण त्यात अतिरेक नसे.

एवढं करूनही घरातल्या सुख-दु:खाच्या प्रसंगी लग्नकार्याशिवाय ते घरी किंवा गावात रहायचे नाहीत. त्यांची उठबस विंचूर, लासलगावला. भल्या सकाळी विंचूरला जाऊन गांवकरी, देशदूतसारखा एखादा पेपर घ्यायचा. चहा वगैरे घ्यायचा. न्हाव्याच्या दुकानात दाढी करायची. मित्रांसोबत काहीबाही काम करत ते दिवसभर फिरत रहायचे. त्यांच्या जीवाला आराम असा नसेच. त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या तीर्थयात्रा आणि दिवसभराच्या या विविध कामाकाजामुळे त्यांचं व्यवहारज्ञान उत्तम होतं. शालेय शिक्षण कमी झालेलं. परंतु सर्वांची कामे करून मुळच्या गोड स्वभावातून अनेक माणसं त्यांनी जोडली. आयुष्यभर ती प्राणपणाने सांभाळलीही.

या कामाची बक्षिसी म्हणून त्यांना काही मानमराबतही गावात मिळाले. डोंगरगाव ग्रामपंचायतीमध्ये दहा-पंधरा वर्षे ते उपसरपंच नि सरपंचही होते. तरी या पदांचा ‘तोरा’ किंवा मिजास त्यांनी कुठे कधी दाखवला नाही. ते नेहमी एक साधं आयुष्य जगले. माझ्यापेक्षा वयाने मोठा असलेला संजूदादा हा त्यांचा मुलगा अभ्यासात हुषार निघाला. परंतु दहावीनंतर तो शेतीतच राहिला. मंगल ही त्यांची मुलगी अत्यंत लाडकी. तिच्या जन्माचं निदान ‘पुणे’ येथे झालं म्हणून लग्नाआधी

सर्वजण तिला 'पुणी' म्हणायचे. नंतर संजूदादाचं आणि मंगलचंही लग्न झालं. घरात सून आली. नातवंडं झाली, पण तात्यांनी 'सासरेपणाचा' किंवा आजोबां'चा तोरा कधी दाखवला नाही.

दरम्यान, आजी-आजोबांचं वृद्धापकाळामुळे निधन झालं. टलूतात्या या दोघांचेही विशेष लाडके असल्याने तात्या त्यांच्या जाण्यानं जास्तच खचले. त्यावेळी तात्यांना एखादा लहान मुलाप्रमाणे रडताना मी पाहिलं. मोठी माणसं रडताना अगदी पाहवत नाहीत. मुळात नाजूक, कृश असलेली त्यांची प्रकृती आणखीच खालावली. परंतु म्हणून त्यांनी सर्वांना सहकार्य करण्याचा आपला मूळ स्वभाव बदलला नाही. त्यांनी स्वत:ची अशी काळजी केव्हाच घेतली नाही.

जसजसा वयाने मी मोठा होत गेलो. कसं नि काय तात्या नि माझ्यातलं अंतर वाढत गेलं. जमिनीच्या वाटपावरून घरात वाद सुरू होते. परंतु मी स्वत: मनाने टलूतात्यांच्या बाजूने असे. कारण त्यांची नाजूक प्रकृती, प्रेमळ स्वभाव, त्यांचा असा खर्चिक स्वभाव, फिरस्ती वृत्ती. माझे वडील-अण्णांना शिक्षकाची नोकरी, रामनाथतात्या कामाला वाघ! म्हणून तात्यांचं कसं होईल? ही काळजी मला वाटे.

आमची ठकूकाकू तशी होती कामास चटपटीत, हुषार. पण वाटे पडले नि तिचं ते करारी रूपच गेलं. तात्यांची काळजी घेण्यात, घरकामात तिचा दिवस जाऊ लागला. ती अधिक दमलेली, थकलेली वाटू लगाली. एरवी ती घरात मुख्य होती. तात्यांचं औषधपाणी, त्यांचं राहणं, खाणं-पिणं, बाजारहाट, घरातलं देण-घेणं तीच पाहायची, तात्या टेकले नि काकूही जणू शांतच झाली. जणू तिची उमेदच खचली.

मला आठवतंय, बाकीचे लोक तेव्हा मला हिणवाचये, माझ्याकडे दुर्लक्ष करायचे, पण जेव्हा जेव्हा मी डोंगरगावला गेलो तेव्हा तेव्हा तात्यांनी मला प्रेमाने जवळ घेतलं. मला मुक्कामी ठेऊन घेतलं. रात्री झोपण्यापूर्वी ते माझ्याशी भरपूर बोलत. मला हसवत.चार गोष्टी सांगत. मी एक-दोनदा त्यांच्या मागे लागलो तर मला ते आवडीने सोबत घेऊन

गेले. विंचूर-लासलगावात त्यांनी मला फिरवलं. मला आवडणारा भत्ता, गुडीशेव, लाडू, जिलेबी खाऊ घातली. त्यांनी माझी कधी हाडतूड केली नाही. मला हिणवलं नाही. म्हणून तात्यांबद्दल कुणी मला कितीही वाईटसाईट सांगितलं असेल, त्यांची बदनामी केली असेल परंतु तात्या नेहमीच माझ्या आवडीचं असं माणूस राहिले आहेत.

१९८३ साली पुण्यातील ससूनला मी दोन महिने ॲडमिट होतो, तेव्हा हॉस्पिटलची काथ्या नि वरतून रेक्झिनची गादी मला टोचू नये म्हणून त्यांनी पुण्यातून कापसाची गादी भरून आणली. तपासणीसाठी एकदा माझं रक्त काढताना पाहून तात्या चक्कर येऊन खाली पडले. माझ्या आई-वडिलांइतकीच तात्यांना माझ्या तब्बेतीची काळजी होती. कुणी नसताना ते माझ्यासोबत बसत. मला विनोद सांगत. परंतु मनाने ते चिंतेत असत. मला त्यांचा त्यावेळचा भाबडा चेहरा अजून स्वच्छ आठवतो.

माझ्या दोन्ही बहिणींची लग्न गावीच झाली. तेव्हा त्यांचा लग्नातील सहभाग आणि उत्साह विलक्षण होता. त्यावेळी त्यांचा उत्साहाचा, उमेदीचा काळ होता. पुढे त्यांचे हातपाय बसले. माझ्या नोकरीमुळे नि आमच्या वाट्याला आलेली शेती आम्ही विकल्यामुळे लग्नकार्यांशिवाय तात्यांची भेट होणं दुर्मिळ झालं. मला गावी जाणं नको वाटे. शेतीबरोबरच तात्याही आपल्यापासून तुटले, याचं वाईट वाटायचं. त्यांची आठवण आली की, मी हमसून हमसून रडायचो. माझं मनच खचलं होतं. कुणालाच भेटू नये असं वाटायचं. मी त्या सगळ्यांपासून शरीराने नि मनाने दूर दूर गेलो. एकटे टलूतात्या असे होते की, ते फक्त मला फार हवे होते. मात्र माझा लहान भाऊ किरण नि त्यांचे सूर जमले. त्याच्याकडून कुणा, कुणाकडून मी तात्यांची चौकशी करत रहायचो. भाऊहिस्से झाल्यानंतरही ते मला केवळ आवडतच राहिले. त्यांच्याविषयीचा मनातला आदर कुठे कमी झाला नाही. त्यांच्या आठवणी मनाला पिळ पाडत राहिल्या.

मध्यंतरी किरणचा फोन आला, ‘दादा, आपल्या तात्यांना बरं नाहीये.

तू येऊन जा.' लागलीच मी डोंगरगावला गेलो. तात्या अंथरुणाला खिळलेले. हातपाय अधिक कृश झालेले. मी त्यांना असं झोपताना कधी पाहिलेलं नव्हतं. वाईट वाटलं, त्यांच्या कंटाळून जाण्याचं. आम्ही दोघं डोळ्यांनीच बोललो. इतरांशी इकडचं-तिकडचं बोलत राहिलो, पण मन आतून चरकलच. 'परत येतो' असं त्यांना म्हणालो. परंतु तसं झालं नाही. तात्या गेले. डोंगरगावचं माझ्या आत्यंतिक प्रेमाचं माणूस गेलं.

शेती विकल्यानंतर गाव जोडून ठेवणारं ते एक प्रेमाचं माणूस होतं, माझ्यासाठी. मला उदास-उदास वाटलं. एकटं नि पोरकंही वाटलं. तात्यांच्या अंत्ययात्रेला खूप माणसं जमली. आयुष्यभर त्यांनी माणसं जोडली. तात्यांनी आयुष्यात कमवलं ते फक्त माणसाचं प्रेम!

तात्या गेले. त्यांच्या कितीतरी आठवणी मनात आहेत. ते माझ्या कविता-लेख वाचत असत. परंतु डोंगरगावात तात्या असे एकच माणूस होते की, मला त्यांना माझे सारे साहित्य, लेख वाचायला द्यायचे होते. त्यांना ऐकवायचे होते. त्यांच्याकडून माझं कौतुक करून घ्यायचं होतं. परंतु कसं नि काय ते राहूनच गेलं. आता तात्या नाहीत. परंतु मला माझे टलूतात्या जसे हवे होते तसा त्यांचा नातू, जो बी.एस्सी., एम.बी.ए. शिकलाय. सेटनेटमध्ये नशिब अजमावतोय. नम्रपणे बोलतो-वागतो. त्या माझ्या पुतण्यात, विलासमध्ये मी तात्यांना पाहतो!



# एक मनस्वी कवी
# **कैलास पगारे**

कवी माणूस म्हटला की, त्याला व्यवहार फारसा कळत नाही. तो आपल्याच विश्वात (स्वप्नात) रममान असतो. जगाच्या दृष्टीने कवीचं हे वेडेपण खूपदा त्याच्या गावीही नसतं. रुढार्थानं कवी माणसाचं असं चित्र जग रंगवीत असताना आजकालचे तथाकथित कवी मात्र या मताला छेद देत पक्के व्यवहारी झाले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

म्हणजे ते प्राध्यापक, समीक्षक, प्रपाठक अशा सुरक्षित वगैरे नोकऱ्या पटकवतात आणि आपला कवितेचा छंद जोपासत व्यवस्थितपणे नोकरीही टिकवतात!

परंतु कवी कैलास पगारेंसारखी कवीमनाची माणसं वयाच्या पन्नाशीनंतरही खऱ्या अर्थानं कुठंच व्यवस्थितपणे स्थिर होत नाही. व्यवस्थेच्या ठोकरा खात पुन्हा पुन्हा उभं राहण्याचा प्रयत्न करतात. पोटाला भाकर असली काय, नसली काय जगणं सुटत नाही. तशी कविताही सुटत नाही. 'शो मस्ट गो ऑन'सारखं आयुष्य एखाद्या दिशाहीन भिरभिऱ्यासारखं भिरभिरत राहतं!

हो तर मुद्दा असा आहे की, मी बोलतोय ते नाशिकचे विद्रोही कवी कैलास पगारेंबद्दल. पन्नाशीची उमर, सडपातळ अंगकाठी. काळा तुकतुकीत रंग, पांढरे स्वच्छ दात, डोळ्यांवर सोनेरी काड्यांचा चष्मा,

पांढरेशुभ्र कपडे, खिशात मोबाईल, पिवळसर डोळे, टिपिकल आंबेडकरी चळवळीत शोभावं असं नीटस् व्यक्तिमत्त्व.

कवी कैलास पगारेंकडे पाहिल्यानंतर कोणालाही वाटावं, खावून-पिऊन अगदी सुखात असावेत. चार पैसे गाठीला, एखादं स्वयंचलित वाहन दिमतीला, मुलंबाळं छान शिकून कमावते झाले असतील, मुलींची लग्नं झाली असतील. एकंदरीत हा माणूस सुखचैन माणूस असावा असाच कोणाचाही ग्रह व्हावा, पण खरं चित्र निराळंच आहे.

म्हणजे मी अधूनमधून विचारायचो तेव्हा पगारे म्हणायचे हसत हसत, उडत उडत. 'छान चाललयं! मजेत आहे बॉ! नवीन संग्रह ना? काय घाइये काढायचाच आहे एवढ्यात!' मला हे सर्व खरं वाटायचं. वाटत राहायचं.

मात्र २००३ सालच्या व्यासपीठ दिवाळी अंकाचं संपादन करताना अंकासाठी कैलास पगारेंकडे कविता मागवली. त्याप्रमाणे पगारेंनी कविता तर दिलीच, सोबत आपल्या डायरीची काही पानंही दिली. 'बघा वाचून आमची डायरी. बरी वाटली तर छापा.' कविता छान होती म्हणून कविता स्वीकृत करून न वाचताच ही डायरी मात्र बाजूला ठेवून दिली.

नंतर केव्हा तरी (सावकाशीने) ही डायरी वाचली. डायरी २००३ सालची! म्हणजे अगदीच अलिकडची होती. संपूर्ण डायरी बारकाईनं वाचून घेतली नि अस्वस्थ झालो. जागेअभावी ही संपूर्ण डायरी इथं देणं अशक्य असलं तरी कवी कैलास पगारे वास्तवात किती हलाखीत दिवस कंठताहेत ते त्यात वाचलं.

नोकरी नाही, धंदा नवीन. भांडवल नाही. मुलं चाचपडताहेत. मुलीच्या लग्नाची जबाबदारी. त्यात वृद्ध आई-वडिलांच्या औषध-पाण्याला पैसा नसणं, त्यांचं मरत-मरत जगणं डोळ्यांनी पाहणं, पैसा नसल्यामुळे घरातच बसून राहणं. इतकी हतबलता की, पैसे नसल्यामुळे घरात टीव्ही, फोन, रेडिओच काय पेपरसुद्धा येत नाही. म्हणून नाशिकमध्ये राहून जगाशी संपर्क तुटल्यासारखा. त्यामुळे काळजातल्या

आदरणीय शांताबाई दाणी जातात तरी पटकन खबर लागत नाही. याची प्रचंड बोच लागते. आणखी कवी वसंत बापट जातात तेव्हा पेपरवाले 'चळवळीतला माणूस' म्हणून आपली प्रतिक्रिया का घेत नाही?

एवढंच काय सावानासारख्या संस्थेत कधी काळी खूप जोडलो गेलेलो आपण 'आता साहित्यिक मेळाव्याची साधी पत्रिकाही ते लोक आपल्याला पाठवत नाही?' कैलास पगारेंची ही मानसिक घुसमट त्यांच्या रोजनिशीतून वाचताना अस्वस्थता येते. घरात चहा-साखरेलाही पैसे नसतात मग स्टॅम्पपेपर्स कुठून विकत घेणार? एवढचं काय त्यांच्या दोन्ही पेनमधील रिफिल संपतात, त्या आणायलासुद्धा पैसे नसतात, हे वाचून तर धक्काच बसतो. त्यापुढे गणपती उत्सवाचं मत आणि स्वामी नारायण मंदिरावरील हल्ल्यामुळे विश्व हिंदू परिषदेचा बंद, गांधी जयंती असे सामाजिक संदर्भानं येणारी मतंही वाचनीय असली तरी ती रिफिलीइतकी गलबलून टाकत नाहीत.

ही डायरी वाचून मला कवी कैलास पगारेंचा आजपर्यंतचा प्रवासच जाणून घ्यावा वाटला. कधी काळी नामदेव ढसाळ, भाई कंसारांबरोबर काम केलेला, दोन काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आणि महाराष्ट्रभर बऱ्यापैकी नाव असलेल्या कैलास पगारेंना वास्तव विचारलं तर जीवाभावाच्या मित्राला सांगावं असं साठलेलं दुखणारं, ठसठसणारं असं काही पगारेंनी मला सांगायला सुरुवात केली.

मी कैलास पगारे! एक कवी म्हणून कवीमित्रांमध्ये परिचित आहे. काही कंपनी कामगारांना मी 'युनियनचा माणूस' म्हणून माहीत आहे. काही व्यापाऱ्यांना मी एकेकाळचा होलसेलर म्हणून माहीत आहे. मी काय केलं नाही. पानटपरी चालवली, भाजीपाला सप्लायर झालो, गोळ्या-बिस्कीटं विकली, सुटा मसाला विकला, मुंबईत असताना हातगाडी ओढून हमाली केली. दारुगुत्त्यावर काम केलं, वर्कर म्हणून कंपन्यांत कामं केली. अजून मिळेल ती छोटी-मोठी कामं करून पोट जाळलं. कुटुंब तगवलंय. वरवर खोटं खोटं हसत जगण्याला नव्याने सामोरं

जात राहिलोय.

तसा मी नवसाचा. गोड गळ्याने जात्यावर गाणाऱ्या आईचा लाडका, माझ्या नावाचा दगडी म्हसोबा अजूनही गावात आहे. आई-वडील अशिक्षित असतानाही जुनी मॅट्रिक पास झालो. शेती असून नसल्यासारखी. म्हणून गाव (आधारवड, ता. इगतपुरी) सुटलं. पोटापाण्यासाठी नाशिकला आलो. कंपनीत वर्कर म्हणून लागलो.

मित्रांबरोबरीने मुंबईला गेलो. तेथे पडेल ते काम केलं. दारुगुत्त्यावर काम करतानाही वाचत होतो. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात कविवर्य नामदेव ढसाळांची भेट झाली. ढसाळांप्रमाणे आपणही लिहावं, वाचावं, पँथरचं काम करावं असं वाटायचं. मी पँथरमध्ये असण्याचा एक फायदा झाला, माझं वाचन प्रचंड वाढलं. नेतृत्त्व करावं असंही त्यावेळेसच मनात आलं. त्यावेळी मी बऱ्यापैकी बेफिकीर होतो.

साधारण ६९ ते ७१ पर्यंत मुंबईत होतो. त्यावेळी 'संदेश' ही माझी कविता प्रथमच 'मराठा'मधून प्रसिद्ध झाली होती. त्यावेळी अर्जुन डांगळे, भाई संगारे, अविनाश मातेकर, ज.वि. पवार यांच्याबरोबर रहावं वाटायचं, पण कारखान्यात एकदा लोखंडाच्या गरम रसानं हाताला फोड आले, त्यात वडिलही न्यायला आले नि माझी मुंबई सुटली. पुन्हा नाशकात आलो.

१९७२ ते ९४ पर्यंत कंपनीची नोकरी केली. त्यात चार वेळा निलंबन झालं. दरम्यान, कामगार नेते भाई कन्सारांसोबत कामगार चळवळ चालवली. काही काळ मी सीटूचा फूलटायमर होतो. दत्ता सामंतची युनियनही स्वींगमध्ये चालवली. या सर्वांमुळे कंपनीने मला कम्पलसरी रिटायरमेंट दिली.

मिळालेल्या पैशात घराचा प्रश्न काही अंशी सुटला. थोडंफार कर्ज करून घर केलं. आठ जणांचा कुटुंबकबिला तेव्हापासून कसातरी ओढतोय.

सहा-सात वर्षापासून स्टँपवेंडरचं लायसन भेटलंय. पण भांडवल

कुठंय? शिवाय आपले मित्रपरिवाराशी संबंध? फिरस्ता स्वभाव. त्यातून कवीमन, चळवळीचा किडा मग खरेखुरे मुद्रांक विकून महिन्याकाठी दहा-वीस हजार भेटतात. त्यात घर कसं चालणार? खूपदा स्टँपसाठी माझ्याकडे पैसेच नसतात.

'सर्व्हे ' या पहिल्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाला दया पवार अध्यक्ष होते आणि डॉ. अनिल अवचटांच्या हस्ते प्रकाशन झालं. 'याही मौसमा'ने मला कवी म्हणून चांगलं नाव दिलं. त्यानंतर सातत्याने लिहितो आहे. काव्यसंग्रह आहेत, लेख आहेत पण छापणार कोण? सर्व बाड तसंच पडून आहे.

मुद्रांक विकतोय, पण त्यात काही जादा पैसा भेटत नाही. त्यात आपण कोणाला नाडत नाही. शिवाय आपल्याला हा बैठा धंदा मनापासून कधी आवडलाच नाही, पण काय करणार? जमलं तसं मन बाहेर खेचतच असतं.

म्हणून धंदा सोडून (व्हँडरचा) मी कधी लेबर कॉन्ट्रॅक्टर असतो, एखाद्यावेळी फूड फेस्टिवलच्या बाहेर पार्किंग कॉन्ट्रॅक्टर असतो, कधी बॅगा विकतो. जोडीला कविता-बिविता, पुस्तकं, कार्यक्रम सुरू असतंच.

म्हणजे आता थोडाफार शाना झालोय. चळवळीचे दिवस संपलेहेत. फुकटची धुणी धूणं आता इस्टॉप. डोक्यावर घरच्यांची जबाबदारी आहे ती तरी पूर्ण करीन म्हणतोय.

आदर्श, पदं-बिदं, चळवळीच्या किड्यानं महामूर फरफट झाली आयुष्याची. बाकी सगळे सुखात हायेत. आपली वणवण कुठं संपलीय? हे उमगलंय...

किती मोठ्या(?) माणसांमध्ये वावरलो, त्याचा पश्चाताप नाही, पण घरच्यांना प्रेम देऊ शकलो नाही, याचं शल्य वाटतंय म्हणून खडबडून जागा झालोय. गेलेल्या दिवसांबद्दल कुढत बसण्यापेक्षा येणाऱ्या दिवसांना सामोरं जातोय. जिवतोड मेहनत करतोय.

विद्रोही ते मनस्वी कवी असा कवितेचा प्रवास अखंड सुरूच आहे.

'मल्टीनॅशनल वॉर' आणि 'माणूसनामा' हे दोन संग्रह आता नव्याने झालेहेत. मुलीच्या लग्नाइतकीच ही माझी जबाबदारी मी पार पाडली! याचं समाधान आहे. घर आणि कविता खऱ्यार्थानं सावरलीय. कवी कैलास पगारे असं पोटच्या मुलींइतकंच कवितेला आपलं मानतात, याचं कौतुक वाटतं.

...आयुष्यात बऱ्यापैकी फरपट झालेल्या एखाद्या मनस्वी कार्यकर्त्याला आणि पाठीमागे एक मायेचा उबदार कुटुंबकबिला असताना काहीही स्वैर, दिशाहीन मुशफिरी करणाऱ्या आज कवी कैलास पगारेंना पुन्हा आयुष्यात उभं केलयं ते कवितेने, बाबांच्या पुस्तकांनी! मुद्रांक विकणं हे एक जगण्याचं साधन, पण साध्य मात्र चांगला माणूस म्हणून जगण्याचे. 'निश्चयाचे बळ तुका म्हणे तेची फळ' मित्रहो, खरं तर यानिमित्ताने सांगायचं होतं ते इतकंच!

# वेगळ्या वाटेचा प्रवासी
# **राहुल रघुवीर फालक**



'टीन एजर्स' मुलं म्हटली की, मौज-मस्ती आणि बिनधास्त वागण्याचा एक कैफ हा मुलांमध्ये असतोच, खूपदा. आई-वडील मुलांचे लाड पुरवतात. मुलांना आपल्या मित्र-मैत्रिणींमध्ये भास हा मारायचाच असतो. मग मुलांच्या त्या स्वच्छंद हुंदडण्याला नसते सीमा ना असते कसलीच बांधिलकी! असे चित्र आपण सर्वसाधारणपणे सर्वत्रच पाहतो.

त्यातून पुढे अनेक प्रश्न निर्माण होतात. लक्षात येते किंवा पश्चाताप होतो तेव्हा खूप उशीर झालेला असतो.

परंतु साधारण अशा पार्श्वभूमीवर आपल्या नाशिकच्या खुटवडनगर, कामटवाडे भागात राहणारा राहुल रघुवीर फालक हा केटीएचएम महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा विद्यार्थी हा खऱ्या अर्थाने एक वेगळ्या वाटेवरचा प्रवासी आहे.

म्हणजे तो खेळतो भरपूर. मित्रांमध्ये रमायला त्याला आवडतं. वेळ मिळेल तेव्हा घरकामातही तो आवर्जून मदत करतो. तो त्याच्या आई-वडिलांचा नि आजी-आजोबांचाही छान लाडका आहे. मित्रांमध्ये, घरात त्याचं असणं, म्हणजे सर्वांसाठी एक आनंददायी अनुभव!

एरवी सर्वसामान्य दिसणारा राहुल वृत्तीने मात्र अत्यंत सालस आणि नम्र आहे. लहानपणापासून तो अत्यंत धाडसी आणि कल्पक आहे. त्याचे

वडील स्वत: एक निष्णात इलेक्ट्रिशियन आहेत. त्यामुळे विद्युत (इलेक्ट्रिकल) कामातलं बाळकडू त्याला आपल्या घरातच मिळालं. पण केवळ वायर किंवा बल्ब जोडणं यावर त्याचं विश्व मर्यादित नव्हतंच कधी!

'नवनिर्मिती' ही त्याच्या कल्पकतेला सतत खुणावत असते. वेगवेगळी, गुंतागुंतीची यंत्र पाहिलं की, ती खोलून पाहणं, त्या खुल्या भागाचं यंत्रातील स्थान, कार्य, उपयुक्तता वगैरे न्याहाळणं, त्याचा अभ्यास करणं, खोललेलं ते यंत्र पुन्हा अचूक जोडणं! हा राहुलचा आवडता छंद.

असं सारं काही व्यवस्थित अभ्यासून, त्यातून प्रेरणा घेऊन आपल्या घरातील टाकाऊ वस्तूंपासून आणि स्वत:चं तंत्र वापरून एखादं यंत्र, स्वयंचलित गाडी आपण बनवू शकतो का, हा त्याचा प्रयत्न सतत सुरू असतो.

मराठा हायस्कूलमध्ये इयत्ता आठवीत असतानाच राहुलने जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'धावत्या रेल्वेपासून उर्जा निर्मितीचा' प्रयोग केलेला होता. सन २००३-२००४ साली संपन्न या विज्ञान प्रदर्शनात राहुलचा प्रयोग लक्षणिय ठरला होता.

राहुलच्या घरी दुचाकी, चारचाकी अशा गाड्या आहेत. पण त्यातून आपल्यासाठी ठरवून निवडलीय, ती आपली सायकलच! शारीरिक आरोग्य छान राहतं. महागडं नि दुर्मिळ होत चाललेलं इंधन वाचतं. शिवाय प्रदूषणही नाही! त्यामुळे सायकलवर त्याचे अनेक प्रयोग सुरू असतात. डिसेंबर २००८ मध्ये त्याने 'फिटनेस सायकल'द्वारे उर्जा निर्मितीचा प्रयोग वाघ गुरुजी विद्यालय येथे यशस्वी करून दाखविला होता.

विज्ञान व पर्यावरण या विषयासाठी त्याची धडपड अखंड सुरू असते. मध्यंतरी त्याने स्वत:च रिमोटवर चालणारी ट्रक बनवून तो यशस्वीपणे चालवून दाखवला. या अफलातून गाडीचे स्वागत व कौतुक परिसरातील

सर्वांनीच केले. पण स्वत:चे पाय संपूर्ण जमिनीवर ठेऊन, गगनभरारी मारण्याचे स्वप्न त्याने उराशी जपलंय. कारण आता त्याला बनवायचंय ते चक्क विमान!

मोकळं नि खूलं आकाश त्याला सतत खुणावत असतं. म्हणूनच पतंग उडवण्यात त्याला विशेष रस आहे. त्याला मात्र कधीच कुणाचा पतंग काटायचा नसतो. हो, त्याला आपला स्वत:चा पतंग छानपैकी उंच नि दूरदूर न्यायचा असतो. त्याची स्पर्धा असते ती स्वत:शीच!

संगणक, टीव्हीसारख्या उपकरणांचं रुढार्थानं कुठलंही प्रशिक्षण वगैरे न घेता तो त्यांची जोडणी व वापर अचूकपणे करू शकतो. छंदातून पैसा किंवा नावलौकिक मिळवणे यापेक्षा त्यातून त्याला मिळवायचा असतो केवळ नवनिर्मितीचा निर्भेळ आनंद.

याबरोबरच राहुलंच वेगळेपण ते असं की, दर शनिवारी- रविवारी तो ठरवून पांडवलेण्याला जातो. तेथील निसर्ग आणि मानवनिर्मित सुंदरशा लेणी या प्रत्येकाने व्यवस्थितपणे जपाव्यात असे त्याला वाटते. तेथील लेण्यांमध्ये, शिळांवर काही प्रियकर- प्रेयसी आपलं स्वत:चं नाव लिहून - कोरून विद्रुपीकरण करतात. राहुल त्यांना तसं करण्यापासून परावृत्त करतो. कुणी नाहीच ऐकलं किंवा त्याच्या अपरोक्ष लिहिली गेलेली नावं वगैरे तो छानपैकी पुसून स्वच्छ करतो.

शिवाय तेथील झाडा-झुडूपांची तो विशेष काळजी घेतो. प्लास्टिकच्या कॅरिबॅग्स, रॅपर्स, रद्दी कागद, पुड्यांचा कचरा जमा करून तो त्याची योग्य ती विल्हेवाट लावतो. गेली ४-५ वर्ष राहुल हे काम मन:पूर्वकतेने करतो आहे.

एकूणच राहुलला सतत नवनिर्मिती करायची असते. सर्वांशी नेहमीच खूप प्रेमाने नि निर्मळ वागायचं असतं. निसर्ग व पर्यावरणाशी नातं घट्ट करायचं असतं.

राहुलचा हा सर्व चांगूलपणा (त्याच्या आई-वडलांच्या लेखी भोळसटपणा) मित्रांमध्ये मात्र कधी चेष्ठा आणि विनोदाचाही भाग

असतो. ‘तुझ्या एकट्याने काय जग बदलणारेय?’ वगैरे हेटाळणी सुरू असते.

पण राहुल खूपच आशावादी असा ‘तरुण’ आहे. ‘कुठल्याही चांगल्या कामाची सुरुवात ही स्वत:पासूनच होते!’ हे तत्त्व त्याला बळ देत असते. त्याला, त्याची ही ‘पर्यावरण वाचवा’ची चळवळ सर्वांसाठी करावी! असे वाटते म्हणून त्याच्या परीने तो याबाबत जाणीवपूर्वक प्रचार-प्रसार करीत असतो.

राहुल असा खूप आशावादी नि जिद्दी मुलगा आहे. जग सुंदर करू पाहणाऱ्या मोजक्या लोकांमध्ये राहुलचे स्थान असेलही किंचितमात्र! पण त्याची उत्साही मन:पूर्वकता! मात्र तरुणांना प्रेरणादायी तसेच सर्वांसाठीच अतिशय उपयुक्त! राहुलसारख्या धडपडणाऱ्या मुलांना आपण जपायला हवं! त्यांना प्रोत्साहन द्यायला हवं. इतकं छान काही तो रुजवू पाहतोय, तेही ऐन विशी-बावीशीत!



# हनी

# आर्या कुलकर्णी

हनी म्हणजे मध. मधमाशादी इवलूल्या जीवांनी सुंदर फुलाफुलातून रसिकतेनं जमविलेला गोड रस. मधाळ, औषधी, गुणकारी असा. आणि हे अख्खं मधाचं पोळं कुणी रसिकतेनं पाहिलयं का? किती सुंदर रचना. भक्कम- गोड गुंतागुंत. तरी स्वतंत्र अस्तित्व. ती एकाग्र गुणगुण, ती एकी, ती चिकाटी एकाग्रतेनं पहावी नि हरखून जावं.

म्हणूनच हे गोड मध प्रत्येकाला आवडतेच. घरात औषधाला तरी असावे असे वाटतेच. मध ह्या शब्दावरुनच 'मधाळ' शब्द तयार झाला असावा. किंवा कधी -कोणी गोड दिसलं, हसलं तर मनोमन आपण अभिप्राय देऊन टाकतो, 'वा' काय मधाळ सौंदर्य आहे हे ! आणखी काही सामान्य दिसणारी माणसं मधाळ बोलतात, तेव्हा ऐकत राहावसं वाटतं. असा हा मधप्रवास अगदी प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा. खूप खूप प्रिय वाटणारा.

तर माझ्या जीवनात मध्यंतरी अशीच एक गोड 'हनी' नावाची चिमुरडी आली. तिची माझी भेट आमच्या वाचनालयात झाली. ती तिच्या मोठ्या बहिणीबरोबर आली होती. स्वाभाविकपणे या गोडशा मुलीला मी तिचं नांव विचारलं, तर ती म्हणाली, 'माझं नांव आर्या! पण सर्वजण मला 'हनी'च म्हणतात! मी तर आनंदलोच, वा काय छान

नांव आहे ग तुझं - 'हनी!'

हनीचं हे सुंदर नांव तिच्या रसिक वृत्तीच्या मावशीनं ठेवलं होतं. त्यांच्या कल्पकतेचं मोठं कौतुक वाटलं. चिमुरडी तर वाचनालयातून निघून गेली पण काळजात मात्र गच्च रुतून बसली. छान मुव्हड असला की मन हूम ऽ हूम करतं तसं मन आता हनी ऽ हनी करु लागलं.

यानंतर ही गोड मुलगी अशी-तशी कुठेकुठे भेटतच राहिली. टपोऱ्या डोळ्यांची, अवखळ केसांची, लाघवी बोलाची नि विलक्षण गोड स्वभावाची. मला ती आणि तिचं नांव असं सगळं 'असणं' आवडलं होतं. एकूणच गोड दिसणं आणि त्यास अत्यंत साजीरं नांव 'हनी'! माझ्या आनंदाचा ती एक भाग झाली होती.

यावेळी ती पहिलीत शिकत होती. मध्ये एक वर्ष गेलं. तशी दोन-तीनदा भेट झाली. मी तिच्याशी खूप जवळकीच्या नात्यानं बोललो. खूप आग्रहानं तिला थोडासा खाऊ घेऊन दिला. बस्स एवढंच. बाकी हनी आठवणीत मात्र पक्की होती. कुठलीही लहानखुरी मुलगी पाहिली की मला आठवायची ती हनीच!

आणि मग असंच कोणीतरी मला एकदा सांगितलं 'बाबारे, ती पोर तिच्या गावाकडे तुझी फार आठवण काढते. सर्वांना तुझ्या कवितेबद्दल सांगत असते. तिने तुला तिच्या घरी बोलवलय.' अर्थातच या छोट्याशा गोड मुलीला स्वत:चे मामा नव्हते. मी मनोमन आनंदाने तिचा 'मामू' झालो. 'हनीचा मामू!'

असंच एकदा सुटीत तिच्या गावी गेलो. तिचं घर आमची वाट पाहत होतं असं जाणवलं. छान स्वागत झालं. खेड्यातलं साधसं पण निर्मळ-आनंदी घर. मला माझ्याच बालपणीच्या अशा घराची आठवण झाली. छान जेवणं झाली. हनी इकडं-तिकडं करत होती. माझं सारं लक्ष तिच्यावर..

जेवण आटोपल्यावर मी हनीला म्हणालो, 'चल बाहेर फिरुन येउया. नि दोघंच निघालो. हनी तयारच होती. पण त्यावेळी मात्र मी छोटा

झालो नि हनी मोठी. तिने मला आपली शाळा दाखवली. ती शिकत असलेला दुसरीचा वर्ग दाखवला. रविवारचा दिवस म्हणून शाळेला सुटी असल्याने वर्ग बंद होता म्हणून तिला तिची बसायची जागा मला दाखवता आली नाही. ती खट्टू झाली मग मी म्हणालो, ‘कवींना आरपार दिसतं. मी पाहिलीय तुझी बसण्याची जागा’ तिला ते खरं वाटलं. लहान मुलांच विश्व किती निरागस असतं ना ?

वर्गाबाहेर बसून तिच्या विषयी, मित्र-मैत्रिणी बद्दल, सरांविषयी तिने माझ्याशी खूप गप्पा मारल्या. मी, अरे व्वा, छान, असं? म्हणून तिला दाद देत होतो. ती भरभरुन बोलत होती. मला ऐकण्यात गंमत वाटत होती. जणू मला माझं बालपणच पुन: छानसं भेटत होतं. खरच मुलांबरोबर खेळण्यासारखा दुसरा आनंद नाही.

भर उन्हात फिरतानाही मला उगीच प्रसन्न वाटत होतं. ती बोलक्या डोळ्यांनी मला काही-बाही सांगतच होती. मीही काही ऐकवत होतो. असं खूप कौतुकाचं- उत्सुकतेचं बोलणं सुरूच होतं.

नंतर आम्ही तेथील छानशा वाळूवर बसलो. पक्षी, प्राणी, झाड असे आकार वगैरे असलेले दगड माझ्या रुमालात आम्ही जमा केले. दगड जमविण्याच्या अनुषंगाने काही गप्पा झाल्या. घरी परततांना ती खाऊ घ्यायचं नाहीच म्हणाली. मग मी तिला चिकटकामाची एक वही, रंगीत खडू असं काही लेखन-साहित्य घेऊन दिलं. नि आम्ही घरी परत आलो. तिला ही गंमत आईला दाखवायची होती. तशी तिने तो दाखवली. माझं कौतुक केलं. ती खूप आनंदी दिसत होती.

आमचा दोघांचा हा बालिशपणा तिच्या आईने अगदी कौतुकाने वगैरे पाहिला. विंदांना ज्ञानपीठ मिळाल्याचा फोटो त्या वहीत आम्ही कापून चिकटवला. श्री गणेशा तर छान झाला. त्यावर विंदांचीच ‘देणाऱ्याने देत जावे...’’ही कविता मी लिहिली. ‘माझा छंद’ आजपासून वहीत! ती आता याच वहीत तिच्या आवडीची चित्रं वगैरे चिकटवणार होती. आणखी वेगवेगळे आकार असलेले दगड शोधून जमा करणार

होती. आपल्या वेड्या मामूला आठवणार होती नि याबद्दल मला हनीचं भरपूर कौतुक करायचं होतं.

शेवटी जड मनाने आमचे निरोपाचे हात हलले. तिच्या तेजस्वी, निरागस डोळ्यातला आनंद पाहून वाटलं- चला हा आनंद (मध) आपल्याला खूप दिवस पुरेल!' मधाइतकीच ही आमची एक गोड भाची नि मी तिचा एक भाग्यवंत मामू!

हनी आता नाशिकलाच राहायला आलीय. हायस्कूलमध्ये शिकते. मला ती किंवा मी तिला भेटत नाही. मोठी झालीय ना ती! पण मी? मी तर तोच आहे, तिचा वेडा मामू!

मधमाशांचं पोळं खाली झाल्यावर ते कसं केविलवाणं, उदाससं दिसतं, तसं मी या नात्याकडे पाहतो.

आमचे मार्गदर्शक, 'स्वप्नपंख'कार डॉ. राजेंद्र मलासे म्हणतात की, 'कालौघात नवनवीन नाती निर्माण होतात नि काही जुनी नाती आपोआपच विसर्जित होतात', पण मग माझ्यासारख्या आठवणींमध्ये गच्च गुंतणाऱ्या वेड्यांचं काय?



# इगतपुरीचा मनस्वी कवी
# **तुकाराम धांडे**

तुकाराम धांडे आणि माझी ओळख नेमकी कुठे झाली. हे मला अचूक स्मरत नाही. इतका तो साधा किंवा मी त्याला सुरुवातीला कॅज्युअली घेतलेलं. वेगवेगळ्या कविसंमेलनातून कविता वाचतांना काही ठराविकच कवी लक्षपूर्वक ऐकायचे, ह्या नियमाला मीही अपवाद नव्हतो. परंतु ते ९४-९५ चं साल असावं. नाशिक जिल्हा साहित्यिक मेळाव्यातलं कविसंमेलन होतं. म्हणजे ते मेळाव्याच्या आधल्या दिवशी असतच. तिथे मी आपली कविता वाचली. समोर चक्क कविवर्य आनंद जोर्वेकर! कवितेतला एक वजनदार माणूस. कविता वाचून खाली बसतांना माझ्या लक्षात आलं, की आपण घाईघाईने कविता वाचत असूनही आनंद जोर्वेकर मात्र आपली कविता मनापासून ऐकताहेत. कविता वाचून त्यांच्या मागे थोड्या अंतरावर जाऊन बसलो. प्रत्येक लहान-मोठ्या कवीची कविता सर लक्षपूर्वक ऐकत होते. योग्य ठिकाणी दाद देत होते. हे असं तब्बल चार एक तास! सरांची तीच बैठक तीच तंद्री.

त्यादिवशी मला कविसंमेलन 'ऐकणं'चा अर्थ उमगला. मनोमन मी खजील झालो. अंतर्मुख झालो. खरंतर उपस्थितात  कोण कोण होतं हे व्यवस्थितपणे पाहिलं तेव्हा ते जरा जास्तच जाणवलं. झोडग्याचे कमलाकर आबा देसले, मनमाडचे खलील मोमीन, अरुणा कुलकर्णी,

चंद्रकांत महामिने, पंढरीनाथ सोनवणी, आदममुल्ला बाबा, रेखा भांडारे, किशोर पाठक, अरविंद ओढेकर, असे कितीतरी मोठे कवी. त्यादिवसापासून कविसंमेलन 'ऐकणं' माझं खऱ्या अर्थाने सुरू झालं. कविसंमेलन सुरू असतांना होणारे तथाकथित विनोद, सूत्रसंचालनातील गमती, उगाचच बाहेर उभं राहून गप्पा-टप्पा वगैरे सारं काही बंदच झालं. त्याच कविसंमेलनात मला दोन कवी मित्र म्हणून मिळाले. त्यात एक होता धुळ्याचा युवा कवी हेमराज बागूल आणि त्यावेळी विशीपंचवीशीतलाच इगतपुरीचा तुकाराम धांडे!

हेमराज बागूलच्या 'आई' च्या कवितेला आनंद जोर्वेकरांनी त्यादिवशीचा (वर्षाचा) 'सर्च'! असे नाव दिले होते. सकाळ वृत्तसमुहातून हा कवी पुढे माहिती संचानालय, मुंबई येथे मोठ्या अधिकारपदावर जाईपर्यंत आम्ही दोघे छान मित्र होतो. तेव्हा निव्वळ स्वप्नाळू, उत्साही वाटणारा हेमराज पुढे खरोखरच बडा माणूस झाला! असो.

परंतु याच कविसंमेलनात इगतपुरीच्या एका साध्या राहणीमानाच्या कवीने मैफिल डोक्यावर घेतली होती. त्याचं नावं होतं 'तुकाराम धांडे!' पांढरा शर्ट, पांढराच पायजमा. पायात गावठी चप्पल. हातात वायरची पिशवी. रंग काळा-सावळा. केस मागे घट्ट वळवलेले. चेहऱ्यावर एक प्रसन्न हसू. त्याने कवितेचा फड जिंकला. त्याच्या कवितेला वन्समोअर मिळाला. परंतु पठ्ठ्या जोरदार कविता म्हणत सरळ खाली येऊन बसला. एखाद्या योद्ध्यासारखा! निखळ ग्राम्य देहबोलीचा हा कवी मला का कुणास ठाऊक पण जवळचा वाटला. मी त्याच्याकडे स्वत:हून मैत्रीचा हात पुढे केला. तर तुकारामने उलट माझीच व्हिकेट घेतली, ''अरे काय विवेक, मी चांगला ओळखतो ना बाबा तुला. तू माझ्यापेक्षा मोठा कवी आहेस!'' त्याच्या अभिप्रायाने मला चांगलंच कानकोंडं झाल्यासारखं वाटलं.

कारण तुकारामचं माईकपुढे दमदारपणे उभं राहणं. त्याची कविता त्याच्या स्वत:च्या आदिवासी बोलीत मनापासून पेश करणं, अधूनमधून

पॉझ घेत काही शब्दांचे अर्थ सांगणं, हशा-टाळ्या, वन्समोअर हसून स्वीकारणं आणि कविता सादरीकरणाचा एकूणच उत्तम असा नमुना पेश करण्याची त्याची लकब अत्यंत विलक्षण अशी आहे. तो येतो. तो पाहतो आणि तो जिंकतोच! हा अनुभव मी त्याच्या सोबतच्या प्रत्येक कविसंमेलनातून घेत आलो आहे. एकाही कविसंमेलनात त्याची कविता पडलेली किंवा फसलेली मी तरी पाहिली नाही. त्याच्या सर्व कविता मुखोदगत. वेगळा गावरान मेवा. तुकारामच्या कवितेनं वेड होऊन जावं, इतकं सारं अस्सल नि मिठ्ठास त्याच्या कवितेत नक्कीच आहे. आशय नि सादरीकरणांच एक बेमालूम मिश्रणच!  याच वेगळ्या आशयांच्या कवितेवर आणि सादरीकरणामुळे त्याला रामदास फुटाणेंनी एका कविसंमेलनात ऐकलं आणि सुरू झाला तुकारामचा लांब पल्ल्याचा प्रवास. मुंबई-पुणे फेस्टिवल, साहित्य संमेलनं, ना. सुशीलकुमार शिदेंच्या समोर, अरुण म्हात्रे, प्रकाश घोडके, अशोक नायगावकर, फ.मुं.शिंदे, सतीष सोळांकुरकर, सौन्मित्र, नलेश पाटील, महेश केळुस्कर अशा सर्व बड्या कवींसमोर-सोबत त्याने कविता पेश केल्याहेत. बाजी मारली आहे. त्यांची दाद मिळवली आहे. आजही संपूर्ण महाराष्ट्रातून तुकारामला कविसंमेलनात ‘निमंत्रीत कवी’ म्हणून सन्मानानं बोलावणं येतं. पंढरपूरच्या वारीला जावं, या श्रध्देनं तोही जातो. कविता गाजवून येतो. त्याचा तपशीलवार अहवालही मित्रांना देतो. परंतु यामुळे आपण कोणी मोठा माणूस आहे, हे तुकारामच्या गावीही नसतं. इतर मोठ्या कवींचं, तिथल्या रसिकांचं, आयोजकांचं कौतुक करण्यात त्याला धन्यता वाटत राहते.

निमंत्रितांच्या आणि आमच्यासोबत कविता म्हणण्यासाठी येतानाची त्याची तयारी कधी बदलत नाही. कपडे तेच साधेसे. मळकट पांढरे. हातात एखादी साधीशी पिशवी, त्याच वाहना. एरव्ही साधं दिसणारं त्याचं व्यक्तिमत्व कविता म्हणतांना विलक्षण फुलून येतांना मी अनेकदा पाहिलय. त्याचं अप्रूप वाटत राहतं.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील आंबेवंगण ह्या

अतिशय दुर्गम आदिवासी भागातून तो आलेला आहे. इगतपुरीच्या महिंद्रा कंपनीत तो सेवेत आहे. पण दोन दशकं सेवा पूर्ण करुनही त्याचं राहणं, वागणं जराही बदललेलं नाही. आदिवासींच्यातलं त्याचं राहणं इतकं स्वाभाविक आहे, की तुकाराम जणू काही त्या सर्वांचं अघोषित असं प्रतिनिधीत्वच करत राहतो. आपल्या गरीब माणसांचं दु:ख तो किती वेगळ्या पद्धीतीने मांडतो पहा.

**'दु:ख अशा खडकासारखं, की सुरुंगानही फुटना**
**डबक्यात बसली म्हईस, जशी जाग्याहून उठना!'**

तुकारामच्या कवितेला तिथल्या मातीचा अस्सल सुवास आहे. त्याच्या प्रतिमाही त्याच्या मातीतल्याच आहेत सध्याच्या राजकारणावरची त्याची अत्यंत गाजलेली कविता तर सर्वातोमुखीच झालेली आहे.

**'सध्या बाजारात गाढवांना भरमसाठ भाव आहे**
**गल्लीपासून दिल्लीपर्यंत त्यांचंच नाव आहे'**

कवितेचं एक सशक्त माध्यम हाती आलेल्या तुकारामला वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या माणसाचं दु:ख, त्यांच्या वेदना, त्यांची अवहेलना ताकदीने मांडायची असते. तो 'जगण्याच्या किमतीचं गणित मांडतो. महागाईवर तुटून पडतो. विश्वासघात करणाऱ्या व्यवस्थेला त्याला झोडपायचं असतं. **'आता विश्वास तरी कोणावं ठिवावा, का आपलाच कान चाचपडून पहावा?'** असं विलक्षण अंतर्मुख करणारं तुकाराम लिहित असतो. हे सर्व त्याच्या तोंडून ऐकतांना फार मजा येते.

मध्यंतरी त्याला मानाचा कविवर्य ना.वा. टिळक पुरस्कार मिळाला. या पुरस्काराच्या वेळी वनाधिपती विनायकदादा पाटील, उत्तम कांबळे आदी दिग्गज मान्यवर उपस्थित होते. तुकारामच्या कविता ऐकून विनायकदादांनी 'राजहंस प्रकाशनला' तुकारामचा संग्रह प्रकाशित करण्याचं सूचवलं. त्याप्रमाणे देखण्या रूपात 'वळीव' हा तुकारामचा संग्रह आला. आम्हा सर्व मित्रांना खरोखर आनंद झाला. तुकाराम नि राजहंस! छानच योग नकळत जुळून आला. त्या पुरस्कार वितरणात तुकारामच्या कविता

सादरीकरणाने, त्याच्या लकबीने आणि कवितेच्या दणकट आशयाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. त्यापूर्वी तुकाराम एक विनोदी कविता सादर करणारा कवी होता. मंचीय कवी होता. परंतु या कार्यक्रमानंतर खऱ्यार्थाने तुकारामच्या कवितेचा अभ्यास सुरू झाला. त्याची बोलीभाषा, त्याच्या प्रतिमा, त्याची प्रतीकं त्याचं वेगळेपण यांची दखल काव्यजगताला घ्यावी वाटली. तुकारामच्या कवितेत काय नाही. प्रेम आहे, दु:ख आहे, उपहास आहे, फटके आहेत, जिद्द आहे. आणि हे केवळ कल्पनेचं नाही. अनुकरणातून आलेलं नाही तर ते सारं सारं त्याच्या प्रत्यक्ष जगण्यातलं. स्वत: अनुभवलेलं नि संपूर्ण वेगळं! हो आजही तुकाराम वाड्या-वस्तीतच राहत असतो. त्यांच्यातच वावरतो. कला पदवीधर असूनही शिक्षणाची भिंत आपल्यासमोर तो उभी करत नाही. त्याला नाटकाचंही वेड आहे. नाट्यलेखनही स्वत:चं, स्वत:च्याच बोलीतलं. थकल्या-भागल्या माणसांच्या चेहऱ्यावर त्याला हसू फुलवायचं असतं. त्याचबरोबर त्यांना नवं काही कळत-नकळत छान समजाऊन सांगायचं असतं. त्यासाठी अपार मेहनत घेणं हे त्याचं आवडीचं काम. कवी वाहरु सोनवणेंसारखं गेली अनेक वर्ष तुकाराम आपलं हे काम अत्यंत आनंदानं आणि उत्स्फुर्तपणे करत आहे. एकाच वेळी तुकाराम हा खूप साधा वाटणारा माणूस असतो. तर वेगवेगळ्या निमंत्रितांच्या कविसंमेलनात त्याचं असणं कुणालाही अवाक करतं. त्याची कविता ऐकतांना हसवते परंतु तेव्हाच ती रसिकाला अंतर्मुखही करत जाते. तो ज्या सहजतेने आपल्या आदिवासी आणि कामगार बांधवांत राहतो त्याच सहजतेने तो व्हीव्हीआयपी पाहुण्यांच्या मांडीला मांडी लावून कविसंमेलनादी कार्यक्रम एन्जॉय करतो. त्याच्या कवितेची कच्ची वही मी प्रत्येक वेळा पाहतो. वाटतं तुकारामला एखादी छान डायरी घेऊन द्यावी कविता लिहिण्यासाठी! परंतु याच अशा वह्यांतून त्याने 'राजहंस'चा प्रवास केलेला आहे. हे मात्र मला विसरता येत नाही.

कवितेच्या पाऊलवाटमध्ये कितीतरी वेळा मी त्याच्या सोबत कविता

वाचल्या आहेत. साहित्यसंमेलनात, साहित्यिक मेळाव्यात व इतरही कविसंमेलनात आम्ही सोबत असतो. मात्र कवितेचं देखणं सादरीकरण, हशा- टाळ्या घेणं, कवितेची यशस्विता(!) अशा बिनमहत्त्वाच्या मुद्यावर त्याने मला एकदाही उपदेश वगैरे केलेला नाही. त्याने अभिप्राय दिले आहेत ते फक्त कवितेवर, तिच्या आशयावर आणि रसिकतेवर. एकूणच त्याचं बोलणं हे नेहमीच मनापासून असतं. जमिनीवरचं असतं. मला ते आवडतं. निफाडला राजेंद्र सोमवंशींच्या एका कविसंमेलनात आम्हाला घरी परतायला उशिर झाला. तुकाराम त्या दिवशी आमच्या घरी मुक्कामी होता. संध्याकाळी संपन्न झालेल्या कविसंमेलनात घरच्यांनी त्याची कविता ऐकलेली होती. त्यामुळे एक मोठा कवी आपल्याकडे आला आहे, याचं समाधान त्यांनाही वाटत होतं. थोड्या बहूत गप्पा मारून आम्हा झोपलो. पहाटे लवकर उठून तुकाराम मार्गस्थ झाला. मित्राचं मोठेपण एका वाक्यात सांगतांना मी वडिलांना म्हणालो, 'अण्णा, तुकाराम धांडेच्या 'वळीव' संग्रहात विनायकदादा पाटील यांनी त्याला अभिप्राय दिलेला आहे. 'आज स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब असते तर तुकारामची कविता डोक्यावर घेऊन ते महाराष्ट्रभर आनंदाने फिरले असते!'

स्व. यशवंतरावांबद्दल तीर्थरूप अण्णांना अतीव आदर. तुकारामच्या कवितेची उंची समजण्यासाठी हा अभिप्राय कुणालाही महत्वाचा वाटावा. अण्णांनी समाधानाने मान हलवली नि मला म्हणाले, 'तुझा मित्र एक कवी म्हणून तर निश्चितच चांगला आहे परंतु एक माणूस म्हणूनही त्याचं वागणं मला छान वाटलं!'

तुकाराम धांडेची कविता आणि स्वत: तुकाराम धांडे आवर्जून वाचावेत अशी त्याची कविता अस्सल, मनस्वी अशी चिज आहे. याचा अनुभव घेण्यासाठी तुकारामची एकतरी कविता आपण ऐकावी! अशी आग्रहाची विनंती मी आपणास करीन.



# नितळ जगणं
# **पुंडलिक मोरजे!**

उन्हाळ्यातील भर दुपारची वेळ. ऊन्हं मी म्हणतंय. तरण तलावाच्या बाजूनं काही कामानिमित्त मी सायकल मारीत चाललेलो. समोरून एक वृद्ध गृहस्थ रस्त्यावर फुटलेल्या काचा रस्त्याच्या कडेला उचलून टाकत होते. मी त्यांना नमस्कार केला.

'साहेब नमस्कार, काय चाललंय?'

तर चाललेलं मन:पूर्वक काम पुढे सुरूच ठेवत साहेब म्हणाले, 'कुठे काय? अशा काचा, दगड, पत्रा पायाखाली आला की लागलीच उचलून टाकतो. हं बोला!'

आता तुम्ही म्हणाल, 'यात काय विशेष?' वरकरणी पाहता यात विशेष काही नाहीच मुळी. विशेष आहे ते फक्त इतकंच, हे काचा उचलून टाकणारे साहेब होते पुंडलिक मोरजे. सेवानिवृत्त मुख्य अभियंता. साहित्य भूषण, वय वर्षे ७२ आणि हे सर्व असताना इतकं नितळ जगणं जगणारी पिढी आता संपत आहे, असं वाटलं.

मंत्रालय, मुंबईसारख्या ठिकाणी उपसचिव राहिलेल्या मोरजेंनी उभ्या आयुष्यात साधी सायकलही विकत घेतली नाही. आजही ते पायीच फिरतात. आपले पाय हेच माझं वाहन. गर्दीची कोंडी नाही आणि वरून तब्येतही कशी अगदी किप फिट! मोरजेंचं साधेपण हेच त्यांचं वैशिष्ट्य!

अमेरिकेची परदेशवारी असो आणि या दौऱ्यातच (कॅलिफोर्निया) आपल्या शोफरलाच (वाहनचालक) समोरचे लोक 'साहेब' कसे समजले किंवा नोकरीत असतानाचे अनुभव असो. मोरजे सांगतात इतक्या बारीक सारीक तपशीलाने आणि उत्साहाने की, त्यांच्या डोळ्यातले निखळ भाव पाहात रहावे.

बरं राहणंही इतकं साधं, की ओपन शर्ट, पॅंट, पायात जुन्या पध्दतीच्या कातडी चपला, हातात कापडी पिशवी. डोक्यावर कधी टोपी, केस मागे वळवलेले. पाहताना हा माणूस साधा सुधा वाटत असला तरी पाणीप्रश्न, नद्या जोडणी किंवा साहित्यावर आपली मतं नोंदवतो तेव्हा त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची प्रचिती यावी.

मोरजे मूळचे कोकणचे. मूळ गाव वेंगुर्ले. जि. सिंधुदुर्ग. प्राथमिक शिक्षण वि.स. खांडेकरांच्या शिरोडे गावात झालं. याच गावात मधु मंगेश कर्णिकांशी त्यांची ओळख-मैत्री झाली. ती आजतागायत टिकून आहे.

बरं शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाला की, सुटलो बुवा एकदाचं! म्हणून पेन्शन सोडून आपल्या कामात काय चाललयं इकडं लोक ढूंकून पाहत नाही. पण मोरजे त्यातले नाहीत, आजही ते सिंचनासारखी मासिकं नियमित वाचतात. पाण्याची उपलब्धता, नदी जोडणे प्रकल्प किंवा अभियांत्रिकी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन असो. मोरजेंचं ज्ञान अद्ययावत असतं आणि हे ज्ञान इतरांना देण्यासाठी ते प्रचंड आतुर असतात.

१८ मे १९५४ रोजी सौराष्ट्र शासनाच्या पी.डब्ल्यू.डी. विभागात ओव्हरसियरपदापासून सुरुवात झालेली शासकीय सेवा १९८७ साली थेट मुख्य अभियंतापदापर्यंत उंचावतच राहिली. ३१ मार्च १९८९ रोजी सेवानिवृत्त झालेले मोरजे म्हणजे खऱ्या अर्थाने 'असेट ऑफ डिपार्टमेंट' होते. परंतु पाटबंधारे विभागात माधवराव चितळेंइतकं प्रचंड काम ते उभं करू शकले नाहीत! हेही ते मान्य करतात.

कारण मोरजे हे एक बहुआयामी असं व्यक्तिमत्त्व आहे. शासन सेवेत असताना कार्यबाहुल्यात त्यांना लिहायला-वाचायला फार झालं नाही.

ते त्यांनी सेवानिवृतीनंतर धडाक्यानं सुरू केलं. स्वत:ही पुस्तकं विकत घेणं, वाङ्मयीन नियतकालिकांचं वार्षिक वर्गणीदार होणं, चार-पाच वाचनालयांचं सभासद होणं, असा सर्व तो सपाटा होता. जोडीला थोडंबहुत लिखाणंही सुरू होतं.

पुस्तक प्रदर्शनं, साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रप्रदर्शन, व्याख्यानमाला, कवी संमेलन असा कोणताच विषय त्यांना वर्ज्य नसे. जोडीला दूरदर्शन आणि आकाशवाणीचा रसास्वाद घेणं सुरू होतंच.

मग हा माणूस पुस्तकी किडा आहे की काय? असा कोणाला प्रश्न पडावा पण तसंही नाही. हा माणूस पहाटे ३॥-४ वाजता उठतो आणि कामाला लागतो. घरातली कामं सांभाळून मोरजेंनी संपूर्ण नाशिक पायी फिरून जवळून पाहिलंय. त्यांचे प्रश्न समजून घेतले. लोकांशी संवाद साधला आणि लोकांचे मूलभूत प्रश्न घेऊन मोरजे लिहिते झाले.

स्थानिक व प्रादेशिक वृतपत्रं, मासिकं, साप्ताहिके, दूरदर्शन, आकाशवाणी, शासकीय, निमशासकीय कार्यालयं, महत्त्वाच्या व्यक्ती, सुहृद अशा सर्वांना नियमित पत्र लिहिणं, त्यात आपलं म्हणणं मांडणं, ही मोरजेंची ओळख झाली. आजवर अक्षरश: हजारो पत्रं मोरजेंनी लिहून अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. फोडताहेत.

बरं, ही सर्वच पत्रे तक्रार स्वरूपाची नाहीत. यात साहित्यिकांना पाठविलेल्या पत्रांची संख्याही प्रचंड आहे. उत्तरादाखल कुसुमाग्रज, आर.के लक्ष्मण, विजय तेंडुलकर, इंदिरा संत, श्री.ना. पेंडसेंपासून ते विश्वास पाटील, मिलिंद बोकील, अनंत सामंत अशा आघाडीच्या लेखकांशी मोरजेंचा पत्रसंवाद आहे. शिवाय या यादीत नरेंद्र दाभोळकर, सदानंद वर्दे, मधु दंडवते असा चौफेर संबंध आहे.

निवृतीनंतर सुरुवातीला मोरजे प्रतिवर्षी साधारण ५०० पत्रं लिहायचे. गेल्या ४-५ वर्षात मोरजेंच्या पत्रांचा जावक क्रमांक पंधराशेच्या आसपास असतो. वर्षाकाठी चार-दोन नातेवाईकांना शुभेच्छा पत्रं लिहायची (नुसत्या पत्त्यापुरता, मायना छापील असतोच) म्हटली तरी आपल्या

काय जीवावर येतं? तिथं सत्तरी ओलांडलेले मोरजे वर्षाकाठी दीड हजार पत्रं कसे लिहीत असतील, हे एक थोरपण नाही का? वेगळेपण तरी नाही का?

या सर्व पत्रलेखनात त्यांचा किती वेळ, पैसा आणि श्रम खर्ची पडले असं वाटतं, पण मोरजेंना तो आपल्या आनंदाचा एक भाग वाटतो. 'हातांनी लिहिलेल्या पत्रांचा सुगंध काही वेगळाच असतो' असं मोरजे म्हणतात.

१९४८ साली वेंगुर्ल्याच्या शाळेतून विक्रमी (त्यावेळचे ७३%) गुण मिळवल्यावर मोरजेंनी ठरवलं होतं की, पोटापाण्यासाठी एखादी नोकरी व्यवसाय करूच, पण साहित्य सेवा ही आपण करायचीच. सेवानिवृतीनंतर का होईना मोरजे लिहिताहेत. झडझडून लिहिताहेत.

त्यांच्या विडंबन कवितांना खुद्द मंगेश पाडगावकरांनीही दाद दिली. किस्से मंत्रालयातील आणि शासकीय कार्यालयातील मोरजेंनी लिहिलेल्या पुस्तकांविषयी व.पु. काळे, वि.दा. करंदीकरांनी गौरवोद्गार काढले. कविता, परीक्षण, कथा, ललित, रोजनिशी असं त्यांचं लिखाणही सुरू असतं.

हे सर्व असताना तुमचा मूळ पिंड कोणता? असं विचारलं तर मोरजेंचा गोंधळ उडतो. ते म्हणतात की, 'मला लोकांच्या प्रश्नात रस आहे. वाहतूक सुरळीत व्हावी, लोकांनी नियमाप्रमाणे वागावे, केरकचरा करू नये, वाहनं कुठेही लावू नये, पाणी वाया घालवू नये, असं खूप काही वाटत राहतं आणि मी त्यावर मनापासून लिहीत राहतो. मी रसिक आहे, लेखक आहे, कार्यकर्ता आहे, असं खूप काही.

या कामांचा पाठपुरावा सातत्याने केल्यामुळेच स्व. दादासाहेब पोतनीसांनी माझ्या कामाची दखल घेतली. दै. देशदूत (इंग्रजी) मधूनही मी प्रश्नमालिका लिहिली आहे. नाशिक शहरातील अठरा जंक्शन रस्त्याचे डिझाईन मी दिले आहे के.के. कश्यप आयुक्त असताना माझ्या बऱ्याच कामांची दखल घेऊन ते मार्गी लागल्याचं समाधान मला आहे.

वाहतुकीच्या प्रश्नांवर सातत्याने लिहिल्यामुळे ट्रॅफिक ॲडव्हायझर्स कमिटीचा मेंबरही मला करण्यात आलेलं होतं. माझ्या दृष्टीने कोणतंच काम छोटं नसतं. हलकं नसतं. वयपरत्त्वे या कामाला मर्यादा आलेल्या असल्या तरी त्यात खंड मात्र पडलेला नाही. मोरजेंचा हात आणि आतला आवाज अजून शाबूत आहे.

कवयित्री इंदिरा संत आणि आर. के. लक्ष्मण यांच्या साहित्याचे अनुक्रमे इंग्रजी आणि मराठी अनुवाद या सर्व उद्योगात करायचे राहून गेले, याची खंत मोरजेंना आहे. त्यांच्या परवानगीची पत्रं मला आजही या कामासाठी खुणावतात; असं मोरजे म्हणतात.

तब्येत चांगली आहे. अजून हिंडू-फिरू शकतात. पण उतार वयात साहेबांनी आता आराम करावा असं त्यांच्या सौभाग्यवतींना वाटतं. पूर्ण आराम करणं मोरजेंच्या स्वभावात बसत नाही. आजही ते पहाटेच उठतात. स्वत:ची कामं स्वत: करतात. घरकामात मदत करतात. पत्रं लिहितात. फिरून येतात. नातवांना खेळवतात. विविध कार्यक्रमांना जातात आणि दिवसाला फक्त २०० पानं किमान वाचतात आणि तेही चष्म्याशिवाय!

कालपरवा मोरजे ज्योतीकलशमध्ये काव्य वाचनात दिसले. उत्साहाने कविता म्हणाले. सर्वांशी हसून बोलले आणि कार्यक्रम संपताच तुरूतुरू चालत पायीच घरी गेले. तेव्हा वाटलं, अरेच्या हा केवळ कविता लिहिणारा कोणी अधिकारी माणूस नाही. (उतार वयात स्वान्त सुखाय कविता लिहिणारे किती तरी लोक आहेत) पण हा तर कविता जगणारा एक नितळ, सच्चा माणूस आहे. लिहिणारे-वाचणारे आणि प्रश्न घेऊन उभे राहणारे असे खूप मोरजे आपल्याला हवे आहेत.

# गोष्ट : एका जिवंत विहिरीची



पंढरपूरची वारी करताना शेवटच्या टप्प्यात एक बाजीरावाची विहीर लागते. मध्यंतरी ही विहीर अतिक्रमणात येत असल्यानं, ती बुजवण्याची कार्यवाही सुरू असताना समस्त वारकरी 'जागे' झाले. ते या विहिरीच्या बाजूने भक्कमपणे उभे राहिले. विठूभक्तांचा हा रेटा विहिरीला बुजविण्यापासून वाचवू शकला, असे मी कुठेतरी वाचले होते.

..तर लोकहो, आपल्या नाशिकमध्ये अशीच एक जुनी विहीर आहे. १८७७ साली राणी अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेली. शक्य आहे की, नाशिकहून त्र्यंबकला जाताना साधू, संत, भाविक, वाटसरूंना रस्त्यात पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणूनच या विहिरीचे प्रयोजन असावे.

सर्व्हे नं.६४९ ब/३/१, त्र्यंबक रस्त्यावरील वेद मंदिराच्या जरा पुढे गेल्यावर मायको सर्कलच्या बाजूला इथं ही विहीर आहे. या ठिकाणी 'विहीर'आहे असं मुद्दाम कोणाला सांगावं लागत नाही.

कारण दिवसभर येथे पाणी भरण्यासाठीच्या टँकर्सची भलीमोठी रांग लागलेली असते. नळावर पाणी भरताना बायकांचा कचाकच भांडण्याचा आवाज मात्र येथे नाही. गर्द झाडीच्या सावलीत टँकर चालक, येथील चार-सहा मजूर माणसं आणि घराच्या आसपास असलेले विहीर मालक

एवढीच माणसं आपलं काम शांतपणे करीत असतात.

नाशिक-त्र्यंबक रस्त्याला लागून असलेली ही विहीर चार-दोन वर्षापूर्वी रस्त्यापासून चांगली आत वाटायची. पण गेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात सर्वच रस्ते रुंद झाले आणि भल्याभल्यांना आपले पसरलेले पाय आत घ्यावे लागले आणि मग अतिक्रमणातील घरं, दुकानं, टपऱ्या कण्हत, कुरकुरत का होईना मुकाट मागं सरकल्या.

अतिक्रमणाची ही टाच किंचित का होईना या विहिरीवरही आली. हो पण या जिवंत विहिरीला मागं कसं हटवायचं? मुख्य रस्त्यापासून १५० फूट अंतरावर असलेल्या या विहिरीचा अगदी किंचित-किंचित भाग अतिक्रमणात येत होता. विहीर मालकाला तशी नोटीस वगैरे आली, मात्र तसे काही झाले नाही.

त्र्यंबकेश्वर हे भारतातील एक प्रसिद्ध देवस्थान आहे. पूर्वीच्या काळी वाहनांची पुरेशी सोय नव्हती. बरेचसे भाविक पायीच देवस्थानाला जात. त्यावेळी या भाविकांची, पादचाऱ्यांची, त्यांच्या सोबत असलेल्या हत्ती, घोडे, उंट, बैलं, गुरं यांना पाणी पिण्यासाठी या विहिरीनं मोठ काम केलेलं आहे.

त्याचप्रमाणे नाशिक शहरात जे म्हणून सर्कसवाले, तमाशा कलावंत किंवा यात्रांच्या निमित्ताने उतारकरूंचा जथा त्यावेळेसच्या गावाबाहेर (१९७५ सालापर्यंत) त्र्यंबक रस्त्यावरील गोल्फ क्लब, सिव्हिल परिसर, उंटवाडी वगैरे परिसरात उतरायचा. या सर्व मंडळीचे पिण्याचे, वापराचे पाणी ही विहीर पूर्ण करीत असे. पुढे शहर वाढलं. नाशिक शहर महानगर झालं. गावात विविध सोयी-सुविधा आल्या. तशा गावातल्या बहुतेक जुन्या, निरुपयोगी विहिरी, आड, बावड्या गैरसोयीच्या वाटू लागल्याने बुजविण्यात आल्या. विहिरी होत्याच्या नव्हत्या झाल्या. लोकांच्या आठवणीतून त्या पुसून गेल्या.

त्यातून ज्या काही मोजक्या विहिरी वाचल्या. त्यात ही त्र्यंबक रस्त्यावरची विहीर १८७७ पासून अखंडपणे पाणी देते आहे. आजवर

ना या विहिरीचे पाणी कधी आटले, ना दूषित झाले, खारे झाले. ती छान झुळझुळत राहिली, उपसत, वापरातच राहिली. म्हणजे आज या विहिरीचं वय आहे साधारण १३५ वर्षे!



मुख्य म्हणजे शासनाला आणि विशेषत: नाशिक मनपाला जेव्हा केव्हा म्हणून पाण्याची आवश्यकता भासेल तेव्हा ही विहीर अगदी तयार असते. किंबहुना दुष्काळासारख्या परिस्थितीत आजवर या विहिरीने कितीतरींचे प्राण वाचविले आहेत. लोकांची तहान व गरज भागविली आहे.

या विहिरीला गोमुखा (गायीच्या तोंडासारखे) सारखे चारही बाजूने पाण्याचे नळ (स्त्रोत) आहेत. संपूर्ण कठीण दगडात ही विहीर असल्याने साहजिकच पाणी काचेसारखं स्वच्छ नि गोड आहे. या दगडामुळे पाणी विहिरीत छान साठून राहतं. वरती जमिनीचा थर असल्याने पंधरा फुटांवर सुंदर वीटकाम केलेलं आहे. केवळ ४०-५० फूट खोल असलेली ही 'पाणीदार' विहीर सततच्या उपशाने तळही स्पष्टपणे दिसावा इतकं नीतळ पाणी असलेली. त्यात चारही बाजूने कृत्रीमरित्या पाणी सोडावे तसे असणारे इथले नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत (नळ) पाहताना हरखून जायला होते.

शहरातील काही श्रद्धाळू, भाविक मंडळी दररोज या विहिरीला नमस्कार करून पुढे जातात. काही लोक विशिष्ट प्रसंगी येथील पाणी पूजा विधीसाठी घेऊन जातात. कारण ही विहीर पाच रस्त्यांवर आलेली आहे आणि या लोकांच्या मते अशी पाच रस्त्यावरची विहीर अत्यंत पवित्र समजली जाते.

या अंधश्रद्धेचा भाग थोडासा बाजूला ठेवून असं म्हणता येईल की, ही विहीर मोक्याच्या ठिकाणी असल्याने तिच्या उपयुक्ततेतून पवित्रता आली असावी. आणखी आपली रोजीरोटी म्हणून येथील टँकरवाले विहिरीची पूजा करतात. शुद्ध आणि सोयीने असल्यामुळे काही मंडळीचे गणपती विसर्जनही या विहिरीत होत असते.

हा सर्व श्रद्धेचा भाग पचवून ही विहीर प्रतिदिवस कमी अधिक पन्नासएक टँकर्स पाणी आपल्यातून देते आहे. रोज इतकं पाणी देणारी ही विहीर तिचं आयुष्य आणि स्थान पहाता कुणालाही श्रद्धस्थ करणारी आहे. विहिरीसारखी विहीर आहे. सव्वाशे वर्षाहून अधिक काळ पाणी देते आहे. मोक्याच्या ठिकाणी आहे. या गोष्टी तर सर्वसाधारण आहे. पण या लेखात ज्या गोष्टीविषयी लिहायचे आहे, ती गोष्ट सर्वच संवेदनशील मनांना अस्वस्थ करणारी आहे.

कारण मुळात ही विहीर पुण्यश्लोक राणी अहिल्यादेवींनी बांधलीय. त्या दृष्टीने ही विहीर एक ऐतिहासिक आणि पुण्यवान ठेवा मानावी अशी आहे. या विहिरीने आजवर तिचं तहान भागविण्याचं काम अत्यंत चोख पार पाडलेलं आहे. आजही यात कुठे जराही कसूर नाही.

परंतु अशा या मौलिक विहिरीचा किंचित (म्हणजे विहिरीच्या बांधकामाचा. रस्त्याच्या बाजूचा भाग) सुधारित शहर आराखड्याप्रमाणे अतिक्रमणात येतो आहे. तशा अर्थाची नोटीस विहीर मालक प्रवीण देवीदास कलाणी यांना मिळाली आहे.

नाशिक मनपा काय किंवा शासन यंत्रणा काय, शासकीय नियमाच्या अधीन राहून कोणतीही आवश्यक कार्यवाहीसाठी बांधील राहणार हे सत्य आहे.

विहिरीच्या पाणी उत्पन्नातून मिळणारं कलाणी कुटुंबियाचं उत्पन्नाचं साधन तर जाणार. शिवाय अनेक पिढ्यांपासूनची असलेली भावनिक गुंतागुंत अतिक्रमणामुळे जमीनदोस्त होणार. विहिरीवर काम करणारे ७-८ मजुरांचा हक्काचा रोजगार बुडणार, दररोज किमान पन्नास एक टँकर्स भरून मिळणाऱ्या कायमच्या पाण्याला मुकावं लागणार! ही विहीर मालकाची खंत आहे.

वास्तविक आपली महानगरपालिका ही विहीर संपूर्ण बुजवून टाकण्याचं म्हणत नाही. त्यांना फक्त विहिरीवर स्लॅब घालायचाय आणि त्यावर भविष्यात पदपथ करण्याची योजना आहे.

दुसरीकडे विहिरीतला गाळ काढणे, मोटार दुरुस्ती इत्यादी नेहमी कराव्या लागणाऱ्या तत्सम कारणांसाठी विहीर बंद करणं, विहीर मालकाला व्यवहार्य वाटत नाही. एकदा का स्लॅब पडला की विहीर गेलीच बुजून! अशी कलाणींना साधार भीती वाटते.

बरं ही विहीर पक्क्या पाषाणात असल्याने विहीर सरकवणे, नवीन (शेजारी) जागी विहीर पाडणे म्हणजे (नवीन विहीर खोदणे) विहीर पाडली तरी तिला पाणी लागणे याबाबतही काहीच खात्री देता येत नाही. कारण शेजारच्याच धामणकरांनी दहा फूट अंतरावर बोअर घेतला, पण पाणी लागलं नाही. खुद्द या विहिरीत अवघ्या चाळीस फुटांवर देवाची करणी नि नारळात पाणी असावं तसं तुडुंब पाणी आहे. ही वस्तुस्थिती आहे. वास्तविक विहिरीचं पाणी विकून त्यावर स्वत:ची गुजराण करणं स्वत: कलाणींनाही संकोच देणारं वाटतं. फक्त मूळ रस्त्यापासून तब्बल १५० फूट आत असणारी ही विहीर थोड्याशा कारणानं शासनाने का बुजवावी? असा कलाणींचा भावनिक प्रश्न आहे.

महानगरपालिका काय किंवा शासन काय कुणी व्यक्ती नाही. त्यांना कलाणींसारख्या खाजगी मालकांशी दोस्ती वा दुश्मनी असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. शासकीय नियमांच्या चौकटीत जी काही कार्यवाही होईल ती अपरिहार्य असेल आणि आज डोळ्यांना दिसणारी जिवंत विहीर उद्या एखाद्या जलपरीसारखी बंदिस्त होऊन जाईल इतकचं.

तरी मात्र प्रश्न उरतो तो जनसामान्यांच्या भावनेचा. की पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या हातची असलेल्या या विहिरीने आजवर कित्येक माणसं, पशु-पक्षी यांची तृष्णा भागवलीय. दुष्काळात अनेकांचं प्राण वाचवलेहेत. कलाणींसह कित्येकांची श्रद्धा असलेली ही जीवनदायीनी आजच्या रखरखीत दिवसांमध्ये वर्षाकाठी कमी अधिक २०,००० टँकर्स पाणी विविध कारणांसाठी देते आहे. त्यात वेळोवेळी शासनाच्या कामासाठी विहिरीने आपले योगदान दिले आहे.

या सर्व तांत्रिक, अतांत्रिक म्हणजे भावनिक मुद्दांचा विचार करता

असं वाटतं की, अतिक्रमणात फारशी बाधक न ठरणारी ही जुनी जाणती विहीर किंवा एक जिवंत पाण्याचा स्त्रोत फार तर शासनाने किंवा मनपाने अधिग्रहीत करावा आणि ही जीवनदायीनी विहीर 'मूळ' स्थितीतच ठेवावी. कारण एखादं शेत काय किंवा विहीर काय ही त्या मालकासाठी नेमकी काय असते, हे सांगणारी माझी 'विहीर' ही कविता आपल्यासाठी देतोय. विहीर कविता वाचल्यानंतर आपणही माझ्या भावनांशी सहमत व्हाल! अशी मला आशा आहे.

**विहीर**

माझ्या विहिरीची गाणी
गोड वाटे दुधावाणी...

तीन परस ग खोलं
भिजे अंतरीची ओलं
तिला देवळीचं मोलं
गोदाच दिसे नयनी...

आधी चालायची मोटं
आता इंजिनाची खोटं
तरी आनंदी हे बेटं
होई सुसह्य जगणी...

पाजता अमृत पान्हा
मळा फुले पुन:पुन:
जीव होतो वेडा कान्हा
अशी मधाळ करणी...

शत जन्माची पुण्याई
कसा होऊ उतराई?
विहीर ती झाली आई
करी सुखाची पेरणी.



# सत्यकथा
# **मोहनराव गायकवाड**

फलटण तालुक्यातील तरडगाव येथे एका शेतकरी कुटुंबात ‘मोहन’चा जन्म झाला. शेती सर्व जिरायती. त्यात आई-वडील वारकरी संप्रदायातले. भजन-किर्तनात रंगलेले म्हणून शेतीकडे दुर्लक्ष. भरीसभर म्हणून १९६७ सालचा दुष्काळ. मुलीचे लग्नही जमिनीचा एक तुकडा गहाण टाकून केलेलं. अशा प्रतिकूल परिस्थितीत लहानग्या मोहनने स्वत:चे शिक्षण कसे करावे? गरिबीचे चटके फक्त सोबत होते.

वयाच्या मानाने मोहनजवळ विलक्षण ‘समज’ होती. उपजत बुद्धी होती. काहीतरी करून दाखविण्याची प्रचंड जिद्द होती. शिक्षणापासून दूर जाणे झाले तर नशिबी फक्त हमालीच! या जाणिवेतून कष्ट उपसण्याची तयारी सुरू झाली. दुष्काळी कामांवर खड्डे खोदणे, माती वाहणे आदी कामे करताना कष्टाळू मोहनला विद्येचं आकर्षण न वाटलं तरच नवल.

शिक्षणाची एक-एक इयत्ता गिरवीत पुढे जाणे म्हणजे सहज सोपे कधीच नव्हते. अंग मोडून केलेल्या मेहनतीमुळे झोप कशी ती यायचीच नाही. भविष्याचीच काळजी लागलेला मोहन गरीबीचे चटके सोसत जीवनाकडेच एक ‘अभ्यास’ म्हणून पाहायला शिकला. हाताला घट्टे पडताना शिक्षणासाठी म्हणून एक हळूवार, नाजूक कप्पा हृदयात सतत साठवून ठेवला. साखरेचं भरलेलं पोतं इयत्ता सातवीतच पेलवणाऱ्या

मोहनची जिद्दही अफाट होती.

मोहनची शाळा आता फलटणला सुरू झाली. जेवणाचा डबा तरडगावहून यायचा. डब्याची वाट पाहता-पाहता बऱ्याचदा पहिला तास बुडायचा. त्या दरम्यान, कष्टाची अनेक कामे करताना वेगवेगळ्या लोकांचे उपदेश, काहींच्या शिव्या, अपमान यातून वाट काढीत मोहनने रात्रीचा दिवस करीत ध्येयाप्रद जगण्याचा प्रवास सुरू ठेवला.

शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही परंतु केवळ विद्यासंपादनासाठी सलग तीन वर्ष चोरून मोहन वसतीगृहात राहिला. फलटणच्या मुधोजी हायस्कूलचा विद्यार्थी मोहन एस.एस.सी. परीक्षेत फलटण केंद्रात दुसरा आला. त्यावेळेस मोहन सिमेंट पाईपच्या एका कारखान्यात तीन रुपये रोजाने काम करत होता. गाडगे महाराजांचे संस्कार मानणाऱ्या मोहनला कोणत्याच कामाची कधीच लाज वाटली नाही. कोणतच काम कधी हलकं-भारी नसतं. असंच त्याला वाटे.

कष्टांचा प्रवास संपलेला नव्हता. सुट्टीत मिळतील ती कामे करणे सुरूच होते. स्वत:ची पुस्तके नसल्यामुळे पहाटे लवकर उठून इतरांची पुस्तके वाचून आपण शिकलो. पास झालो, आता थांबणे नाही. ही जाणीव कार्यप्रवण ठेवण्यासाठी मोहनची धडपड सुरूच होती. नंतर पुढील शिक्षण सांगली येथील शांतीनिकेतन महाविद्यालयात सुरू झाले. सरकारी शिष्यवृत्ती व सवलतीद्वारे शिक्षण पुढे चालू राहिले. दरम्यान, महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा आवडता विद्यार्थी होण्याचं भाग्यही मोहनला लाभलं. आपल्या सरांप्रमाणे अमोघ वक्तृत्वाचे धडे मोहनने येथेच गिरवले. सरांचा मोठा आदर्श डोळ्यांसमोर 'याचि देही याचि डोळा' दररोज अनुभवता येत होता.

पुढे कऱ्हाड येथील सरकारी औषध निर्माण महाविद्यालयात प्रवेश घेऊन मोहनने बी.फार्मसीची पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. अभ्यासाबरोबरच वक्तृत्वकला जोपासना सुरूच राहिली. प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्राचार्य पी.के. पाटील, डॉ. सुमन पाटील यांना गुरुस्थानी मानून

ज्ञानाची शिदोरी बांधली. कष्टप्रद शिक्षणातूनच ध्येयपूर्तीच्या दिशेने मोहनचा प्रवास सुरू होणार होता.

आता मोहन व्यवहारी जगात झेपावण्याच्या तयारीत होते. बी. फार्मसीची पदवी, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांचा अनुभव यामुळे अफाटशा मुंबईतही नशिब काढण्यासाठी तो पोहचला. मोहनचे अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्व व त्याच्या गुणांची योग्य ती पारख होऊन 'जॉन्सन अँड जॉन्सन'सारख्या नामांकित कंपनीत 'ॲप्रेंटिस'म्हणून सेवेची सुरूवात झाली. तेथे काम करताना मोठा सहकारीवर्ग मोहनला मिळाला.

पुढे बंगलोरच्या मायको लॅबमध्ये संधी मिळाली. तेथेही आपल्या कर्तृत्वाने कंपनीचा करोडो रुपयांचा फायदा मोहनने करून दिला. कंपनी मालक सोडण्यास तयार नसताना तो पुन: महाराष्ट्रातील एका उगवत्या औद्योगिक वसाहतीत रूजू झाला.

आणि, एकेकाळी खड्डे खोदणारा, माती वाहणारा, झाडू मारणारा, हमाली करणारा गरीब शेतकऱ्याचं पोर यशस्वी असा प्रशासक व उत्तम वक्ता म्हणून नावारूपास आला. त्याच मोहनचे नाव 'मोहनराव गायकवाड!'

मोहनराव गायकवाड यांचा 'मोहन' असा एकेरी उल्लेख करत सांगितलेला जीवनानुभव खरोखरी विलक्षण आहे. त्यातला शब्द न शब्द अक्षरश: खरा आहे. जिद्द व चिकाटी असेल तर माणूस कुठे पोहचू शकतो त्याचं सुंदर उदाहरण म्हणून 'मोहनची' ही सत्यकथा! एक खरीखुरी हकीकत.

उमलत्या वयात केलेले कष्ट व श्रमाची लाज नाही. असलाच तर रास्त अभिमान आहे. परंतु या वाटेवरून सुखाची हिरवळ दिसताच हवेत तरंगणे नाही. सिन्नर जवळील माळेगाव येथील शासकीय औद्योगिक वसाहतीत कॅम्लीन उद्योग समूहात लिव्हा फार्मा लिमिटेड ह्या कंपनीत आज ते 'सरव्यवस्थापक' म्हणून कार्यरत आहेत.

कॅम्लीन समूहातील लिव्हा फार्मा लिमिटेड ही कंपनी कॅम्लीनच्या नावाला व परंपरेला साजेशी आहे. माळेगाव औद्योगिक वसाहतीत

सर्वप्रथम आलेली व लोकादरास प्राप्त झालेली ही कंपनी १९९३ साली सुरू झाली अनेक स्थानिक व प्रकल्पग्रस्त बेकार तरुण-तरुणींना या कंपनीने नोकरीची संधी दिली. एवढंच नव्हे तर अनेक अपंग, विधवा व परितक्त्या महिलांनाही संधी देऊन स्वावलंबी बनवले. गरीब गरजूंना संधी दिली. कामाचे व स्वच्छतेचे प्रशिक्षण दिले. शिस्त, स्वच्छता, टापटीप ही या कंपनीची वैशिष्टये आहेत. यामध्ये मोहनराव गायकवाड यांच्यासारख्या कुशल व्यवस्थापक आणि त्यांचे निष्ठावंत सहकारी या सर्वांच्या मेहनतीतून औषध निर्माण क्षेत्रामध्ये तसेच जनमानसातही या कंपनीने मानाचे स्थान मिळवले आहे.

या सर्व प्रगतीत मोहनरावांचे संयमी नेतृत्व, अनुभव आणि प्रोत्साहन आहेच. खर्चात काटकसर, उत्पादनात वाढ आणि गुणवत्ता राखण्यात ही कंपनी यशस्वी ठरली आहे. एक आदर्श कारखाना म्हणून तिचा नावलौकिक तर आहेच शिवाय गत सहा वर्षांत कुठलीही संघटना नाही. कलह नाही, 'ही कंपनी आपली आहे!' ही भावना कामगारांमध्ये दिसून येते.

कोणत्याही कंपनीचा सरव्यवस्थापक म्हटला की तो कुणीतरी दूरस्थ, सोफिस्टीकेटेड आणि आत्ममग्न असलेला माणूस, असं चित्र दिसून येतं. परंतु मोहनरावांचं तसं नाही. ते कुणालाही आपलाच माणूस वाटावेत! इतकं मोकळं-ढाकळं बोलतात. वागतात. प्रत्येकाची सुख-दुःख समजून घेणं त्यांना आवडतं.

शिवाय प्राचार्य शिवाजीराव भोसलेंचा लाभलेला सहवास, संस्कार यामुळे सभा, व्याख्यानं, कविसंमेलन, नानाविध कार्यक्रमांना मोहनरावांची उपस्थिती हमखास जाणवते. आपल्या पदामुळे निव्वळ व्यासपीठावरून न मिरवता एक रसिक श्रोता म्हणूनही त्यांची उपस्थिती नजरेत भरते. एक उत्साही, दिलखुलास आणि उमदं व्यक्तिमत्व म्हणून सर्वांना त्यांची ओळख झालेली आहे.

मुळात गायकवाड साहेब स्वत: एक उत्तम साहित्यिक आहेत, कवी

आहेत. आपल्या व्याख्यानात, मनोगतात शीघ्र कविता पेरणं त्यांना सहज साधतं. उत्तम वाचन व लेखनातून एक अमोघ वक्तृत्व त्यांनी आत्मसात केले आहे. 'व्याख्याता' म्हणून विविध संस्था, शाळा, कॉलेजातून त्यांना बोलावणे असते. मातृभाषेबरोबरच इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेवरही त्यांचे चांगले प्रभुत्व आहे. ज्ञानेश्वरीवर कीर्तन करणंही त्यांना साधतं. जायंट्स ग्रुपसारख्या विधायक कामे करणाऱ्या संस्थेतही आपण काम करावं असं त्यांना वाटतं.

श्री. दांडेकर यांच्यासारख्या मराठमोळ्या कॅम्लीन उद्योग समूहाच्या विकासात 'मोहनराव' एक मानबिंदू ठरले आहेत. उत्तम व्यवस्थापन तज्ज्ञ म्हणून आणि घरचे एक स्नेही म्हणूनही दांडेकर त्यांचा आदर करतात. क्वॉलिटी एक्सलन्स ॲवार्ड मिळवून कंपनीला त्यांनी गुणवत्ता मिळवून दिली तशीच गुणवत्ता आपल्या आयुष्यातही असावी! असा मोहनरावांचा प्रयत्न सतत सुरू असतो.

अतिशय खडतर अशा परिस्थितीला कष्टपूर्वक सामोरे जाऊन त्यांनी परिस्थितीवर विजय मिळवला. निव्वळ गुणवत्तेवर एका चांगल्या कंपनीत सरव्यवस्थापक होणं. सजग जाणिवेतून स्थानिक, गरजू, विधवा, परितक्त्या, अपंग, निराधारांना रोजगारात अग्रक्रम दिला. साहित्यिक व्यासंगही रसिकतेने जोपासला. स्वत:ची ओळख सरव्यवस्थापकाच्या पदाबरोबरच प्रामाणिक, कष्टाळू, अजातशत्रू, ध्येयवादी, कर्तृत्ववान आणि सज्जन अशी निर्माण केली.

'ही सर्व कथा वाचून यातून एक जरी 'मोहन समाजातून उभा राहिला तर मला ते हवं आहे!' ही आहे मोहनराव गायकवाड यांची जिद्द! म्हणून असा एक विचार मनात आला की मराठीच्या पाठ्यपुस्तकात एखादा धडा असावा का आपल्या 'मोहनराव गायकवाड यांचा!'

## उद्याचा मोठा पत्रकार
## **सागर पांढरे !**



नाशिकच्या रचना विद्यालयात इयत्ता सातवीत शिकणारा सागर पांढरे हा मुलगा 'उद्याचा मोठा पत्रकार माणूस आहे!' असे विधान मी केलं तर खुद्द सागरला ओळखणारे त्याच्या शाळेतील मुलं, मित्र, त्याचे शिक्षक, परिचित, नातेवाईक यांनाही ही माझा मुद्दा (विधान) पटायला वेळ लागावा आणि एक अर्थी हे मत बरोबरही आहे. इतकं साधं, सोपं, संयमी आणि मृदू असचं सागरचं वागणं-बोलणं आहे.

आता तुम्ही म्हणालं, सागर आज खरोखरी काही लिहाय-बिहायला लागलाय का? तर या प्रश्नाचं उत्तर आहे. अगदीच थोडं! म्हणजे सुरुवात झालीय  इतकंच. आज तर अभ्यास, वाचन यामुळे सागर फार काही लिहित नाहीए. मध्यंतरी त्याच्या स्वानुभवाचे चार-दोन लेख वृत्तपत्रातून वगैरे प्रसिद्ध झाले आहेत. म्हणजे सागर लिहू शकतो आणि चागलं लिहू शकतो! याचे ते लेख म्हणजे एक झलक (नांदी) होती.

म्हणून माझं हे विधान थोडं धाडसाचं असेल. परंतु सागरचं एकूण व्यक्तिमत्व समजून घेतल्यावर आपणही माझ्याशी सहमत असाल असा मला दावा करता येईल.

त्याचं असं झालं सागरला मी पाहतो आहे तेव्हापासून, त्याचं वयाच्या मानानं काहीस स्थूल शरीर. परंतु एखादं दुसऱ्यावेळी सागरला

भेटल्यावरही लक्षात राहावेत असे त्याचे निरागस डोळे, अत्यंत भाबडा-चेहरा, लाघवी बोलणं कुणालाही अगदी छान वाटावं, असं हे सर्व. म्हणजे असं पाहा, सागरचं त्याच्या आईसोबत वाचनालयात येऊन पुस्तकं शोधणं-निवडणं असेल. कुठल्याशा वक्तृत्व स्पर्धेत आपले इतरांपेक्षा पूर्णपणे वेगळेसे विचार संयतपणे मांडणं असेल. लेखक आपल्या भेटीला किंवा त्याच्या शाळेतील त्याचा दैनंदिन वावर असेल. सागर इतर मुलांपेक्षा निश्चितच वेगळा आहे. वयाच्या मानाने कितीतरी अधिक प्रगल्भ आहे. तयारीचा आहे हे जाणवल्याशिवाय राहत नाही.

लेखाच्या अनुषंगाने सागरच्या आईशी मी बोललो तर त्यांनी सागरच्या साधेपणाविषयी आणि विविध कलागुणांविषयी प्रसन्नपणे माहिती दिली. त्यात सागरच्या वृत्तपत्रांतील लेखांची कात्रणं, सागरच्या गायन, वक्तृत्व, निबंध स्पर्धांची प्रमाणपत्रं, दरवर्षीची अभिनंदनाचा शिक्का असलेली गुणपत्रकांची फाईल दाखविली. मी ती कौतुकाने पाहिली.

प्रशस्तीपत्रकाच्या भल्या-भक्कम फाईली आजवर मी खूप पाहिल्या, पण इतकं सर्व खणखणीत नाणं असल्यावर बहुतेक मुलं शेफारतात, लाडावतात, स्वत:वर खुश असतात. (फुकटचा भास मारतात) परंतु आपला हा सागर, शांत, नम्र डोळ्यांनी इनोसन्टली पाहतो ना तेव्हा खरचं या पोराचं केवळ कौतुकच वाटतं. सागरच्या या फाईली पाहून झाल्यावर मी थेट त्याच्याशी गप्पांनाच सुरुवात केली. अपेक्षेप्रमाणे सागर पक्का वाचणारा निघाला. मुळात सागरची आजी नीला चंद्रकांत पांढरे, आई लीना पांढरे या स्वत:च भरपूर लिहिणाऱ्या-वाचणाऱ्या असल्याने त्यात सागरच वाचणं! साहजिकच होतं. वाचता यायला लागलं तेव्हापासून सागरचं अवांतर वाचन सुरू झालं. किशोर, चांदोबा, ठकठक, चंपक आणि अशीच कितीतरी छोट्याच्या गोष्टीची पुस्तकं पुष्कळच वाचून झाली. आताशा सागर इंग्रजी कॉमिक्स, स्टोरीज वगैरेही वाचतोय. हॅरी पॉटरची पुस्तकंही सागरच्या आवडीचा एक भाग. सागरच्या वयातली खूपशी मुलं ही सर्व पुस्तकं वाचतंच मोठी होतात, पण आज सातवीत

शिकणाऱ्या सागरने एवढाशा वयात एक होता कार्व्हर, अग्निपंख, श्रीमान योगी, अब्राहम लिंकनचं चरित्र, महात्मा गांधीजीचं सत्याचे प्रयोग किंवा आत्मकथा, साने गुरुजींची शामची आई आणखी अशीच काही उत्तमोत्तम पुस्तकं मन:पूर्वक वाचून घेतलीय. टाकली नाहीत. म्हणजे या पुस्तकातलं चांगलं काय, घेण्यासारखं काय यावर सागर भरभरून बोलतो. एकूणच ही काही पुस्तकं ज्या संवेदनशील मनांच्या माणसांनी वाचलीय. त्या माणसांच्या वागण्या-बोलण्यात जी एक नम्रता दिसून येते ती सागरच्यात मला दिसून आली. 'सत्याचे प्रयोग'च्या अनुषंगाने सागरला विचारलं तर बापूंविषयीचा आदर-प्रेरणा सागरकडून ऐकताना खूपच सुखद वाटलं, की शामची आई नि सत्याचे प्रयोग ज्या कुणी इतके समरसून वाचले असतील ती कुणीही भविष्यात बिघडण्याच्या सर्व शक्यता संपूर्ण संपून गेलेल्या असतात. सागर आज त्याच्या शाळेचा पर्यावरणमंत्री आहे. यावर्षी त्याच्या चमूने शाळेच्या परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबवलाय. शाळेतल्या वक्तृत्व मंडळाचा तो अध्यक्षही राहिलेला आहे. नियमित स्वअभ्यासाबरोबरच स्थानिक दोन वृत्तपत्र आणि मराठी माध्यमातून शिकत असतानाही सागरचं टाईम्स ऑफ इंडिया वाचणं चुकत नाही. त्यामुळे शाळेत महिन्यातून कधी एखादी बातमी सांगण्यापुरता. तीही पालकांच्या मदतीने. संबंध येणाऱ्या इतर मुलांपेक्षा सागरचं करंट अफेअर्सचं ज्ञान अद्ययावत असतं. त्यावर सागर आपलं स्वत:चं मत नोंदवू शकतो. चर्चा करू शकतो. इतका जाणीवपूर्वक अभ्यास त्याचा सुरू असतो. अमेरिका-इराक युद्ध असो, भांडारकर प्राच्य विद्या मंदिरावरील हल्ला असो, इराणमधील प्रलयंकारी भूकंप असो, देशभर गाजत असलेला मुद्रांक घोटाळा असो, कुंभमेळा असो सागरला या सर्वाबद्दल जवळून माहिती असते. कारण टाईम्स ऑफ इंडिया आणि इतर महत्त्वाच्या पेपर्सचे अग्रलेख वाचणं सागरचा दिनक्रम आहे. मला सांगा, इतक्या लहान वयात किती मुलं असे अग्रलेख वाचून स्वत:ची मतं बनवत असतील. या चौफेर वाचनातून सागरचं एक स्वतंत्र व्यक्तिमत्व

आकार घेतयं, हे निश्चित.

सागरचं गणित उत्तम आहे, तसं व्याकरणही उत्तम आहे. चांगला पत्रकार होण्यासाठी मराठी-इंग्रजी वाचन, ग्रंथवाचन, चांगले कार्यक्रम पाहणे-ऐकणे, सतत शिकण्याची तयारी नि ध्यास यामुळे अभ्यासात तो पहिला असतोच. शिवाय व्यक्तिमत्त्वही शिस्तशीर असावं! असं त्याला वाटतं.

शाळेत जसा तो हुशार, नम्र विद्यार्थी आहे. तसा घरातही त्याच्या आईसाठी तो 'शाम' असतो. घरातील छोटी मोठी कामं असतील, ओव्हरस्मार्ट अशा छोट्या भावंडाला (साहिरला) खेळवणं असेल. सागरला या कामामध्ये पुरेपूर उत्साह असतो. निखिल पवार आणि विक्रांत मेतकर या शाळेतील दोस्तांबरोबरच त्याने मैत्री केलीय. त्याविषयी विचारलं तर सागर म्हणाला, तसा सर्व वर्गच माझा मित्र आहे. पण ही दोन मुलं हुशार नि प्रामाणिक आहेत. आम्ही तिघे एकमेकांना जिवाभावाच्या गोष्टी सांगतो. चांगलं वागण्याचं ठरवतो. वर्गातील गरीब मित्रांना खेळायला घेणं, डबा खाताना सोबत घेणं, असं समजूतदार ते ते सागर आवर्जून करतो.

पूज्य महात्मा गांधी, साने गुरुजी, निर्भिड पत्रकार बरखा दत्त, अपर्णा वेलणकर, सागरची आई लीना पांढरे त्यांच्या शाळेतील शिक्षक पुरुषोत्तम ठोके (जागल्याकार), शिक्षिका शेलारबाई ही काही सागरची आदर्श व्यक्तिमत्त्व. तिसरीपासून सतत पहिलाच आणि ९२ ते ९८ टक्के गुण पटकावणाऱ्या सागरला मोठेपणी 'पत्रकार' व्हायचंय! पत्रकार हा जगाच्या नकाशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असतो. त्याला सर्व जग थेट जवळून पाहता येतं. दु:खितांच्या दु:खाला, अन्यायाला वाचा फोडून लोकांचं जगणं अधिक सुसह्य करण्यासाठी मला पत्रकारच व्हायचंय! हे सागरचं ठाम मत ऐकताना सागरला त्या क्षणीच उत्स्फूर्तपणे 'बेस्ट लक' देऊन टाकला.

वृतपत्रात येणाऱ्या अप्रिय बातम्यांनी त्याचं हळवं मन व्यथित होतं.

तरी पत्रकार माणसं समाजात जे स्फुलिंग जागवण्याचं काम करतात, त्याचं सागरला प्रचंड आकर्षण आहे. मोठेपणी इंजिनिअर, डॉक्टर इत्यादी होण्यापेक्षा पत्रकारासारखं सतत आव्हानांना सामोरं जावं लागणारं थ्रिलिंग क्षेत्रच इयत्ता सातवीत शिकणाऱ्या अतिशय हुशार नि अभ्यासू, स्वतंत्र विचाराच्या सागरला खुणावतंय. लोकशाहीचा एक प्रमुख स्तंभ असलेल्या पत्रकारितेत सागरसारखी ध्येयवेडी गुणी मुलं आली, तर उद्याचं जग अधिक सुरक्षित नि विचारशील असेल!

निर्भिड पत्रकाराच्या डोळ्यातली चुणूक सागरच्या डोळ्यात आजच दिसते आहे. त्यादृष्टीने त्याचं अभ्यास, चिंतन, वाचन सुरू आहेच. मनाची तयारी तर आहेच आहे. आई-बाबांची साथ आहे म्हणून मी खात्रीनं म्हणू शकतो की सागर पांढरे हा उद्याचा मोठा पत्रकार आहे!

अर्थात वडाची झाडं एका रात्रीत मोठी होत नाही. आपल्या विचारांची मूळ अधिक घट्ट करण्यासाठी प्रचंड मेहनत घेण्याची उमेद बाळगून असणाऱ्या पत्रकार सागरची आपण प्रतीक्षा करूया!

मध्ये चांगली साताठ वर्षे गेली. पुस्तकाच्या निमित्ताने मी सागरच्या आईला फोन केला. तेव्हा सागरविषयी मी जाणून घेतलं की, बारावीत फर्स्ट क्लास विथ डिस्टिंक्शनचे मार्क्स पडूनही सागर ठरवून इंजिनीअरिंग, मेडिकलला न जाता पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिकतोय. नाट्य, कलाक्षेत्र गाजवतोय. विद्यापीठात टॉपर वगैरे आहे. संपूर्ण विद्यापीठात पहिला आलेला सागर केवळ अभ्यासातच गुंतून न राहता 'एड्स'च्या विषयावर भरपूर काम करतोय. त्यानं लिहिलेलं एड्सवरचं नाटक व्यावसायिक रंगभूमीवरही आलेलं आहे. आणखी सामाजिक कार्यातही त्याचा उत्स्फूर्त सहभाग असतो. माहीत नाहीय. पुढे तो नक्की कोण होणार? कुलगुरू, प्राध्यापक, संशोधक, समीक्षक, पत्रकार असंच त्याचं क्षेत्र असेल, पण एक चांगला 'माणूस' होण्याच्या दिशेनं त्याने आपली मुळं घट्ट केली आहेत. हे अगदी नक्की!

# पाठराखण

विवेक उगलमुगले हे मुळात कवीप्रकृतीचे आहेत. परतुं कवितेबरोबरच त्यांनी गद्यलेखनही विपुल केलेलं आहे. उमलत्या वयात छात्रभारती, विद्यार्थी चळवळ आणि पुढील आयुष्यात साहित्य तसेच वाचक चळवळीशी त्यांची नाळ घट्टपणे जुळली! यातूनच कितीतरी साधी नि थोरही माणसं त्यांना जवळून पाहता आली. त्यामुळेच सामान्य माणसातलं असामान्यत्व पाहण्याची एक विलक्षण दृष्टी त्यांना लाभलेली आहे.

'शोध माणूसपणाचा' या संग्रहात अशीच काही नामवंत आणि बरीचशी बिनचेहऱ्याचीही माणसं आहेत. त्यांच्यातील चांगुलपणा शोधून त्यांच्यावर मन:पूर्वकतेने लिहिताना उगलमुगलेंची लेखणी थकत नाही.

मुख्य म्हणजे या सर्व लेखनाचा बाज अत्यंत साधा तरीही मौलिक असा आहे.

**विजयकुमार मिठे**
**संपादक, कादवा शिवार**

# परिचय

**नाव : विवेक चिंतामण उगलमुगले**

पत्ता : 'सुशेय', प्लॉट नंबर ४२, खुटवडनगर, कामटवाडे, नाशिक : ४२२००८.

भ्रमणध्वनी : ९४२२९४६१०६

जन्मतारीख : १९ फेब्रुवारी १९६६

शिक्षण : वाणिज्य पदवीधर

**प्रकाशित साहित्य :**

- दिवाण्या आणि तोड्या
- दाट सायीचे गाव
- हॅपी होम
- सायकलवरच्या कविता
- प्रिय आई बाबांच्या शोधात
- रोजनिशी एका चिमुरडीची

**पुरस्कार**

- 'दिवाण्या आणि तोड्या' या काव्यसंग्रहास विदर्भ साहित्य संघाचा पहिला राज्यस्तरीय लोककवी डॉ. विठ्ठल वाघ गौरवार्थ तिफन पुरस्कार.
- 'दिवाण्या आणि तोड्या' या काव्यसंग्रहास सा. गोदाकाठ संस्थेचा गोदाभूषण पुरस्कार.
- 'दिवाण्या आणि तोड्या' या काव्यसंग्रहास कोकणादेवी निफाडचा वैनतेय पुरस्कार
- 'दाट सायीचे गाव' व 'हॅपी होम' यास सावाना नाशिकचा कै. लक्ष्मीबाई टिळक बालवाङ्मय पुरस्कार.
- 'दाट सायीचे गाव' या बालकविता संग्रहास वाङ्मयसेवा पुरस्कार
- कवी गोविंद पुरस्कार प्रथम पुरस्कार
- 'सायकलवरच्या कविता' या संग्रहास अंकुर मराठी साहित्य संघ, अकोला यांचा स्व. केशवराव चुटके काव्य पुरस्कार
- 'सायकलवरच्या कविता' या संग्रहास कविवर्य नारायण सुर्वे काव्य पुरस्कार
- 'रोजनिशी एका चिमुरडीची' या बालकविता संग्रहास कोल्हापूरचा बालकुमार साहित्य सभेचा पुरस्कार